# विविध लेखसंग्रह

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १५२०
१६६

— लेखक —

श्रीबाबाजीमहाराज पंडित

★

REFBK-0013758

माघ वद्य चतुर्थी शके १८८६

तीन रुपये

**प्रकाशक–श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत
सांप्रदायिक मंडळातर्फे**

**सचिव–रावसाहेब ना. र. केकरे,**
B. A., LL. B. ॲडव्होकेट,
मु. पो. हरदा (म. प्र.)

**सदस्य–श्री ज्ञानेश्वर उद्धव मांढरे,**
१२८ रास्तापेठ, पुणें नं. २.

प्रथमावृत्ति
माघ व।। ४
शके १८८६

७५
१९६४

★

या ग्रंथाचे सर्व प्रकारचे हक्क श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळाचे स्वाधीन.

मुद्रक –
**वि. ना. वाडेगांवकर**
उद्यम कमर्शियल प्रेस,
नागपूर १.

# विविध लेखसंग्रह

३८८६०
निबंध
९०।८१६७
सं.२११.
नं.९५८०

(प्रथम खंड)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 38860 वि: निबंध
क्रमांक 9580 नों कि 90।8167

★

REFBK-0013758

श्रीबाबाजीमहाराज पंडित

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 93548
(स्थळ प्रत)

माघ वद्य चतुर्थी शके १८८६

तीन रुपये

।। श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ।।

# निवेदन

" सत्यसंकल्पाचा दाता नारायण "

परमपूज्य श्रीसद्गुरु ती. बाबाजी महाराज पंडित यांची दृश्य मूर्ति गतवर्षी शके १८८५ माघ वद्य चतुर्थी दि. १–२–१९६४ रोजी अन्तर्धान पावली. प्रथम स्मृतिदिनानिमित्त त्यांचा " विविध लेखसंग्रह " हा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे. श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ प्रकाशनाचा श्रीबाबाजीमहाराजकृत हा आठवा ग्रंथ आहे. यातील बहुतेक लेख पूर्वीच्या अनेक मासिकात व वर्तमानपत्रात वेळोवेळी प्रसिद्ध झाले होते. त्यांतील कांही लेख प्रस्तुत ग्रंथाच्या प्रथम खंडात प्रसिद्ध होत आहेत व बाकीचे लेख दुसऱ्या खंडात प्रसिद्ध होतील. याशिवाय त्यांनी स्वत: केलेले अभंग, पदे सुमारे १२०० अप्रसिद्ध आहेत. श्रीबाबाजीमहाराजांचें एकूण लिखाण सुमारे ४००० पृष्ठांवर जाईल असे दिसते. गीतारहस्य ग्रंथाचे भाषांतर संस्कृत भाषेत करणारे नागपूरचे सुप्रसिद्ध विद्वान लेखक गुरुजी नानाजी पिंपळापुरे व त्यांचे परम स्नेही डॉ. त्र्यं. गो. पंडे, प्राचार्य अरविंद जोशी इत्यादि कांही थोर नामवंत लेखक श्रीबाबाजीमहाराजांचे विस्तृत चरित्र–" व्यक्ति आणि वाङ्मय " ग्रंथाचे संशोधनपूर्वक लिखाण करीत असून ते लवकरच प्रसिद्ध होईल; परंतु तत्पूर्वी श्रीमहाराजांच्या अनेक भक्तभाविकांच्या प्रेमाग्रहास्तव या प्रस्तुत ग्रंथात श्रीबाबाजी महाराजांचा अल्प परिचय जोडला आहे.

उद्यम प्रेसचे मालक श्री. वि. ना. वाडेगांवकर यांनी स्वत: विशेष लक्ष पुरवून अगदी थोडक्या अवधीत हा ग्रंथ छापून दिला याबद्दल मंडळ त्यांचा फार आभारी आहे.

प्रकाशक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 38070 वि: निबंध
क्रमांक 9450 नोंदि: 10/8/95

## लेखानुक्रम

१. श्रीगुलाबरावमहाराज व मधुराद्वैतदर्शन १
धर्मचक्र मासिक–नोव्हेंबर व डिसेंबर १९५३

२. भगवन्नाम महिमा ... १७
प्रेमानंद मासिक–मार्च १९५८

३. श्रीसंत गुलाबरावमहाराज व नामनिष्ठा २७
प्रेमानंद (नाम साधनांक)–आक्टोबर-नोव्हेंबर १९५७

४. संतकृपा झाली, इमारत फळा आली ... ३६
'माउली' मासिक–मार्गशीर्ष शके १८७९

५. सर्वश्रेष्ठ युगधर्म ... ४९
फाल्गुन शके १८७४

६. इये श्रीमूर्तिवाचुनी नाही ... ६२
प्रेमानंद मासिक–एप्रिल १९५७

७. भक्तियोगाचे श्रेष्ठत्व ... ६८
मुमुक्षु मासिक

८. श्रीनाथवाङ्मय ... १०३
(अप्रसिद्ध)

९. आम्ही वैकुंठवासी... ... १४७
(केसरी ता. २१–३–५४)

१०. पंडित निश्चलदासजी-मतसमीक्षण ... १५३
(प्रेमानंद मासिक–जानेवारी १९५७)

* * *

# सद्गुरु श्रीबाबाजीमहाराज

## अल्प परिचय

"पवित्र ते कूळ पावन तो देश ।
जेथे हरीचे दास जन्म घेती"

श्रीबाबाजीमहाराज यांच्या संपूर्ण जीवनचरित्राची मला यथार्थ कल्पना करता येत नाही. प्रस्तुत "विविध लेखसंग्रह" ग्रंथात त्यांचा अल्प परिचय लिहिण्याची मला आज्ञा झाल्यावरून हे माझे अल्पपरिचयात्मक दोन वेडेवाकडे शब्द म्हणजे थोडक्यात रेखाटलेले धावते शब्दचित्र आहे. यांत समग्र माहिती नसून कांही थोडच्या ठळक व प्रमुख अशा गोष्टींचा उल्लेख केला आहे. या माझ्या लिखाणात अनेक महत्वाच्या गोष्टींचा मला विसर पडला असेल, माझ्या अज्ञानामुळे यांत अनेक दोष राहिले असतील. मी सर्व दृष्टीने अनधिकारी आहे. तरी देखील "नातरी बालक बोबडा बोली । कां वाकुडा विचुका पाउली । तें चोज करूनी माउली । रिझे जेवी ।।" आपण संतसज्जन क्षमा कराल ह्या अपेक्षेने आता मी आपल्या विषयाकडे वळतो.

### कुळवृत्तांत

श्रीबाबाजीमहाराज हे देशस्थ कऱ्हाडे ब्राह्मण. यांचे पूर्वज झांशीच्या राज्यात सुप्रसिद्ध सरदार होते. इ.स. १८५७ सालच्या बंडाने हे सरदार घराणे विखुरल्यामुळे त्यांचे आजोबा श्री. गोविंद भय्याजी पंडित झांशी सोडून निर्वासित स्थितीत चंद्रपूर (चांदा) येथे स्थायिक झाले. त्यांचा एकुलता एक नवसाचा मुलगा पैकाजीपंत व पैकाजीपंतांना एकूण जी आठ संतती झाली त्यापैकी फक्त दोनच सुपुत्र दीर्घायु ( चि. दत्तात्रय व नारायण ) राहिले. नारायण (श्रीबाबाजीमहाराज) यांचा जन्म चंद्रपूर येथे शके १८०७ मकर सक्रांतीच्या महापर्वकाळी झाला. त्यांची मातुःश्री सौ. जानकीबाई

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 38660 वि: निबंध
क्रमांक 9420 नों दि 10/8/64

परम साध्वी व वडील हे मोठे दत्तभक्त असल्यामुळे त्यांना बाळपणापासूनच भागवतधर्माचे बाळकडू मिळालेले होते. स्वतः गरीबीत शिक्षण घेऊन इ. स. १९०३ मध्ये ते मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. असहाय स्थितीमुळे त्यांनी दोन वर्षातच कॉलेज शिक्षण सोडून सरकारी नोकरी करावी लागली. इ. स. १९०७ मध्ये त्यांचा विवाह झाला. त्यांच्या पत्नीचे नांव सौ. गिरिजाबाई होते. सद्‌गुरू श्रीगुलाबरावमहाराज यांचे दर्शन त्यांना नागपूर मुक्कामी विद्यार्थीदशेत इ. स. १९०५ साली झाले. तेव्हापासून त्यांचे चित्त तिकडे आकर्षिले गेले. इ. स. १९०८ साली सर्व संसारपाश तोडून ते श्रीगुरूचरणाजवळ सतत राहू लागले.

### निःसीम श्रीगुरुसेवा

इ. स. १९०९ मध्ये रावसाहेब विठ्ठलराव केकरे मंडला येथे सद्‌गुरु श्रीगुलाबराव महाराज यांचा मुक्काम असता त्यांनी श्री. नारायणराव पंडित यांना मंत्रोपदेश दिला. तेव्हापासून ते श्रीगुरु-सेवेत सतत सन्मुख व जगास विन्मुख झाले. त्यांनी आपल्या देहाचा प्रत्येक कण व आयुष्याचा प्रत्येक क्षण श्रीगुरुसेवेत खर्च करून चंदनासारखा देह झिजविला. त्यांच्या श्रीगुरुसेवेकडे पाहिले की ज्ञानेश्वरीतील श्रीगुरुसेवेचे वर्णन प्रत्यक्ष डोळ्यापुढे उभे राहते. त्यांची अतुलनीय सेवा पाहून "मी पंडिताला वश झालो" असे धन्योद्‌गार महाराजांनी काढले.

इ. स. १९१५ साली शेवटच्या आजारात सद्‌गुरु श्रीगुलाबराव महाराजांचा मुक्काम पुणे येथे सुमारे दीड दोन महिने होता. श्रीमहाराज शेवटच्या दिवशी त्यांना जवळ बसवून म्हणाले "आतापर्यंत मी तुला काही दिले नाही आणि काही शिकविलेहि नाही. पण आता एकच लक्षात ठेव. माझे ग्रंथ वाच आणि तुला ते समजतील." असा पूर्ण आशीर्वाद दिला. सद्‌गुरु श्रीगुलाबराव महाराज पुणे मुक्कामी शके १८३७ भाद्रपद शु. १२ सोमवार (वामनद्वादशी) रोजी अन्तर्धान पावले. श्रीनानाजीमहाराज

कविमंडन यांच्या बरोबर श्रीबाबाजी हे श्रीगुरूच्या अस्थि घेवून दुसऱ्या दिवशी प्रयागला गेले व तेथे त्रिवेणी संगमात अस्थींचे यथाविधि विसर्जन झाले. त्याच रात्री श्रीमहाराजांनी स्वप्नात पंडितजीला दर्शन दिले व एक पुडी प्रसाद देवून बोलले "तू या पुडीतील भस्म नित्य सेवन करीत जा; म्हणजे तुला माझे ग्रंथ समजतील." सकाळी जाग आल्यावर ती स्वप्नातील पुडी प्रत्यक्ष बाबाजींच्या अंथरुणावरच दिसली. त्यांनी भस्म नित्य थोडे थोडे ग्रहण केले आणि आशीर्वाद फलद्रूप झाला.

### धन्यो गृहस्थाश्रमः

श्रीबाबाजीमहाराज हे आता १९१५ पासून कांही काळ अमरावतीस व कांही काळ नागपुरास राहत होते. त्यांनी तेथे उग्र तपश्चर्या केली, गुरूपदिष्ट मंत्राचे पुरश्चरण केले, हरिपाठाचे रोज १०८ पाठ आणि त्यानंतर अमृतानुभव व ज्ञानेश्वरीचीं अनेक पारायणे केली. आत्मौपम्य वृत्तीने आजन्म राहून त्यांनी लोकसंग्रह वाढविला. आपली ब्रह्मानंद स्थिती संसारात राहूनहि अभंग ठेविली व "अलौकिक नोहावे लोकाप्रति" असे सामान्यजनाप्रमाणे वागले. "आदौ राम तपोवनादि गमनं" ह्या एकाच श्लोकांत श्रीरामप्रभूचे चरित्र किंवा "आदौ देवकी देवी गर्भ जननम्" ह्या एकाच श्लोकात अति संक्षेप रूपाने जसे पूर्णावतारी भगवान श्रीकृष्णाचे चरित्र सांगितले आहे, तसेच—

सानंदं सदनं सुताश्च सुधियः कांता सुधाभाषिणी ।<br>
सन्मित्रं सधनं स्वयोषितरतिश्चाज्ञापराः सेवकाः ।<br>
आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नपानं गृहे ।<br>
साधोः संगमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः ।। "

ह्या एकाच श्लोकात श्रीबाबाजीमहाराजांचा आदर्श गृहस्थाश्रम सांगता येईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 38770 वि: ७ / निबंध
क्रमांक 9480 नों दि: 20/6/64

प्रशस्त व प्रशांत श्रीज्ञानेश्वर संस्थान अमरावती येथे शेवटची बरीच वर्षें त्यांचे वास्तव्य होते. त्यांचे घरात स्वच्छता, टापटीप व सुव्यवस्था असून ते आनंदाचे माहेरघर होते. त्यांचे घर म्हणजे सर्वांना खुले मुक्तद्वारच असे. तो खुला दरबार होता. तेथे ओळख नको, वशिला नको, जो घरी येईल त्याचा योग्य तो आदरसत्कार करून त्याच्याशी आपुलकीने वागावे. बुद्धिमान, सुशिक्षित, व ईश्वरभक्तिपरायण असे तीन सुपुत्र त्यांना असून सर्व सरकारी नोकरीत आहेत. ज्येष्ठ चिरंजीव डॉ. वासुदेव नारायण पंडित (M. A., Ph. D.) हे मुंबईतील सचिवालयात महाराष्ट्र राज्याचे भाषासंचालक आहेत. महाराजांची पहिली पत्नी सौ. गिरिजाबाई ही तर श्रीएकनाथ महाराजांच्या धर्मपत्नी सौ. मातु:श्री गिरिजाबाईसारखी महासाध्वी होती. तिच्या निधनानंतर दुसरी पत्नी सौ. मातु:श्री इंदिराआई म्हणजे दुसरी साक्षात गिरिजाआईच वाटते. महाराजांच्या परमार्थात वरील दोन पत्नींचा फार मोठा वाटा आहे. म्हणून सध्याच्या मातुश्री इंदिराआई यांना सांप्रदायिक मंडळीच्या अंत:करणात कायमचे पूज्यस्थान मिळाले आहे. परद्रव्य, परनारी व परनिंदा यांचा त्यांनी आजन्म विटाळ मानला. तसेच अन्नदान, विद्यादान व ज्ञानदानाचे सत्र त्यांनी आपल्या घरी शेवटपर्यंत चालविले. श्रीगुरूपदिष्ट मंत्रजप, हरिपाठ, ज्ञानेश्वरी इत्यादिकांचे पाठ, देवपूजा तसेच पार्थिव पूजा रोज नित्यनियमाने केल्याखेरीज अन्नग्रहण कोणत्याहि परिस्थितीत अगदी शेवटच्या आसन्नक्षणापर्यंत केले नाही.

### "पुण्यें पोशिली असाधरणे"

शेवटची सुमारे पन्नास वर्षें श्रीबाबाजीमहाराजांनी कितीतरी पुण्यकर्मांचा अगाध संचय करून ठेविला. चार धाम, सप्तमहापुरी, बारा ज्योतिर्लिंग इ. इ. भारतातील बहुतेक सर्व प्रमुख तीर्थयात्रा केल्या. पण अत्यंत चिरस्मरणीय अशी त्यांची श्रीगुरुआज्ञेनुसार,

गाजावाजा न करता केलेली, ८९८ मैलांची प्रयाग ते आळंदीची पदयात्रा होय. इ. स. १९३४ साली श्रीबाबाजीमहाराजांनी सहकुटुंब सहपरिवारे, अनेक भक्तमंडळीसह अनवाणी प्रयागच्या शुद्ध गंगेची कावड प्रत्येकानी खांद्यावर आणून त्या कावडीच्या गंगोदकाने श्रीज्ञानेश्वरमहाराजांना महाभिषेक केला. आळंदीक्षेत्रातील शेंकडो समस्त गावकरी लोकांना गोड पक्वान्नांचे सुग्रास भोजन तीन दिवस दिले. याशिवाय सतत प्रतिवर्षी आळंदीच्या पन्नास वाऱ्या केल्या, अमरावतीस संस्थानात ज्ञानेश्वरीची १०८ पारायणे, ब्राह्मणभोजन, महारुद्र, अतिरुद्र वगैरे व्रते केलीत. अनेक ब्राह्मण सुवासिनींना भारी लुगडी, जरीची खणे वगैरे दिलीत. तसेच अमरावतीस सर्व भिकाऱ्यांना यथेच्छ भोजन घातले. चैत्रात रामजन्म, आषाढात श्रीगुरु पौर्णिमा, श्रावणात श्रीकृष्णजन्म, आश्विनात दसरा, दिवाळी, कार्तिकात रोज देवास पाहटेचा काकडा, मार्गशीर्षात पूर्ण तीस दिवस कात्यायनी महोत्सव, माघात महाशिवरात्र इ. इ. आपल्या श्रीसद्गुरू गुलाबरावमहाराजांची संपूर्ण नित्यनैमित्तिक व्रतवैकल्ये त्यांनी शेवटपर्यंत चालू ठेवून उत्तरोत्तर त्यात उत्कर्षच केला.

### अध्ययन व अध्यापन

श्रीसद्गुरु गुलाबराव महाराज यांचे अमरावतीस फार मोठे ग्रंथसंग्रहालय आहे. त्यात अनेक भाषांचे व अनेक विषयांचे हजारो ग्रंथ आहेत. त्यांच्या अध्ययनात ते शेवटपर्यंत जगले. पौर्वात्य व पाश्चिमात्य ग्रंथांचे त्यांनी तुलनात्मक सूक्ष्म अध्ययन केले. कोणत्याहि विषयात त्यांची गति नाही असे नव्हते. धर्मशास्त्र, संतवाङ्मय व वेदान्त विषयात त्यांची अलौकिकता पाहून श्रीशंकराचार्यांनी त्यांना "वेदान्त केसरी" पदवी देवून त्यांचा गौरव केला. इ. स. १९२० पासून जेथे चातुर्मासात मुक्काम होईल तेथे चातुर्मासानिमित्त सायंकाळी रोज त्यांचे प्रवचन चाले. त्यात अनेक वेदशास्त्रसंपन्न शास्त्री पंडित तसेच आंग्लविद्याविभूषित उच्च पदवीधर व थोर सरकारी अधिकारी वर्ग श्रवणसुखास नित्य नियमपूर्वक येत असे. त्यांच्या चौरस व

अथांग विद्वत्तेमुळे श्रोतृसमाजावर त्याचा विशेष परिणाम झाला; पण त्याहून विशेष परिणाम म्हणजे "आधी केले मग सांगितले" अशा शुद्ध आदर्श चारित्र्याचा परिणाम श्रोतृसमाजावर विशेष प्रकारे अनुभवास आला. मनुष्य शिकून वळत नाही इतका पाहून वळतो. हा खरा प्रकार आहे.

### अलौकिक ग्रंथसंपत्ति

श्रीबाबाजीमहाराजांची कामगिरी खरोखरच थोर आहे. श्रीसद्‌गुरु गुलाबरावमहाराजकृत समग्र ग्रंथ अठरा खंड पृष्ठे सुमारे ६००० (सहा हजारावर) आहेत. अल्प काळातच त्यांतील कांही ग्रंथ दुर्मिळ झाले म्हणून श्रीबाबाजीमहाराजांनी त्या दुर्मिळ ग्रंथांच्या तीन चार आवृत्त्यांचे पुनर्मुद्रण करून त्यांतील कांही ग्रंथावर स्वतःच्या विवरणात्मक टिपा लिहून ते प्रसिद्ध केले आहेत. याशिवाय आपल्या श्रीगुरूची ज्ञानपरंपरा त्यांनी उत्कृष्ट रीतीने स्वतःच्या ग्रंथद्वारे पार पाडली. श्रीसद्‌गुरु माउलींच्या ग्रंथाप्रमाणे यांचे ग्रंथहि परम प्रासादिक झालेले आहेत. खडे तात्विक बोल, मार्गदर्शक सुभाषितें व गुरुगम्य स्वानुभवाच्या खुणा पदोपदी असल्यामुळे त्यांचे ग्रंथ अत्यंत लोकप्रिय झालेलें आहेत. श्रीसद्‌गुरु गुलाबरावमहाराज व श्रीबाबाजीमहाराज यांचे कांही ग्रंथ जर इंग्रजी भाषेत असते तर त्यांची कीर्ति स्वामी विवेकानंद किंवा स्वामी रामतीर्थ यांच्यासारखी सर्व जगभर पसरली असती, यात तिळमात्र शंका नाही. वरील ग्रंथांचे असंख्य वाचक महाराष्ट्रात तर आहेतच पण पुष्कळसे वाचक अखिल भारतात आहेत, तसेच इंग्लंड, अमेरिकेतहि कांही अभ्यासू आहेत.

### ग्रंथनिर्मिति

**१ आर्यधर्मोपपत्ति, २ हरिपाठरहस्य, ३ अमृतानुभव कौमुदी ४ श्रीज्ञानेश्वरी गूढार्थ दीपिकेचे** अध्याय एक ते सतरापर्यंत असे श्रीबाबाजीमहाराज यांचे एकूण आठ ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत.

त्यांच्या अकाली मृत्युमुळे श्रीज्ञानेश्वरी गूढार्थदीपिकेचा शेवटचा अठरावा अध्याय अपूर्ण राहिला म्हणून ते काम पूर्ण करण्याचे त्यांचे ज्येष्ट चिरंजीव डॉ. वा. ना. पंडित यांनी अंगीकारिले आहे. जगद्गुरु श्रीशंकराचार्य, तत्वज्ञ संत गुरुदेव, डॉ. रामभाऊ रानडे, वारकरी संप्रदायाचे एक अध्वर्यु प्राचार्य सोनोपंत दांडेकर, दर्शनालंकार न्यायरत्न डॉ. विनोद, माजी नेकनामदार डॉ. बापूजी अणे, पुणे विद्यापीठाचे कुलगुरु काकासाहेब गाडगीळ, महाराष्ट्रराज्य विधान सभेचे सभापति नामदार बाळासाहेब भारदे या सर्व अग्रगण्य थोर पुरुषांनी श्रीबाबाजीमहाराजकृत वरील प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात प्रस्तावनादि स्वतः लिहून महाराजांबद्दल एकमुखाने व मुक्तकंठाने गौरवपूर्ण धन्योद्गार काढले आहेत.

याशिवाय साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त मराठीतील अत्युत्कृष्ट ग्रंथास दिले जाणारे पांचशे रुपयांचे "केसरी–मराठा पारितोषिक" श्रीबाबाजीमहाराज पंडित यांच्या "श्रीज्ञानेश्वरी – गूढार्थदीपिका" या ग्रंथास नुकतेच ऑक्टोबर १९६४ मध्ये देण्यात आले.

## अजरामर वाङ्मय मूर्ति

अलौकिक थोर पुरुषांचे खरे थोरपण त्यांच्या अलौकिक ग्रंथनिर्मितीवरून सिद्ध होते. सम्राटाधिपतीची राजसत्ता त्याच्या केवळ प्रजेवर तो जीवंत आहे तोपर्यंतच टिकते; पण त्याच्या मरणाबरोबरच त्याची ती राजसत्ता भस्मीभूत होऊन जाते. त्रिकालज्ञ ऋषीमुनी आणि साक्षात्कारी संतविभूती यांची ग्रंथनिर्मिति अजरामर व पृथ्वीमोलाची असल्यामुळे भारत, भागवत, रामायणादि आणि ज्ञानेश्वरी, साधुसंतांची अभंग गाथा, दासबोध इत्यादि ग्रंथ आज कित्येक शतकानुशतके आपली सत्ता व आपले प्रभुत्व सर्व जगावर अखंडित चालवीत आले आहेत. श्रीबाबाजीमहाराज यांचे चरित्र

व चारित्र्य लोकोत्तर आहेच, पण त्यापेक्षा त्यांच्या अलौकिक लोकोत्तर ग्रंथनिर्मितीमुळे ते चिरस्मरणीय व अमर झालेले आहेत. श्रीबाबाजीमहाराज हे महान तपस्वी ब्रह्मनिष्ठ होते. प्रज्ञाबल व श्रद्धाबल यांची प्रत्यक्ष मूर्ति असल्यामुळे त्यांची प्रभा त्यांच्या ग्रंथात अनेक ठिकाणी पानोपानी प्रकट झालेली दिसते. त्यांची शास्त्रशुद्ध व तर्कशुद्ध विवेचनपद्धति इतकी सप्रमाण व प्रभावी आहे की ती अगदी नास्तिकालाहि आस्तिक बनवून त्यांना सदाचार, धर्म, नीती व भक्तीचे वेड लावील.

## महाप्रयाण

श्रीबाबाजीमहाराजांना आपला मृत्युकाळ अगोदरच समजून आला होता व तसे त्यांनी दोन वर्षापूर्वी बोलूनहि दाखविले होते. इच्छामरणी पितामह श्रीभीष्माचार्य हे ५८ दिवस शरपंजरी पडले असताहि त्यांनी धर्मराजास शांतिपर्व सांगितला व भगवद्गीता अध्याय ८ श्लोक २६ यांत वर्णन केल्याप्रमाणे शेवटी अत्यंत सुमुहूर्त पाहून महाप्रयाण केले. डिसेंबर इ. स. १९६३ सालचें कात्यायनीव्रत (सतत अठ्ठेचाळीस वर्षें) यथासांग झाले त्यावेळी त्यांची प्रकृति बरी नव्हती. सतत तीस दिवसांच्या त्या व्रतातील निराहारामुळे त्यांची प्रकृति घसरली व ते शरपंजरी पडले. तरीहि ज्ञानेश्वरी गूढार्थदीपिकेचा अठरावा अध्याय सांगण्यास त्यांनी प्रारंभ केला. महाशिवरात्र महोत्सवाचे नवरात्र बसण्याच्या दिवशी म्हणजे माघ वद्य चतुर्थी ता. १ फेब्रुवारी १९६४ रोजी सकाळी सर्व ब्राह्मणमंडळी व घरच्या मंडळीना दुपारी साडे अकराच्यापूर्वी भोजनादि आटोपून घेण्यास सांगितले. नंतर दुपारी सवाबारा वाजता श्रीबाबाजीमहाराजांनी गंगोदक सर्व अंगावर घेऊन वस्त्रांतर केले. आजन्म चाललेल्या नित्यनियमाप्रमाणे संध्यावंदन, जप, हरिपाठ, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, शिवलीलामृत, श्रीशंकराचार्यकृत स्तोत्रे यांचे संपूर्ण पाठ झाल्यावर पूजेसाठी हातावर पार्थिव घेतला यथासांग पूजाविधि आटोपून

त्या मृण्मय पार्थिवाचे विसर्जन करीत असता शेवटी "महादेवाय नमः विसर्जनम्" या मंत्राचा उच्चार करून स्वतःच्या पार्थिव देहाचे दुपारी सुमारे दीड वाजता विसर्जन केले.

"यासाठी केला होता अट्टाहास । शेवटचा दिवस गोड व्हावा"

ह्याप्रमाणे त्यांचा शेवट अत्यंत गोड झाला.

**शेवटची प्रार्थना**


"बोलिली लेकुरे । वेडी वाकुडी उत्तरे ।।१।।
करा क्षमा अपराध । महाराज तुम्ही सिद्ध ।।२।।
नाही विचारिला । अधिकार मी आपुला ।।३।।
तुका म्हणे ज्ञानेश्वरा । राखा पायापै किंकर ।।४।।

केवळ त्यांच्याच कृपेने मजकडून जे वेडेवाकडे शब्द लिहून घेतले ते त्यांच्या चरणी समर्पण करून त्यांच्या नांवाचा जयघोष करीत माझ्या लेखणीला तूर्त स्वल्पविराम देतो.

"श्रीकृष्णनिवास"
पुण्यनगरी
शके १८८६
माघ वद्य चतुर्थी


श्रीसद्‌गुरूमाउलीचा
अज्ञबालक
दासानुदास चरणरज—
**ज्ञानेश्वर उद्धव मांढरे**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८७७० वि: निबंध
क्रमांक ९५२० नों. दि. २०/८/८५



वेदान्तकेसरी श्रीबाबाजीमहाराज पंडित

| | |
|---|---|
| जन्म | महाप्रयाण |
| मकरसंक्रांत १८०७ | माघ वद्य ४, शके १८८५ |



श्री गुलाबराव महाराज

तैसी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां ।।
बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ।। (ज्ञानेश्वरी ६-४५३)

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ३८७७० दि:
क्रमांक ९५९० नों दि
दा. क्र. ९३७५

।। श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ।।

# विविध लेखसंग्रह

## श्री गुलाबराव महाराज व मधुराद्वैतदर्शन ... १

सच्चित्सुखविहारायविमलज्ञानमूर्तये ।
श्रीपांडुरंगनाथाय सिद्धप्रज्ञाय ते नमः ।।

**अल्प परिचय–श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा साक्षात्कार.**

वऱ्हाडातील उमरावती जिल्ह्यात माधान नांवाचे गावी पाटलाचे कुळात श्रीगुलाबराव महाराजांचा जन्म शके १८०३ आषाढ महिन्यात झाला. पांडुरंगनाथ हे त्यांचे नाथसंप्रदायातील नांव. श्रीमहाराजांची आई थोर पतिव्रता व वडील थोर शिवभक्त होते. ते अत्यल्प वयातच–म्हणजे सुमारे नऊ महिन्याचे असतानाच त्यांचे दोन्ही डोळे आंधळे झाले. लहानपणचे श्रीमहाराजांचे खेळणे तंतोतंत श्रीकृष्णासारखे असे. लहानपणांत त्यांच्या ठिकाणी दांडगी स्मरणशक्ति व मेधाशक्ति व थोर प्रज्ञाशक्ति प्रगट झाली. बालपणी त्यांचे वागणे फार खेळकर व स्वच्छंदी असे. रात्रभर समाधि लावून बसलेले पुष्कळ जुन्या लोकांनी त्यांना पाहिले. "वैद्यराज आम्ही निर्गुणपुरीचे, औषध घ्याना कोणी" हे गाणे ते लहाणपणी म्हणत असत. शिक्षणाचा गंधहि नसताना ते काव्य करीत. पाठांतरहि बरेच होते. आमच्या पाश्चात्य विद्याभूषितांना चमत्काराचे वावडे असले तरी हजारो लोकांच्या अनुभवास आलेले त्यांचे अलौकिक सामर्थ्य पाहून ते आश्चर्यचकित होत.

स्वत: श्रीज्ञानेश्वर महाराजांनी महाराजांना स्वनामाचा उपदेश केला असे त्यांनी

"आपुला अनुभव असतां प्रत्यक्ष । इतरांची कायसा साक्ष ।
मज आडवे मांडिये घेऊनी । कृपाकटाक्षें । निहाळिले ॥२८॥
दिधला मंत्र चतुराक्षरी । आपुली प्रतिज्ञा केली पुरी ।"

(संप्रदाय सुरतरु, अध्याय ४ था, ओवी २८-२९)

आपल्या 'संप्रदाय सुरतरु' त सांगून ठेवले आहे.

पुढे आपले गाव सोडून ते निरनिराळचा ठिकाणी हिंडून लोकांना उपदेश करू लागले व आपल्या मताला पुष्टि देण्याकरिता पूर्वाचार्यांच्या ग्रंथातून त्यांची प्रमाणार्थ वचने घेण्यासाठी ग्रंथ वाचून घेणे सुरू झाले. वाचणाऱ्या मंडळीलाहि वाचलेल्या ग्रंथातील न उलगडणारा अर्थ त्यांनीच समजून द्यावा. येथून पुढे ग्रंथलेखन सुरू झाले. प्रथमपासून शेवटपर्यंतचे एकूण एक त्यांचे लिखाण लिहिले गेले असते तर, गद्य सोडून आज जवळजवळ **सव्वा लाख पद्य लिखाण झाले असते !** कांही मंडळी मग त्यांच्या जवळ राहू लागली. तोंडओळखीचे पुष्कळ लोक होते पण फार थोडचांना त्यांनी अनुयायी म्हटले. कारण शिष्यशाखा वाढविण्याकडे त्यांचा ओढा नव्हता. अशा सुप्रसिद्ध महात्म्यांनी मधुराद्वैताचे उद्‌घाटन केले. आपल्या ध्येयानुसार त्यांनी स्त्री-वेशाची कांही चिन्हे धारण केली होती.

### संप्रदायाची पार्श्वभूमि

श्रीशंकराचार्यांच्या पुष्कळशा ग्रंथातून व त्यांच्या संन्यासमार्गी अनुयायांच्या ग्रंथातून निर्गुणाचेच विशेष प्रामुख्याने वर्णन आले असल्यामुळे भक्तिमार्गाचे आंलबन जे सगुण रामकृष्णादि परब्रह्म त्यांच्या स्वरूपाविषयी बरेच अपसमज वेदान्ताभ्यासू लोकात उत्पन्न झाले. त्याचे परिणाम शुद्ध भक्तिमार्गानुसारी वारकरी संप्रदायावरहि होऊ लागले. ज्ञानदेवी किंवा नाथभागवतासारखे ग्रंथ त्यांना वेदान्ताभ्यासाकरिता अपूर्ण वाटू लागले व निश्चलदासासारख्या

निर्गुणवाद्यांचे ग्रंथ वाचून सगुणापेक्षा निर्गुण श्रेष्ठ अशी वेदान्तबाह्य कल्पना त्या पंथात रूढ होऊ लागली व त्यामुळे खऱ्या भक्तिमार्गाला पोखरणी सुरू झाली. भक्तिमार्ग हा अज्ञानाचा मार्ग. निर्गुणाच्या प्राप्ती-करिता लागणारी एकाग्रता भक्तिमार्गाने प्राप्त करून घेण्याकरिता भक्तिमार्ग संतांनी प्रगट केला. वास्तविक पाहता सगुणापेक्षा निर्गुण श्रेष्ठ असून त्याच्या प्राप्तीकरिता सगुणाची भक्ति सांगितली आहे. ज्ञानानंतर सगुणाची भक्ति राहत नाही. कारण ज्ञानाने सर्व सगुण-रूप मिथ्या ठरल्यावर सगुणभक्ति होऊ शकत नाही व त्यावर प्रेम बसू शकत नाही इत्यादि अपसमज रूढ होऊ लागले. श्रीमहाराजांनी आचार्यांनी मान्य केलेल्या प्रस्थानत्रयीच्या सिद्धान्तावरूनच हे वरील अपसमज कसे वेदान्तविरुद्ध आहेत हे दाखवून सगुण स्वरूपहि कसे निरुपाधिक आहे व त्याचे ठिकाणी ज्ञानानंतरहि भक्ति करणे अंतिम साध्याच्या दृष्टीने कसे आवश्यक आहे हे अनेक ग्रंथ लिहून सप्रमाण सिद्ध केले आहे. हेच श्री महाराजांचे मुख्य अवतारकार्य होय.

ब्रह्मज्ञान होण्यापूर्वी ब्रह्मज्ञान होण्याकरिता व ब्रह्मज्ञानानंतर जिवन्तपणीच जीवन्मुक्ति व विदेहमुक्तीचे सुख भोगण्याकरिता ज्ञानोत्तर रामकृष्णादि सगुण साकाराची भक्ति अवश्य केली पाहिजे, हे सर्व त्यांच्या ग्रंथांचे सार आहे. निर्गुणवादाने रामकृष्णादिकांचे देह मायिक म्हणजे भौतिक ठरल्यावर त्या पांचभौतिक देहाचे ठिकाणी ज्ञानानंतर प्रेम राहणे शक्य नाही. सगुण भगवंताचे ठिकाणी आत्मप्रेमवत् प्रेम असणे याला भक्ति म्हणतात. प्रेमच नाही तर भक्ति तरी कुठली ? व अशा विचारसरणीने भक्तिमार्ग तरी कसा टिकणार ? आत्मज्ञान होण्यापूर्वी जो आत्मानात्मविचार करावा लागतो त्याच वेळी पांचभौतिक अशा अनात्मविषयांचे प्रेम नाहीसे होते. तसेंच भगवंताचा देहहि पांच-भौतिकच असेल तर त्याहि देहाचे प्रेम आत्मानात्मविचाराचे वेळेसच नष्ट होऊन ज्ञानापूर्वीहि भक्तीची सिद्धि होऊ शकत नाही. म्हणजे

या निर्गुणवादाने सर्व भक्तिमार्गाचाच पुढे उच्छेद झाला असता. भगवदिच्छेनेच श्रीमहाराजांचा अवतार होऊन श्रुति, युक्ति, अनुभव या वेदान्तमान्य प्रमाणत्रयीच्या साहाय्याने वरील वेदान्तविरुद्ध अपसिद्धान्त खोडून काढून त्यांनी भक्तिमार्गाला शुद्ध शास्त्रीय स्वरूप आणून दिले.

### संप्रदायाची स्थापना

भारतातील वेदाला प्रमाण मानून निघालेले सर्व संप्रदाय भगवंतापासूनच प्रगट झाले आहेत. त्यांचे आचार्य हे त्या संप्रदायांचे केवळ पुनरुज्जीवन करणारे आहेत. त्याचप्रमाणे मधुराद्वैतसंप्रदाय देखील भगवान आदिनाथ शंकरापासून प्रगट झालेला आहे व श्रीज्ञानेश्वरादि संतांनी आपल्या वाङ्मयातून त्या भक्तिसप्रदायातील भक्तिप्रेमाचे उद्‌गार काढलेले आहेत. सूत्ररूपाने या भक्तिमार्गाची चिकित्साहि त्यांच्या ग्रंथातून आली असून स्वतः सर्व संतांनी भक्तिमार्गाच्या आचारणाने व उपदेशाने त्याचा पुरस्कारहि केला. पण भक्तिशास्त्राचे सविस्तर उपपादन कोणी केले नाही. संतांचे सूत्रप्राय उपपादनावर श्रीमहाराजांनी भक्तिशास्त्राच्या उपपादनाची श्रुति, युक्ति इत्यादि प्रमाणांच्या साहाय्याने इमारत उभारली आहे. म्हणून हा संप्रदाय नवीन नाही. उपपादन मात्र नवीन आहे. "येथ आदिनाथ तें मूळ । आळंदीश्वर तें फळ" असे श्रीमहाराजांनी स्वतः सांगितले असून "याते नाथसंप्रदाय म्हणती" असे त्यांनीच सांगून ठेविले आहे. म्हणून श्रीमहाराज या संप्रदायाचे उद्‌घाटक आचार्य आहेत. सर्व संप्रदायांच्या आचार्यांचीहि हीच गोष्ट आहे.

### मधुराद्वैतदर्शन

भक्ति म्हणजे तुकाराम महाराज म्हणतात,

"हेचि थोर भक्ति आवडते देवा ।
संकल्पावी माया संसाराची ।"

व्यवहारामध्ये कोणते तरी स्नेहाचे नाते ठेवून आपण प्रेम किंवा माया करीत असतो. स्वामीच्या ठिकाणी नोकर, दासाचे नाते ठेवून प्रेम करतो. मुलगा, बालभाव किंवा लेकुरभाव आपल्या ठिकाणी घेऊन आईबापांचे ठिकाणी मातृपितृभावाने पूज्यता बाळगून प्रेम करतो. मित्रभावाने मित्र मित्राशी वागतो. आई मुलाचे ठिकाणी प्रेम करते. पत्नी, पतीचे ठिकाणी प्रेम करते. असे पांच प्रकारचे स्नेहसंबंध आहेत. या स्नेहसंबंधाने परमेश्वराचे ठिकाणी प्रेम करणे याला भक्ति म्हणतात. हे स्नेहसंबंध उत्तरोत्तर श्रेष्ठ आहेत; म्हणून त्या उत्तरोत्तर स्नेहसंबंधाने केलेली भक्तीहि पूर्व पूर्व भक्तीपेक्षा श्रेष्ठ ठरते. कारण पूर्व पूर्व भक्तीचा उत्तरोत्तर भक्तीमध्ये अंतर्भाव असतो. अर्थातच पत्नीभावाने केलेल्या भक्तीत पूर्वीच्या सर्व प्रेमसंबंधांचा अंतर्भाव असल्यामुळे, ती भक्ति प्रेमाचे परमोच्च शिखर होय व अशा संबंधाने केलेल्या भक्तीलाच मधुरभक्ती म्हणतात. या भक्तीत द्वैत मुळीच राहत नाही. कारण ती ज्ञानानंतरच करता येते व केली जाते.

"कोणी एक अकृत्रिम । भक्तीचें हें वर्म
योगज्ञानादिविश्राम । भूमिका हे ।" (अमृ. ९–५९)

योगमार्ग व ज्ञानमार्ग यातील सविकल्प स्थिति येथे राहत नाही व प्रेमभक्ति करणाऱ्या भक्ताचे ठिकाणी दुसऱ्याला द्वैताचा भास झाला तरी

"द्वैतदशेचें आंगण । अद्वैत वोळगे आपण ।
भेद तंव तंव दूण । अभेदासी ।" (अमृ. ९–२८)

प्रेमभक्तीने द्वैत निःशेष नाहीसे होऊन अद्वैतदशा अधिकाधिक अनुभवाला येते. श्रीज्ञानेश्वरमहाराजादि संतांनी या सर्व स्नेह-संबंधाने परमेश्वराला आळविले आहे. सर्व संतांच्या गौळणी

वगैरे गाण्यांमध्ये पत्नीभावाने देवाला प्रेम समर्पण केल्याचे दिसून येते. गोपिका या मधुर भावाने प्रेम समर्पण करणाऱ्यांमध्ये गुरुस्थानी आहेत. भगवान शंकर आदिनाथ हे भगवान श्रीकृष्णाच्या रासात गोपिका होऊन राहिले आहेत, असे पुराणात सांगितले आहे. त्यांच्यापासून हा मधुराद्वैत संप्रदाय प्रवृत्त झाला. "स्वमन्तव्यांश-सिद्धान्ततुषार" या ग्रंथात श्री महाराजांनी स्वमुखाने मी गोपी आहे असे सांगितले असून त्यांच्या ठिकाणी मधुररसमंदाकिनीचा प्रेमप्रवाहच मुख्य होता. म्हणूनच त्यांच्या वाङ्मयातून या प्रेमाची सिद्धि व या प्रेमसंबंधानेच विशेषतः भगवंताला आळविलेले दिसून येते.

### संप्रदायाचे वाङ्मय

उगमापासून निघालेल्या नदीचे प्रवाहपात्र जसे पुढे पुढे वाढत जाते त्याप्रमाणे अल्पवयातच प्रगट झालेली श्रीमहाराजांची काव्य-स्फूर्ति अमर्याद वाढू लागली. त्यांच्या काव्यस्फूर्तीचे सर्व लिखाण झाले असते तर सुमारे सव्वा लक्ष ओव्यांचा ग्रंथराज प्रसिद्ध झाला असता. काव्यस्फूर्तीचा वेग इतका असे की, लेखकांना लेखन करणेच कठीण जात असे. सर्व संतांचे ग्रंथ या संप्रदायात मान्य असून मधुराद्वैताचे प्रतिपादन करणारे त्यांचे वाङ्मय पुढीलप्रमाणे आहे. श्रीमहाराजांचे जे ग्रंथ छापून प्रसिद्ध झाले त्या ग्रंथांना "सूक्ति-रत्नावलि" हे नांव दिले असून प्रत्येक भागाला "यष्टि" हे नांव दिले आहे व प्रत्येक यष्टीमध्ये ज्ञानोत्तर भक्तीचे निरनिराळ्या रीतीने प्रतिपादन आले आहे.

### प्रथमयष्टि मुख्य ग्रंथ

(१) भक्तिपदतीर्थामृत–यात तत्त्वमसि महावाक्याचे भक्ति दृष्टीने विवेचन केले आहे.

(२) निगमांतपथसंदीपक–ज्ञानोत्तर भक्तीचे उपपादन.

(३) निदिध्यासनप्रकाश–यात निदिध्यासनाच्या प्रक्रिया आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३८८०० वि: ...
नों. दि. ...



## द्वितीययष्टि–पूर्वार्ध

(१) प्रिय पाहुणेर–यात मर्यादा व पुष्टि असे प्रेमाचे दोन भेद करून दोन्ही प्रकारच्या भक्तीची आवश्यकता दाखविली आहे.

## द्वितीययष्टि–उत्तरार्ध

(१) भगवद्भक्तिसौरभ–यात रुक्मिणीने भगवंतास पाठविलेल्या पत्रातील श्लोकावर पतिपत्नीभक्तीला धरून सुंदर विवरण आहे.

(२) प्रीतिनर्तन–यात लालन, वात्सल्य व पतिपत्नी भक्ति ह्या, पूर्वपूर्व भक्तीपेक्षा कशा वाढत्या प्रेमाने केल्या जातात, हे दाखविले आहे.

## तृतीययष्टि

(१) ही यष्टि म्हणजे श्रीमद्भागवत प्रथमस्कंध यावरील टीका होय.

## चतुर्थयष्टि

(१) यात स्त्रियांची गाणी दिली आहेत.

## पंचमयष्टि

(१) हा ग्रंथ व्याख्यानरूपाने आहे.

## षष्ठयष्टि

(१) स्वमंतव्यांशसिद्धान्ततुषार (हिंदी) – यात श्रीमहाराजांनी आपण कोण व कोणत्या कार्याकरिता आलो हे सांगितले आहे व ज्ञानोत्तरभक्तीचे प्रतिपादन केले आहे.

## सप्तमयष्टि–उपदेशामृत पत्रे

(१) वेळोवेळी आपल्या मंडळीला व बाहेरच्याहि मंडळींनी विचारलेल्या शंकांना उत्तरादाखल पत्रे लिहिली त्यांचा संग्रह.

## अष्टमयष्टि

(१) साधुबोध––यात आधुनिक विद्वानांच्या संभाव्य शंकांना उत्तर म्हणून प्रश्नोत्तररूपाने विवेचन आले आहे.

### नवमयष्टि–पूर्वार्ध

(१) अभंगांची गाथा.

### नवमयष्टि–उत्तरार्ध

(१) पदांची गाथा.

### दशमयष्टि

(१) प्रेमनिकुंज––यात ज्ञानोत्तरभक्ति कशी होऊ शकते, तिची आवश्यकता, आक्षेपकांचे खंडण, श्रीकृष्णस्वरूपाचे निरुपाधिकत्व असे भक्तीवर सांग निरूपण आले आहे. हा माधुर्यभक्तिरसप्रधान ग्रंथ आहे.

### एकादशयष्टि

(१) संप्रदायसुरतरु––हा ग्रंथ मुख्यतः भागवत धर्माचा संपूर्ण ऊहापोह करणारा असून मधुराद्वैत संप्रदायाची यात शिकवण दिली आहे.

### द्वादशयष्टि

(१) यातहि उपदेशामृत पत्रेच दिली आहेत.

### त्रयोदशयष्टि

(१) यात वेदान्तातील पारिभाषिक शब्दांचे अर्थ दिले आहेत व स्वतःचे ग्रंथ कसे लावावे याची दिशा दाखविली आहे.

बाकीच्या चतुर्दशयष्टि, पंचदशयष्टि, षोडशयष्टि यातून श्रीमहाराजांच्या अपूर्ण वाङ्मयाचा संग्रह असून नारदभक्तिसूत्रांवर २५ सूत्रांपर्यंत संस्कृत भाष्य आले आहे. षोडशयष्टीत त्यांचे संपूर्ण संस्कृत वाङ्मय आले आहे. हे सर्व प्रकरणग्रंथ कांही पूर्ण व अपूर्ण आहेत. या संप्रदायात श्री ज्ञानेश्वर महाराजांचे अमृतानुभवादि ग्रंथ वेदरूप व इतर संतांचे वाङ्मय स्मृतिरूप व श्री. महाराजांचे वाङ्मय भाष्यरूप समजले जाते.

## संप्रदायाची शिकवण–सामान्य

श्रीमहाराजांनी उदाहरलेल्या संप्रदायाची शिकवण मी त्यांच्याच शब्दात पुढे देतो–

"येथ आदिनाथ तें मूळ । आळंदीश्वर ते फळ ।
किंवा आघवाचि कल्लोळ । मधुररसमंदाकिनीचा ।। ८९ ।।
म्हणोनि यातें नाथसंप्रदाय म्हणती ।
श्रीकृष्णोपासना वैष्णवपद्धति
परी ज्ञानसिद्धांत केवलाद्वैती । निश्चित असे ।।९०।।
आळंदी मूळ पीठ देख । प्रतिनिधी ते सेवक ।
आणि प्रतिनिधीवर रूपें अनेक । तातविग्रह ।।९१।।
उपास्यत्वें पाहतां साची । शाखा वारकरी संप्रदायाची ।
जे फळीं पुष्पीं सुखाची । दुमदुमिली आहे ।।९२।।
द्रुम धर्म सनातन । मूळ तंव ते नारायण ।
येथ शिव आदि गुरु देव श्रीकृष्ण ।
शैववैष्णव मिश्र म्हणोनि संप्रदाय हा ।।९३।।
दोहींचा समावेश पुरता । श्रीगुरु आळंदीश्वरांत होता ।
वाढता आनंद मंत्र जपतां । चतुराक्षरी वा सप्ताक्षरी ।।९४।।
सेवक, शिष्य आणि भक्त । हे त्रिविध जन मानिले येथ ।
सेवकाचे प्रकार दोन होत । अप्रविष्ट आणि प्रविष्ट ऐसे ।।९५।।
जे पतित वा नीच पूर्ण । बळेंची करिती अधर्माचरण ।
तयातें तंत्रें संकोचून । आणावें धन त्याचपासुनी ।।९६।।
आतां गृहकार्यासक्त । परी यथाशक्ति प्रतिनिधिवचन मानित ।
तो जनसमुदाय समस्त । प्रविष्ट सेवक जाणावा ।।९७।।

तयाचे चतुर्थांश धन । सुखें घ्यावें याचना करून ।
नाहीं तरी अप्रविष्टपण । देयावें तयातें ।।९८।।

साधनचतुष्टयसंपन्न । मुमुक्षु शिष्य म्हणविती पूर्ण ।
तिही करावे कार्य तीन । प्रात:काळी जप योग ध्यान ।
संप्रदायानुसार ।।९९।।

माध्यान्हकालीं ज्ञानचर्चा पूर्ण । अथवा करावे ग्रंथलेखन ।
सायंसमयीं हरिकीर्तन । प्रेम करोनी करावे ।।१००।।

कीर्तनाचें न घेयावें धन । यति तरी खावें भिक्षा मागोन ।
नाहीं तरी थोडीशी निश्चिती पूर्ण ।
मीं केली तेवी करावी ।।१०१।।

बहुशा ऐसी समयरीती । अविरोध न येतां संप्रदायाप्रति ।
मध्यें संप्रदायकार्य येती । तेही कीजती उल्हासे ।।१०२।।

शरीरापुरते स्वकार्य पाही । त्याचा उपदेश न लगे कांहीं ।
सेवकापासुनी जे आणिले लवलाहि ।
तें धन स्वकार्या लावूं नये ।।१०३।।

तया धनेंकरून । नवे करावेत शिव-कृष्णालयें जीर्ण ।
पुस्तकालयें बांधोन । करावे पूजन तयाचे ।।१०४।।

(अध्याय ११ वा. संप्रदाय सुरतरु.)

**समाधिसेवा**

"विशेष संप्रदाय पद्धति । नित्य भावावी आळंदी चित्तीं ।
तियेची यथार्थ उपपत्ति । नित्यतीर्थी बोलिली ।।२१।।

दुसरें ऐसे भावावे मनीं । कीं समाधींत बैसले कैवल्यदानी ।
ते आणिका ऐसी निर्वाणीं । समाधी नोहे ।।२२।।

मायबाळा एकांती । जेवूं घाली बाळाप्रति ।
कीं प्रियेची पुरवाया आर्ति । प्रिय एकान्तीं जेवि बैसे ।।२३।।

तेवि तया सुंदरपणा । दृष्टि लावील जनतारकांगना ।
म्हणोनि समाधिमिषें समष्टिहृदयभुवना ।
केले पावन एकसरें ।। २४ ।।....

मिया मूर्ति देखिली जैसी । आणिकीं न देखिली तैसी ।
परी सांप्रदायिकी मूर्ति विशेषी । प्रसिद्ध मानाव्या ।।३१।।

ज्या आहाती भिंतीवरी । कीं ज्या लिहिल्या आहाती चित्रीं ।
त्या पूजाव्या निर्धारीं । सप्रेम भावें ।।३२।।

या ध्यानानुसार करावी मूर्ति ।
अथवा समाधि सेवा जे अलकावती ।
तेचि प्रमाण मानोनि चित्तीं । धरावी प्रेमें ।।३४।।

जेवढा वेळ संसारी । तेवढी करावी आळंदीवारी ।
आजानतरुतळीं अनुभवामृत ज्ञानेश्वरी । वाचावी प्रेमें ।।३५।।

इंद्राणीतीरीं बैसोनी । हरीपाठ म्हणावा वदनीं ।
विश्रांतीवटातळीं बैसोनी । चांगदेवपत्र पैं जपावे ।।३६।।

षोडशोपचारें ओजा । पूजावा आळंदीचा राजा ।
संत ब्राह्मणातें शक्ति सहजा । पूजोनी भोजन घालावे ।।३७।।

जे जे काज येईल वाटणी । तें मोल न घेतां करावे प्रीतीकरूनी ।
किंवा पालखी स्कंधीं धरूनी । बृहस्पतिदिनीं सुखी व्हावे।।३८।।

आरति सेज काकडआरती । प्रेमें कराव्या प्रीती ।
नगर प्रदक्षिणा यथानिगुती । सप्रेमचित्तीं आचराव्या ।।३९।।

तृणपाषाणा करावे वंदन । मनाते वाटावे क्षणक्षण ।
कीं अज्ञोनी भासे भेदभान । अभेदवंदन होईल केव्हां ।।४०।।

जेवढे तीर्थ प्रगट असती । तेवढे सविधि पूजावे प्रीती ।
गुप्ततीर्थ ते भावावे चित्तीं ।
हें बोलिले महाभारतीं पाराशर्य ।।४१।।

परी प्रगट तीर्थाहून । गुप्ततीर्था विशेषपण ।
मानोनी अनादरमय मन । होवो न द्यावे प्रगटाविषयीं।।४२।।

अनादरें न पहावे गुप्त । जे देखते जाहले एकनाथ ।
तें चित्तेंचि पहावे नित्य तीर्थ । जेथे तात विराजती ।।४३।।

पुजोनी श्रीहैबतीराय । त्यांनीं जो क्रम दाविला होय ।
तैसाची आचरावा स्वयें । आगमवत ।।४४।।

नित्य सेवावे प्रसाद तीर्थ । उटी पहावी प्रेमभरित ।
किंवा करावे समस्त । आपुलेनि हाते ।।४५।।

(अध्याय ४ था, संप्रदाय सुरतरु)

## स्वतःचे घरीं राहून सेवा

"कां मनाचेनि दुर्बळें । जैं सेवासमयीं विघ्न खवळे ।
तैं गृहींहि असोनी भावनाबळें । रहावे आळंदीं ।।४७।।

गृहकार्याते करोनी । परसंग रसायनीं ।।
हृदयीं तप्त जेवी जारिणी । तेवि स्मरणीं असावे ।।४८।।

उटी चंदन इंद्रायणीतीर्थ । गोळी करोनिया समस्त ।
गृहीं आणोनी सन्निहित । हरिपाठ पाठ करावे ।।४९।।

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 38700 दि:
क्रमांक 9520 नों दि:



इतर सजातीय भावना । भावोनी करावे ग्रंथपठणा ।
आणि आणोनी आजानशुष्कपर्णा ।
तत्सन्निध अनुभवामृतादिपठणा कीजे ।।५०।।

पालखीचिया संगतीं । फावलीया वेळीं निश्चिती ।
पंढरीहि पहावी प्रीती । किंवा आळंदीप्रति असावे ।।५१।।

गृहीं जे सांगितलें अर्चन । तेथ पुजाव्या पादुका आणोन ।
कां स्वदेशी योग्य प्रतिनिधी गणून ।
तेथ प्रतिदेशपादुकास्थान करावे ।।५२।।

मग प्रतिनिधीचिया अनुज्ञा । योग्य पूजा आदि करोनी प्राज्ञा ।
पादुकाधारणसंज्ञा । स्वकीय कीजे ।।५३।।

...म्हणोनि पादुकांची पूजा । षोडशोपचारें करावी ओजा ।
प्रतिनिधिस्थानी सहजा । सुखासनोत्सवादि करावे ।।६९।।

हैबतिरायें जो क्रम । आळंदींत ठेविला सप्रेम ।
तोचि भजनादि नियम । स्थानींहि कीजे ।।७०।।

पांच अभंग पालखी समयीं । म्हणोनी आनही म्हणावें कांहीं ।
मत्कृत हैबतिराय आरति गावि । विशेष एक ।।७१।।

दशमीचिये दिनीं । हैबतिराय आरति म्हणू नये वदनीं ।
किंवा पालखी झालियावरी मनेंचि देहूस जावूनि ।
मग तुकाराम आणि हैबतिराय पूजावे ।।७२।।

पाळावे गुरुवासरव्रत ।
कार्तिक वद्य त्रयोदशीं उत्सव पहावा आळंदींत ।
गृहीं आचरूं नये ती रीत । अन्योत्सव निश्चित करावा ।।७३।।

पादुकाचिया स्नानीं । आणावी शुद्ध इंद्राणी ।
किंवा मंदाकिनी वा त्रिवेणी । स्नान घालावे ।।७४।।
उत्तर गंगा हरिद्वार प्रयाग । येथोनी कावडी भराव्या सवेग ।
श्रीगुरुरामेश्वरलिंग । अभिषेकावे आळंदीये ।।७५।।
मग ते तीर्थ आणोनी । नित्य पुनीत व्हावे पिवुनी ।
नैवेद्य प्रसाद आणावा सदनीं ।
रूढि अनुगुणीं अन्न वा पुराळ ।।७६।।
...जे जे उपचार जैसे मिळती । बाह्यपूजा करावी तिये रीती ।
दास्य दीक्षा घेवोनी प्रीति । बाह्यपूजा आरंभिजे ।।८०।।
(अध्याय ४ था, संप्रदाय सुरतरु )

दास्यदीक्षा घेऊन बाह्यपूजा करता करता एकेंद्रियता आली म्हणजे मग संबंधदीक्षा घेऊन प्रेमभक्ति करावी. लालन, वात्सल्य, माधुर्य असे तीन संबंध आहेत. पुरुषांस बहुतेक लालनच हितावह आहे. लालन म्हणजे श्रीगुरूला किंवा देवाला आईबाप समजून प्रेम करणे होय. स्त्रियांना श्रीगुरूचे किंवा देवाचे ठिकाणी वात्सल्य करणे हितावह आहे. वात्सल्य म्हणजे श्रीगुरूला किंवा देवाला आपले लहान मूल समजून प्रेम करणे होय. ज्यांना आत्मज्ञान झाले आहे त्यांनी देवाला पति समजून प्रेम करणे उत्तम होय. भक्तीत भगवत्प्रेमामुळे विषयांचा वीट आला असल्यामुळे, या कोणत्याहि भक्तीत विषयसुखाचा मुळीच संबंध नसतो व त्यातल्या त्यात दृढज्ञान्याचे ठिकाणी तर तो मुळीच नसतो.

### संप्रदायाची पूजास्थाने

(१) आळंदी मुख्य (२) वृंदावन (३) मथुरा (४) प्रयाग (५) पंढरी (६) हरिद्वार (७) काशी--वगैरे द्वादश ज्योतिर्लिंगें इत्यादि संप्रदायाची पूज्यस्थाने आहेत.

## संप्रदायाची व्याप्ति

श्रीमहाराजांच्या हयातीत पुष्कळ लोकांशी त्यांचा परिचय झाला. चर्चा, संवाद वगैरेहि पुष्कळ लोकांनी त्यांच्याशी केले. हे सर्व सविस्तरपणे त्यांच्या चरित्रात आले आहे. पण अत्यंत निष्ठावंताखेरीज त्यांची कोणाला सांप्रदायिक किंवा शिष्य करण्याची प्रवृत्ति नसल्यामुळे, त्यांच्या अनुयायांची व्याप्ति फार थोडी आहे. अजूनहि तीच शिकवण पाळली जात असल्यामुळे संप्रदायाचा शिष्यपरिवार कांही मोठा नाही. तरी पण त्यांच्या ग्रंथाचा अभ्यास करणारे व तद्वारा त्यांच्याबद्दल आदर असलेले लोक पुष्कळ दिसून येतात. श्रीमहाराजांवर अत्यंत निष्ठा असल्यामुळे त्यांचे गुरुत्व ज्यांनी पत्करले असे पुरुष जुने व नवे मिळून शंभराचे आंतच आहेत.

श्री. रामचंद्र बापू मोहोड माधानकर, श्री. गणपतराव बापू सावळीकर, श्री. आकाजी बापू यावलीकर, श्री. हरीभाऊ केवले, सावकार (हे आद्य ग्रंथलेखक होत), नानाजी कविमंडण, वासुदेवराव वामनराव मुळे (हेडमास्तर निलसिटी हायस्कूल, नागपूर), वे. शा. सं. श्रीनिवासशास्त्री हरदास (हे नागपूर येथील काव्यज्ञ व वैय्याकरणी होते.) श्री. गणपतराव खंडो भालेरावमास्तर, दत्तोपंत खापरे, वकील (एम्. ए., एल्एल्बी.), नारायण पंडित, गंगाधर बाळकृष्ण मुळे, श्री. मारुतीराव रामेकर, श्री. काशीनाथराव आठवले (रिटायर्ड सबजज्ज), श्री. नारायणराव केकरे, वकील, हर्दा, श्री. दिनकराव गोखले, वकील, खांडवा, श्री. गणपतराव केकरे, हर्दा, श्री. सितारामपंत घाटे मास्तर (राजकुमार कॉलेज, रायपूर), श्रीमंत शेठ अंबादास रामरख मारवाडी, यावली, श्री. ज्ञानेश्वर उद्धव मांढरे, पुणें, व्यंकटराव देशपांडे, श्री. राजेश्वरराव त्रिपुरवार (चरित्रलेखक), श्री. विठ्ठलराव

केकरे, वकील, मंडला, श्री. विष्णु बापुजी धामापुरकर, प्रोफेसर ॲग्रिकल्चर कॉलेज, नागपूर इत्यादि पुरुष मंडळी व सौ. मातोश्री रंगुबाई देशपांडे, सौ. मातोश्री दुर्गाबाई परुळकर, गं. भा. मातोश्री ताई केसकर, शिरसगांव इत्यादि बाया मंडळी त्यांच्या सान्निध्यात राहिलेली आहे. नवीनहि अनुयायी बरेच आहेत. तरी संप्रदायाचा व्याप वर सांगितल्याप्रमाणे फार मोठा नाही.

## सांप्रदायिक उत्सव

गोकुळअष्टमी, कात्यायनी व्रतोत्सव, शिवरात्री-उत्सव व रामनवमी इतके उत्सव होतात.

## सध्या चालू असलेले संप्रदायकार्य

श्री महाराजांनी 'संप्रदाय सुरतरु' ग्रंथात सांगितलेल्या मार्गांनी श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका व श्रीकृष्ण मूर्ति यांची पूजाअर्चा, वेदान्तचर्चा, भजन, श्रीमहाराजांच्या ग्रंथातून प्रतिपादलेल्या तत्त्वांचा प्रवचनद्वारे पुरस्कार, श्रीमहाराजांचे अप्रकाशित ग्रंथ प्रकाशित करणे, त्यांच्या ग्रंथसंग्रहालयाची व्यवस्था इत्यादि संप्रदायाचे कार्य चालू आहे. इति शम्.

---

## भगवन्नाम महिमा ...२

भगवंताच्या नामाचा महिमा श्रुतिस्मृतिपुराणें, संत या सर्वांनी गायिला आहे. " मर्त्ता अमर्तस्य ते भूरि नाम मनामहे । विप्रासो जात वेदसः " व " आस्य जानन्तो नाम चिद्विवक्तन महस्ते विष्णो सुमतिं भजामहे " असे हे दोन, ऋगवेद संहितेत, सर्व साधनापेक्षा नामसाधन श्रेष्ठ आहे, असे नामाचे माहात्म्य सांगणारे मंत्र दिलेले आहेत. प्रत्येक पुराणात नाममहात्म्य सांगणारे शेकडो श्लोक दिले आहेत. तुकाराम महाराज, नामदेव महाराज, नाथ महाराज, श्रीज्ञानेश्वर महाराज यांनी तर नाममहात्म्याचा ध्वजच उभारिला व एका नामसाधनानेच सर्व साधनांचे फळ मिळते असा घोष केला आहे. भगवन्नामस्मरण हे सर्व पापांची होळी करणारे आहे असे पुराणांचे व संतांचे म्हणणे आहे. असा हा नाममहिमा अत्यंत अलौकिक सांगितला आहे. हा नाममहिमा अर्थवाद नाही. नाममहिमा अर्थवाद आहे असे म्हणण्याचा

" अर्थवादं हरेर्नाम्नि संभावयति यो नरः ।
स पापिष्टो मनुष्याणां नरके पतति स्फुटम् ।।"

(कात्यायन संहिता)

इत्यादि अनेक वचनांनी पुराणादि ग्रंथातून निषेध केला आहे. पद्मपुराणात दहा नामापराध सांगितले आहेत. त्यांत " नाम्न्यर्थवाद भ्रमः " नाममहिमा अर्थवाद आहे. असा भ्रम होणे हा एक अपराध गणला गेला आहे. हारितादि स्मृति ग्रंथातूनहि नाममहिमा वर्णिला आहे. असा एक आर्षग्रंथ नाही की, ज्यात नाममहिमा वर्णिला नाही. गीतेत भगवंतांनी आपल्या मुखाने " यज्ञानां जपयज्ञोऽस्मि " (गी. १०–२५) सर्व यज्ञापेक्षा नामजपयज्ञ श्रेष्ठ ठरविला आहे. " जप्येनैव तु संसिध्येद् ब्राह्मणो

नात्र संशयः'' (म. स्मृ. २-८७) नुसते जपाने देखील ब्राह्मणत्व सांभाळले जाते असे मनूनेहि म्हटले आहे. गीतेच्या सतराव्या अध्यायात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी व शंकराचार्यांनी भगवन्नाम हे विगुणकर्माला सगुण करते व अपूर्ण कर्म पूर्ण करिते असे सांगितले आहे.

परि आश्रय आकाशा । आकाशचि कां जैसा ।।
या नामा नामीं आश्रय तैसा । अभेद असे ।।४०३।। (ज्ञा.)

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, आकाशाला जसा आकाशाचा आश्रय असतो म्हणजे आश्रय आकाश व आश्रित आकाश असा अभेद आहे, तसाच नाम व नामाचा आश्रयभूत नामी परमात्मा या दोघांचाहि अभेद आहे. नाम व परमात्मा हे दोन्ही अभिन्न आहेत. "नाम परब्रह्म वेदार्थी" (ज्ञा. १०-२३३) वेदाने देखील नाम परब्रह्मरूपच मानले आहे असे माऊलीचेच वचन आहे. हे नामाचे माहात्म्य जाणूनच आपल्या सर्व कर्ममार्गात आदिअंती "विष्णवे नमः" म्हणून नामस्मरण करीत असतात. पण दुर्दैव हे की, कित्येक समाजधुरिणाना हे नाममाहात्म्य रोचक म्हणजे अर्थवाद वाटते.

### अर्थवादाचे रूप

एखाद्याने एखादे वाक्य अर्थवाद आहे असे म्हटले म्हणजे ते अर्थवाद होते असे नाही. अर्थवादाचे लक्षण जेथे दिसेल ते वाक्य अर्थवाद होते. ज्यांना वेदातील पशुयागापेक्षा नामजपयज्ञ श्रेष्ठ असे भगवंताचे म्हणणे बरे वाटत नाही तेहि असेंच "यज्ञानां जपयज्ञोऽस्मि" हे वाक्य अर्थवाद आहे असे म्हणतात. असे म्हटल्यास सर्व विभूति-योगाध्ययच अर्थवाद म्हणावा लागेल. जेथे अर्थवाद असतो तेथे हे वाक्य अर्थवाद नव्हे असे सांगण्याची गरज नसते, पण नाममहिमा सांगताना हा नाममहिमा अर्थवाद नाही व तसे म्हणणे अत्यंत पाप आहे असे पुराणात सांगितले आहे. अर्थवाद हा पूर्वमीमांसेतील

पारिभाषिक शब्द आहे. पूर्वमीमांसेत दोन प्रकारची वेदवाक्ये आहेत असे मानिले आहे. एक मुख्य वाक्य व दुसरे अवांतर वाक्य. सर्व वेदाने मनुष्याला अमुक कर, अमुक करू नको अशा प्रवृत्तिपर किंवा निवृत्तिपर आज्ञाच वेदात केली आहे. त्यामुळे वेद हे क्रियापर आहे असे पूर्वमीमांसकाचे म्हणणे आहे. जे वचन असे विधिपर आहे व ज्याचे कांही पापपुण्यरूप फळ सांगितले आहे, ते विधिवाक्य मुख्य म्हटले जाते व ज्या वाक्यांत कांहीच विधि नसतो पण विधीमध्ये उपयोगी पडणाऱ्या यजमान, देवता, सामुग्रीद्रव्य, त्यांचे केवळ स्तुतिपर किंवा निंदापर अथवा अस्तित्वदर्शक वर्णन असते, असे वाक्य अवांतर वाक्य म्हटले जाते. या अवांतर वाक्यालाच पूर्वमीमांसेत 'अर्थवाद' म्हणतात. या अर्थवाद वाक्यांचा विधिवाक्याशी ते एकवाक्यता करितात. वेदातील अवांतर वाक्यांचा भाग एकदा विधि सांगत नसला तरी वेदात सांगितलेल्या विधिवाक्यांची प्रशंसा करून मनुष्याला कर्म करण्याला प्रवृत्त करणारा असल्यामुळे तो विधीशीच संल्लग्न आहे, म्हणून तो निरर्थक नाही, अशी पूर्वमीमांसक एकवाक्यता करीत असतात. सारांश, ज्या वाक्यात कांही विधिआज्ञा नाही व ज्यात काही स्वतंत्र फळप्राप्ति सांगितली नाही असे बचन अर्थवाद होय असा पूर्वमीमांसेत 'अर्थवाद' पदाचा स्पष्टार्थ सांगितला आहे.

### अर्थवादाचे प्रकार

ही वेदातील अर्थरूप वाक्येहि तीन प्रकारची आहेत. याहून चवथा प्रकार नाही. पहिली अनुवादरूप वाक्ये आहेत. दुसरी 'गुणरूप' वाक्ये व तिसरी 'भूतार्थरूप' वाक्ये होय. जो अनुभव आपण प्रत्यक्ष प्रमाणाने घेतो तोच अनुभव श्रुतीने सांगितला असला तर अनुभव सांगणारे श्रुतिवाक्य 'अनुवादरूप' अर्थवाद म्हटले जाते. उदाहरणार्थ–

(१) "अग्निर्हिमस्य भेषजम्" हे श्रुतिवाक्य आहे.

अग्नि हा थंडीचे निवारण करितो असा त्या वाक्याचा अर्थ आहे. पण अनुभव आपल्याला प्रत्यक्षप्रमाणानेच येतो. श्रुतिवरून येतो असे नाही. येथे ह्या वाक्यात प्रत्यक्ष प्रमाणाने सर्वांना कळत असलेली गोष्टच श्रुतीने सांगितली असल्यामुळे "अग्निर्हिमस्य भेषजम्" हे श्रुतिवाक्य आपल्याला येत असलेल्या प्रत्यक्ष अनुभवाचा अनुवाद म्हणजे पुनः उच्चार करिते, म्हणून "अग्निर्हिमस्य भेषजम्" हे वाक्य 'अनुवादरूप' अर्थवादात्मक होय.

(२) आपण प्रत्यक्ष जशी वस्तु पाहतो त्या विरुद्ध लक्षणाने श्रुतीने जर त्या वस्तूचे वर्णन केले असेल तर तेथे त्या वस्तूचे वर्णन करणारे श्रुतिवाक्य गुणवादाने अर्थवादरूप होते. जसे "यजमानः प्रस्तरः" हे एक श्रुतीत वाक्य असून त्याचा यजमान दगड आहे असा अर्थ आहे; पण प्रत्यक्ष यज्ञात बसलेला यजमान आपण चेतन पाहतो. तो दगड दिसत नाही. तेव्हा हे "यजमानः प्रस्तरः" हें श्रुतीचे वचन प्रत्यक्षाच्या विरोधी आहे म्हणून हे वाक्य अर्थवादात्मक आहे.

(३) "आदित्यः पुरुषो भूत्वा कुंतिमुपजगामह"हे वचन असून सूर्य, पुरुष होऊन कुंतीपाशी आला असा त्याचा अर्थ आहे. हे 'भूतार्थवादाचे' उदाहरण आहे. ह्या भूतार्थवादात इतिहास असतो.

### नाममहिमा अर्थवाद नाही

वर सांगितलेल्या अर्थवादांपैकी नाममहिमा कोणता अर्थवाद होतो हे पाहू गेल्यास नाममहिमा कोणताच अर्थवाद ठरत नाही असे आपल्याला स्पष्ट दिसून येईल. नामाचा महिमा जो कांही सांगितला आहे तो आपल्याला शास्त्राने त्याचाच अनुवाद केला असे कोणीच म्हणू शकत नाही. कारण तो प्रत्यक्षप्रमाणगम्य नाही. म्हणून नाममहिमा अनुवादरूप अर्थवाद आहे असे म्हणता येत नाही.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम 3८७७० वि:
क्रमांक २५८० नों वि
१०/८१

गुणवादात्मक अर्थवादहि प्रत्यक्षप्रमाणाचे विरुद्ध प्रतिपादन करणारे वचनाचे ठिकाणीच मानला जातो, पण नाममहिमा हा प्रत्यक्ष प्रमाणाचे विरुद्ध प्रतिपादन करणारा आहे असे तरी कसे म्हणता येणार? म्हणून नाममहिमा गुणवादाने अर्थवादरूप आहे असे म्हणता येत नाही. भूतार्थवादात इतिहास असतो व इतिहास म्हणजे घडलेली सत्य हकीकत होय. त्या दृष्टीने नाममहिम्याचा इतिहास सत्य ठरतो. म्हणजे नाममहिमाच सत्य ठरतो. अर्थवाद वाक्यात स्वतंत्र फळ सांगितले नसते. विधीने प्राप्त होणारे फळच अर्थवाद वाक्याचे फळ समजले जाते. नाम घ्यावें असा विधि आहे व नाम-शास्त्रात नामाचे स्वतंत्र फळ सांगितलेले आहे. नामाने सर्व पाप क्षालन होते. कांही न करता एक नामसाधन केले तरी भगवत्-प्राप्ति होते असेच नामस्मरणाचे सर्वसाधननिरपेक्ष फळ सांगितले आहे. म्हणून कोणत्याहि शास्त्रविचाराने नाममहिमा अर्थवादरूप मानताच येत नाही.

### वचन विरोध

आता संतांच्या वचनात कांही परस्पर विरुद्ध वचने दिसतात. एका वचनात ते म्हणतात की भाव असो, नसो जिव्हेने नामस्मरण केल्यास सर्व पापांचा नाश होऊन ईश्वरप्राप्ति होते, तर दुसऱ्या वचनात तेच म्हणतात की, भाव असल्यावाचून नाम घेणे ही नुसती जिव्हेची बडबड आहे. अशी संतांची परस्पर विरोध वचने असली तरी नामस्मरणाचे माहात्म्य अर्थवाद नसल्यामुळे नाममाहात्म्य अर्थवाद न मानताच संतांच्या परस्परविरोधी भासत असलेल्या वचनांचा समन्वय करावयास पाहिजे, तो पुढीलप्रमाणे करता येतो व तोच प्रमाण ठरतो.

### वचन संगति

भगवंताच्या नामाची दोन प्रभावी फळे सांगितली आहेत. एक फळ म्हणजे सर्व पापांचा क्षय व दुसरे फळ म्हणजे भगवंताचा

साक्षात्कार. पहिले फळ म्हणजे सर्व पापांचा क्षय, हे भगवंताचे नाम कशाहि रीतीने घेतले तरी प्राप्त होते. हे फळ प्राप्त होण्याकरिता भाव म्हणजे श्रद्धाच असली पाहिजे असे नाही. तुकाराममहाराजांनी

"चाल केलासी मोकळा । म्हणे विठ्ठल वेळोवेळा ।।१।।
तुज पापचि नाही ऐसे । नाम घेता जवळी वसे ।।२।।

या अभंगाने नामाचे पापक्षालन सामर्थ्य केवढे थोर आहे हे दाखविले आहे. या अभंगात श्रीतुकाराममहाराजांनी पाप करण्याची परवानगी दिली असा अर्थ नाही, हे "चाल केलासी मोकळा" या चरणावरून दिसून येते. जो किती सांगूनहि पापकर्मापासून परावृत्त होत नाही त्याला त्यांनी उपदेश करताना त्रासलेल्या आईबापाप्रमाणे असा उपदेश केला आहे की, तू चाल मोकळी केलीस म्हणजे वाटेल तसे वागावेसे वाटते तर बाबा, तसे वाग. कर वाटेल ते, पण एकमात्र न चुकता वेळोवेळी विठ्ठलाचे नांव तरी घेत राहा म्हणजे पापसंचयाने होणारी दुर्गति तरी नामस्मरणाने टळेल. असे नाम घेता घेता पुढे नामस्मरणाचा ध्यास लागून वृत्तीचा पालट होतो व पुरुष धार्मिक होतो. श्रीतुकारामादि संतांचा अशाप्रकारचा प्रत्यक्ष अनुभव आहे. कसेहि नाम घेतले असता पापाचे पर्वत जळतात, पण तशाच नामस्मरणाने लगेच भगवत्प्राप्ति होते असे नाम कोठेच सांगितले नाही. नामस्मरणाने भगवत्प्राप्ति होण्याकरिता त्या भगवत्-प्राप्तीच्या उद्देशाने श्रद्धापूर्वक सतत नाम जप करून त्या नामस्मरणाबरोबर भगवंताचे ध्यानहि घडले पाहिजे. असा नामरूपाचा मेळ झाला नाही, तर

"नामरूपा नाही मेळ । अवघा वाचेचा गोंधळ"

म्हणजे असे नामस्मरण वाचेची केवळ बडबड होय व त्या नामाने भगवत्प्राप्ति होत नाही असे नाथांचे स्पष्ट म्हणणे आहे.

"इंद्रियासी नेम नाही । मुखीं नाम करील काई"

ह्या अभंगातहि भगवत्प्राप्तीच्या दृष्टीनेच वैय्यर्थ दाखविले आहे. पापाचे क्षालनहि तशा नामस्मरणाने होत नाही असा त्या अभंगाचा अर्थ नाही. नामस्मरण करीत राहून पापहि करीत राहिल्यास नामस्मरणाच्या पूर्वीची पापे नामस्मरणाने नाहीशी होतात, पण नामस्मरणानंतरची पापे राहत जातात. त्यामुळे लवकर चित्त शुद्ध होऊन भगवत्प्राप्ति होत नाही, असा त्या अभंगाचा भावार्थ आहे. अशा सर्व अभंगाचा अर्थ हाच आहे की, भगवत्प्राप्ति व्हावी अशी इच्छा असेल तर मग नामाबरोबर रूपाचे ध्यान होत राहिलेच पाहिजे. भगवंताचे नामस्मरणाबरोबर भगवंताचे ध्यान घडण्याकरिता विषयाचे ध्यान सुटले पाहिजे व त्याच्याकरिता अभ्यास व वैराग्य पाहिजे. एकटचा नामस्मरणानेहि विषयवैराग्य, भगवंताचे ध्यान व भगवत्प्रेम उत्पन्न होऊ शकेल, पण ते नामस्मरण अविरत घेणे अत्यंत आवश्यक असते व त्याला कालावधिहि लागतो. काळ लागू नये व भगवत्प्राप्ति लवकर व्हावी अशी इच्छा असल्यास इंद्रियनिग्रह व मनोनिग्रहपूर्वक अविश्रम नामस्मरण करावे हे त्या अभंगात सांगितले आहे.

सकृदुच्चरितं येन हरिरित्यक्षरमद्वयम् ।
बद्धः परिकरस्तेन मोक्षाय गमनं प्रति ।।

इत्यादि वाक्यात एकदा नामस्मरण केल्यावर अजामिळाप्रमाणे ज्याला पुढे पाप करण्यास अवसरच मिळाला नाही म्हणजे मरणाचे वेळी तोंडाला भगवंताचे नाम आले तरी तेवढचा एकवेळच्या नामस्मरणाने देखील त्याच्या सर्व पापांचा नाश होऊन त्याची दुष्प्रवृत्ति जाऊन सत्प्रवृत्ति होते व तो मोक्षाचा अधिकारी होतो— म्हणजे मोक्षमार्गाला लागतो, असे सांगितले आहे. एकवेळ नामस्मरण केले व मग कांही करीत राहिले तरी तेवढचा एकवेळच्या

नामस्मरणाने मोक्ष होतो असा त्या वाक्याचा अर्थ कोणी केल्यास, दु:खाने एवढेच म्हणावे लागेल की, भगवंता! अशा बुद्धिमान पुरुषांच्या तोंडून अर्थ ऐकण्याचे माझे कपाळी लिहून ठेवू नकोस. अजामिळाने शेवटच्या वेळी नाम घेतले व तेहि पुत्रमिषाने–परंतु तेवढ्या नामाने त्याच्या पापाचा क्षय झाला व त्याला पुढे सत्प्रवृत्ति होऊन त्याने मुक्तीचे साधन केले. पुत्राकडे दृष्टि ठेऊन नाम घेतले नसते व परमेश्वराकडे दृष्टि ठेवून नाम घेतले गेले असते तर त्या सकृन्नामोच्चाराने देखील तो विष्णुलोकास गेला असता हे सुनिश्चित. कारण तशा नामस्मरणाबरोबर भगवत्प्राप्तीला आवश्यक ध्यान घडण्यामुळे,

"मरणीं जया जे आठवे। तो तेचि गतीते पावे।।"

(ज्ञा. ८–७६)

या माउलीच्या आश्वासनाप्रमाणे त्याची वैकुंठ हीच एक गति होती. अजामिळाला तसे झाले नाही. कारण नांव देवाचे व ध्यान मुलाचे ह्या गोंधळामुळे तो वैकुंठाला लगेच गेला नाही; पण तेवढ्या व तशा नामस्मरणानेच त्याचे सर्व पाप नाहीसे होऊन त्या नामस्मरणाच्या अगाध पुण्याईने त्याची मोक्षमार्गाकडे प्रवृत्ति झाली. सारांश, नामस्मरणाचे नामदाहक सामर्थ्य रोचक आहे हे विधान सर्वस्वी चूक आहे.

**"निष्ठावंत भाव भक्ताचा स्वधर्म"**

भगवत्प्रेम उत्पन्न होणे कठीण आहे हे कोण नाही म्हणतो; पण ते उत्पन्न होण्याला मात्र नामस्मरण हेच साधन आहे. "बहुता सुकृतांची जोडी। म्हणुनि विठ्ठली आवडी" भगवत्प्रेम उत्पन्न होण्याला अलोट सुकृत पदरी पाहिजे हे खरेच आहे. अजामिळाने मनोनिग्रहादि साधने करून मोक्ष मिळविला असला

तरी त्याने नामसाधन केले नाही असा उल्लेख नाही. विष्णुदूतांचे तोंडून नामाचा पराक्रम ऐकल्यावर त्याला नामसाधनच करावेसे वाटणे साहजिक होते. नामानेच अष्टांगयोगाची सर्व अंगे साधू शकतात असे योगशास्त्रातहि मान्य केले आहे. योगात नामस्मरणपूर्वक केलेला सबीज अभ्यासच सुलभ व निर्विघ्न मार्ग आहे असे निक्षून सांगितले आहे. अजामिळाने नामस्मरण सोडून अष्टांग योगाभ्यास केला असेल तरी अजामिळाने तसा अभ्यास केला म्हणून त्यावरून एकट्या नामाने शेवटी भगवत्प्राप्ति होत नाही व त्याला योगादिकांची जोड द्यावी लागते असा निष्कर्ष काढणे मोठी चूक आहे. सगुणध्यान योगच आहे. भक्ति ही शूळावरील पोळी आहे हे खरेच आहे. भक्तीकरिता शूरवीराप्रमाणे प्राण देखील अर्पण करण्याची तयारी पाहिजे. हाच भक्तिमार्गातील वीररस आहे. भगवत्ध्यानाने अशी तयारी होते. पण अशी तयारी होण्याकरिता जे भगवंताचे प्रेम असावयास पाहिजे ते क्रमाक्रमाने

"निष्ठावंत भाव भक्ताचा स्वधर्म ।
निर्धार हे वर्म चुको नये ।।"

अशा निर्धाराने व पूर्ण निष्ठेने नामस्मरण करणाऱ्या नामधारकाला भगवंत निश्चयाने देतोच. भगवत्प्राप्तीकरिता निष्ठायुक्त नामस्मरण पाहिजे व त्याचबरोबर प्राण खर्ची घालण्याचाहि निर्धार पाहिजे, हे सर्वांना मान्य आहे. तुकाराम महाराजांनी "अनाथाच्या नाथे घातला विमानीं" भगवंतांनी अजामिळाला विमानात घालून वैकुंठात नेले हे जे म्हटले आहे ते तात्काळ नेले ह्या अर्थी न घेता शेवटी नेले असा अर्थ आहे. एका नामस्मरणाने त्याची सर्व पापे नाहीशी होऊन त्याची सत्प्रवृत्ति झाली व तो मोक्षसाधनाला लागून शेवटी वैकुंठाला गेला असा त्या वचनाचा अर्थ केला पाहिजे. भगवत्प्राप्ति किंवा भगवत्प्रेम

शूळावरील पोळीप्रमाणे कठीण असले तरी आपल्या बुद्धीचा अहंकार बाळगणाऱ्यालाच कठीण आहे. सर्व अहंकाराचा समूळ त्याग करून व आपलेच दोष पाहून जो भगवंताला सानन्य दीनतेने त्याच्या नांवाने हाका मारितो त्यालाहि शूळावरील पोळी मिळते यात शंका नाही. आपल्या शहाणपणाचा अभिमानच या भक्ति-मार्गातील पाय घसरून पडण्याची भीति असलेला थोर तुटलेला पर्वताचा कडा आहे, असे तुकाराममहाराजांनी "भक्ति म्हणजे काय शूळावरील पोळी" या अभंगात म्हटले आहे. अभिमान असतो तोपर्यंत भक्तिप्रेम प्राप्तच होत नाही, एवढेच नाही तर असलेले प्रेमहि दुरावते.

---

## श्रीसंत गुलाबरावमहाराज व नामनिष्ठा...३

श्री सद्‌गुरु गुलाबराव महाराज हे ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात सांगितलेल्या योगात निष्णात होते. भगवान व्यासासारखे पूर्ण ज्ञानी व भगवान श्रीकृष्णाचे ठिकाणी गोपीप्रमाणे त्यांचे निःसीम प्रेम होते. महाभागवत श्रीज्ञानेश्वर माउलीचाच त्यांच्यावर साक्षात् अनुग्रह होता. श्री क्षेत्र आळंदी येथे 'ज्ञानेश्वर माउली' या मंत्राची संपुटी लावून अजानवृक्षाखाली त्यांनी अनुभवामृताचे पाठ केले होते अशी आख्यायिका आहे. आधीच प्रपंचाचा वीट येऊन वैराग्य संपन्न झाले होते व भगवत्प्राप्तीची आतुरता होती. म्हणूनच भगवद्‌भक्त हैबतिरायाप्रमाणे श्रीसद्‌गुरु गुलाबराव महाराजांनाहि ज्ञानेश्वर माउलींनी स्वनामाचा प्रत्यक्ष उपदेश देऊन कृतार्थ केले.

त्यांनी फार मोठी ग्रंथसंपत्ति निर्माण केली आहे. सर्वस्वी सगुण भक्तिच मान्य असलेल्या वारकरी संप्रदायाला तर श्रीसद्‌गुरु गुलाबरावमहाराजांचे ग्रंथ अत्यंत उपयोगी असूनहि कांही वारकरी निश्चलदासासारख्या निर्गुणवाद्याचे ग्रंथांचा ते अभ्यास करितात, पण सर्व संतांच्या सिद्धांतांचे प्रतिपादन करणाऱ्या श्रीगुरु गुलाबराव महाराजांच्या ग्रंथाला मात्र ते तुच्छ लेखतात हे आश्चर्य आहे. याचे कारण एकच आहे की, वारकरी पंथातील कांही अग्रणी यांना पंढरीची वारी करणाऱ्या भक्तावाचून भारतातील इतर भक्ताविषयी आदरभाव नाही, एवढेच नाही तर पंढरीला एखादेवेळीं जाऊन नित्य आळंदीला किंवा आपल्या उपास्याचे स्थळी जाणारे जे कोणी भक्त असतील त्यांचा भक्तिभावहि खोटा असेहि म्हणायला ते कमी करीत नाहीत. सगुण भक्तालाहि असा मार्गाभिमान किंवा उपास्याभिमान असावा याचे आश्चर्य वाटते. सगुण भक्तीत अभिमान निःशेष गळतो व भक्त अत्यंत विनम्र होतो असे म्हणतात, पण या कसोटीने वारकरी पंथातील कांही जणांच्या या प्रवृत्तीकडे पाहता

वारकरी पंथात सगुण भक्तीने फार मोठी अहंकृति उत्पन्न केली आहे असे म्हणणे भाग पडते. सर्व संत सारखे लेखावे, थोर–कनिष्ठ असा भेदभाव धरू नये अशी ज्या पंथाची शिकवण त्या पंथातच असा संताविषयी कनिष्ठ–श्रेष्ठभाव असावा याचा खेद होतो. पतिव्रतेची आपले पतीचे ठिकाणी एकनिष्ठता असते पण ती आपापल्या पतीचे ठिकाणी एकनिष्ठ असलेल्या ज्या दुसऱ्या स्त्रिया, त्यांना माझ्या पतीचे भजन करा असे कधी म्हणत नसते. ती सर्व इतर एकनिष्ठ स्त्रियांना आपल्यासारख्याच एकनिष्ठ पतिव्रता समजत असते व सर्वांविषयी पूर्ण आदरभाव दाखविते. तसेच वारकरी पंथातील अग्रणीला इतर उपासकांविषयी वाटू लागेल तो सुदिन.

### नामनिष्ठा

श्रीसद्गुरु गुलाबरावमहाराजांची नामनिष्ठा म्हणजे नामस्मरणाचा आदर व तदेकपरायणता किती असीम होती हे त्यांच्या ग्रंथातून हरिनामाविषयी त्यांनी काढलेल्या उद्गारावरून दिसून येते. श्रीमहाराजांचे नामस्मरण कोणालाच स्पष्ट दिसत नसे, पण त्यांचे अखंड नामस्मरण चालत असे, हे, झोपेतहि त्यांच्या मुखातून जे केव्हा केव्हा भगवन्नामस्मरण निघालेले दृष्टीस पडत असे त्यावरून दिसून येत असे. सावध स्थितीत मनुष्य नामस्मरण करील पण झोपेसारख्या स्थितीतहि जर नामस्मरण होताना दिसले तर ते मानसिक अखंड नामस्मरणाच्या अभ्यासावाचून होऊच शकत नाही. म्हणून

“ ज्ञानदेवा नाम जपमाळ अंतरीं ।
धरूनि श्रीहरी जपे सदा ।। ”

या ज्ञानराज माउलींच्या म्हणण्याप्रमाणे श्रीमहाराजांचे नामस्मरण अखंड अंतःकरणात चालू राहत असे. श्रीमहाराज म्हणतात,

"नवल सप्रेम नामाची गती ।
अबद्ध म्हणताहि श्रुति । फळ पावे ।।"

प्रेमाने नामस्मरण करताना भगवंताचे नाम तोंडावाटे अबद्ध म्हणजे बरोबर न झाले तरी फळ मिळते. 'ऐं' हे बीज देवीचे वाचक आहे, पण हेच बीज अबद्ध असे निघाले तरी प्रेमामुळे दोष होत नाही. कोणी धर्माभिमानी लोक असा आक्षेप घेतात की कलीमध्ये जे लोक वैदिक कर्म सोडून हरिनामस्मरण करितात ते पतन पावतात. पण असा आक्षेप घेणाऱ्या लोकांचे लक्ष वैदिक धर्म सांगणाऱ्या वचनाकडे जितके असते तितके वैदिक धर्माचा अधिकार नाहिसा करणारे जे आचरण आहे ते आचरण करू नये अशा धर्माज्ञेकडे मात्र त्यांचे लक्ष नसते. शिखा-विरहित असलेला, गायत्रीरहित असलेला, अभक्ष्य भक्षण करणारा, नोकरी करणारा वगैरे ब्राह्मण वैदिक धर्माचरण करण्याला अधिकारी नसतो. त्याचा वैदिक कर्माचा अधिकार नष्ट होतो. कलियुगात सर्वत्र अशीच स्थिति दिसत असताना वैदिक धर्माचे आचरण कसे फलद्रूप होणार ? कोणी म्हणतील की हा आपत्काल आहे. ते म्हणणे खरेहि असले तरी मग अशा बिकट आपत्काली सर्वतोपरी पापापासून अलिप्त ठेवणाऱ्या व शेवटी पूर्ण फलद्रूप होणाऱ्या अशा वेदोक्त नामस्मरणरूप धर्माचा आश्रय कां करू नये ?

यज्ञयागादि कर्माचरण म्हणजेच धर्म अशी समजूत उराशी बाळगणाऱ्या लोकांचा यज्ञादि धर्मावाचून दुसऱ्या वेदोक्त धर्मावर विश्वास बसत नाही. ही काय वैदिकनिष्ठा म्हणावी ! हरिनाम-स्मरण हे देखील वेदोक्त कर्मच आहे व ते सर्व कर्मरूप यज्ञामध्ये श्रेष्ठ आहे हे ऋग्वेदातील ऋचा देऊन महाराजांनी सिद्ध केले आहे व भागवतटीकेत श्रीधराचार्यांनी व विष्णुसहस्रनामभाष्यात आचार्यांनीहि याच श्रुतीच्या आधारे नामस्मरण वेदोक्त कर्म आहे

असे प्रतिपादिले आहे. शिवाय हरिनामस्मरण हा युगधर्महि आहे. युगधर्म हा त्या त्या युगात मुख्य भगवत्प्राप्तीचा मार्ग असतो व त्या मार्गाला सोडून इतर मार्गाने भगवत्प्राप्ति होणे अत्यंत कठीण जाते. या नामस्मरणरूप धर्माने मनुष्य कलीदोषापासून व सर्व पापापासून अलिप्त राहतो, याचे कारण हेच आहे की, श्रीमहाराज म्हणतात,

"अनध्यस्तविवर्तशब्द तो नाम ।
अनध्यस्तविवर्तरूप मेघश्याम ।।"

ज्याप्रमाणे परमात्मा श्रीकृष्ण अविद्या उपाधिरहित शुद्ध ब्रह्मस्वरूप असल्यामुळे, सर्व उपाधीत राहूनहि उपाधिहून अलिप्त आहे, त्याप्रमाणे त्याचे नामहि अविद्याउपाधिरहित असून शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे. म्हणूनच त्या नामाचा आश्रय करणारा नामधारक कधीहि पापाने लिप्त होत नाही. हरिनामाने पापाचे क्षालन होत असेल पण ते हरिनाम सुलभ सोपे असल्यामुळे अशा हरिनामरूप प्रायश्चित्ताने क्षुल्लक पापे नाहिशी होणे शक्य आहे. भयंकर पापाला प्रायश्चित्तहि मरणान्तिकासारखे मोठेच पाहिजे असे कित्येक म्हणतात. या आक्षेपाला उत्तर देताना महाराज म्हणतात, प्रायश्चित्त मोठे कोणते हे शास्त्रावरूनच जाणले जाते. सर्व वेद पुराणादिकांनी नामस्मरणाची इतकी प्रशंसा केली आहे की,

"नाम्नोऽस्ति यावती शक्तिः पापनिर्बहणे हरेः ।
तावत्कर्तुं न शक्नोति पातकं पातकी जनः ।। "

नामस्मरणाने जितके घोर पाप नाहिसे होते तितके पापच मनुष्य करू शकत नाही. हरिनाम ब्रह्मरूपच असल्यामुळे ब्रह्माला जशी मर्यादा नाही तशी नामाच्या माहात्म्यालाहि मर्यादा नाही. पाप करणे पाप असेल, पण नाम महिम्याचा संकोच करणे किंवा तो

खोटा आहे म्हणणे हे महत्तम पाप होय. याची निष्कृति कोणत्याहि प्रायश्चित्ताने होत नाही असे शास्त्र म्हणते.

कोणी म्हणतात

"अपहाय निजं कर्म कृष्ण कृष्णेति वादिन:
ते हरेर्द्वेषिणो मूढा धर्मार्थं जन्म यद्धरे: ।। "

धर्माच्या रक्षणार्थ भगवंताचा अवतार होत असल्यामुळे, आपले विहित धर्म सोडून नुसते कृष्ण कृष्ण म्हणणारे हरीचे द्वेष्टे समजावे. यावर श्रीमहाराजांचे असे उत्तर आहे की, एकतर हे वचन कोठे सांपडत नाही. दुसरे, भगवंताचे प्रेम करणारा भगवद्‌भक्त मुद्दाम विहित कर्मरूपी भगवंताची आज्ञा मोडणे शक्य नाही व तो मोडतहि नाही. पण प्रश्न असा उत्पन्न होतो की, भगवन्नामस्मरणाला अग्रस्थान देऊन विहित कर्माचरणाला दुसरे स्थान द्यावे की विहित कर्माला अग्रस्थान देऊन नामस्मरणाला गौण स्थान द्यावे ? पण

"मत्कर्म कुर्वतां पुंसां कर्मलोपो भवेद्यदि ।
तेषां कर्माणि कुर्वंति तिस्र: कोटचो महर्षय: ।। "

माझे नामस्मरणात गुंतल्यामुळे कर्मलोप झाला किंवा कर्माची वेळा टळली तर तीन कोटी महर्षी त्यांच्या करिता कर्म करीत असतात असे शास्त्रवचन आहे. म्हणजे कर्माचा लोप किंवा कर्मकालाचे अतिक्रमण झाले तर चालते पण नामस्मरण टाकून कर्माला अग्रस्थान देऊ नये असाच शास्त्रनिर्णय आहे, असे श्रीमहाराज म्हणतात. पुन: श्रीमहाराज म्हणतात की नामस्मरण करितो म्हणून त्या अभिमानाने विहित त्याग करणे हा नामाचाच अपराध आहे हे आम्हाला माहित असल्यामुळे, आम्ही कोणालाहि अशा रीतीने विहित कर्माचा त्याग करण्याचा उपदेश करीत नाही. पण कोणी

विहित त्याग करून नामस्मरण केलेच तर त्यालाहि नाम तारते हे नामाचे वस्तुतंत्रमाहात्म्य आहे, याला आम्ही काय करणार ? समर्थहि दासबोधात म्हणतात –

"स्मरण देवाचे करावे । अखंड नाम जपत जावे ।
नामस्मरणें पावावे । समाधान ।।"
"कांहींच न करूनि प्राणी । रामनाम जपे वाणी ।
तेणें संतुष्ट चक्रपाणि । भक्तालागी सांभाळी ।।"

याचा अर्थच असा की, नामाचे जे अपराध सांगितले आहेत ते न करता निरपराध नामस्मरण करणे उत्तमच आहे. पण नुसत्या विहित कर्माचे अनुष्ठान करून नामस्मरण न करणाऱ्या किंवा नामस्मरणाविषयी कर्मापेक्षा नामस्मरण श्रेष्ठ आहे अशी आदर बुद्धि न बाळगणाऱ्या कर्मठापेक्षा सापराध नामस्मरण करणाराहि श्रेष्ठ असून भगवान् कर्मठाला सांभाळत नाही, पण त्याला सांभाळतोच; नामस्मरण करणारा मरतेवेळी भ्रमात राहून जरी नामस्मरण करील किंवा नामस्मरण त्याच्या तोंडास येईल तरी तो तरतो हे अजामिळाचे उदाहरणावरून सिद्ध आहे. पण कर्मठाचे किंवा ब्रह्मभावना करून उपासना करणाऱ्या उपासकांचे तसे होत नाही. तो सावध राहून व उत्तरायण वगैरे काल पाहून देह ठेवील तरच तो ब्रह्मलोकाला जातो. नाही तर नाही. म्हणून कर्मी व उपासक यांच्या पेक्षाहि हरिनामधारक श्रेष्ठ आहे.

(१) संतांची निंदा (२) दुष्टास नाममाहात्म्य सांगणे (३) शिव विष्णु भेद पाहणे (४) शास्त्रवचनावर अविश्वास (५) वेदवचनावर अविश्वास (६) गुरुवचनावर अविश्वास (७) नाममाहात्म्य खोटे आहे म्हणणे (८) नामाचे अभिमानाने निषिद्ध वागणे (९) नामाचे अभिमानाने विहित त्याग (१०) इतर

देवतांची नामे, शिव–विष्णूच्या नामासमान आहेत असे समजणे, हे दहा नामाचे अपराध पद्मपुराणात सांगितले आहेत. श्रीमहाराज म्हणतात.

(१) नामस्मरणाविषयी आदर न बाळगतां कर्माविषयी अत्यंत आदर बाळगणाऱ्या पुरुषाची शास्त्रानेच निंदा केली असल्यामुळे येथे ज्या संतांची निंदा करू नये असे सांगितले आहे तो संत नामधारक होय. नामधारकाची निंदा केली असता नामाचाच अपराध होतो.

(२) पाप्याला नाममहिमा सांगणे हा नामापराध आहे. पण वाल्या कोळचाला नारदांनी नाममहिमा सांगून उद्धरले तेव्हा जो मागे झालेल्या पापाबद्दल पश्चात्ताप वागवितो व पुढे पाप न करण्याचा निर्धार करितो त्याला नाममहिमा सांगणे अपराध होत नाही, पण ज्याला कृतपापाबद्दल अनुताप होत नाही व पापप्रवृत्ति तशीच चालू ठेवितो आणि नामावरहि आदर नाही अशाला नाममहिमा सांगणे नामापराध होतो.

(३) शिव–विष्णू यांच्यांत भेद पाहणे हा जो नामापराध आहे तो विष्णु कनिष्ठ, शिव श्रेष्ठ किंवा शिव कनिष्ठ व विष्णु श्रेष्ठ असे मानिल्यास किंवा शिव व विष्णु दोन ईश्वर आहेत व दोघे समान आहेत असे मानिले असता होतो; पण एकच परमेश्वर भक्ताकरिता दोन रूपे धारण करितो असे मानिले असता अपराध होत नाही.

(४) वेदवचनावर अविश्वास हाहि नामापराध आहे. म्हणून दोन विरोधी वचने असल्यास ते अधिकाऱ्यानुसार आहेत असे समजावे, पण अविश्वास धरू नये.

(५) शास्त्र म्हणजे मन्वादि स्मृति ग्रंथ होत. त्यांच्यावरहि अविश्वास करू नये, पण त्यांना नामापेक्षा श्रेष्ठ मानू नये. नामावर

विश्वास नाही व स्मृतिवचनावरहि विश्वास नाही, असा जो अविश्वास, तो येथे अपराध म्हणून घेतला आहे.

(६) सद्गुरु म्हणजे प्रेमाने हरिनाम घेणारा व शिष्यास कृष्णप्रेम देणारा असा अर्थ आहे. त्यांच्या वचनावर अविश्वास हा महान् नामापराध होतो.

(७) नामाचे महात्म्य खोटे आहे किंवा तो अर्थवाद आहे असे म्हणणे महापाप आहे, म्हणून तो नामापराध आहे.

(८) नामाच्या बळावर निषिद्धाचरण करणे हा नामापराध आहे, पण देवासाठी निषिद्धाचरण करणे हा अपराध होत नाही. भगवंताचे सुख भोगण्याकरिता गोपी जारिणी झाल्या, पण ते निषिद्धाचरण गणले गेले नाही. कमालाने संतांकरिता चोरी केली, पण ते निंद्य कर्म झाले नाही. तुकाराम महाराजांनी **"देव जोडे तरी करावा अधर्म"** असे स्पष्ट म्हणून ठेविले आहे, म्हणून जे निषिद्धाचरण नामापराध होते, ते असे आहे. मी वैष्णव आहे असे समजून आपले चरणोदकाने शिवाला अभिषेक करणे, द्वादशीला वांगे खाणे, नामबळाने मद्यमांसाचे सेवन करणे वगैरे निषिद्धाचरण येथे नामापराध म्हणून सांगितले आहे.

(९) त्याचप्रमाणे नामबलाने विहित त्याग करणे हाहि अपराध आहे; पण भगवंताचे नामस्मरण करीत असता कर्म लोप झाला तर तो नामापराध गणला जात नाही. ब्राह्मण असून नामस्मरण करितो या अभिमानाने मुद्दामच महाराचे हातचे खातो, भंग्याच्या मुलीशी लग्न लावतो, शौचाला जाताना नीवीति करून कानावर जानवे ठेवीत नाही, नाम स्मरतो म्हणून वैश्वदेवच करीत नाही, इत्यादि विहित त्यागाचे प्रकार येथे नामापराध म्हणून घेतले आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ

(१०) शेवटला अपराध म्हणजे शिव – विष्णु यांच्या नामासमान इतर देवतांचे नाम मानणे हा होय. पण उमा, रमा, गुरू यांचे नामस्मरणहि शिव–विष्णुनामा समान मानल्यास दोष होत नाही. इंद्र, चंद्र, सोम वगैरे देवतांची नामे शिव–विष्णु नामासमान मानणे अपराध होतो.

असे नामापराध घडले तरी श्रीमहाराज म्हणतात, तेहि अखंड नाम स्मरण केल्यानेच त्यांचे क्षालन होते. शेवटी श्रीमहाराज म्हणतात की माझ्या म्हणण्यावर कोणी असे म्हणतील की, तुम्ही नामाचा महिमा अर्थवादरूप आहे असे म्हणत नाही व नामापराध झाले तरी ते अविरत नामस्मरणानेच नाहीसे होतात असे म्हणता तेव्हा तुम्ही उघड पाप करण्याची आज्ञा देता म्हणायचे ?

या आक्षेपास महाराज उत्तर देतात की 'होय', आम्ही नाम घेत राहणाऱ्याला पाप करण्याची उघड आज्ञा देतो. पण त्याचप्रमाणे ज्या नामधारकाला नाम घेत असायचे व पापहि करीत असायचे हे खपत नसेल त्याला नाम घेत घेत त्या पाप करणाऱ्या नामधारकास चोप देण्यालाहि आज्ञा देतो. एका स्वामीचे दोन कुत्रे भांडले असता जसा स्वामी दोघांनाहि सांभाळतो त्याप्रमाणे भगवानहि त्या दोघा नामधारकाला सांभाळील हे पक्के लक्षात असू द्यावे. सापराध नामधारकाला दंड करायचा तो निरपराध नामधारकच करू शकेल. एरव्ही जेथे साक्षात् यमहि ज्या सापराध नामधारकाला देखील दंड करू शकत नाही, तेथे कर्मठ व नामधारक नसलेला मनुष्य त्याला दंड देण्याला पात्र होऊ शकत नाही. असो; श्रीमहाराज म्हणतात, सांगायचे तात्पर्य हे की, नामाचा महिमा अगाध असून त्यांचा संकोच केव्हाहि करता येत नाही. तो नामाचा वस्तुतंत्रमहिमा आहे व ते हरिनामच माझे जीवन आहे.

---

## संत कृपा झाली इमारत फळा आली...४

संत कृपा झाली । इमारत फळा आली ।।१।।
ज्ञानदेवे रचिला पाया । रचियेले देवालया ।।२।।
नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ।।३।।
जनार्दनाचा एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ।।४।।
भजन करा सावकास । तुका झालासे कळस ।।५।।

संतांनी कृपा केली म्हणूनच हे भक्तीचे मंदिर पूर्ण झाले. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी या भक्तिमंदिराचा ज्ञानभक्तिरूप पाया रचून भक्तिमंदिराची रचना केली. श्रीज्ञानेश्वर महाराजांचे प्रशिष्य श्रीनामदेव महाराजांनी त्या मंदिराचा मोठा आवार किंवा परीघ विस्तारला. जनार्दनाच्या श्रीएकनाथ महाराजांनी भागवतावर पूर्ण ज्ञानभक्तिसंपन्न टीका केली, हा त्या मंदिरावर लावलेला ध्वज होय. श्रीतुकाराम महाराज हे त्या मंदिराचा कळस झाले. असे हे भक्तिमंदिर एका नामसंकीर्तनानेच उभारले गेले असल्यामुळे निश्चित होऊन भगवंताचे एकाग्र चित्ताने भजन करावे.

हा वरील अभंगाचा सरळ अर्थ आहे. आता थोडा विशेष विचार करू.

**संतकृपेवाचून भक्ति प्राप्त होत नाही.**

" मुख्यतस्तु महत्कृपयैव भगवत्कृपालेशाद्वा " असे श्रीनारदाचार्यांचे भक्तिसूत्र आहे व संतकृपेवाचून भक्ति प्राप्त होऊ शकत नाही. भक्ति प्राप्त होण्याला मुख्यत: संताची कृपाच पाहिजे असा त्या सूत्राचा अर्थ आहे. नंद व यशोदा यांनी श्रीकृष्णाची जी नि:सीम प्रेमभक्ति केली ती ब्रह्मदेवाच्या कृपेने त्यांना प्राप्त झाली असे भागवतात स्पष्ट म्हटले आहे. ही संतकृपाहि म्हणजे संताचे

हृदय दयेने पाझरणे होय. प्रेमभक्तीची याचना करणाऱ्या पुरुषा-विषयी संताचे हृदय अत्यंत कळवळून आपल्या हृदयींचे प्रेम त्याच्या हृदयात घालावे असे त्यांना बेंबीच्या देठापासून वाटले पाहिजे. तशी संतांची मनोवृत्ति झाली की, तेच प्रेमवृत्तिरूपाने शिष्याचे हृदयात प्रगट होतात.

### संत कोणाला म्हणावे

श्रीएकनाथ महाराज म्हणतात,

"माझा स्वरूपीं ज्यांचे चित्त ।
अखंड जडले भजनयुक्त ।
त्यासीच बोलिजे मद्‌भक्त ।
तेचि संत सज्जन ।।"

सगुण भगवंताचे ठिकाणी ज्यांचे अखंड भजनयुक्त चित्त जडले म्हणजे "ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं" या श्रीज्ञानेश्वर–महाराजांच्या म्हणण्याप्रमाणे ज्यांचे बुद्धीत अखंड सगुण रामकृष्णाचे ध्यान असून ज्यांचे मनात अखंड सगुणभगवंताचे नामस्मरण चालले असेल त्यालाच भगवद्‌भक्त किंवा संत म्हणतात. समर्थ म्हणतात.

"जो जाणेल भगवंत । तया नांव बोलिजे संत"

ज्याने पूर्णपणे भगवंताला जाणले त्याला संत म्हणावे.

### भगवंताला पूर्ण जाणणे म्हणजे काय ?

सच्चिदानंद भगवंताची सगुण निर्गुण अशी दोन रूपे जीवाच्या अनुभवाला येतात. वेदान्तविचाराने भगवंताची दोन्ही रूपे कशी निर्गुण निरुपाधिक आहेत हे ज्ञानाने व भक्तीने जाणून व्यतिरेक-ज्ञानाने निर्गुणाशी व अन्वयाने सगुणाचे आत्मप्रेमवत् प्रेम करून सगुण रामकृष्णादि रूपाशी जाणीवरहित ऐक्य होणे याला भगवंताला पूर्ण

जाणणे म्हणतात. अशा रीतीने ज्ञानभक्ति करून निर्गुण–सगुणाशी पूर्णैक्य पावलेल्याला संत ही संज्ञा आहे. अशा संताच्या कृपेने भक्तिमंदिराची उभारणी होते.

## इमारत फळा आली

ही भक्तीची इमारत फळरूप आहे, म्हणजे भक्ति हे कशाचे साधन नसून भक्ति हे फळ आहे. भक्तिच भक्तीचे साधन आहे आणि भक्तिच भक्तीचे फळ आहे. ज्ञानयुक्त भक्तीने प्राप्त होणारी पूर्ण भक्ति प्राप्त होईपर्यंत केली जाणारी भक्ति गौण किंवा साधनभक्ति म्हटली जाते. या गौण भक्तीने अपरोक्ष ज्ञान व निर्गुण ब्रह्मैक्य साधले जाऊन सगुणाचे आत्मप्रेमवत् स्वाभाविक प्रेम लागते. असे आत्मवत् सगुणाचेहि प्रेम अखंड झाले की ही भक्ति पूर्ण होते. या पूर्णभक्तीलाच फलरूपभक्ति म्हणतात. भगवान नारदांनी "स्वयंफलरूपतेति ब्रह्मकुमारः" भक्ति फलरूप आहे असे म्हटले आहे. याचा अर्थ असा की, अशी निःसीम प्रेमरूप भक्ति प्राप्त झाली म्हणजे पुढे कांहीच प्राप्त करून घ्यायचे नसते. अशी भक्ति प्राप्त होणे हेच शेवटचे प्रयोजन होय व हीच शेवटली ब्रह्मावस्था किंवा सहजस्थिति होय. ही भक्तीची इमारत किंवा फळरूप भक्ति, जे कोणी अशा फळरूप भक्तीने संपन्न झालेले संत असतील त्यांच्याच कृपेने प्राप्त होऊ शकते, "परतेः कृष्णदासस्य भक्तेः स्थापनता सदा" भगवद्भक्ताच्या–द्वाराच भक्तिमंदिर उभारले जाते. भगवद्भक्तावाचून दुसरा कोणीहि भक्तीची स्थापना करू शकत नाही. विशेषतः कृष्णभक्तच भक्तीचे मंदिर पूर्ण करीत असतात. कृष्णच पंढरीला पांडुरंग झाले म्हणून कृष्णभक्त म्हटले; म्हणून पांडुरंगभक्त भक्तीची स्थापना करू शकत नाहीत असा अर्थ घेता येत नाही. पांडुरंगभक्त म्हणजे कृष्णभक्तच होय व कृष्णभक्त म्हणजे पांडुरंगभक्तच होय. तात्पर्य, ज्ञानभक्तीच्या योगाने निर्गुण-

सगुणाचे ठिकाणी परिविष्टित झालेल्या संताच्या कृपेने प्राप्त झालेल्या ज्ञानभक्तीच्या योगाने सगुणनिर्गुणाचे ठिकाणी जाणीवरहित ऐक्य पावलेल्या व पुढील चरणात निर्दिष्ट केलेल्या श्रीज्ञानेश्वर महाराजादिक संतांनी निःसीम प्रेमरूप भक्तिमंदिराची उभारणी केली किंवा पूर्ण भक्तिमार्ग प्रगट केला असा पहिल्या चरणाचा अर्थ आहे.

**ज्ञानदेवे रचिला पाया । रचियेले देवालया**

कोणत्याहि इमारतीचा पाया ज्याप्रमाणे मजबूत राहील त्या मानानेच ती इमारत पक्की म्हणजे बराच काळ टिकणारी असते हे आपण सर्व जाणतो. इमारत अविनाशी करायची असल्यास पायाच अविनाशी पाहिजे. व्यवहारातील इमारती ह्या अविनाशी राहणेच शक्य नाहीत, पण भक्तीची ही इमारत अविनाशी राहणार नाही, तर अशा नाशिवंत भक्तीचे गौरवयुक्त पोवाडे संत गाते ना. संसार नाशिवंत म्हणून तुच्छ समजून त्याचे प्रेम जसे संतांनी निःशेष सोडलेले असते, त्याप्रमाणे भक्तिप्रेम नाशिवंत असते तर

" जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी "

अशी तळमळ तुकाराम महराजांनी व्यक्त केली नसती, पण भक्तिप्रेम हे अविनाशी आत्मस्वरूपभूत स्वाभाविक प्रेम असल्यामुळे सर्व संतांनी त्याचा पुरस्कार केला व तेच देवापाशी मागितले. आपला आत्मा परमप्रेमरूप आहे व तेच परमप्रेम जेव्हा वृत्तिरूपाने स्फुरण पावते तेव्हा त्या प्रेमवृत्तीलाच भक्तिप्रेम म्हणतात. ही प्रेमवृत्ति आपल्या ठिकाणी आत्मस्वरूपाविषयी नित्य आहे असे "आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवंति" आपल्या प्रेमाकरिताच आपण सर्वांवर प्रेम करित असतो, या श्रुतीने सांगितले आहे. आपल्या इतके प्रेम आपण दुसऱ्या कशावरहि करीत नसतो, हीच

आपल्यावर आपले असलेल्या परमप्रेमाची खूण आहे. असेच निःसीम प्रेम सगुण श्रीहरीविषयी होऊ लागले म्हणजे त्या प्रेमाला भक्ति म्हणतात. सगुण श्रीहरीवर असे निःसीम प्रेम होण्याकरिता सगुण श्रीहरीहि अविनाशी नित्यनिरुपाधिक असणे जरूर आहे. नाशिवंत विषयाचे प्रेम जसे नाशिवंत असते किंवा खंडित राहते, अखंड रहात नाही व ब्रह्मज्ञान झाल्ययावर विषय मिथ्या आहेत किंवा विषय म्हणून ब्रह्मवस्तूहून निराळा स्वतंत्र कोणी पदार्थच नाही असे कळून आल्यामुळे ते विषयप्रेम निःशेष नाहिसे होते, तसे कांहीं भगवद्‌भक्ताचे भक्तिप्रेम ब्रह्मज्ञान झाल्यावरहि यत्किंचितहि नाहिसे होत नाही, असे श्रीज्ञानेश्वरमहाराजादि संतांनी केलेल्या भक्ति-प्रेमावरून सिद्ध आहे. याचा अर्थच असा की ज्या सगुण श्रीहरीची प्रेमभक्ति केली जाते त्या सगुण श्रीहरीचा देह विषयासारखा अविद्याजन्य नाही किंवा मायिक नाही. नाथ म्हणतात

"नारदासी पूर्ण ब्रह्मज्ञान । त्यासी कैसे श्रीकृष्णभजन ।<br>
श्रीकृष्णदेहो सच्चिदानंदघन ।<br>
म्हणोनि श्रीकृष्णभजन नारदा पढिये ॥ "

नारद पूर्ण ब्रह्मज्ञानी होते पण त्यांना श्रीकृष्णभजन ब्रह्मज्ञाना-नंतरहि सुटले नाही, याचे कारण हेच की श्रीकृष्णाचा देह त्यांना सच्चिदानंदघनच अनुभवाला येत होता.

अशाप्रमाणे ज्ञानाच्या पूर्वी व ज्ञानाचे नंतरहि राहणारे हे सगुणाचे भक्तिप्रेम आत्मस्वरूपभूत असून अविनाशी निरुपाधिक आहे व ज्या सगुण श्रीहरीचे असे भक्तिप्रेम केले जाते तो सगुण श्रीहरिहि निरुपाधिक आहे, हे श्रीज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, पासष्टी या ग्रंथांतून श्रुति-युक्ति-अनुभव या त्रयीने सिद्ध केले आहे.

"तैसी क्रिया कीर न साहे । परि अद्वैती भक्ति आहे ।
हे अनुभवाचि जोगे नोहे । बोला ऐसे ।।" (ज्ञा. अ. १८)

"कोणी एक अकृत्रिम । भक्तीचें हें वर्म ।
योगज्ञानादिविश्राम । भूमिका हे ।।" (अमृ. प्र. ९)

इत्यादि ज्ञानेश्वरी-अमृतानुभवांतील ओव्या वरील विधान सिद्ध करणाऱ्या आहेत. भगवंताचे नामरूपात्मक सगुण स्वरूपहि कसे निरुपाधिक ब्रह्मस्वरूप आहे हेच त्यांनी अज्ञानाचे खंडन करून दाखविले आहे. वन्हि आणि ज्वाला, कापूर आणि परिमळ, रत्न आणि त्याची कान्ति यांचे जसे ऐक्य व स्वाभाविक स्थिती आहे, त्याप्रमाणेच

"पै मंडल आणि चंद्रमा । दोन्ही नव्हती सुवर्मा ।
तैसा मज आणि ब्रह्मा । भेद नाही ।।" (ज्ञा. अ. १४)

चंद्र आणि मंडल जसे एकच त्याप्रमाणे माझे सगुण रूप व निर्गुण ब्रह्मरूप एकच या दोन वस्तु नव्हेत म्हणून

"तैसे विश्व येणें नांवे । हे मीचि पै आघवे ।
घेई चंद्रबिंब सोलावें । न लागे कांहीं ।।
म्हणोनि विश्वपण जावे । मग तै मातें घेयावे ।
तैसा नव्हे आघवे । सकटचि मी ।।" (ज्ञाने.)

चंद्रबिंब सोलून जसे चंद्राला घेण्याची आवश्यकता नाही, चंद्रबिंबासहितच चंद्र आहे, त्याप्रमाणे नामरूप सोडून सच्चिदानंद ब्रह्म घेण्याची आवश्यकता नाही, नामरूपसहितच पूर्ण ब्रह्म आहे असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सिद्ध केले आहे. अध्यात्मविचाराने सगुणाचे निरुपाधिकत्व व अविनाशित्व सिद्ध करणे हाच प्रेमभक्ति-मंदिराचा अभंग अविनाशी पाया होय. हाच पाया श्रीज्ञानेश्वर-

महाराजांनी आपल्या ग्रंथांतून भरला आहे व त्या भक्कम पायामुळेच भक्तीची इमारत नित्य अखंड व अभंग झाली आहे.

**नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार**

विसोबा खेचरांना श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा उपदेश होता व नामदेवमहाराजांना विसोबा खेचरांचा उपदेश झाला म्हणून नामदेव महाराज आपल्याला श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा दास म्हणवून घेतात. नामदेवमहाराजांना याप्रमाणें परंपरेने श्रीज्ञानेश्वरमहाराजापासून भक्तिप्रेमाची जी अवीट गोडी प्राप्त झाली, तिचा त्यांनी अभंगवाणीने पंढरीनाथांच्या व श्रीकृष्णाच्या प्रेमसंबंधाने आळवून या प्रेमभक्तीचा विस्तार केला. ज्याप्रमाणे एखाद्या इमारतीचा किंवा मंदिराचा आवार किंवा मर्यादा विस्ताराने दाखविली जाते त्याप्रमाणे नामदेवमहाराजांनी देवाला नाना प्रेमभावाने आळविले. हाच भक्तीचा विस्तार होय.

**जनार्दनाचा एकनाथ । ध्वज उभारिला भागवत**

जनार्दनस्वामीचे शिष्य एकनाथमहाराज यांनीहि श्रीज्ञानेश्वर-महाराजाप्रमाणेच प्रेमभक्तीचे शास्त्रीय उपपादन करून भक्तिशास्त्राचे अध्यात्मशास्त्रातील स्थान कोणते हे दाखवून दिले आहे. अध्यात्मशास्त्रात जे कांही आत्मज्ञान सांगितले आहे ते सर्व संसार-निवर्तक अपरोक्षज्ञान

"न करिता भगवद्भक्ति । ब्रह्मयासी नव्हे मुक्ति ।
माया निवर्तक ज्ञानप्राप्ति ।
न करिता भगवद्भक्ति कदा नुपजे ।।"

सगुणाचे भक्तिवाचून उत्पन्नच होत नाही असे प्रतिपादन ज्ञानप्राप्त्यर्थ भक्तीची आश्यकता प्रतिपादिली व ज्ञानानंतरहि

"जेणें सुटे तुझे सद्‌गुरुभजन। ते मी मानी परम विघ्न।
तुझें भक्तीविण मुक्तपण। अलवणी मज जाण गोविंदा"

भक्तीवाचून ज्ञानाला रुचि येत नाही असे म्हणून ज्ञानोत्तर भक्तीचेहि नाथांनी प्रतिपादन केले. म्हणून या चरणांत नाथांनी भागवताच्या एकादश स्कंधावर टीका करून भक्तीचा ध्वज फडकविला असे म्हटले आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजानंतर भक्तिमार्गाला शास्त्रीयतेचा उजाळा नाथांनी दिला, असा अर्थ.

**भजन करा सावकास । तुका झालासे कळस**

या ठिकाणी "तुका झालासे कळस" याचा अर्थ तुकाराममहाराजांची भक्ति म्हणजे कळस होय. मागील श्रीज्ञानेश्वर महाराजादिकांपेक्षाहि तुकाराम महाराजांचे प्रेम देवावर निःसीम होते असा कित्येक लोक अर्थ करितात पण तो योग्य नाही. निःसीम प्रेमाची व्याख्या काय याचा विचार केल्यास वरील अर्थाचा फोलपणा तेव्हाच लक्षात येतो. आत्मप्रेम हे स्वभावतःच निःसीम आहे. जेथे प्रेमाला खंड पडतो तेथे प्रेमाची मर्यादा होते आणि आपल्याहून प्रेमाचा विषय जेव्हा भिन्न असतो तेव्हाच प्रेमाला खंड पडतो. प्रेमाला खंड पडणे म्हणजे प्रेमाचा विषय जो आहे तो एखादेवेळी नावडता होणे होय. आपण ज्या ज्या विषयाचे प्रेम करितो तो तो विषय केव्हा केव्हा आवडेनासा होतो; म्हणून आपले विषयाविषयीचे प्रेम खंडित होते. पण आपण आपले जे प्रेम करितो ते कधी खंडित होत नाही–म्हणजे आपणाला आपला कधीच वीट येत नाही-म्हणून आत्मप्रेम निःसीम आहे. ब्रह्मज्ञानाने किंवा आत्मज्ञानाने आत्माच परमात्मा आहे आणि ।

"ज्ञानदेव म्हणे नयनाची ज्योती।
या नांवेंरूपें ती तुम्ही जाणा॥"

आपल्या दृष्टीची जी दृष्टी, दृष्टृमात्र स्वरूप, तेच या नामरूपाने नटले आहे; असा बोध झाल्यावर नामरूपाने नटलेल्या सगुणरूपावरहि ते जे स्वाभाविक आत्मप्रेम बसते तेहि निःसीम असते. त्याचा कधीहि वीट येत नाही, ज्याप्रमाणे पाण्यात बर्फाचा लाभ होत नाही पण बर्फात मात्र पाण्याचा लाभ होऊन बर्फाचाहि लाभ होतो, त्याचप्रमाणे

"निर्गुणचि स्वभावे। सगुण होते"

या समर्थांच्या उक्तीप्रमाणे किंवा

"जें उन्मनीयेचे लावण्य। जे तुर्येचे तारुण्य।
अनादि जें अगण्य। परमतत्व॥"
"ते हे चतुर्भुज कोंभेली॥"

या श्री ज्ञानेश्वर महाराजांचे वचनाप्रमाणे निर्गुणच सगुण होत असल्यामुळे, निर्गुण स्वरूपाचे ठिकाणी सगुणाचा लाभ होत नाही तरी सगुणाचे ठिकाणी निर्गुणाचा पूर्ण लाभ होतो व सगुणाचाहि लाभ होतो. म्हणून ज्यांचे ठिकाणी सगुणाचे प्रेम जडले ते मग निर्गुणाला सोडून एका सगुणाचेच प्रेम करितात. कारण नाथ म्हणतात

"विघुरले तूप होय। थिजले त्यापरीस गोड आहे।
निर्गुणापरीस सगुण पाहे। अति लवलाहे स्वानंदु॥"

ज्याप्रमाणे थिजलेले तूप पातळ तूपापेक्षा अधिक रुचीकर वाटते त्याप्रमाणे भक्तांना निर्गुणापेक्षा सगुणरूपात अधिक सुख वाटते. म्हणजे याचा अर्थ असा की नुसत्या निर्गुणस्वरूपाचे ठिकाणी समाधीयोगाने ऐक्य पावून निर्गुणानंद घेणारे व्यक्तिरेकज्ञानी जे असतात त्यांना व्युत्थानकाळी नामरूपाचा भास झाल्याबरोबर

त्यांचा आनंद किंवा सुख खंडित झाल्याचा अनुभव येतो. पण भक्तांना नामरूपासह ब्रह्म आहे असा अन्वयाने अनुभव असल्याने त्यांचे नामरूपावरहि तेच आत्मप्रेम राहते. त्यामुळे त्यांच्या प्रेमात खंड पडत नाही. म्हणूनच तुकाराममहाराज म्हणतात

"ऐसा सांडुनि सोहळा । कोण लावुनि बैसे डोळा ।।"

सगुणाच्या नामस्मरणादिक प्रेमभक्तीचा आनंदसोहळा सोडून व्यतिरेकाने नामरूपाचा त्याग करून व डोळे लावून निर्गुण स्वरूपाचा आनंद घेण्याचा आम्ही प्रयत्न करीत नाही. ज्ञानाने निर्गुणरूप व भक्तिप्रेमाने सगुणरूप झालेले जे संत आहेत त्यांच्यात श्रेष्ठ कनिष्ठ दर्जा मानणे शक्य नाही. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज, नामदेवमहाराज, नाथ महाराज व तुकाराममहाराज यांपैकी कोणी श्रेष्ठ नव्हते व कोणी कनिष्ठ नव्हते. सर्वच भक्तिज्ञानसंपन्न असून ज्ञानेश्वर-महाराजांनी म्हटल्याप्रमाणे

"इया ज्ञान भक्ति सहज । भक्त एकवटला मज ।
तो मीचि केवळ हें तुज । श्रुतहि आहे ।।"

भगवंताशी समरस अद्वैतरूप झाले होते, म्हणून

"तुका झालासे कळस"

या चरणाचा इतकाच अर्थ करावा लागतो की, तुकाराम-महाराजांनीहि नामदेवाप्रमाणे प्रेमभक्तीचे शास्त्रीय उपपादन न करता केवळ अविच्छिन्न प्रेमभक्तिच केली. ज्याप्रमाणे देवळाचा कळस दुरून पाहिला असता देवळाचे दर्शन घडते त्याप्रमाणे तुकाराममहाराजांच्या सर्व अभंगवाणीकडे दुरून पाहिले तरी त्यांच्या प्रेमभक्तीचे स्वरूप उघड होते. पुनः तुकाराममहाराजा-सारख्या अत्यंत निरहंकारी पुरुषाने मी सर्वांवर कळस आहे असे आपणच आपल्याविषयी म्हणणे शक्य नाही. याप्रमाणे श्रीज्ञानेश्वर-

महाराज, नामदेवमहाराज, नाथमहाराज व तुकाराममहाराज या चार संतश्रेष्ठांनी भक्तीची इमारत भाविक लोकापुढे उभारली.

**या भक्तीचे स्वरूप**

कसे आहे हे आपण थोडे विचार करून पाहू. आत्मा परमप्रेमरूप आहे, हा वेदान्ताचा सिद्धान्त असून आपणा सर्वांचा तसा अनुभवहि आहे. हा परमप्रेमरूप आत्माच स्वत:चे प्रेम करण्याकरिता वृत्तिरूपाने स्फुरत असतो. ती वृत्तिहि अर्थातच प्रेमरूपच असते असे श्रीज्ञानेश्वरमहाराज अनुभवामृतात

'आवडीचेनि वेगे । एक एकाते गिळिताहे आंगें ।
कीं द्वैताचेनि पांगे । उगळिते आहाती ।। '

या ओवीने सांगतात. या ओवीमध्ये श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी प्रेमाचे दोन भाग केले आहेत. पूर्वार्धात जे प्रेम सांगितले आहे ते संयोगप्रेम असून उत्तरार्धात वियोगप्रेम सांगितले आहे. या दोन्ही प्रकारच्या प्रेमाचा प्रत्येकास त्याच्या अत्यंत आवडत्या वस्तुविषयी असलेल्या प्रेमात अनुभव येतो. या संसारात आपण विषयाचे प्रेम करितो, पण विषय आपल्याहून भिन्न वाटतात म्हणून त्यांचे प्रेमसुख भोगताना

"परी ते वेगळेपणे भोगिजे । जैसे पक्षिये फळ चुंबिजे ।"

ज्याप्रमाणे पक्षी फळाहून निराळा राहून फळाचा स्वाद घेतो त्याप्रमाणे आपण विषयाहून अलग राहून विषयांचे प्रेमसुख घेतो. म्हणून विषयाचे सुख भोगताना आपण विषयांशी ऐक्य पावतो तरी सुखाचा भोग घेऊन व मी सुखी झालो असे म्हणत विषयाहून अलग पडतो. विषयांहून अलग पडल्याबरोबर ते विषयांचे प्रेमहि कमी होऊन कांही काळ तो विषय नकोसा वाटतो, पण आत्मप्रेम तसे नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात,

"तैसे नव्हे तेथ विसरिजे। भोक्तेपणहि ॥"

आत्मप्रेमात किंवा आत्मरूप सगुण श्रीहरीच्या प्रेमात, जीवशिवाच्या ऐक्यज्ञानामुळे, जीव शिवाहून अलग होऊ शकत नाही. म्हणून तेथे भोक्तेपण भासत नाही. भोक्तेपणच विसरले जाते. कारण भोक्तृत्व मिरविणारा अहंकारच तेथे उठू शकत नाही. प्रेमांत खंड पडून प्रेम कमी होण्याकरिता भोक्तृत्व व त्याचा अहंकार स्फुरला पाहिजे व आपण प्रेमाचे विषयापासून आपला निराळेपणा मानित असलो पाहिजे. विषयप्रेमात भोक्ता, भोग्य यांचे द्वैत मानण्यात येते व म्हणून त्या प्रेमात खंडहि पडतो. विषयप्रेमात असा कांही काळ खंड पडून पुनः तो विषय सेवन करण्याची तळमळ उत्पन्न होते. ही तळमळ म्हणजे विषयाचे प्रेमच होय. या तळमळीमुळे आपण विषय प्राप्त करून घेतो व त्याच्याशी ऐक्य पावून त्याचे सुख भोगतो. सुखभोगात पुनः भोक्तृत्वाहंकार उठतो. असा विषयाचे सुख भोगण्यामध्ये विषयाचा प्रेमप्रवाह खंडित होऊन पुनः सुरू होत असतो, पण भगवत्प्रेमात भोक्तेपण विसरले जात असल्यामुळे भगवंताच्या प्रेमभक्तीचा प्रवाह खंडित होत नाही. तो सारखा चाललेला असतो. म्हणजे याचा अर्थच असा की, भगवद्भक्ताच्या प्रेमभक्तीचे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी वर ओवीत सांगितल्याप्रमाणे दोनच अखंड प्रवाह असतात. हे प्रवाह एका संत कवीनी पुढील श्लोकात सांगितले आहेत.

"अदृष्टे दर्शनोत्कंठा दृष्टे विश्लेषभीरुता।
दृष्टेऽहमहद्दुःखं तदप्यस्ति महत्सुखम् ॥"

सगुण भगवान् डोळ्यांनी दिसत नाही तोपर्यंत तो एकदा डोळ्यांनी पहावा अशी उत्कंठा किंवा तळमळ असते, आणि एकदा डोळ्यांनी भगवंताची श्यामसुंदर गोजिरी मूर्ति पाहिली की, तिचा

आता कधी वियोग होऊ नये अशी सारखी तळमळ असते. अशा या दोन तळमळीमध्ये भगवंताच्या प्राप्तीचा आनंद भोगणारी भोक्तृत्ववृत्ति उठण्यास अवकाशच राहत नसल्यामुळे भक्ताचे भक्तिप्रेम कधीच खंडित होत नाही, म्हणून ते निःस्सीम म्हटले जाते. स्फुरणाऱ्या प्रेमवृत्तीला भक्ति म्हणतात आणि स्फुरणारी प्रेमवृत्ति – तळमळ विरहरूप आहे; म्हणून भगवद्भक्ताच्या भक्तीचे स्वरूप, श्रीहरीकरिता कोणत्या ना कोणत्या प्रेमभावाने चित्ताची तळमळ होत राहणे, हे होय.

जगात दास्य, लालन, वात्सल्य, सखा, पति असे पांच स्नेह किंवा प्रेमाचे संबंध आहेत. यापैकी एका किंवा सर्व भावांनी भगवंताचे प्रेम भगवद्भक्त करीत असतात. पूर्ण निष्णात संत सर्व भावांनीच भगवंताचे प्रेम करीत असतात.

"हेचि थोर भक्ति आवडते देवा ।
संकल्पावी माया संसाराची ।।"

जेवढीं कांही संसारात अनेक संबंधाने आपली माया म्हणजे प्रेम असेल तेवढे सर्व एका देवाचेच ठिकाणी करावे, हीच श्रेष्ठ भक्ति होय, असे तुकाराममहाराज म्हणतात. वरील अभंगात निर्दिष्ट केलेल्या ज्या श्रीज्ञानेश्वरमहाराजादि संतचतुष्टयांनी भक्तिप्रेम मंदिराची इमारत पूर्णपणे उभारणी करून लोकांना अक्षय सुखाचा मार्ग दाखविला, त्या संतचतुष्टयांना अनंतकोटी प्रणाम करून मी आपल्या सद्गुरू आईच्या चरणी वाणीला विश्रांति देतो.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 36660 वि: ...
क्रमांक 9420 नों वि 90/८१...



## राष्ट्रोन्नतीचा मूळ पाया धर्मच

भगवान् श्रीसद्‌गुरु ज्ञानेश्वर माउलींचा सर्वत्र उत्कर्ष असो. अनादि अज्ञानामुळे आपले खरे कल्याण कशात आहे हे जीवाला समजत नाही. कारण जीव अज्ञानी आहे. तो जे स्वतःच्या बुद्धीने करू शकतो किंवा त्याला जे करावेसे वाटते ते सर्व दुःखरूप संसारात पडण्यालाच कारण होते. एतदर्थ नित्यज्ञानी, मुक्त, सर्वज्ञ व सर्वशक्तिमान् परमेश्वराने त्याच्या कल्याणाचे म्हणून जे आचरण त्याला करण्याची आज्ञा केली, त्या आज्ञेलाच धर्म म्हणतात. हा धर्म म्हणजे जीवाच्या कल्याणाचा मार्ग व तो परमेश्वरानेच निर्माण केला आहे.

हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, बौद्ध इ. जगातील सर्व धर्मपंथात, धर्म म्हणजे त्या पंथात प्रमाण मानलेल्या ग्रंथांच्या आज्ञा असाच अर्थ घेतला जातो. आज जगाच्या पाठीवर जेवढे म्हणून धर्म आहेत, त्या सर्वात आपला हिंदुधर्म परमश्रेष्ठ आहे; कारण हिंदुधर्मात जी मनुष्याची पूर्णावस्था सांगितली आहे व तिच्या प्राप्तीचे जे उपाय सांगितले आहेत, ती पूर्णावस्था व ते उपाय इतर कोणत्याहि धर्मात संपूर्णतः सांगितलेले नाहीत. धर्म हा राष्ट्राच्या उन्नतीचा मूळ पाया आहे, धर्माविषयी तिरस्कार व अनादर बुद्धि उत्पन्न झाली की राष्ट्र अधोगतीला जाते असे पाश्चिमात्य पंडित बर्क वगैरे विद्वानांनी स्पष्टपणे सांगितले आहे. अलोट संपत्तीच्या बळावर धर्मबंधनाला झुगारून आज पाश्चिमात्य राष्ट्रें अधोगतीला जात आहेत; कारण द्रव्यसंपत्ति मनुष्याला कान असून बहिरा करते, डोळे असून आंधळा करते व वाचा असून मुका करते.

## प्रवृत्ति धर्म

जीवाच्या इच्छेप्रमाणे परमेश्वराने धर्माचे दोन प्रकार सांगितले आहेत. एक प्रवृत्ति–धर्म व दुसरा निवृत्ति–धर्म. ज्या धर्माच्या आचरणाने मनुष्य पुनः पुनः संसारात येऊन सुखदुःख भोगतो, त्या धर्माचरणाला प्रवृत्तिधर्म म्हणतात व ज्या धर्माच्या आचरणाने मनुष्य पुनः संसारात म्हणजे नाना प्रकारच्या जीवयोनीत जन्म घेत नाही व कायमचा सुखदुःखातून सुटतो, त्याला निवृत्तिधर्म म्हणतात. विषयसुखप्राप्तीचा साधनमार्ग म्हणजे प्रवृतिधर्म व अखंड परमेश्वर सुखप्राप्तीचा साधन मार्ग म्हणजे निवृत्तिधर्म होय. विषयसुखप्राप्ति हेच आपले ध्येय असे जरी अज्ञ जीव समजत असला, तरी विषयसुख नाश पावते व आपण पुनः पुनः दुःखात लोटले जातो. हा त्याचा नित्याचा अनुभव असल्यामुळे त्या विषयसुखाला तो आपले आत्यंतिक किंवा परम कल्याण समजत नाही. विषयसुखात मग्न असणाऱ्या जीवांना देखील सुख हे अखंडित असावे असेच वाटते. जीवाला अखंड सुखाची इच्छा आहे व नाशवंत सुखाची इच्छा नाही; म्हणूनच परमेश्वराने देखील जो कांही प्रवृत्तिधर्म सांगितला आहे, तो केवळ विषयसुखाच्या प्राप्तीकरिता सांगितला नसून त्याचे अंतिम साध्य परमेश्वरप्राप्ति आहे असे स्पष्ट सांगितले आहे.

“ अगा जया जें विहित । तें ईश्वराचें मनोगत ।
म्हणोनि केलिया निभ्रांत । सांपडेचि तो ।।९११।।
हें विहित कर्म पांडवा । आपुला अनन्य ओलावा ।
आणि हेचि परमसेवा । मज सर्वात्मकाची ।।९०६।।

(ज्ञानेश्वरी अ. १८)

विषयसुखाची इच्छा सोडून परमेश्वरप्राप्तीकरिताच विहित कर्माचे अनुष्ठान केल्यास चित्तशुद्धिद्वारा तोच धर्म भगवत्प्राप्ति करून देतो. जीव आपल्या विषयवासनेने त्या धर्माचे आचरण

विषयसुखप्राप्तीकरिता करतो व भगवंताने त्या धर्माचरणाने त्यास विषयसुख मिळावे अशी व्यवस्थाहि करून ठेवली आहे.

### निवृत्ति धर्म

विषयसुखाला विटून पूर्व सुकृतामुळे ज्या भाग्यवान जीवांना भगवत्प्राप्तीची तळमळ उत्पन्न झाली असेल त्यांच्याकरिता भगवंतांनी निवृत्तिधर्म सांगून ठेवला आहे. भगवन्नामस्मरण, भगवत्-कथाश्रवण, कीर्तन, पूजन करून शास्त्रशुद्ध विहित कर्मे करून ती सर्व भगवंताला समर्पण करणे व त्यास सर्वथा शरण जाणे हा मुख्य निवृत्तिमार्ग होय. यालाच भागवतधर्महि म्हणतात. प्रवृत्तिधर्मालाहि जर तो केवळ भगवंताची प्राप्ति व्हावी अशा निष्काम व निर्विषय चित्ताने आचरला गेला तर त्यासहि भागवतधर्म म्हणता येईल. सारांश, भगवत्परायण होऊन भगवन्नामस्मरणपूर्वक जेवढे म्हणून लौकिक, वैदिक कर्म जीवांकडून होत असेल ते सर्व भगवत्प्रीत्यर्थ करणे हे भागवतधर्माचे स्वरूप होय. भागवतधर्माचे माहात्म्य अगाध आहे. मनुष्यमात्रालाच नव्हे तर सर्व प्राणीमात्राला याचा अधिकार आहे. प्रवृत्तिधर्माचे आचरण करणारा कांही पापकर्मामुळे पशुपक्ष्यादि योनीत गेल्यास त्याच्या ठिकाणी पूर्वी आचरण केलेल्या प्रवृत्तिधर्माचा कांहीहि मागमूस राहत नाही, पण भागवतधर्म आचरण करणारा पुरुष कांही पापकर्मामुळे पशुपक्ष्यादि योनीत गेल्यास त्या योनीतहि भागवतधर्माचे संस्कार कायम राहतात. त्याच्या ठिकाणचा भागवतधर्म केव्हाहि नष्ट होत नाही; म्हणूनच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी

" रानींचिया पालेखाईरा । नेवाणें करविलें लंकेश्वरा ।।"

"पै रंकु एक आडलेपणें ।
काकुळती अंतीं धांव गा धांव म्हणे ।।"

(ज्ञानेश्वरी)

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. 93649
५१
(स्वयंचलित प्रत)

इत्यादि ओव्यांत जंगलात राहणाऱ्या वानरांची श्रीरामभक्ति व गजेंद्राची भक्ति त्या त्या योनीत कायम होती हें स्पष्ट सांगितले आहे. जटायूचे ठिकाणी पक्षीयोनीतहि श्रीरामभक्ति कायम होती. इतर धर्मांच्या अनुष्ठानाने अनुष्ठान करणारा, अनेक प्रत्यवायामुळे स्वतः एकटा देखील तरणे कठीण; पण निष्काम भागवतधर्माचे अनुष्ठान करणारा स्वतः तरून त्यांच्या संगतीत असणाऱ्या जीवासहि तो तारतो, असे भक्तिसूत्रांत श्रीनारदमहामुनींनी स्पष्ट सांगितले आहे "स तरति स तरति स लोकांस्तारयति ।" (भक्तिसूत्र ५०)

### भागवतधर्माचे सर्वश्रेष्ठत्त्व व सर्वोपकारकत्व

"वेदशास्त्र प्रमाण श्रुतीचें वचन ।
एक नारायण सार जप ।। १ ।।
जप, तप, कर्म, क्रिया, नेम, धर्म ।
वाउगाचि श्रम व्यर्थ जाय ।। २ ।।
हरिपाठीं गेले ते निवांतचि ठेले ।
भ्रमर गुंतले सुमनकळिके ।। ३ ।।
ज्ञानदेवा मंत्र हरिनामाचें शस्त्र ।
यमें कूळगोत्र वर्जियेले" ।। ४ ।।

( श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत हरिपाठ अभंग क्रम १९ )

भागवतधर्म हा शुद्ध वैदिक धर्म असून सर्व धर्मात श्रेष्ठ आहे असेच समस्त श्रुतिस्मृति पुराणे व संतमहात्मे कंठ शोषून सांगत आलेले आहेत. हा धर्म ऋग्वेद, श्रीकृष्णोपनिषत्, रामतापनीय, कृष्णतापनीय, नृसिंहतापनीयादि उपनिषदें, तसेच न्याय, पूर्व-मीमांसा, सांख्य, पतंजली, वैशेषिक व वेदांतशास्त्रे, भागवतादि अठरा पुराणे, इत्यादिकांत उत्तम प्रकारे वर्णिला आहे. श्रीशंकरा-

चार्य, रामानुजाचार्य, वल्लभाचार्यादि श्रेष्ठ आचार्य तसेच श्रीज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व समर्थादि अवतारी संतविभूतींनी याच धर्माचे स्वत: आचरण करून भागवतधर्माचा उपदेश प्राणीमात्रास केला आहे. कांही अज्ञजीव असा आक्षेप घेतात की, नामस्मरणादि भागवतधर्म हा वैदिक धर्म नाही. योगयागादि धर्म हा खरा वैदिक धर्म असून नामस्मरणादि भागवतधर्म स्त्रीशूद्रादिकांकरिताच सांगितला आहे. ब्राह्मणादि त्रैवर्णिकांकरिता तो सांगितला नाही; ह्या आक्षेपाचे खंडण भगवान् श्रीज्ञानेश्वर महाराज वरील अभंगाच्या पहिल्या चरणात करतात.

"वेदशास्त्रप्रमाण"

कांही बोलावयाचे असल्यास स्वकपोलकल्पित बोलणे तसेच पूर्वप्रमाणरहित बोलणे हा मोठा अक्षम्य दोष आहे. स्वयंप्रमाण स्वरूप असा जो परमात्मा त्या परमात्म्याने निर्माण केलेली वेदादि शास्त्रे आमच्या आर्यधर्मात परमप्रमाण मानली जातात. "वेदशास्त्रप्रमाण" मंत्र, संहिता व ब्राह्मण मिळून वेद आहे. येथे 'वेद' शब्दाने मंत्रसंहिता व 'श्रुतीचें वचन' या शब्दाने उपनिषदादि ब्राह्मण भागाचें ग्रहण केले आहे. शास्त्र म्हणजे मन्वादिकांचे स्मृतिग्रंथ व भागवतादि महापुराणे. मंत्रसंहितेत म्हणजे ऋग्वेदाच्या आठव्या मंडलात :–

"मर्त्ता अमर्तस्य ते भूरि नाम मनामहे। विप्रासो जातवेदस:"

असा एक मंत्र आहे व

"आस्य जानन्तो नाम चिद्विवक्तनमहस्ते विष्णो सुमतिं भजामहे"

असा दुसरा मंत्र आहे. पहिल्या व दुसऱ्या मंत्राचा भावार्थ असा की, आम्ही मरण पावणारे, अविनाशी असे तुझे नाम तपदान

नित्यकर्मादिक सर्व धर्माहून अत्यंत श्रेष्ठ समजतो. ही दोन श्रुति-वचने शंकराचार्यांनी विष्णुसहस्रनामभाष्यात तसेच श्रीधरस्वामींनी (भागवतांतील सहावा स्कंध अजामिळ आख्यान.) प्रमाणार्थ घेतली आहेत. नामस्मरणादि भागवतधर्माचे वैदिकत्व दाखविण्या-करिता ऋग्वेदातील पुरावा सांगून ह्याशिवाय उपनिषत्‌भागातूनहि नाममाहात्म्य वर्णिले आहे, असे वरील अभंगात श्रीज्ञानेश्वर महाराज सांगतात.

छांदोग्योपनिषदातील सातव्या अध्यायात भगवान् श्रीनारद व सनत्कुमार यांचा संवाद आला आहे. त्यात श्रीनारदांनी सनत्कुमा-रांना शरण जाऊन सर्व संसारदुःखातून मुक्त होण्याचा मार्ग विचारला असता, "नामब्रह्मेत्युपासीत" म्हणजे नाम हें साक्षात् ब्रह्मच समजून त्याची उपासना कर असा गुरूपदेश केला. असेच सर्व उपनिषदातून नाममाहात्म्य सांगितले आहे. नाममाहात्म्याबद्दल असे शेकडों वैदिक पुरावे पाहिल्यावर वेदाला प्रमाण मानणारा कोणता धार्मिक पुरुष नामस्मरणादि भागवतधर्म अवैदिक आहे असे म्हण-ण्याचे धाडस करील ?

शास्त्रांनी म्हणजे सर्व पुराणें, स्मृती, इतिहास, योगसूत्रें, भक्तिसूत्रें या सर्व ग्रंथातून मुक्तकंठाने नामाचे माहात्म्य गायिले आहे. भगवान शंकराचार्यांनी विष्णुसहस्रनामावर भाष्य करताना नामाचे माहात्म्य अगाध आहे, हे सांगण्याकरिता श्रुतिस्मृति पुराणातील शेंकडो वचने प्रमाणार्थ दिली आहेत.

"नाम्नोस्ति यावती शक्तिः पापनिर्बर्हणे हरेः ।
तावत्कर्तुं न शक्नोति पातकं पातकी जनाः ॥"

नामात पाप भस्म करण्याचे एवढे सामर्थ्य आहे की, नामाच्या योगाने जळत नाही असे पापच मनुष्य करू शकत नाही,

अनुक्रम ३८५५० दि: ...
९५८० नों दि ...



असे भगवान वेदव्यासांनी महाभारतात सांगितले आहे. तसेच महाभारतातील शांतिपर्वात राजा युधिष्ठिराने भीष्मांना प्रश्न केला की, वेदांनी सांगितलेल्या सर्व धर्मात श्रेष्ठ धर्म कोणता ? त्यावर भीष्मपितामह उत्तर देतात की,

"एष मे सर्वधर्माणां धर्मोऽधिकतमो मतः ।
यद्भक्त्या पुंडरीकाक्षं स्तवैरर्चेन्नरः सदा ।। "

अहोरात्र भगवंताचे नामस्मरण करणे, अर्चन करणे व गुणसंकीर्तन करणे या धर्मापेक्षा श्रेष्ठ धर्म दुसरा कोणताच नाही. अशा वेदशास्त्र पुराणादिकांच्या आधारानेच श्रीज्ञानेश्वरमहाराजादि संतमहात्म्यांनी भागवत धर्माचा पुरस्कार करून त्याचेच अनुष्ठान करा व इतर गौण धर्माची उपेक्षा करा, असा सर्व प्राणिमात्रांस उपदेश केला आहे. तो उपदेश लोकांना धर्मापासून भ्रष्ट करून वैदिकधर्म बुडविण्याकरिता केला नाही, तर धर्माचा उद्धार करण्याकरिताच केला आहे. श्रौतस्मार्त कर्माचाच नेहमी युगपरत्वे ऱ्हास होत असतो. युगपरत्वे जे निरनिराळ्या धर्माचे श्रेष्ठत्व किंवा कनिष्ठत्व सांगितले आहे ते निरनिराळ्या श्रौतस्मार्त कर्मामध्येच होय. भगवन्नामस्मरणादि भागवतधर्म कोणत्याहि युगात बदलत नाही किंवा कोणत्याहि युगात त्याचे महत्वहि कमी होत नाही. सर्वत्र कर्मकांडात विष्णुस्मरण हेच एक त्या कर्माची पूर्णता करणारे असून श्रीविष्णुस्मरणावाचून कोणतेहि कर्म सदोष व अपूर्ण राहते. कलियुगात श्रौतस्मार्त धर्माचा ऱ्हास होत असल्यामुळे नामस्मरणादि भागवत धर्माचेच विशेष माहात्म्य व तोच एक मुख्य धर्म आहे, असा समस्त वेदशास्त्रपुराणें व संतमहात्म्यांचा उपदेश आहे.

### एक नारायण सार जप

भगवंताला विन्मुख राहून विषयसुखाची इच्छा करणारे जे विषयासक्त पुरुष आहेत, त्यांना संसारात दुःख वाटून ते भगवंताकडे

वळावेत ह्यासाठीच प्रवृत्तिधर्मात नानाप्रकारचे विधिनिषेधांचे कांटे पसरलेले आहेत. (भागवत स्कं. ११ अ. २० श्लो. ८). विषय-सुखाची इच्छा सोडून भगवत्प्राप्तीची इच्छा करणाऱ्याला तितके विधिनिषेध सांगितले नाहीत. नामधारकाचे अहोरात्र निरंतर भगवन्नामस्मरणाकडे चित्त राहिल्यामुळे यदाकदाचित् वर्णाश्रमाचे त्याच्याकडून आचरण घडले नाही तर त्याबद्दल त्याला दोष नाही,

"माझी करितां सप्रेम भक्ति । भक्तांची नित्य कर्में राहती ।
तेहतीस कोटी ऋषि महती । संपूर्ण करिती कर्में त्यांची ॥"

असे श्रीएकनाथ महाराज सांगतात. मनुस्मृति अध्याय २ श्लोक ८६ व ८७ मध्ये असे स्पष्ट सांगितले आहे की वैश्वदेव, होम, बलिकर्म, नित्यश्राद्ध व अतिथि भोजन हे जे चार पाकयज्ञ आहेत ते दर्शपौर्णिमासादिविधियज्ञासह नामजपयज्ञाच्या सोळाव्या कलेचीहि बरोबरी करू शकत नाहीत. ब्राह्मण वैदिक कर्म करो किंवा न करो, तो केवळ नामजपाच्या योगानेच उत्तम सिद्धीस (मोक्षास) पूर्ण अधिकारी होईल यात कांही संशय नाही. "सर्व यज्ञांत जपयज्ञ हें माझें स्वरूप होय." (श्रीगीता अ. १० श्लो. २५) असे स्वत: भगवंतांनीहि स्पष्ट सांगून ठेवले आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्या पुरुषार्थांकरिता जी कांही साधने सांगितली आहेत ती न करता एका भगवंताच्या आश्रयाने अनायासे सर्व पुरुषार्थ प्राप्त होऊ शकतात.

"समस्तांही यज्ञांच्या पैकीं । जपयज्ञ तो मी ये लोकीं ।
जो कर्मत्यागें प्रणवादिकीं । निपजविजे ॥ २३२ ॥
नाम जपयज्ञ तो परम । बाधूं न शके स्नानादि कर्म ।
नामें पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म वेदार्थी ॥ २३३ ॥
(ज्ञानेश्वरी अ. १०)

केवळ एक भगवन्नामजपयज्ञाने सर्व सिद्धि होते. कारण भगन्नाम हे केवळ शुद्ध भगवत्स्वरूप आहे, असा वेदशास्त्रादिकांचा अंतिम निर्णय असल्यामुळे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, नारायण नामाचा जप हे सर्व वेदशास्त्र पुराणांचे सारसर्वस्व आहे.

**जप तप कर्म क्रिया नेम धर्म । वाऊगाचि श्रम व्यर्थ जाय**

या दुसऱ्या चरणांत भगवन्नामावाचून इतर जपतपादिक कर्मांचा निषेध केला आहे. भगवंतावाचून जपतप, क्रियाकर्मादि करणे सर्व व्यर्थ आहे. कारण ती कर्मे भगवत्प्राप्ति तर करून देत नाहीतच, पण चित्तशुद्धि देखील त्याने होत नाही. म्हणून अशी निर्फल कर्मे करण्याचा हव्यास म्हणजे व्यर्थ श्रम आहे. प्रस्तुत अभंगाच्या पहिल्या चरणात नारायण नामाचा जप साराचे सार सांगितल्यामुळे इतर गौण क्षुद्र देवतांचा जप परमार्थात कांहीच उपयोगी नाही असे सांगतात. तप दोन प्रकारचे—एक यज्ञयागादिक कर्मद्वारा इंद्रादिक देवतांची उपासना करणे व दुसरे एकादशी इत्यादि व्रतद्वारा भगवंताची उपासना करणे—यज्ञयागादिक तपाने कर्मकर्तृत्वाचा अहंकार उत्पन्न होतो; तर भगवंताच्या उपासनेत दीनता प्राप्त होते. म्हणून भगवत्प्राप्तीचा उद्देश ज्यात नाही व भगवंताचे ध्यान ज्यात रहात नाही अशा तपाचा येथे निषेध केला आहे.

कर्म = वर्णाश्रमविहित कर्म. क्रिया = श्राद्धादि नैमित्तिक क्रिया. नेमधर्म = यमनियमादि धर्म. या सर्वांचे अनुष्ठान करीत असता एका भगवंताचे प्रेम नसले तर ते सर्व निर्फळ, कष्टदायक आहेत. सारांश, कलियुगात नामस्मरणादि भागवतधर्म हाच एक मुख्य धर्म आहे. कलियुगात इतर धर्म सांग होणे कठीण; पण नामस्मरणादि भागवत धर्मात व्यंगच उत्पन्न होत नाही. म्हणून भगवन्नामस्मरणावाचून यज्ञकर्माच्या पाठीमागे लागणे म्हणजे वाळूघाणा गाळण्यासारखे निरर्थक श्रम मात्र होय. "भरोसो जाहि दुसरो सो करो"

(विनय पत्रिका) दुसरे हजारो लोक इतर हजारो साधनांचा भरंवसा करोत बिचारे, पण मला तर कलियुगात एक रामनाम महाकल्पवृक्षच सांपडला आहे. हे सर्व रामनाममहात्म्य कविकल्पना–तिशयोक्ति नसून त्रिवार सत्य आहे हे मी स्वानुभवपूर्वक माझ्या उपास्य श्रीरामरायाची शपथ घेऊन सांगतो. रामनाम माहात्म्य खोटे ठरल्यास माझी जीभ झडून जावो !" (श्रीतुलसीदास)

**हरिपाठीं गेलें ते निवांतचि ठेले । भ्रमर गुंतले सुमनकळिके**

ह्या तिसऱ्या चरणात ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, हरि-नामस्मरणादि भगवद्भक्ति केल्याने निर्विकल्पसमाधि प्राप्त होते. अमृतानुभवग्रंथात जीवाला कोणती स्थिति प्राप्त व्हावयास पाहिजे ह्याचे मार्मिक निरूपण केले आहे. ब्रह्मज्ञानाने अज्ञान व भक्तीने ब्रह्म अंगी मुरले की जीव निर्विकल्प अवस्थेला प्राप्त होतो. स्मरण राहणे हा ज्ञानाचा स्वभाव तर, सर्व विसरणे हा प्रेमाचा स्वभाव आहे. प्रेमामुळे जाणतेपणाचा व नेणतेपणाचा दोघांचाहि विसर पडतो.

"माझी मज झाली अनावर वाचा ।
छंद या नामाचा घेतलासें ।।"

(श्रीतुकाराम महाराज)

असे झाल्यावरहि प्रयत्नावाचून अखंड नामस्मरण होतच राहते. भगवद्भक्ताचे अंतःकरण भगवत्प्राप्ति झाल्यावरहि भगवंताचा क्षणभरहि वियोग होऊ नये म्हणून सतत तळमळत राहते. "निवांत" शब्दाचा दुसरा अर्थ निर्विघ्न व निर्धास्त असा आहे. संसारात असो किंवा परमार्थात असो; जेवढी म्हणून विघ्ने येतात ती सर्व त्या जीवाच्या पापकर्मामुळे येतात.

धर्मशास्त्रातील एका विशिष्ट प्रायश्चित्ताने एकच पाप नाहीसे होते, पण पापप्रवृत्ति नाहीशी होत नाही. हरिनामस्मरण असे

सर्वश्रेष्ठ प्रायश्चित्त आहे की, त्याच्या योगाने मागील सर्व संचित-पाप नाहीसे होते व अखंड नामस्मरणाने पापप्रवृत्तीहि क्षीण होत जाते. सर्व समर्थ परमात्मा नामधारकाचे संरक्षण करणारा असल्या-मुळे ग्रहपीडांचे व देवतादिकांच्या विघ्नांचे त्याला भय उरत नाही. एकच मुख्य गोष्ट ही की, तनमनधनाने मात्र देवावर प्रेम केले पाहिजे. निरपराध नामधारकास भगवंताच्या भक्तवात्सल्याचा अनुभव पदोपदी येतो. सापराध नामस्मरण भक्तीला पोषक नाही.

"नाम स्मरतां म्हणुनि आचराल दोष ।
तरी श्रवण मनन भक्ति पडली ओस ।।"

(श्रीएकनाथ महाराज)

"इंद्रियासी नेम नाहीं । मुखीं राम म्हणोनि कायी ।
जेवी माशीसवें अन्न । सुख नेदी तें भोजन ।।"

(श्रीतुकाराम महाराज)

मकरंदाच्या लोभाने कमळाच्या फुलावर बसलेला भ्रमर जसा प्रेमात तल्लीन होऊन त्याला आंतबाहेरचे कांही स्मरत नाही तसे भक्तहि भगवत्प्रेमात अत्यंत शांत व निर्विकल्प असे भगवंताशी ऐक्य पावून राहतात. हीच ब्रह्मानंदाची अवस्था असे श्रुतीत वर्णिले आहे.

**ज्ञानदेवा मंत्र हरिनामाचें शस्त्र । यमें कुळगोत्र वर्जियेले**

ह्या शेवटच्या चरणात श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, "भगवंताचे नांव एक अत्यंत प्रभावी असे मंत्ररूपी शस्त्र आहे व हे शस्त्र ज्याच्याजवळ आहे, त्याला, त्याच्या कुळाला, एवढेच नाहीतर त्याच्या गोत्रजांसहि यमलोकाला जावे लागत नाही." एवढा नामधारकाच्या नामस्मरणाचा प्रभाव आहे.

"तुका म्हणे काळा हाणा तोंडावरी ।
भाता भरा हरिनाम वाणी ।।"

यमाचा पाश चुकविण्याकरिता हरिनाम हा निर्वाणीचा अचूक रामबाण आहे. नामधारक प्रारब्धकर्मानुसार पाप करणारा असला तरी यम त्याला दंड करू शकत नाही. (पद्मपुराण पातालखंड अ. १०७ श्लोक ४४. श्रीमत् भागवत् स्कंध ६ अ. २ श्लोक ९–१०) तसेच–

"यम सांगे दूता । तुम्हां नाहीं तेथें सत्ता ।
जेथें होय कथा । सदा घोष नामाचा ।। १ ।।

नका जावूं तया गांवा । नामधारकाच्या शिवा ।
सुदर्शन यावा । घरटीं फिरे भोंवतीं ।। २ ।।

चक्र गदा घेवूनि हरि । उभा असे त्याचे द्वारीं ।
लक्ष्मी कामारी । ऋद्धिसिद्धि सहीत ।। ३ ।।

ते बळिया शिरोमणि । हरिभक्त ये मेदिनी ।
तुका म्हणे कानीं । यम सांगे दूतांचें" ।। ४ ।।

एवढा हरिनामाचा अगाध महिमा समस्त वेदशास्त्रपुराणे तसेच सर्व संतमहात्मे यांनी एकमुखाने वर्णिला आहे. धर्म हा श्रद्धामूलकच असल्यामुळे व प्रत्येक पुरुष "श्रद्धामयोऽयं पुरुषः" (श्रीगीता १७–३), श्रद्धावान् असल्यामुळे व्यवहारात किंवा परमार्थात श्रद्धा ठेवल्याखेरीज भागतच नाही.

"अर्थवादं हरेर्नाम्नि संभावयति यो नरः ।
स पापिष्टो मनुष्याणां नरके पतति स्फुटम् ।।"

(कात्यायन संहिता)

—कर्मकांडातील धर्माधर्म प्रायश्चित्ते यावर जर श्रद्धा ठेवावीच लागते तर मग नाममहात्म्यावर श्रद्धा कां ठेवू नये ? जो कोणी नाममहिमा खोटा समजेल, त्याला निश्चित नरकगति झालीच पाहिजे. पूर्वीच्या कृतत्रेतद्वापार या तिन्ही युगात देखील त्या त्या युगातील युगधर्म गौण लेखून नामस्मरणादि भागवतधर्मास सर्व प्राधान्य देवून अंबरीष, रुक्मांगद, बिभिषण, हनुमंत, अंगद, अर्जुन, उद्धव, अक्रुरादि हजारो महाभगवद्भक्त झाले आहेत. तसेच कलियुगात श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीनामदेव-महाराज, श्रीएकनाथमहाराज, श्रीतुकाराममहाराज, श्रीसमर्थादि दिव्य संतविभूति महाराष्ट्रात अवतीर्ण होऊन गेले आहेत. त्यांच्या-वरच आपण अचल श्रद्धा ठेवून संसार अनायासे लीलेने तरून जाण्यास आपणा सर्वांस श्रीज्ञानेश्वरमहाराज सद्‌बुद्धि देवोत, येवढीच त्यांच्या चरणी प्रार्थना करून ही अल्प सेवा त्यांच्याच चरणी समर्पण करतो.

श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

---

आम्हा भोगमोक्षाचिये ठायीं । इये श्रीमूर्ती वाचूनि नाहीं ।
म्हणोनि तैसाचि साकार होई । हें उपसंहारी आतां ॥
(ज्ञा. ११–६०१)

वेदपुराणादिकांनी प्रतिपादिलेला व श्रीज्ञानेश्वरमहाराजादि संतांनी पुरस्कारिलेला भागवत धर्म किंवा भक्तिमार्ग वारकरी संप्रदायाचा मुख्य मार्ग होय. या भक्तिमार्गात मुख्यतः भगवंताच्या रामकृष्णादि सगुण साकार स्वरूपाचेच आलंबन घेतले जाते. कारण ज्या भक्तिमार्गात नामस्मरण, भगवंताचे गुणवर्णन व सर्वकर्म समर्पण ही तीन मुख्य साधन अंगे आहेत, ती तीन अंगे सगुणावाचून निर्गुणाचे ठिकाणी घेता येत नाहीत. केवळ नामरूपरहित निर्गुण स्वरूपाचे ठिकाणी नामरूप नसल्यामुळे नामस्मरण व गुणसंकीर्तन करणारे व ते तसे सर्वस्वी असंग असल्यामुळे त्याचे ठिकाणी कर्मसमर्पणहि होऊ शकत नाही. भगवद्गीतेत हाच सर्वकर्मसमर्पणरूप भागवतधर्म सांगितला असून पुढे नामस्मरण व भगवद्गुणवर्णनरूप भागवतधर्महि सांगितला आहे. म्हणूनच तेथे भगवान् श्रीकृष्णांनी वारंवार अर्जुनाला कर्म समर्पण कर, माझ्या ठिकाणी चित्त ठेवून कर्म कर, माझ्या करिताच कर्म कर, माझे स्मरण करून कर्म कर, माझे नामस्मरण कर असा आपल्या सगुण साकार स्वरूपाला धरून उपदेश केला आहे.

अकराव्या अध्यायात भगवंताने अर्जुनाला विश्वरूप दाखविल्यानंतर ते विश्वरूप पाहून अर्जुनाने भगवंताच्या विश्वरूप व चतुर्भुज मूर्ति या दोहोंपैकी सुखाचा लाभ अधिक कोणापासून, हे स्वानुभवाने दोहोची तुलना करून पाहून भगवंताला वरील ओवीत सांगितलेला आपला अनुभव त्यांनी सांगितला आहे. अर्जुन

म्हणतो भगवंता! तुझे हे चतुर्भुज रूप म्हणजे आम्हाला भोगाचे ठायी म्हणजे ब्रह्मज्ञानाने जीवन्मुक्ति साधल्यावर त्या जीवन्मुक्त-दशेत मिथ्या ठरलेल्या नामरूपात्मक विषयांचे उदासीनतेने प्रारब्धानुसार सेवन करण्यात आम्हांला जो ब्रह्मानंदाचा अनुभव येत नाही तो ब्रह्मानंदाचा अनुभव तुझ्या सगुण साकार चतुर्भुज मूर्तीच्या प्रेमभक्तीने प्रारब्धानुसार विषयसेवन करीत असताना येतो. भक्तांना प्रारब्धानुसार व्यवहार करीत असताना देखील परमानंद किंवा ब्रह्मानंदच प्राप्त होतो व केवळ ज्ञानी जर जीवन्मुक्त झालाच तर त्याला नामरूपाविषयीच्या उपेक्षाबुद्धीमुळे व्यवहारकाळी परमानंदाचा लाभ होत नाही. 'भोग' या शब्दाचा अर्थ येथे व्यवहार-काळी परमानंद प्राप्तिरूप भोग असा आहे किंवा भोग म्हणजे विषय भोगकालीहि सगुण भगवंताचे प्रेमामुळे भक्तांना परमानंदच असतो असा अर्थ. भोग म्हणजे 'विषयसुख' असा अर्थ येथे घेता येत नाही. कारण भक्तांना विषय भोग भोगताना आपण पहातो तरी त्यांचे ठिकाणी विषयांची स्फूर्ति नसते, भगवंताचीच स्फूर्ति असते, असे नाथांनी म्हटले आहे. भगवंताचे प्रेमाने, सर्व नामरूपात्मक देखावा सगुण साकार भगवत्स्वरूपच भासायला लागले असता भगवंताच्या अखंड प्रेमात किंवा अखंड ब्रह्मानंदात खळ पडण्याचे कांही कारणच उरतच नाही. त्याचप्रमाणे मोक्षाचे ठायी म्हणजे विदेहमुक्तीचे ठिकाणी जीवन्मुक्ति व विदेहमुक्ति या दोहोंत जाणीव असणे व जाणीव नसणे इतकाच फरक आहे. जीवन्मुक्त-स्थितीत आपल्या मुक्तावस्थेची जाणीव असते किंवा जोपर्यंत मुक्तावस्थेची जाणीव राहते तोपर्यंत ती जीवन्मुक्तावस्था म्हटली जाते व आपल्या प्राप्त झालेल्या मुक्तावस्थेची जाणीव हारपली की तीच विदेहमुक्ति म्हटली जाते. कोणी म्हणतील की शास्त्रात ज्ञानी जीवंत आहे तोपर्यंत त्याला जीवन्मुक्त म्हटले आहे व आपण जीवन्मुक्त व विदेहमुक्त यांच्या निराळ्या व्याख्या सांगत आहा.

पण ही शंका जीवन्मुक्त व विदेहमुक्त यांच्या शास्त्रातून सांगितलेल्या अनुभवस्थितीचा ज्यांनी विचार केला नाही अशा शब्दनिष्ठ वेदान्त्यालाच येऊ शकेल. जीवन्मुक्ति व विदेहमुक्ति ही जीवंत राहण्यावर व मरणावर अवलंबून नाही. अनुभवावर अवलंबून आहे. विदेहमुक्तीचा व समाधीचा अर्थात् निर्विकल्प समाधीचा अनुभव सारखा आहे. समाधीत वृत्तीचा निरोध होतो म्हणजे ती जाणलीच जात नाही; म्हणून वृत्तीचा अनुभव किंवा जाणीव बंद पडली की विदेहमुक्ति म्हटली जाते. जाणीव बंद पडणे हे ज्ञानाचे प्रांतात येत नाही आणि प्रेमाचा किंवा सुखाचा स्वभाव "जेणें एकेचि अशेख। विसरे जीव ।।" (ज्ञाने. अ. १३-१२७) विसरणे हा आहे. ज्ञानाने कळते व सुखाने किंवा प्रेमाने बाकीचे सर्व विसरले जाते. भक्तिप्रेमात भक्ताला जगाचाच विसर पडतो. कांहीच भासत नाही; म्हणून भक्ताची दशा विदेहमुक्तीसारखी अखंड समाधिदशा असते. ज्यांना वेदान्तशास्त्र धड अवगत नाही असे शब्दज्ञानी किंवा निर्गुणवादी सगुण भगवंतालाहि पांचभौतिक देहधारी समजतात, पण ती त्यांची भ्रांति आहे. नाथ म्हणतात-

जीवासी दृढ देहबुद्धि । भगवंतहि देहसंबंधी ।
तयाचे भजनें मोक्षसिद्धी । न घडे विशुद्धि जीवासी या ।।३८।।
ऐसी उठो पाहे आशंका । ते विषयीचे उत्तर आईका ।
जीवा आणि जगन्नायका । देहसमत्व देखा न घडे ।।३९।।
जाती पाहतां दोन्ही दगड । परि रत्नगार नव्हे पडिपाड ।
तेवि देवा जीवा समत्व दृढ ।
हे केवळ मानिती मूढ न ज्ञाते ।। ४० ।।
आपणया सारिखाचि देख । हरी मानी पंचभौतिक ।
त्या परममूर्खाते देख । आकल्प दुःख सरेना पै ।।४१।।

भगवद्देह चैतन्यघन । तेथे असेना देहाभिमान । या लागी करितां त्याचें भजन । अज्ञान जन उद्धरती ।। ४५ ।।
केवळ चैतन्य विग्रहो । सत्य संकल्प भगवद्देहो । त्याचे दर्शनार्थ पहा हो । तपादि उपावो हरि प्रेरी ।। ५४ ।।

(चतुश्लोकी भागवत)

अर्थ–"अनुपपत्तेस्तु न शारीरः" या ब्रह्मसूत्रात व त्यावरील शांकरभाष्यात जीवाची उपासना करता येत नाही कारण, जीव मूळात ब्रह्मस्वरूपच आहे, तरी तो आपल्या स्वरूपाला विसरून तो आपल्याला मर्यादित देहस्वरूप समजतो. त्यामुळे त्याचे ठिकाणी परमेश्वरैश्वर्य झांकले गेले, म्हणून उपासना संमत नाही, असा सिद्धान्त केला आहे. या सिद्धान्ताचा आश्रय करून येथे शंका घेतली आहे की, जीवाला देहाची उपाधि आहे व सगुण परमेश्वराचे ठिकाणीही देह असतो, तेव्हां देहधारी जीवाच्या उपासनेने जसा जीव तरून जाऊ शकत नाही तसा देहधारी भगवंताचे उपासनेने तरी जीव कसा तरू शकेल ? यावर नाथ म्हणतात, जीवाचा देह जीवाहून निराळा आहे व तो देहांकार धरून देहाशी आपले ऐक्य करितो. जीव चेतन व जीवाचा देह जड आहे. अशा जड देहाचे भजनाने जीव कसा तरेल ? ही तुमची शंका बरोबरच आहे. मुक्ति म्हणजे ऐक्य. जड देहाचे भजनाने जडदेहाशी चेतनजीवाने ऐक्य पावणे होईल. अशा रीतीचे ऐक्य तर आताहि त्यांनी केलेलेच आहे व त्यानेच तो बंधात पडला; म्हणून जड देहाशी ऐक्य करून सगुण झालेल्या जीवाचे भजनाने मुक्त न होता तो संसारातच पडतो; परंतु सगुण साकार देहधारी परमात्मा देहधारी असला तरी त्याचा देह त्याच्याहून निराळा जड पांचभौतिक नाही व म्हणूनच जीवाप्रमाणे त्याला आपल्या देहाचा अभिमान धारण करून त्या देहाशी ऐक्य करावे लागत नाही. सगुण परमात्मा जसा चैतन्यघन आहे तसा

त्याचा देहहि चैतन्यघनच आहे. म्हणून त्या चैतन्य परमात्म्याचे चैतन्यघन साकार देहाचे भजन केले असता जीव मुक्त होऊ शकतो. याप्रमाणे वेदान्तशास्त्रानेच सगुण साकार रामकृष्णादि स्वरूपे पूर्ण ब्रह्म निरुपाधिक आहे हे सिद्ध होते.

ही वेदान्तशास्त्रातील सगुण भगवंताच्या साकार देहाची उपपत्तिच भक्तिशास्त्राचा मुख्य मजबूत पाया होय. या पायावरच वेदादिकांनी व श्री ज्ञानेश्वर महाराजादि संतांनी भक्तिमार्ग उभारला आहे. या भक्तिमार्गातील उपास्य सगुण भगवान् व त्याचे आत्मप्रेमवत् प्रेमरूप भक्ति व ज्ञानी जीव हे तिन्ही अविनाशी शुद्ध ब्रह्मस्वरूपच असल्यामुळे भक्तिमार्गहि अविनाशी आहे. असो. म्हणूनच सर्व वैराग्यसंपन्न ज्ञानी पुरुषांनी त्याची थोरवी जाणून ज्ञानानंतरहि त्याचा अवलंब केला. सगुण साकार भगवंताच्या आलंबनाने सिद्ध होणारा भक्तिमार्ग व भगवंताचे साकार स्वरूप जीवंतपणीच विदेहमुक्तीची स्थिति प्राप्त करून देणारे आहेत. हा स्वतःचा अनुभव पाहूनच अर्जुनाने पुनः चतुर्भुज स्वरूपाने दर्शन देण्याकरिता भगवंताची प्रार्थना केली. कोणी म्हणतात अर्जुनाची ही विनंती ऐकून भगवंतांनीच त्याचा निषेध केला आहे व भगवंतांनीच व्यापक विश्वरूपापेक्षा आपल्या चतुर्भुज मूर्तीला मायिक ठरविले आहे; तेव्हा भगवंताची चतुर्भुज मूर्ति पूर्णब्रह्म कशी म्हणता येईल ? पण श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

"तेणें देवाचिया दोन्ही मूर्ती। निकिया न्याहाळलिया चित्तीं।
तव विश्वरूपाहून कृष्णाकृतीं। देखिला लाभ"

अर्जुनाने दोन्ही मूर्तीची तुलना करून पाहिली तेव्हा त्याला विश्वरूपाहून श्रीकृष्ण स्वरूपाचे अवलंबनात विशेष सुख आहे असे दिसून आले. पुढे बाराव्या अध्यायात अर्जुनानी जो प्रश्न केला त्यात विश्वरूप व श्रीकृष्णरूप या दोहोपैकी कोणाचे अवलंबन

घेऊन जीव युक्ततम होतो म्हणजे अनिर्वाच्य पूर्ण निर्विकल्प होतो असे विचारले असता भगवंतांनी आपल्या सगुण साकार चतुर्भुज मूर्तीच्या साह्यानेच तसा होऊ शकतो हे उत्तर दिले आहे.

**श्रीकृष्णचि कैवल्य उघडे**

म्हणजे श्रीकृष्ण पूर्ण ब्रह्मस्वरूप आहे असे श्रीज्ञानेश्वरमाउलीनेहि म्हटले असून बाराव्या अध्यायात विश्वरूप व श्रीकृष्णमूर्ति यांच्या पूर्णतेचा कस या दृष्टीने कांहीच न्यूनपणा-अधिकपणा नाही हे सांगितले आहे; पण व्यापक नदीच्या पाण्याने तहानेची तृप्ति होत नाही, ती तृप्ति अंजलीत पाणी घेऊन पिण्याने होते, त्याप्रमाणे विश्वरूपाचे ठिकाणी अर्जुनाला प्रेमसुख मिळाले नाही. ते चतुर्भुज मूर्तीच्या ठिकाणीच मिळाले हा अर्जुनाचा अनुभव होता. असो, या सर्व विवेचनाचा अर्थ इतकाच की अर्जुनाचे वरील ओवीचे म्हणणे स्वानुभवाचे होते, मूर्खपणाचे नव्हते व असाच अनुभव व असेच सगुण साकार रामकृष्णादि स्वरूपाचे थोरपण सर्व संतांनीहि स्वानुभवाने वर्णिले आहे.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८७७० वि: ...
क्रमांक ७५८० नों दि ...

## भक्तियोगाचें श्रेष्ठत्व....८

स्वच्छंदोपात्तदेहाय विमलज्ञानमूर्तये ।
दासमानसहंसाय ज्ञानराजाय ते नमः ।।

१. ईश्वरप्राप्ति हे जीवाचे अंतिम ध्येय असून, ती ज्या उपायांनी करून घेता येते, त्या उपायाला 'योग' असे म्हणतात. 'योग' शब्दाच्या व्याख्येविषयी पुष्कळ विवाद आहेत. 'योग' हा शब्द कर्मयोगासच लागू पडतो, असे कित्येक म्हणतात; पण या व्याख्येने, 'ज्ञानयोग' शब्दातील "योग" शब्दाचे अर्थाचा निर्वाह लागत नाही व

"समाधावचलाबुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि"
"समत्वं योग उच्यते"
"इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ।।"

इत्यादि वाक्यांवरून ब्रह्माचे ठिकाणी वृत्ति राहणे म्हणजे "योग" असा 'योग' या शब्दाचा अर्थ सिद्ध होतो. ह्यात साम्यरूपी ब्रह्माचे ठिकाणी विहितकर्मानुष्ठानसमर्पणद्वारा चित्तवृत्ति स्थिर करणे, तो कर्मयोग; विधिपूर्वक संन्यास घेऊन, शम-दम, वेदान्त-श्रवणादि कर्मानुष्ठानद्वारा ब्रह्माचे ठिकाणी चित्तवृत्ति स्थिर करणे, तो ज्ञानयोग; व रामकृष्णादिकांच्या सगुण परमात्म्याचे ठिकाणी निःसीम प्रेमाने स्वभावानुसार घडेल ते कर्म अर्पण करून भगवन्नामसंकीर्तनादि करणे, तो भक्तियोग होय; असे गीता, भारत व भागवत इत्यादि ग्रंथांवरून सिद्ध होते. सारांश, 'योग' हा शब्द गौणत्वाने ईश्वर प्राप्तीच्या उपायालाहि लागतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम 3८०००
९५२०

२. याप्रमाणे ईश्वरप्राप्तीकरिता कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग असे तीन उपाय सांगितले आहेत. यांच्या एकवाक्यतेविषयीहि बराच विवाद दिसून येतो.

कोणी म्हणतात की, हे तिन्ही मार्ग स्वतंत्र असून, अन्यनिरपेक्ष, स्वातंत्र्याने ईश्वरप्राप्ति करून देण्यास समर्थ आहेत. कोणी म्हणतात की, ज्ञाननिष्ठा ही अंतिम निष्ठा असून, भक्तिनिष्ठा व कर्मयोगनिष्ठा ह्या तिचे पूर्वांग आहेत. कोणी म्हणतात की, भक्तिनिष्ठा अंतिम असून, ज्ञाननिष्ठा व कर्मनिष्ठा ह्या तिचे पूर्वांग आहेत. कोणी म्हणतात की, कर्मनिष्ठा अंतिम असून ज्ञाननिष्ठा व भक्तिनिष्ठा तिला सहकारी आहेत. असा विवाद उत्पन्न होण्याची पुष्कळ कारणे आहेत. पैकी निरंकुश तर्क, स्वतंत्र ग्रंथावलोकनाने आपल्या बुद्धिनुसार काढलेला सिद्धान्त व स्वभावानुरूप विशिष्ट उद्देश ही तीन मुख्य कारणे आहेत. एकवाक्यता करताना तर्काची अपेक्षा नसतेच असे नाही. तेथे तो सहकारी असतो, मुख्य नसतो.

३. एखाद्या गावाला प्रथमच जाणाऱ्या मनुष्याला त्या गावाला कोणकोणते रस्ते जातात, सर्व रस्ते स्वतंत्र आहेत किंवा मध्येच एखादा रस्ता दुसऱ्या रस्त्यात मिळून, एकच रस्ता शेवटी त्या गावाला जातो; वगैरे गोष्टींचा निर्णय करणे जसे शक्य नसते; त्याला त्या गावाला जाऊन आलेल्या गृहस्थाच्या अनुभवाचाच आश्रय करणे भाग पडते; त्याप्रमाणे ईश्वरप्राप्ति कोणत्या मार्गांनी होईल, ईश्वरप्राप्तीचे मार्ग किती आहेत, सर्व स्वतंत्र आहेत किंवा एकच मार्ग ईश्वरप्राप्ति करून देणारा असून बाकीचे सहकारी आहेत, वगैरे गोष्टींचा निकाल साधकाला करता येणे शक्य नाही. त्याला ईश्वरस्वरूपाला प्राप्त झालेल्या संतांचे वचनांचा किंवा शास्त्राचा विचारच केला पाहिजे, म्हणून वचन, अनुभव व

युक्ति यांच्या आधारे एकवाक्यता करावी, अशी शांकरवेदान्त-मर्यादा आहे.

४. विरोध प्राप्त झाला असता एकवाक्यतेची आवश्यकता असते; पण विरोध निरनिराळ्या प्रकारचा असल्यामुळे एकवाक्यतेचे स्वरूपहि बदलते. विरोध दोन प्रकारचा असतो. एक वस्तुविषयक व दुसरा मार्गविषयक. वस्तुविषयक विरोध त्यातील एक पक्ष सत्य व दुसरा मिथ्या आहे, किंवा एक मुख्य व दुसरा गौण आहे, असे सिद्ध करून नाहीसा करावा लागतो. मार्गविषयक विरोध अधिकारीभेदाने व कालभेदाने वगैरे निवृत्त होतो.

५. कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग यांचेविषयीचा वर जो विवाद दाखविला आहे, त्याची एकवाक्यता करण्याकरिता आपल्याला पुढील गोष्टींचा विचार केला पाहिजे.

(१) ईश्वर प्राप्तीच्या मार्गांचे पूर्वांग व उत्तरांग असे भाग आहेत काय ?

(२) प्रथमपासून शेवटपर्यंत एकच निष्ठा ठेवून ईश्वर-प्राप्ति करून देणारा असा यांपैकी कोणी मार्ग आहे काय ?

(३) या तीन निष्ठा भिन्न भिन्न आहेत काय ? प्रथम आपण तिसऱ्या मुद्याचा विचार करू.

६. "योगास्त्रयो मया प्रोक्ता" (भाग. ११-२०-६)

या श्लोकात कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग असे मोक्षार्थ तीन उपाय आहेत, असे भगवंतांनी उद्धवाला सांगितले आहे.

"लोकेऽस्मिन् द्विविधा निष्ठा"

या गीताश्लोकात भगवंतांनी दोन निष्ठांचा उल्लेख केला आहे. भारतातील शांतिपर्वान्तर्गत जनकसुलभा संवादात

"सांख्ये ज्ञाने च योगे च महीपाल विधौ तथा ।
त्रिविधे मोक्षधर्मेऽस्मिन् "

अशी त्रिविध निष्ठा सांगितली आहे. याप्रमाणे मोक्षार्थ निरनिराळ्या निष्ठा सांगितलेल्या दिसतात. गीतेतील

"लोकेऽस्मिन् द्विविधा निष्ठा "

या श्लोकात जरी दोनच निष्ठांचा उल्लेख असला तरी गीतेत तिसऱ्या भक्तिनिष्ठेचाहि उल्लेख केलेला आहे, कारण कोणताहि भिन्नपणा व्यावृत्तीने होत असतो.

गाय व घोडा यांची जनावर दृष्टीने एकच जात असली तरी परस्परांचे ठिकाणी परस्परांना परस्परांहून भिन्नपणाने दाखवून देणारे कांही असाधारण धर्म असतात. त्या धर्माच्या योगाने परस्परांची व्यावृत्ति होते.

"यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः
तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसंगः समाचर"

या श्लोकात कर्तृबुद्धि व फलाशा सोडून यज्ञपुरुषाकरिता कर्म कर असे सांगून

"मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा"
"सर्व कर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः"

इत्यादि श्लोकात भगवंतांनी आपल्या सगुण स्वरूपाचे ठिकाणी सर्व कर्म समर्पण करण्यास सांगितले आहे. पुनः "अनन्याश्चिन्तयन्तो माम्" इत्यादि श्लोक स्पष्ट भक्तिविधायक आहेतच.

७. कर्मयोगनिष्ठा हीच भक्तिनिष्ठा होय; भक्तिनिष्ठा म्हणून कर्मनिष्ठेहून स्वतंत्र कोणी निष्ठा नाही, असे कित्येक

म्हणतात, पण हे त्यांचे म्हणणे निराधार आहे. निष्ठेच्या भिन्नपणाला, लक्षण व गति ह्या दोन गोष्टी कारण आहेत. भिन्न भिन्न निष्ठेत भिन्न भिन्न लक्षण व गति आढळून येते; म्हणून त्या परस्परांहून भिन्न आहेत, असे आम्ही म्हणतो.

(१) कर्मयोगनिष्ठेत विहित कर्म जाणून व निषिद्ध गाळून विहित कर्मांचाच सद्ब्रह्माचे ठिकाणी विनियोग करावा लागतो; पण भक्तिनिष्ठेत "कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा" इत्यादि श्लोकात सांगितल्याप्रमाणे सर्व कर्म रामकृष्णादि सगुण ब्रह्माचे ठिकाणी अर्पण होतात.

(२) कर्मयोग्याला पुनरावृत्ति टाळण्याकरिता शुक्लपक्षादिक काळाची अपेक्षा असते व अशा शुभकाली मेलेला कर्मयोगी ब्रह्मलोकात जाऊन ब्रह्मदेवाबरोबर मुक्त होतो किंवा ज्ञाननिष्ठेने इहलोकीच त्याला मुक्त होता येते; पण भक्ताला पुनरावृत्ति टाळण्याकरिता काळाची अपेक्षा कोठे सांगितली नाही व त्याला सांख्यज्ञाननिष्ठेचीहि अपेक्षा सांगितली नाही.

(३) "योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना ।
श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमो मतः ।।"

या श्लोकात सर्व योग्यांमध्ये भक्ताला युक्ततम असे ठरविले आहे, तसे कर्मयोग्याला किंवा ज्ञानयोग्याला कोठेहि ठरविले नाही.

(४) भक्तिनिष्ठेत "मन्मना" "मत्परायण" "अनन्यचेताः" इत्यादि शब्दांनी भगवंताविषयी एकविधभाव व

"सततं कीर्तयन्तो मां"
"अनन्याश्चिंतयंतः" "नमस्यन्तश्च मां भक्त्या"

इत्यादि शब्दांनी भगवंताचे नामस्मरण करणे वगैरे कर्मनिष्ठेहून स्वतंत्र धर्म सांगितले आहेत.

या चार कारणांमुळे कर्मयोगनिष्ठेहून भक्तिनिष्ठा पृथक् करून कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग अशी तीन पृथक् निष्ठा गीतेतहि सांगितल्या आहेत, असे आमचे मत आहे.

८ भारतातील शांतिपर्वान्तर्गत नारायणीयधर्माचा विचार केला असताहि नारायणीयधर्मात वरील तीन निष्ठांचा उल्लेख सांपडतो व त्याच्याच आधारे गीतेतहि तीन निष्ठा सांगितल्या आहेत, असे सिद्ध होते; कारण गीतेत तिसऱ्या अध्यायामध्ये प्रवृत्तिधर्माचा उपन्यास करून फलाशा व संग सोडून परमेश्वर-प्रीत्यर्थ त्या धर्माचे अनुष्ठान केले असता तो पुनरावृत्ति टाळतो, असे जसे म्हटले आहे, तसेच नारदनारायणसंवादभूत नारायणीय धर्मनिरूपण करतानाहि शांतिपर्वातील ३४० व्या अध्यायात वरील प्रवृत्तिधर्माचा उपन्यास करून त्या धर्माच्या निष्काम अनुष्ठानाने ज्ञानद्वारा मुक्ति होते, असे महाभारतकारांनी सांगितले आहे व प्रजापति या प्रवृत्तिधर्माच्या अनुष्ठानाने भगवंताचे यजन करतात असा उल्लेख केला आहे. पण अशा प्रकारचा प्रवृत्तिधर्मच भक्तियोगाचे स्वरूप होय, असे मात्र महाभारतकारांचे मत नाही, हे पुढील कारणांवरून दिसून येईल.

(१) महाभारतकारांनी "एवमेष महान् धर्मः" (३४६-११) या श्लोकात प्रवृत्तिधर्माचा उल्लेख करून "यतीनां चापि यो धर्मः" (३४८-५३) या श्लोकात ज्ञानयोगाचा उल्लेख केला आहे व

"ततस्तद्भावितो नित्यं यजेत् वैकुंठमव्ययम्"

या श्लोकात भक्तियोग सांगितला आहे. त्यातील एकान्तधर्म हा भक्तियोग आहे.

(२) "एवमेष महान् धर्मः" या श्लोकाने सांगितलेला धर्म व "यतीनां चापि यो धर्मः" या श्लोकात सांगितलेला धर्म हे दोन्हीहि धर्म जसे परस्परांहून भिन्न आहेत, तसाच एकान्त-धर्महि या दोन धर्मांहून निराळा आहे. कारण वरील दोन धर्म गीतेत संक्षेपाने सांगितले आहेत, असे म्हटले असून एकान्तधर्मा-विषयी तसा उल्लेख नाही.

(३) अध्याय ३४४ व ३४८ यांमध्ये गतीचा विचार करताना "तेभ्यो विशिष्टां जानामि गतिमेकान्तिनां नृणाम् ।" (३४८-६)

इत्यादि श्लोकाने, कर्मयोगी व ज्ञानयोगी या दोघांपेक्षाहि एकान्त धर्मियाला श्रेष्ठ गति होते, असे सांगितले आहे.

(४) कर्मयोगाचे अनुष्ठान करणाऱ्या ऋषींना, "तुम्ही माझे एकान्तभक्त नसल्यामुळे माझे दर्शन तुम्हांला होणे शक्य नाही," असे सांगून एकान्तभावाने भगवंताचे यजन करणाऱ्या उपरीचर राजाला भगवंतांनी दर्शन दिले व त्याचप्रमाणे एकान्त भक्त अशा नारदालाहि दर्शन दिले, असा उल्लेख आहे.

(५) उपरीचर राजाला शाप झाल्यामुळे जेव्हा तो पाताळात गेला तेव्हा तेथून त्याचा भगवन्नामानेच उद्धार झाला. नारदांनाहि श्वेतद्वीपामध्ये गेल्यानंतर भगवंताच्या दर्शनाकरिता भगवन्नामाचा जप व स्तुति करावी लागली. भगवान व्यासहि क्षीरसमुद्राचे तटी जाऊन नामजप करीत असतात, असे

"जगौ परमकं जप्यं नारायणमुदीरयन्"

या श्लोकामध्ये सांगितले आहे.

"सर्वाश्रमाभिगमनं सर्वतीर्थावगाहनम् ।
न तथा फलदं सौते नारायणकथा यथा ।।" (३४३-२)

इत्यादि श्लोकामध्ये भगवत् कथेचे माहात्म्य सांगितले आहे. याप्रमाणे उपरीचर, भगवान् व्यास, भगवान् नारद इत्यादि एकान्त भक्तांच्या ठिकाणी भगवन्नामस्मरण, भगवत्कथाश्रवणकीर्तनादिकांचे प्राधान्य होते, असे दाखविले आहे.

सारांश, पृथक् पृथक् लक्षणांवरून व गतीवरून कर्मयोग व भक्तियोग एक नसून ह्या दोन भिन्न निष्ठा आहेत आणि ज्ञानयोगाला धरून भागवतात सांगितलेल्या मोक्षार्थ तीन निष्ठाच कोठेहि आपल्याला दृष्टिस पडतील; म्हणून महाभारताचे आधारेहि गीतेत तीन निष्ठा प्रतिपादिलेल्या आहेत, हे सिद्ध होते.

९ याप्रमाणे कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग अशा तीन निष्ठा आहेत, पण यांचा परस्पर कांहीच संबंध नाही, असे मात्र म्हणता येत नाही. भगवान नारद श्वेतद्वीपाहून परमात्म्याचे दर्शन घेऊन परत आल्यावर

"तेन मे कथितः कृत्स्नः धर्मः क्षेत्रज्ञसंज्ञितः ।"

त्या परमात्म्यांनी संपूर्ण क्षेत्रधर्म मला सांगितला, असे त्यांनी नारायणाला सांगितले. तेव्हा कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग हे तिन्ही मिळून एक क्षेत्रधर्म होतो, असे अनुमान निघते; पण परस्पर निरपेक्ष अशा ह्या मोक्षार्थ तीन वाटा आहेत, असे म्हणता येत नाही, कारण

"एवमेकं सांख्ययोगं वेदारण्यकमेव च ॥
परस्परांगान्येतानि पांचरात्रं च कथ्यते ।"
(३४८–८१–८२)

या श्लोकात कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग ही परस्परांची अंगे आहेत व ही तीन अंगे मिळून एक एकान्तधर्म होतो असे म्हटले आहे. तेव्हा क्षेत्रधर्म म्हणजे एकान्त धर्म किंवा भक्तियोग असून

विहितकर्मसमर्पणरूप कर्मयोगनिष्ठा; निःसीम प्रेमपूर्वक सर्वकर्म-समर्पणरूप भक्तियोगनिष्ठा व व्यापक निःसीम प्रेमपूर्वक सर्वकर्म-समर्पणरूप एकान्तनिष्ठा, असा तो त्रिनिष्ठात्मक आहे, असे म्हणावे लागते.

१० गीतेचा विचार केला असताहि वरील त्रिनिष्ठात्मक भक्तिधर्म गीतेत सांगितला आहे, असे दिसते. कारण प्रथम सहा अध्यायात कर्मयोग व ज्ञानयोग यांचे वर्णन करून

"योगिनामपि सर्वेषां मद्‌गतेनान्तरात्मना ।
श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमो मतः ।।"

या श्लोकाने परमेश्वराशी पूर्ण ऐक्य होण्याकरिता सर्व योग-मार्गांना भक्तीची आवश्यकता आहे, असे दाखविले आहे. अठराव्या अध्यायात ४५ श्लोकापर्यंत कर्मयोगाचे वर्णन करून व कर्मयोग्याला विहित कर्मानुष्ठानाची आवश्यकता आहे, असे दाखवून

"स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः"

या श्लोकाने भागवतधर्मातील विहितकर्मानुष्ठान समर्पणरूप कर्मयोगनिष्ठेचा उल्लेख केला आहे. पुढे ५३ श्लोकांपर्यंत भगवद्ध्यानरूप भक्तिनिष्ठेचा उल्लेख करून ५५ श्लोकांपर्यंत व्यापकपराभक्तिनिष्ठेचा उल्लेख केला आहे.

११. याप्रमाणे या एकान्त किंवा क्षेत्रधर्मात वरील तीन निष्ठांचा समुच्चय असला, तरी लक्षणभेदामुळे व अनुष्ठेय कर्तव्याच्या दृष्टीने तेवढ्यापुरता त्यांचा भेद आहे.

"मुक्तानां तु गतिर्ब्रह्मन् क्षेत्रज्ञ इति कल्पिता ।
स हि सर्वगुणश्चैव निर्गुणश्चैव कथ्यते ।।"

मुक्तपुरुष क्षेत्रज्ञात मिळतात. तो क्षेत्रज्ञ सगुण व निर्गुण असा दोन प्रकारचा आहे तो ज्ञानयोगाने प्राप्य आहे, असे नारायणीय-

धर्मात सांगितले आहे. तेव्हा क्षेत्रज्ञप्राप्तीच्या वेळची निष्ठा ज्ञानयोगच होऊ शकते, असे या श्लोकावरून सिद्ध होते. पुण्यपापविरहित झालेले पुरुष प्रथम आदित्यात जातात, तेथून अनिरुद्धाचे ठिकाणी, तेथून प्रद्युम्नात व तेथून संकर्षणात येऊन त्रिगुणातीत होतात आणि पुढे सांख्ययोग्याबरोबर निर्गुण क्षेत्रज्ञाला प्राप्त होतात (भा. शां. प. अ. ३४४–१३–१८)

"ये तु दग्धेंधना लोके पुण्यपापविवर्जिताः ।
तेषां त्वयाभिनिर्दिष्टा पारंपर्यागता गतिः ।।"

(३४८–२)

पुण्यपापविरहित झालेले पुरुष परंपरेने (ज्ञाननिष्ठा द्वारा) क्षेत्रज्ञ परमात्म्याला प्राप्त होतात, असे भारतात म्हटले आहे. या गतिविचारावरून कर्मयोगियाला कर्मयोगानेच साक्षात् भगवत्प्राप्ति होते, असे म्हणता येत नाही. त्यांना ज्ञानयोगाचा आश्रय करावाच लागतो; म्हणून येथे कर्मयोग ज्ञानाचे पूर्वांगच ठरते. या गतीचा क्रम असा आहे की, प्रथम निष्काम विहित कर्मानुष्ठानाने पुरुष पापपुण्यविरहित होतो (गी. अ. २–५०) व नंतर ज्ञानयोगनिष्ठेने निर्गुण क्षेत्रज्ञस्वरूपाला प्राप्त होतो. पण क्षेत्रज्ञ परमात्मा सगुण व निर्गुण असा दोन प्रकारचा असल्यामुळे सगुण क्षेत्रज्ञ परमात्म्याशी तादात्म्य करण्याकरिता त्याला नंतर एकान्तभक्ति करावी लागते. (गी. अ. १८–५४–५५)

"सर्वावासं वासुदेवं क्षेत्रज्ञं विद्धि तत्वतः ।
समाहितमनस्काश्च नियताः संयतेंद्रियाः ।।"
एकान्तभावोपगता वासुदेवं विशन्ति ते ।"

(भा. शां. प. अ. ३४४–१८–१९)

सर्वांना आधार असलेला क्षेत्रज्ञ परमात्मा वासुदेव होय. एकान्तभावाला प्राप्त झालेले समाहित चेताचे पुरुष या वासुदेवाला

प्राप्त होतात. या वासुदेवाला सात्वत परमात्मा म्हणतात. सात्वत ज्ञानयोगाने हा परमात्मा प्राप्य असल्यामुळे त्याला सात्वत म्हणतात, असे

"सात्वतज्ञानदृष्टोऽहं सत्वतामिति सात्वतः।"

(भा. शां. प. अ. ३४२–७८)

या श्लोकात म्हटले आहे. क्षेत्रज्ञ परमात्मा सगुण व निर्गुण असा उभयविध असून तो ज्ञानयोगाने प्राप्य आहे. सांख्यज्ञानयोगाने निर्गुण क्षेत्रज्ञ परमात्मा प्राप्य असून सात्वत ज्ञानयोगाने (किंवा भक्तियोगाने) सगुण क्षेत्रज्ञ परमात्मा जो वासुदेव तो प्राप्य आहे, असे भारतावरून दिसत असल्यामुळे सांख्य ज्ञानयोग किंवा निर्गुण ज्ञानयोग व सात्वत ज्ञानयोग किंवा सगुण भक्तियोग असे दोन प्रकारचे ज्ञानयोग आहेत, असे सिद्ध होते. तेव्हा क्षेत्रज्ञप्राप्तीच्या वेळी दोन ज्ञानयोग राहू शकतात. कोणाचे ठिकाणी सांख्यज्ञानयोग-निष्ठा राहील व एकान्तनिष्ठेत या दोन्ही निष्ठांचा समुच्चय असल्यामुळे ही एकान्तनिष्ठा पराभक्तिनिष्ठा होय. ही वस्तुस्वरूप राहते, साधनस्वरूप राहत नाही. हिलाच ज्ञानेश्वर महाराजांनी

"पैं गा आमुचिया सहजस्थिति। भक्तिनाम"

असे म्हटले आहे. या ठिकाणी 'निष्ठा' शब्द लावणे गौण आहे. ज्याप्रमाणे माडीवर चढताना वरील शेवटची पायरी माडीच्या पृष्ठभागाशी समान असते म्हणून तिला पायरी म्हणणे योग्य होत नाही, कारण यापुढे चढावयाचे नसते, तरी पण खालील पायऱ्याच्या दृष्टीने आपण तिचा पायरीं या नांवाने निर्देश करतो, त्याप्रमाणेच या परानिष्ठेच्या ठिकाणी "निष्ठा" शब्द पूर्वांगभूत निष्ठेच्या अपेक्षेने वापरला आहे.

१२. सारांश, या उभयविध क्षेत्रज्ञस्वरूप-परानिष्ठेवर आरूढ होण्याकरिता नारायणांनी नारदांना जो क्षेत्रज्ञधर्म सांगितला किंवा

भगवंतांनी अर्जुनाला जो गीताधर्म सांगितला त्यातील निष्ठांचा पुढे दिल्याप्रमाणे क्रम आहे. प्रथम कर्मयोगनिष्ठेचा अवलंब केला पाहिजे. ती कर्मयोगनिष्ठा दोन प्रकारची आहे.

"अत: पुम्भिर्द्विजश्रेष्ठा वर्णाश्रमविभागश:।
स्वनुष्ठितस्य धर्मस्य संसिद्धिर्हरितोषणम्"

(भाग. प्र. स्कं. अ. २–१३)

या श्लोकात सांगितल्याप्रमाणे किंवा

"मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा"

(गी. अ. ३. श्लो. ३०)

या श्लोकात सांगितल्याप्रमाणे सगुण वासुदेवाच्या ठिकाणी कर्म समर्पण करणे, ही पहिली पायरी सगुणभक्तियुक्त कर्मयोगनिष्ठा होय

"देवान्भावयतानेन ते देवा भावयन्तु व:।
परस्परं भावयन्त: श्रेय: परमवाप्स्यथ"

(गी. अ. ३–११)

या श्लोकात सांगितल्याप्रमाणे किंवा

"एवमेष महान् धर्म: स ते पूर्वं नृपोत्तम।
आवाभ्यां पूज्यते सो हि दैवे पित्र्ये च कल्प्यते"

इत्यादि भारतातील श्लोकात सांगितल्याप्रमाणे यज्ञपुरुषाचे ठिकाणी विहितकर्म समर्पण करणे, ही दुसरी कर्मयोगनिष्ठा होय.

"बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते" इत्यादि श्लोकावरून सुकृत-दुष्कृत जळून जाणे व पुढे त्यामुळे चित्त शुद्ध होणे, हेच कर्मयोगाचे फल आहे असे दिसते. सुकृतामुळे सद्वासना व

स्वर्गादिफले प्राप्त होत असून दुष्कृतामुळे असद्वासना व नरकादि भोग प्राप्त होतात. कर्मयोगाने सुकृतदुष्कृत दोन्ही जळून जात असल्यामुळे सदसद्वासना नाहीशा होऊन पुढे परमात्मप्राप्तीची इच्छा, विवेक, वैराग्यादि उत्पन्न होतात. हाच परमात्मानुग्रह होय. येथे अनुष्ठेय कर्तव्याच्या दृष्टीने कर्मयोगाची अवधि संपते.

"तावत्कर्माणि कुर्वीत न निर्विद्येत यावता ।
मत्कथाश्रवणादौ वा श्रद्धा यावन्न जायते"

(भा. स्कं. ११-२०-९)

जोपर्यंत तीव्र वैराग्य किंवा भगवत्प्रेम होत नाही तोपर्यंतच कर्मे करावी असे भागवतात म्हटले आहे.

१३. कर्मयोगानुष्ठानाने चित्त शुद्ध होऊन तीव्र वैराग्य किंवा भक्तिप्रेम उत्पन्न झाल्यावर अनुष्ठेय कर्तव्याच्या दृष्टीने ज्ञान-योगाची मर्यादा सुरू होते. हा ज्ञानयोग दोन प्रकारचा आहे, हे वर सांगितलेच आहे. त्यात सगुण भगवत्प्रेमाकरिता सगुण भगवंताच्या ठिकाणी जो कर्मानुष्ठान समर्पण करतो त्याचे ठिकाणी भगवत्प्रेम उत्पन्न होऊन तो भक्तियोगाचा अधिकारी होतो व निर्गुण ब्रह्मज्ञानाकरिता कर्मानुष्ठान करून ते यज्ञपुरुषाचे ठिकाणी किंवा सद्ब्रह्माचे ठिकाणी जो समर्पण करतो त्याचे ठकाणी वैराग्य उत्पन्न होऊन तो सांख्य ज्ञानयोगाचा अधिकारी होतो, असे

"अस्मिन् लोके वर्तमानः स्वधर्मस्थोऽनघः शुचिः ।
ज्ञानं विशुद्धमाप्नोति मद्भक्तिं वा यदृच्छया"

(भा. स्कं. ११ अ. २०-११)

या भागवतातील श्लोकावरून व नारायणीय गतिविचारा-वरून सिद्ध होते. म्हणून पहिला कर्मयोग सगुणज्ञानयोगाचे पूर्वांग असून दुसरा कर्मयोग सांख्यज्ञानयोगाचे पूर्वांग आहे, असे म्हणावे

लागते. सांख्यज्ञानयोग विचारप्रधान असल्यामुळे व कोणत्याहि ज्ञानयोगाचा अधिकार प्राप्त झाल्यानंतर

"तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणा: ।
गच्छन्त्यपुनरावृत्ति ज्ञाननिर्धूतकल्मषा:"

(गी. अ. ५-१७)

या श्लोकात सांगितल्याप्रमाणे किंवा

"अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जना: पर्युपासते ।"
"सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रता: ।
नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ।।"

इत्यादि श्लोकात सांगितल्याप्रमाणे अनुष्ठेय कर्तव्याच्या दृष्टीने सांख्यज्ञानाच्या अधिकाऱ्याला पुढे आत्मानात्मविचारातच गढून राहावे लागते व अशा स्थितीत मन आत्मचिंतनात गढल्यामुळे ते इंद्रियांवर उत्तरोत्तर कमी येते; म्हणून सांख्ययोग्याकडून इंद्रियांनी होणारे कर्मानुष्ठान यथासांग घडू शकत नाही. गृहस्थाश्रमात राहून विहित कर्मलोप होणे योग्य नसल्यामुळे श्रुतींनी या मार्गात संन्यासाचा उपदेश केला आहे. सांख्यज्ञानयोगनिष्ठेत निर्गुण ब्रह्म आलंबन असते व ते कर्तृत्वादि सर्वधर्मविहीन आहे; म्हणून निर्गुण ब्रह्मचिंतन करणाऱ्याला 'मला' कर्तव्य आहे—म्हणजे मी कर्ता आहे' ही बुद्धि घातक आहे, म्हणून सांख्यज्ञानयोगाच्या अधिकाऱ्याला संन्यास घ्यावा लागतो.

(१४) सगुण ब्रह्म सर्वाला आधार असल्यामुळे सगुणभक्तीत कर्मांचा विरोध येत नाही. आचार्यांनीहि सगुण विद्येमध्ये संन्यास घेण्याची गरज नाही असे म्हटले आहे. भक्तीत कर्म करिताना सात्विक अहंकार असतो; पण हेहि कर्मानुष्ठान भक्तांचे ठिकाणी व्युत्थानदशेत दिसून येते. भगवत्प्रेमात तल्लीन असताना त्यांच्या-

कडूनहि कर्मानुष्ठान घडत नाही. असो. येथे सांगावयाचे ते इतकेच की सांख्यज्ञानयोगनिष्ठा किंवा सगुणभगवत्प्रेमनिष्ठा (सगुण ज्ञाननिष्ठा) ह्या दोन्हीहि कर्मयोगाच्या उत्तरनिष्ठा आहेत व कर्मयोग त्याची पूर्वनिष्ठा आहे. म्हणून

"निर्विण्णानां ज्ञानयोगो न्यासिनमिह कर्मसु ।
तेष्वनिर्विण्णचित्तानां कर्मयोगस्तु कामिनाम् ।। ७ ।।
यदृच्छया मत्कथादौ जातश्रद्धस्तु यः पुमान् ।
न निर्विण्णो नातिसक्तो भक्तियोगोऽस्य सिद्धिदः" ।। ८ ।।
(भागवत स्कंध ११ अ. २० श्लो ७-८)

या भागवतातील श्लोकात सांगितल्याप्रमाणे तीव्र वैराग्य ज्याला उत्पन्न झाले आहे अशा अधिकाऱ्याने, ब्राह्मण असल्यास, संन्यास घेऊन सांख्यज्ञानयोगाने परमात्मप्राप्ति करून घ्यावी; ज्याच्या वासना क्षीण झाल्या नाहीत म्हणून ज्याला वैराग्य उत्पन्न झाले नाही अशा अधिकाऱ्यांनी कर्मयोगाचे अनुष्ठान करावे व ज्याच्या चित्तात परमात्मप्रेम उत्पन्न झाले आहे, पण थोडी विषयवासना आहे, अशा अधिकाऱ्याने भगवत्भक्तीचा आश्रय करावा. जीव अनादि व अनंत आहे व त्याचा कोणताहि वर्तमान जन्म मागील जन्मात केलेल्या धर्माधर्मावर अवलंबून असून ते धर्माधर्म निरनिराळ्या जीवांचे निरनिराळे असतात. त्या धर्माधर्मानुसार झालेली वर्तमान जन्मातील योग्यताहि निरनिराळ्या जीवाच्या ठिकाणी निरनिराळी असते. त्यात विरक्त, अविरक्त, व मध्यम अशी त्रिविध परमार्थयोग्यता दिसून येते. त्यापैकी सुरवातीचा साधक कोणास म्हणावे हे समजत नाही. पण परमात्मप्राप्तीची ज्याला इच्छा उत्पन्न झाली आहे, पण सांख्यज्ञानयोगनिष्ठा व सगुणभक्तीनिष्ठा या वरच्या दर्जाच्या निष्ठांच्या अधिकार प्राप्तीकरितां

लागणारे तीव्र वैराग्य किंवा सगुणभगवत्प्रेम ज्याच्या ठिकाणी उत्पन्न झाले नाही असा पुरुष सुरवातीचा साधक होय असे गृहीत केल्यास तो कर्मयोगाचा अधिकारी ठरतो. या कर्मयोगाच्या द्विविध-प्रकारतेचा वर उल्लेख केलाच आहे. या दोन प्रकारांपैकी सगुण-भगवत्प्रेमाकरिता केलेले कर्मयोगानुष्ठान विशेष श्रेयस्कर आहे. कारण यात जरी भगवंताविषयी उत्कट प्रेमा उत्पन्न झालेला नसला तरी थोडा प्रेमा असतोच व भगवतप्रेम हीच भक्ति होय. म्हणून ही कर्मयोगनिष्ठा भक्तियुक्त असल्यामुळे हिला कोणी कर्ममिश्रा भक्तिनिष्ठा व कोणी गौण भक्तिनिष्ठा म्हणतात. कार्यांचा पर-स्परांशी विरोध असतो पण त्यांच्या कारणाशी विरोध नसतो असा तर्कशास्त्राचा नियम आहे. क्षेत्रज्ञ परमात्मा हे कारणब्रह्म असून हिरण्यगर्भ परमात्मा हा (ज्याला नारायणीय धर्मात संकर्षण असे म्हटले आहे) कार्य ब्रह्म आहे. हा परमात्मा वैदिक कर्मस्वरूप आहे व कारण ब्रह्मसगुण क्षेत्रज्ञ परमात्मा हा कर्माहून अलिप्त असून सर्व कर्मांला आधार आहे. सगुण भक्तियुक्त कर्मयोगात हा कारणब्रह्म सगुणक्षेत्रज्ञ परमात्मा आलंबन असून नुसत्या कर्मयोगात हिरण्यगर्भ परमात्मा आलंबन असतो; कारणब्रह्म अशा सगुण क्षेत्रज्ञाचा सर्व कर्मांशी अविरोध असल्यामुळे, तदालंबनयुक्त कर्म-योगात पापाची विशेष भीति नाही. पण कार्यब्रह्म हिरण्यगर्भाचा वैदिक कर्मांशी विरोध असल्यामुळे तदालंबनयुक्त कर्मयोगात विधिनिषेधाची विशेष खबरदारी घ्यावी लागते. म्हणून नुसत्या कर्मयोगापेक्षा म्हणजे ज्यात हिरण्यगर्भ आलंबन आहे अशा कर्म-योगापेक्षा सगुण भगवत्प्राप्ती करिता आचरलेला कर्मयोग, म्हणजे ज्यात कारण ब्रह्मसगुण परमात्मा आलंबन आहे असा कर्मयोग श्रेष्ठ आहे. दुसरे कारण असे की, प्रत्येक जीवाच्या प्रारब्धानुसार त्याच्या चित्तात सद्-असद्वासना उत्पन्न होतात; ह्या वासना प्रारब्धकर्माच्या जशा स्वाधीन आहेत, तशाच युगगतीच्याहि स्वाधीन आहेत.

" त्रेतायां द्वापरेचैव कलिजाश्च ससंशयः ।
तपस्विनः प्रशांतश्च सत्वस्थाश्च कृतेयुगे ।। "

त्रेता, द्वापार, कलि या युगातील जीव उत्तरोत्तर जास्त संशयी असतात. कृतयुगातील जीव मात्र सत्वस्थ व निःसंशय असतात असे भारतात म्हटले आहे. " मंदासुमंदमतयो मदभाग्याह्युपद्रुता:" इत्यादि कलिजनांचे वर्णन भागवत महात्म्यात दिले आहे. तेव्हा कलियुगात तीव्र वैराग्यवान पुरुष सापडणे दुर्मिळ व म्हणूनच कलियुगात सांख्ययोगाचे अनुष्ठान होऊ शकत नाही. या दृष्टीने पाहता कलीत भक्तियोग किंवा कर्मयोगच श्रेयस्कर आहे, त्यांत भगवत्प्रेम उत्पन्न झाले असल्यास भक्तियोग व भगवत्प्रेम उत्पन्न झाले नसल्यास कर्मयोग हितावह आहे. कर्मयोगातील विहित कर्माचे स्वरूप युगपरत्वे निरनिराळे असते, मनुस्मृतीत (१–८५) व भारतात (शांतीपर्व २५९–८) सांगितलेले आहे. सर्व पुराणांचे आलोचन केले असता, नामसंकीर्तन, भगवल्लीलाश्रवण, इत्यादि धर्म कलिजनाकरिता प्राधान्याने सांगितले आहेत. विष्णुसहस्रनामभाष्यात व " विशेषानुग्रहश्च "(ब्रह्मसूत्र ३।४।३८) या सूत्रावर टीका करिताना आचार्यांनाहि

" जप्ये नैव तु संसिध्येद् ब्राह्मणो नात्रसंशयः ।
कुर्यादन्यन्नवाकुर्यान्मैत्रो ब्राह्मण उच्यते ।। "

इत्यादि श्लोकांच्या आधारे सर्व धर्मापेक्षा नामस्मरणाचे महत्व वर्णन केले आहे. म्हणून कलीत नामस्मरण हा मुख्य धर्म असून कर्मानुष्ठान गौण आहे. पण बळेच विहितकर्म सोडणे व नामस्मरणाच्या भरंवशावर निषिद्ध कर्म आचरणे हे नामापराध आहेत असे पद्मपुराणात सांगितले आहे. म्हणून भक्तियुक्त कर्मयोग्यांनी बळेच विहित कर्म सोडू नये, निषिद्धाचरण करू नये, पण

नामस्मरण व भगवल्लीलाश्रवण या धर्मांपेक्षा त्यांना जास्त महत्वहि देऊ नये.

(१५) क्षेत्रज्ञ परमात्मा सगुण व निर्गुण अशा भेदाने दोन प्रकारचा आहे हे वर सांगितलेच आहे. या भेदाला धरून वरील तीन निष्ठांचा गीतेमध्ये सांगितलेल्या दोन निष्ठांमध्ये अंतर्भाव करिता येतो, म्हणजे दोन निष्ठा मानल्यासहि हरकत नाही.

"संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः"

या श्लोकान्वये कर्मयोग, संन्यासाचे पूर्वांग होऊन उत्तरांग सांख्यज्ञानयोग होतो, व पराभक्ति ही शेवटली सहजस्थिति होते. म्हणजे प्रथम कर्मयोग, नंतर सांख्ययोग व नंतर पराभक्ति असा हा ज्ञानमार्ग सिद्ध होतो. या तिन्ही पायऱ्यांमध्ये निर्गुणाचेच आलंबन प्रधान आहे. "मयि सर्वाणि कर्माणि", "सर्व-कर्माण्यपि सदा कुर्वाणोमद्व्यपाश्रयः" इत्यादि श्लोकांन्वये–रामकृष्णादि वाच्य सगुण ब्रह्माचे ठिकाणी सर्व कर्मं समर्पण करून पुढे जसजसा भगवत्प्रेमा वाढत जाईल, तसतसा सगुणध्यानयोग सिद्ध होत जातो व या स्थितीत कर्तव्यानुसंधानपूर्वक कर्मे होत नाहीत. म्हणूनहि एका दृष्टीने संन्यासस्थिति आहे व ज्ञानयोग स्थितीहि आहे. कारण या स्थितीत सगुणक्षेत्रज्ञपरमात्म्याशी ऐक्य होते व पुढे पराभक्तीने 'सर्वभूतेषु यः पश्येद्भगवद्भाव-मात्मनः' या सर्वाभूती सगुण भगवंताची प्रतीति येऊ लागते. हा दुसरा भक्तियोग मार्ग होय. या मार्गात, पहिल्या पायरीत कर्म सुटत तर नाहीच, पण उलटी सर्व कर्मे परमेश्वरार्पण करावी लागतात. दुसऱ्या पायरीत, केव्हा कर्मे होतात, पण ती केलीच पाहिजेत अशा कर्तव्यबुद्धीने अनुसंधानपूर्वक होत नाहीत. शेवटच्या पराभक्तीच्या पायरीत, यथाप्रारब्ध कर्मे घडतच असतात. या

भक्तिमार्गाला योगमार्ग या एकेरी नांवानेहि संबोधिता येते. ज्ञानमार्गात कर्मयोग, संन्यासयोग व पराभक्ति अशी सोपानपरंपरा असून भक्तिमार्गात कर्मयोग, भक्तियोग व पराभक्ति, अशी सोपानपरंपरा आहे. यावरून ज्या मार्गात मध्ये संन्यास घ्यावा लागतो, तो ज्ञानमार्ग; व ज्यात संन्यास घ्यावा लागत नाही तो योगमार्ग; असा भेद होतो. संन्यासाश्रम घेऊन; ज्ञाननिष्ठेतील शब्दानुविद्ध व दृश्यानुविद्ध या समाधिमार्गाने न जाता गृहस्थाश्रमी राहूनच पातंजल योगाने समाधि साधता येते; व पुढे समाधी दृढ होऊन, आत्म्याचे ठिकाणी दृढ चित्तवृत्ति राहू लागली म्हणजे यथाप्रारब्ध कर्म करण्यासहि हरकत नसते. या मार्गातहि शेवटपर्यंत आश्रमांतर करण्याची गरज नाही.

"नहि क्षत्रियवैश्ययोः परिव्राज्यप्रतिपत्तिरस्ति"

या नियमानुसार क्षत्रिय, वैश्य व कित्येक मध्यम विरक्त ब्राह्मण या मार्गाने जात असतात, असा उल्लेख आहे. (भा. शां. अ. २७६।६।७।८) हा योगमार्ग निर्गुणनिष्ठेतीलच एक भेद आहे. सारांश, ज्यात आश्रमांतर होते तो ज्ञानमार्ग होय; व ज्यात आश्रमांतर करावे लागत नाही तो योगधर्म होय. म्हणून गीतेत सांगितल्याप्रमाणे ज्ञाननिष्ठा व योगनिष्ठा असे दोन मोक्षार्थ मार्ग आहेत, असे म्हटले तरी हरकत नाही.

(१६) वर सांगितल्याप्रमाणे ज्ञानमार्ग तीव्र शमादिषट्कसंपत्तिमान व निर्गुणब्रह्म जिज्ञासु अशा मुमुक्षूला साध्य असून तत्व्यतिरिक्तांना योगमार्ग हितावह आहे. त्यातहि ज्ञाननिष्ठांतर्गत पातंजल योगमार्ग क्लेशदायक आहे, असे भगवंतांनी "क्लेशोऽधिकतरस्तेषां" इत्यादि श्लोकात सांगितले आहे. भागवतातहि 'प्राणायामादि' पातंजल योगाने जाणारा पुरुष अक्षीणवासन असतो, असे भगवंतांनी मुचकुंदाला सांगितले आहे. म्हणून

अविरक्त अशा कलियुगातील पुरुषांना पातंजल योगमार्गहि हितावह नाही, असे 'योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना' इत्यादि श्लोकांनी गीतेत अर्जुनाला व एकादश स्कंधात उद्धवाला भगवंतांनी सांगितले असून श्रीज्ञानराज तुकारामादि संतांनीहि आपल्या अभंग वाणींनी सांगून ठेविले आहे; म्हणून परिशेषात, कलियुगातील साधकाकरिता भक्तिमार्गच हितावह ठरतो.

(१७) इतर सर्व मार्गापेक्षा भक्तिमार्ग कसा श्रेष्ठ आहे, याचे थोडेसे वर्णन करू. अज्ञान, वासना, बुद्धिमांद्य, प्रारब्धभोग ह्या चार गोष्टी, जीव मूळचा ब्रह्मस्वरूप असूनहि 'मी ब्रह्मस्वरूप नाही' अशी त्याची भावना करून देण्याला कारणीभूत आहेत. 'ब्रह्म किंवा परमात्मा नाही' व 'मला त्याचा प्रत्यय नाही' अशा अज्ञानाच्या दोन वृत्ती आहेत. ईश्वर आहे व त्याची प्राप्ति करून घेणे हेच श्रेष्ठतम कर्तव्य होय, असे वाटायला लागले म्हणजे प्रथम अज्ञानवृत्ति निवृत्त झाली असे समजावे. बाकी, त्या ईश्वराचा मला प्रत्यय नाही ही अज्ञानवृत्ति, वासना, बुद्धिमांद्य व प्रारब्धभोग इतके प्रतिबंध शिल्लक राहतात. ब्रह्माच्या ठिकाणी अंशांशीभात्र नाही, तरी सत्, चित्, आनंद अशा वृत्तिभेदाने ब्रह्माचा प्रत्यय येतो असे सर्व वेदान्तग्रंथात मानले आहे. हा भेद वास्तविक नसून भेदइव भेद आहे, ज्ञानमार्गात–मग तो सांख्यमार्ग असो किंवा पातंजल योगमार्ग असो–ब्रह्माचे सच्चिदंशच अपरोक्ष होतात; पण भक्ति आनंदस्वरूप असून व

'एरव्ही सच्चिदानंदभेदे। चालिली तिन्हीं पदें
परी तिन्ही उणी आनंदे। केली येणें' ॥१॥ (अमृ. प्र. ५)

या ओवीत श्रीज्ञानेश्वर महाराजांनी म्हटल्याप्रमाणे आनंदांशाचे ठिकाणी तिन्ही अंश ऐक्यत्वाने अपरोक्ष होतात, असे सर्व अनुभविक महात्म्यांनी म्हटले आहे. "आनंदपदीं जया म्हणती

हरी" या एकनाथोक्तीवरून या आनंदांशाचे ठिकाणी सगुण श्रीहरीचा प्रत्यय येत असल्यामुळे व हा प्रत्यय भक्तिमार्गसाध्य असल्यामुळे, ज्ञानमार्गापेक्षा भक्तिमार्ग श्रेष्ठ आहे असे श्रीगुलाबराव महाराजांनी आपल्या ग्रंथात अनुभविक विवेचन केले आहे. याच अनुभवाला धरून

"ब्रह्मणोहि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च ।
शाश्वतस्य धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च ।।" (गी. अ. १४)

या श्लोकात पूर्ण अंशाने ब्रह्मप्राप्ति माझ्या ठिकाणी होते असे भगवंतांनी म्हटले आहे. त्रिगुणातीत स्थिति भक्तीनेच साध्य आहे, असेंहि भगवंताचे वचन आहे. म्हणून या अनुभविक दृष्टीने सर्वमार्गांपेक्षा भक्तिमार्ग श्रेष्ठ ठरतो.

(१८) जीवाच्या ठिकाणी ज्या वासना उठतात त्या अखंड सुखाच्या अभावामुळे उठत असतात. ज्ञानमार्गाने जाणाऱ्यांना निर्विकल्प समाधीत आत्यंतिक सुख प्राप्त झाले व वासना दबून राहिली, तरी व्युत्थानात त्यांना वासना उठतात व त्यांच्या चित्ताला विक्षेप होऊन दुःख होते; म्हणून आचार्यादिकांनी त्यांना सविकल्प समाधीचा विधि सांगितला आहे. कारण समाधि व व्युत्थान या दोन्ही ठिकाणी आत्यंतिक सुख प्राप्त झाले असताच निःशेष वासना निवृत्ति होते. एऱ्हवी ते कठीण आहे. सांख्ययोग व पातंजल योग यात मिथ्या दृष्टि व निरोध असे अनुक्रमे वासना निवृत्तीचे मार्ग सांगितले असून, सर्व वासनांचा एक भगवंतच विषय करणे असा भक्तिमार्गात वासना निवृत्तीचा उपाय सांगितला आहे. वासना प्रारब्धानुसार उठत असल्यामुळे व प्रारब्ध यावद्विदेहमुक्ति चुकत नाही, असे शांकरवेदान्तात मानले असल्यामुळे ज्ञानमार्गात यावद्विदेहमुक्ति वासना निवृत्ति होणे कठीण आहे,

अनुक्रम 38600 वि:
9400 नों दि: 10/



वासना आहेत तोपर्यंत व्युत्थानकाळी चित्त विक्षेप होत राहून परमानंदप्राप्ति मिळत नाही; पण अनन्य भक्तांच्या समाधीचा व व्युत्थानकाळी वासनांचा विषय एक परमात्माच राहून ते परमात्मस्वरूपहि परमानंदस्वरूप असल्यामुळे अनन्य भक्तांना व्युत्थानकाळीहि परमानंदस्वरूप समाधि असतो. असे "समाधि व्युत्थानी हरि विलसे" या देवनाथ महाराजांच्या उक्तीवरून सिद्ध आहे, श्रीगुलाबरावमहाराजांच्या ग्रंथांचा तर हा मुख्यच विषय आहे.

(१९) वासनेच्या विक्षेपामुळे परमात्म्याचे ठिकाणी जशी वृत्ति स्थिर होत नाही, तशीच बुद्धिमांद्यामुळेहि परमात्म्याचे ठिकाणी वृत्ति स्थिर होत नाही. ब्राह्मणाचा पुत्र शूद्राच्या संगतीने आपल्याला शूद्र समजू लागला तर "तू शूद्र नाही, ब्राह्मण आहेस" एवढे म्हटल्याबरोबर त्याचे ठिकाणी ब्राह्मणत्वाची वृत्ति उत्पन्न होते, त्याप्रमाणे या जीवालाहि "तूं जीव नाही ब्रह्म आहेस" इतक्या शब्दाने ब्रह्मैक्य बोध व्हावयाला पाहिजे, पण वासनादिकां प्रभाणे बुद्धिमांद्यामुळेहि जीवब्रह्मैक्यतासिद्धान्त या जीवाला ग्रहण होत नाही. या बुद्धिमांद्याला कर्मवासना असे म्हणतात. "ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते" या भगवद्वचनावरून व

"द्वितीया जन्मनैकेन निवर्तेतापि जन्मभिः ।
ऐश्वरेण प्रसादेन नान्यथा कोटियुक्तिभिः" ।।

या वचनावरून ईश्वरभक्तिवाचून इतर मार्गाने हे बुद्धिमांद्य किंवा ही कर्मवासना निवृत्तच होत नाही म्हणूनहि इतर मार्गापेक्षा भक्तिमार्ग श्रेष्ठ असे आम्ही म्हणतो.

(२०) "भोगेन त्वित्तरे क्षपयित्वा संपद्यते"
(ब्रह्मसूत्र ४।१।१९)

या सूत्रावर भाष्य करिताना, ज्ञान्याला भोग चुकत नसतो असे आचार्य म्हणतात. असेच अनेक वेदान्तग्रंथात म्हटले

आहे; पण भक्तांची गोष्ट तशी नाही. भक्तांच्या प्रारब्धाचा अभिभव होतो. ज्याप्रमाणे राजाच्या प्रेमातला पुरुष सोडून बाकी सर्व नोकरांना, मग ते ज्ञानी असोत वा गैरज्ञानी असोत त्यांच्या सेवेनुरूप शिक्षा किंवा बढती मिळते, तद्वत् परमेश्वराच्या भक्ताला सोडून सर्व मार्गियांना प्रारब्ध भोगावेच लागते. परमात्मा भक्तांचा सहकारी असल्यामुळे प्रारब्धबलाने भक्तांचे व्युत्थान झाल्यासारखे दिसले तरी त्यांचे ते व्युत्थान जास्त जोराने परमात्म्याचे ठिकाणी त्यांची चित्तवृत्ति आविष्ट होण्याला कारण होते. ज्याप्रमाणे पतिव्रतेचे चित्त व्यवहारकाली पतीचे ठिकाणी जास्त जडलेले असते; किंवा आपल्या पिलाकरिता चारा आणण्याकरिता दूर गेलेल्या पक्षिणीचे चित्त त्यावेळी पिलाकडे जसे अधिक लागलेले असते, त्याप्रमाणे व्युत्थानकाली भक्ताचे चित्त परमात्म्याचे ठिकाणी जास्त आविष्ट होते. "यथा दूरचरे प्रेष्ठे मन आविश्य वर्तते" असे भागवतात म्हटले आहे. याप्रमाणे भक्तांचे प्रारब्ध जर परमेश्वराच्या ठिकाणी त्यांचे चित्त आविष्ट होण्यास कारण झाले, तर तो प्रारब्धभोग कसा होईल? कंसाचे चित्त भीतीने कृष्णमय झाले होते. ती भीति त्याला कृष्णमय करण्यास कारण झाली. म्हणून लोकांच्या दृष्टीने जरी तो प्रारब्धभोग असला तरी वास्तविक तो प्रारब्धभोग नसून तो भोग त्याला कृष्णमय होण्याला कारण झाल्यामुळे ती समाधिप्रक्रिया होय असे म्हणणे योग्य होते. पुन्हा प्रारब्ध जर भोक्तृत्व उत्पन्न करील, तरच ते प्रारब्ध म्हणावयाचे, नाहीतर ते कसले प्रारब्ध? प्रारब्ध भोगण्याकरिता अगोदर भोगसंपादक वासना उत्पन्न झाली पाहिजे, पण भक्तांच्या सर्व वासना परमेश्वरमय झाल्या असल्यामुळे त्यांची कोणतीहि वासना व कोणताहि भोग परमेश्वरालाच अर्पण होतो; म्हणूनहि भक्तांच्या प्रारब्धाचा अभिभव होतो असे आम्ही म्हणतो. या दृष्टीनेहि भक्तियोग श्रेष्ठ आहे.

(२१) जीवाकडून जे यज्ञ होतात, त्यांत देवांना हविर्भाग मिळून त्या हविर्भागाने देवांचे पालन होते, पण मोक्षार्थ प्रयत्न करणाऱ्या जीवांकडून निदिध्यासनदशेत कर्म होत नाही व देवांना हविर्भाग मिळत नाहीत म्हणून देव त्याला परमार्थात विघ्ने करितात. भक्तिव्यतिरिक्त इतर मार्गात त्या विघ्नापासून त्यांचे रक्षण करणारे कोणी उपास्य नसते; कारण त्या मार्गात निर्गुण उपास्य असून ते विघ्न व निर्विघ्न या दोन्ही स्थितीशी विरोधी नाही; पण भक्तियोगात सगुण परमात्मा आपल्या भक्तांची विघ्ने निवारण करीत असतो, असे "त्वयाभिगुप्ता विचरन्ति निर्भया:" इत्यादि भागवतश्लोकात सांगितले आहे; म्हणूनहि भक्तिमार्ग इतरांहून श्रेष्ठ मार्ग आहे.

(२२) सारांश,

"आर्तमर्थार्थिनं देवस्तदर्थे नाभियोजितुम् ।
स्वनियत्या कर्मपाकं प्रतीक्ष्य फलमादिशेत् ।।
निर्हेतुकोपासकं स्वमनन्यशरणं विभु: ।
ज्ञात्वा सर्वात्मना तस्य योगक्षेमवहो भवेत् ।।
अप्रतीक्ष्य कर्मपाकं नियतिं स्वां विधूय च ।
प्रारब्धं नियतिर्वापि महेशविमुखे भवेत् ।।
एतन्मृकंडुतनयेऽत्यंतमीश्वरतत्परे" ।

"आर्त, जिज्ञासु इत्यादि भक्तांना फळ देताना परमात्मा त्यांच्या कर्मपाकाचा विचार करीत असतो, पण अनन्य भक्तांना फळ देताना त्यांच्या कर्मपाकाकडे किंवा आपल्या संकल्पाकडे दुर्लक्ष करितो व विरोधी असल्यास त्यांचा कर्मपाक व आपला संकल्प ही दोन्ही परमात्मा बदलून टाकतो. परमात्मविन्मुख लोकांकरिताच प्रारब्ध सांगितले आहे; हे मार्कंडेयाच्या कथेवरून व्यक्त होते" इत्यादि

श्लोकांवरून भक्तिमार्गाने जाणाऱ्या मनुष्याचे सर्व अडथळे दूर होऊन इतर मार्गांपेक्षा लवकर तो परमात्मप्राप्ति करून घेतो, म्हणून

" यानास्थाय नरो राजन् न प्रमाद्येत कर्हिचित् ।
धावन्निमाल्य वा नेत्रे न स्खलेन्न पतेदिह ।। "

या श्लोकात सांगितल्याप्रमाणे सरळ साफ अशा राजमार्गाने डोळे लावून धावत जाणारा मनुष्य अडखळून पडण्याची जशी भीति नाही, त्याप्रमाणे या भक्तिमार्गाने जाणाऱ्या मनुष्यालाहि मध्ये अडखळून पडण्याची भीति नसल्यामुळे सर्व मार्गात भक्तिमार्ग हा अत्युत्तम मोक्षमार्ग आहे, असे आमचे मत आहे.

(२३) आता थोडा कर्म सोडण्याविषयी विचार करू. आजन्म विहितकर्मे सोडताच येत नाहीत असे गीतेच्या आधारे म्हणणारा एक पक्ष अलीकडे उत्पन्न झाला आहे; म्हणून आजन्म कर्मे केलीच पाहिजेत किंवा कोण्या स्थितीत ती सोडता येतात या प्रश्नाचा विचार, गीता, भागवत व भारत यांच्या आधारे करू. भागवताचा विचार केला असता भक्तियोगाचा किंवा ज्ञानयोगाचा अधिकार प्राप्त होण्यापूर्वी कर्मे सोडता येत नाहीत; पण तीव्र वैराग्य प्राप्त होऊन किंवा भगवत्प्रेम उत्पन्न होऊन, ज्ञानयोगाचा किंवा भक्तियोगाचा अधिकार प्राप्त झाला असता, कर्मानुष्ठान कर्तव्यदृष्टीने राहत नसून ते यथावकाश घडत असते. कर्तव्य या दृष्टीने यावेळी ज्ञानाभ्यास किंवा सगुण भगवत्ध्यानाभ्यास अनुष्ठेय असतो, असे

" तावत्कर्माणि कुर्वीत न निर्विद्येत यावता ।
मत्कथाश्रवणादौ वा श्रद्धा यावन्न जायते "

(भागवत स्कंध ११ अ. २०-९ श्लो.)

या श्लोकावरून स्पष्ट होते. म्हणून भागवताचा विशेष विचार न करिता आपण गीता व भारत यांचाच विचार करू.

(२४) गीता व भारत या दोन्ही ग्रंथात संन्यासनिष्ठेचा उल्लेख केला आहे. पण संन्यासनिष्ठेपेक्षा कर्मयोगनिष्ठाच श्रेयस्कर आहे, असे या ग्रंथात प्रतिपादले आहे असे कित्येक म्हणतात. संन्यासनिष्ठा किंवा भक्तिनिष्ठा प्राप्त होण्यापूर्वी कर्मयोगनिष्ठा—त्यातहि सगुणप्रेमयुक्त कर्मयोगनिष्ठा—श्रेयस्कर आहे, यात कोणाचा वाद नाही, पण विदेहमुक्ति होईपर्यंत कर्मयोगनिष्ठा सोडूच नये, असे गीता व भारत याचे म्हणणे आहे काय ? हा वादाचा मुख्य मुद्दा आहे.

"न हि क्षत्रियवैश्ययोः पारिव्राज्य प्रतिपत्तिरस्ति"
(बृह. ४।५।१५)

"अविरक्तस्य संन्यासो निष्फलोऽयाज्य यागवत् ।
बहिरंगं श्रुतिः प्राह ब्रह्मचर्याहि मुक्तये"

इत्यादि उक्तीवरून अविरक्त ब्राह्मण व क्षत्रिय आणि वैश्य यांना संन्यासाचा अधिकार नाही; व शमदमादि संपत्ति मोक्षाचे अंतरंग साधन असून, आश्रमधर्म बहिरंग साधन आहे; असे आचार्य मानतात. म्हणजे आचार्यांच्या मते तीव्र विरक्तब्राह्मणावाचून इतर कोणालाहि संन्यासाचा अधिकार नाही व त्यांनीहि संन्यास घेतलाच पाहिजे, संन्यासावाचून मोक्ष होतच नाही, असे आचार्यांचे म्हणणे नाही. सर्वकर्मसंन्यासपूर्वक आत्मज्ञाननिष्ठेने मोक्ष होतो असे जे त्यांनी गीतोपाद्घातात म्हटले आहे ते त्यांचे म्हणणे संन्यासाश्रमाला धरून नाही. तेथील सर्व कर्मसंन्यास—सर्व संकल्प परित्याग—या अर्थी आहे हे

"सर्वकामपरित्यागे च सर्वकर्मसंन्यासः सिद्धो भवति ।"
(गी. ६।४)

या वचनावरून स्पष्ट आहे. हा सर्व योग्यांच्या ठिकाणी असतोच; पण तीव्र विरक्ताने कर्मत्यागरूप वैध संन्यासहि घेणे चांगले, असे त्यांचे मत असल्याचे ब्रह्मसूत्रावरून दिसते.

(२५) असो, परमात्मप्राप्ति करू इच्छिणारा पुरुष तीव्र विरक्तिमुळे संन्यास घेऊन कर्मे सोडो किंवा अविरक्त्यादि कांही निमित्तामुळे गृहस्थाश्रमी राहून कर्मे करीत असो, ज्ञानाच्या किंवा भगवद्‌भक्तीच्या पायरीवर आल्यावर अनुष्ठेय कर्तव्याच्या दृष्टीने त्याच्याकडून कर्मानुष्ठान होत नसून ज्ञानाला किंवा भगवद्‌भक्तीला प्रत्यवाय येणार नाही अशा रीतीने ते होत असते; म्हणून या पायरीवर कर्मयोगनिष्ठा संपून ज्ञाननिष्ठा किंवा भक्तिनिष्ठा सुरू होते. या दृष्टीने ज्ञाननिष्ठा किंवा भक्तिनिष्ठा कर्मसंन्यासरूप आहे, असे आम्ही म्हणतो. जोपर्यंत आपण एखाद्या मनुष्याचे नफा-नुकसान करू शकतो, तोपर्यंत आपल्या आज्ञेनुसार वागणे त्याला भाग असते व तोपर्यंत माझी या मनुष्यावर सत्ता आहे, असे आपण म्हणतो, अशीच निष्ठेचीहि गोष्ट आहे. ज्या निष्ठेचा जो मनुष्य असेल, त्या निष्ठेच्या अनुष्ठानाला सोडून दुसऱ्या निष्ठेनुसार जेव्हा त्याला वागता येत नाही तेव्हाच ती त्याची निष्ठा आहे असे म्हणता येते.

“स्वेस्वेऽधिकारे या निष्ठा स गुणः परिकीर्तितः ।
विपर्ययस्तु दोषः स्यादुभयोरेष निश्चयः ॥”

(भागवत स्कं. ११ अ. २१ श्लो. २)

या श्लोकात सांगितलेल्या निष्ठेप्रमाणे वर्तन करणे गुण असून त्याच्या विपरीत वागणे दोषावह होते. आजन्म कर्मयोगाचेच अनुष्ठान करावे असे गीता व भारत यांचे मत आहे, असे म्हणणारांना मी असे विचारतो कीं, या तुमच्या म्हणण्याचा अर्थ काय आहे? (१) आजन्म आचरणामध्ये कर्माचा अन्वय राहावा असे आपण म्हणता? (२) आजन्म गृहस्थाश्रमीच रहावे असे आपण म्हणता? (३) किंवा आजन्म व्यवहाराकडे दुर्लक्ष होता कामा नये, असे आपण म्हणता?

प्रथमपक्षी "विसर्गः कर्म संज्ञितः" या व्याख्येप्रमाणे कोणतीहि देहस्थिति कर्मरूप असल्यामुळे सांख्ययोगी व कर्मयोगी हे दोघेहि कर्मयोगीच ठरतात. संन्यासाश्रमातहि काही विवक्षित कर्माचे विधान आहे. ज्ञान्याला प्रारब्ध चुकत नसल्यामुळे

"यो यथा निर्मितो जंतुः यस्मिन् यस्मिश्च कर्मणि ।
प्रवृत्तौ वा निवृत्तौ वा तत्फलं सोऽश्नुते महत् ।।"

(भा. शां. प. ३४०।७६)

या नारायणीय धर्मातील श्लोकाप्रमाणे कोण्या ज्ञान्याची देहस्थिति निवृत्तिपर व कोण्या ज्ञान्याची स्थिति प्रवृत्तिपर राहत असते. पण निवृत्ति-प्रवृत्ति दोन्ही कर्मच असल्यामुळे या पक्षात सर्वजण कर्मयोगी ठरतात.

दुसरे पक्षी, क्षत्रिय व वैश्य यांच्याविषयी हा निर्बंध मान्य आहेच. अविरक्त ब्राह्मण किंवा भक्त यांनाहि संन्यास घेण्याची आवश्यकता नाही; पण विरक्त व सांख्यमार्गाने जाणाऱ्या ब्राह्मणाकरिता हा निर्बंध योग्य होत नाही. आजन्म गृहस्थामीच राहावे, असे भगवंताचें म्हणणे असल्यास सांख्यमार्गाचा अधिकारीच राहत नसल्यामुळे भगवंतांनी सांख्यनिष्ठा व्यर्थ प्रगट केली असे म्हणावे लागेल. भगवंतांनी ज्याचे विधान केले तो धर्म व ज्याचा निषेध केला तो अधर्म, असा नियम असल्यामुळे या पक्षात गृहस्थाश्रमाव्यतिरिक्त बाकीचे आश्रम अधर्मरूप अतएव ईश्वरप्राप्तिप्रतिबंधक होतील, पण सांख्ययोगाने माझी प्राप्ति होते असे गीतेत व भारतात भगवंतांनी म्हटले आहे; म्हणून सांख्याधिकाऱ्याला सोडून इतरांना हा निर्बंध लागू केल्यास कशाचाच विरोध येत नाही; म्हणजे सांख्याधिकारी तीव्र विरक्ताने कर्मे सोडल्यास हरकत नाही, असे आमचे मत आहे.

तिसऱ्या पक्षी, कर्मयोग म्हणजे व्यवहार करणे असा कर्मयोगाचा अर्थ होतो. यच्चयावत् प्राणी त्रिगुणात्मक प्रकृतीने बांधलेला आहे, असे

'न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः ।
सत्वं प्रकृतिजैर्युक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः ।। "

(गीता १८।४०)

या गीता श्लोकात सांगितले आहे.

"स्वभावजेन कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा ।
कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोपि तत् ।। "

(गीता १८–६०)

या श्लोकात प्रकृतिस्वभाव सुटू शकत नाही, असे सांगून "शमोदमस्तपः शौचं" इत्यादि श्लोकात निरनिराळ्या प्रकृतिस्वभावाच्या मनुष्याकरिता शास्त्रांनी निरनिराळी स्वभावकर्मे सांगितली आहेत. यात क्षत्रिय, वैश्य व शूद्र या तिघांच्याच ठिकाणी व्यवहारोपयोगी प्रकृतिस्वभाव असतो, असे सांगितलेले दिसते. पण ब्राह्मणाचे ठिकाणी तशी व्यवहारोपयोगी कर्मे सांगितलेली दिसत नाहीत; म्हणून गीतेचा विचार केला असता ब्राह्मणाला तरी संन्यासधर्मच विहित केलेला दिसतो. "स्वे स्वे कर्मण्यभिरतः" "स्वकर्मणा तमभ्यर्च्य" इत्यादि श्लोकांवरून कोणालाहि कोणताहि धर्म स्वीकारता येत नाही; म्हणजे कर्मयोग म्हणजे व्यवहार करणे असा अर्थ केला तरी, आपल्या स्वभावकर्मानुसार आजन्म प्रत्येकाने वागले पाहिजे असा अर्थ होतो. कोणी कसेहि वागावे व मी कर्मयोगी आहे म्हणावे, असा त्याचा अर्थ नाही. स्वभावकर्म सुटू शकत नाहीत, या भगवंताच्या उक्तीवरून हे उघड होते की, स्वभावकर्मे आजन्म

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ...३८७७०... विः ...
९५ ८०
९०/८१



करीत राहून तत्व्यतिरिक्त कर्मांचा संन्यास केला तरी चालतो; म्हणून स्वभावकर्मे सोडून इतर कर्मांना अवधि आहे.

(२६) यज्ञ, दान व तप ही कर्मे कधीच सोडू नयेत असे भगवंताचे म्हणणे आहे, असे जरी गृहीत केले तरी कोणता यज्ञ प्रशस्त आहे व आजन्म केला पाहिजे असे भगवान म्हणतात; त्याचप्रमाणे कोणते दान व कोणते तप उत्तम आहे असे भगवंताचे म्हणणे आहे हे आपण पाहू-

"यज्ञानां जपयज्ञोऽस्मि" असे भगवान म्हणतात. तपाचे लक्षण गीता अ. १७ श्लो. १४, १५, १६ मध्ये दिले आहे. दानाचे श्लो. २० मध्ये दिले आहे. पुन्हा अ. ४ श्लो. ३३ मध्ये ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे असे भगवान म्हणतात. ही सर्व कर्मे संन्यासाश्रमातहि सुटत नाहीत. सर्व दानात श्रेष्ठ असे जे अभयदान ते तर सन्याशांचे आद्य कर्तव्य असते, म्हणून या कर्मांशी संन्यासधर्माचा विरोध नाही. संन्यासधर्माचा जो विरोध आहे तो क्षत्रिय, वैश्य, शूद्र इत्यादिकांच्या स्वभावधर्माशी आहे, म्हणून क्षत्रियादिकांना संन्यास घेऊन युद्धादि स्वभावकर्मे सोडणे शक्य नसल्यामुळे, ती त्यांना आजन्म केलीच पाहिजेत, हा भगवंतांचा उपदेश योग्यच आहे. तरीपण कर्मयोगात कराव्या लागणाऱ्या सगुणभक्तियोगाच्या किंवा पातंजल योगाच्या काली योग किंवा निर्विकल्प समाधि सिद्ध होईपर्यंत कर्मयोग्यालाहि स्वभावकर्माचा निरोध करावाच लागतो, असे गीतेतील ६ व्या अध्यायावरून स्पष्ट होते व या स्थितीत अनुष्ठेय कर्तव्याच्या दृष्टीने स्वभावकर्मानुष्ठानाची अवधि संपत असल्यामुळे क्षत्रियादिकांची ही संन्यासस्थितीच होय. सचिन्ह संन्यास न घेता, स्वभावकर्मत्यागरूप संन्यास जनकादिकांनीहि केला होता असे

"विदेहराज्यं च तदा प्रतिष्ठाप्य सुतस्य वै ।
यतिधर्ममुपास्यंश्चाप्यवसन्मिथिलाधिपः ।। ९७ ।।

सांख्यज्ञानमधीयानो योगशास्त्रं च कृत्स्नशः ।
धर्माधर्मं च राजेंद्र प्राकृतं परिगर्हयन् ॥ ९८ ॥
(महाभारत, शांतिपर्व अ. ३१८)

इत्यादि श्लोकांवरून स्पष्ट सिद्ध होते. तेव्हा ब्राम्हण असो, किंवा क्षत्रियादि कोणी असो, या सर्वांचा कर्मयोग सावधि असून सर्वांच्या मोक्षमार्गातील मध्य पायरी कर्मत्यागरूप संन्यासस्वरूपाची आहे यात शंका नाही. स्वभावकर्मे सुटत नसल्यामुळे निर्विकल्प योग सिद्ध झाल्यावरहि म्हणजे "समाधावचलाबुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि" ही स्थिति प्राप्त झाल्यावर या स्थितीतून व्युत्थान होतेच व मनुष्य आपली स्वभावकर्मे करायला लागतो. यात ब्राह्मण शमदमादि मानसव्यापारप्रधानकर्मे करतो व क्षत्रियादि इंद्रियव्यापारप्रधानकर्मे करतात. या व्युत्थानातहि साम्यसमाधि किंवा योग साधणे अवश्य असल्यामुळे, स्वभावानुसार होत असलेली कर्मे परमेश्वराच्या ठिकाणी अर्पण करून साम्ययोग साधावा लागतो; पण ब्राह्मणाच्या ठिकाणी इंद्रियव्यापारप्रधान स्वभावकर्मे नसतात, म्हणून त्यांच्याकरिता गीतेनेहि मानसव्यापारप्रधान कर्मयोगाचे व इंद्रियव्यापारप्रधान विहित कर्मांच्या संन्यासाचेच विधान केले असले पाहिजे. स्वभावकर्माने प्रत्येक जंतु बद्ध आहे व शमदमादि ब्राह्मणाची कर्मे आहेत, असे प्रतिपादन करणारी गीता ब्राह्मणालाहि इंद्रियव्यापारप्रधान अशा विहित कर्मानुष्ठानाचे विधान करते, हे म्हणणे "वदतोव्याघातवत्" अत्यंत विरुद्ध आहे.

सारांश, ज्ञानानंतर ब्राह्मणांनी संन्यास घेऊन शमदमादि कर्मानुष्ठानद्वारा योगाचा म्हणजे समाधीचा अभ्यास करावा व क्षत्रियादिकानी स्वभावकर्मानुष्ठानद्वारा परमेश्वराचे यजन करून सविकल्पसमाधियोग किंवा सगुणभक्तियोग सिद्ध करावा, असा शांकरवेदान्ताचा मतितार्थ आहे.

ज्ञानानंतर व्युत्थानदशेत जो कर्मयोग होत असतो तो ब्राह्मणांचा असो किंवा क्षत्रियांचा असो, ध्यानस्वरूपाचा असल्यामुळे आचार्यादिकांनी त्याला कर्मयोग न म्हणता ध्यान असे नांव दिले आहे. कारण सुरवातीच्या कर्मयोगात आदि व अंती स्वभावकर्मानुष्ठान विरोधी नसले तरी इतर कर्मानुष्ठानाचा विरोध आहेच; म्हणून स्वभावकर्मव्यतिरिक्त इतर कर्मांचा मुमुक्षूंनी त्याग केल्यास कोणताहि प्रत्यवाय नाही. पण वासना राहून कर्मत्याग केल्याने फायदा नसून उलटे नुकसान असल्यामुळे, अक्षीणवासन पुरुषाने योगसिद्धीच्या आदि व अंती स्वधर्माचरणाने असद्वासनांना आळा घालून व ते सर्व धर्माचरण ईश्वराला अर्पण करून कर्मसंग व फलाशा यांच्या त्यागपूर्वक कर्माने निर्वासन होत्साता परमेश्वराचे ठिकाणी चित्तवृत्ति स्थिर करणे चांगले.

२७. सारांश, विषयवासनेमुळे रागद्वेष उत्पन्न होतात व रागद्वेषामुळे धर्माधर्म उत्पन्न होतात; म्हणून ज्याचे चित्त निर्वासन झाले आहे, अशा पुरुषांचे ठिकाणी कोणतेहि धर्माधर्म उत्पन्न होत नाहीत. ही निर्वासन स्थिति, चित्त समाधीत कायमचे स्थिर झाले म्हणजे प्राप्त होते. हीच जीवन्मुक्ति होय. पण योगस्थितीच्या पहिल्या पायरीवर म्हणजे निष्काम कर्मानुष्ठानाचे वेळी चित्त पूर्ण निर्वासन झाले नसते. पुढे जसजसे चित्त अभ्यासाने योगारूढ होत जाऊन आत्मानुभव घेत जाते तसतसे ते निर्वासन होत जाते. अर्थात्, धर्माधर्मांची स्थिति वासनेवर अवलंबून असल्यामुळे व निष्कामकर्मयोग, ध्यानयोग, व समाधि अशा या सोपानत्रयीत उत्तरोत्तर वासना क्षीण होत असल्यामुळे जसजसा पुरुष पूर्व सोपानावरून उत्तर सोपानावर चढत जातो तसतसे धर्माधर्मांच्या बंधनाचे क्षेत्र कमी होत जाऊन, पुढे जीवन्मुक्तीत "हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते" अशी धर्माधर्म विरहित स्थिति राहते. वरील

सोपानत्रयीत धर्माधर्मांचे क्षेत्र कोणत्या प्रमाणाने आहे हे श्रीधर-स्वामींनी वर्णन केले आहे, ते येणेप्रमाणे–

"निष्कामकर्मयोगाधिकारिणस्तु यथाशक्ति । स च ज्ञानभक्तियोगाधिकारात् प्रागेव । तदधिकृतयोस्तु स्वल्पः । ताभ्यो सिद्धानां तु न किंचिदिति ।।"

(भाग. स्कं. ११–२०–८)

श्रीधरस्वामी म्हणतात, निष्काम कर्मयोगाचे अधिकाऱ्याला यथाशक्ति धर्माधर्म लागू होतात. तेव्हा ज्ञानभक्तियोगाचा अधिकार प्राप्त होण्यापूर्वीच ज्ञानयोगाधिकाऱ्याला किंवा भक्तियोगाधिकाऱ्याला फारच अल्प धर्माधर्म आहेत. योगारूढाला तर मुळीच धर्माधर्म लागू नाहीत.

२८ याचा विशेष स्फोट असा आहे की, प्रथम आपण कोण्या सोपानाचे अधिकारी आहोत, हे मनुष्याने पाहावे. तीव्र विरक्ति किंवा भगवत्प्रेम उत्पन्न झाले असल्यास, ज्ञानयोगाचे अधिकारी आपण आहो, असे जाणून त्या सोपानावरील वेदान्तश्रवणादिकर्मे किंवा भगवन्नामस्मरणकीर्तनादि कर्मे विधेय ठरवून व ती सतत करीत राहून तदितर काली शास्त्रानुसार निष्काम कर्मानुष्ठान करावे. तीव्र विरक्ति किंवा भगवत्प्रेम यांच्या अभावी भगवन्नाम-स्मरणादि भागवतधर्मान्वयी निष्काम कर्मानुष्ठान करावे. खरी निष्कामस्थिति जीवन्मुक्तांचीच असते, हे खरे; तथापि कर्मयोगातहि अंशतः निष्कामता असतेच. कर्मसंग व फलाशा अशी सकामतेची दोन अंगे आहेत. परमात्मप्राप्तीची इच्छा दृढ केल्याने फलाशेचे अंग नाहीसे होऊन शास्त्रोक्तकर्म करून ते परमात्म्याला अर्पण केल्याने कर्मसंगरूपी अंग नाहीसे होते. कर्मयोगातील निष्कामता

प्रयत्नसाध्य असून जीवन्मुक्तीतील निष्कामता स्वभावसिद्ध असते, इतकेच.

"ईश्वरा! तुला अर्पण असो" असे म्हणून "ईश्वरार्पण केलेले कर्म ईश्वरार्पण होत नाही" असे म्हणण्याला काही आधार नाही. कर्म ईश्वरार्पण होणे म्हणजे कर्माचे कर्तृत्व व फळ ईश्वराकडे जाणे हे होय. ज्याप्रमाणे धन्याच्या आज्ञेप्रमाणे व धन्याच्या हितार्थ कर्म करणाऱ्या सेवकाचे ठिकाणी केलेल्या कर्माचा संग किंवा त्याचे फळ राहत नसून ती दोन्ही धन्याकडे जातात व सेवक निष्काम बनतो; त्याचप्रमाणे ईश्वरविहित धर्मानुसार वागणारा कर्मयोगी कृतकर्माचे ठिकाणी निष्कामच असतो.

उपाधीचा नियम असा आहे की, जो तिचा अभिमान धरील, त्याच्याशी ती संलग्न होते. जीव ज्या ज्या वृत्तीचा अभिमान धरून ज्या ज्या वृत्तीवर आरूढ होईल ती ती वृत्ति त्याला चिकटते व ज्या वृत्तीचा अभिमान तो धरणार नाही ती परमेश्वराला अर्पण होते.

२९ कर्मयोग्याला संसार सोडण्याची गरज नाही– म्हणजे ज्या कर्माविषयी वासना नसेल तसली कर्मेहि त्याला केलीच पाहिजेत– असा अर्थ मुळीच नाही, हे वर दाखविलेच आहे. वासना असून बळजबरीने त्याग न करता शास्त्रानुसार कर्मानुष्ठानाने तिची तृप्ति करून उत्तरोत्तर निरोधशक्ति प्राप्त करून घ्यावी, असा कर्मयोगाचा उद्देश आहे. "ऋतुस्नातां तु यो भार्यां" इत्यादि निषेध "मनसि कामे सत्यपि तस्यामरुच्या द्वेषादिना वा तामनुपगच्छतो दोषश्रवणोपपत्तेः ।।" कामवासना असून स्त्री न आवडल्यामुळे वगैरे, स्त्रीसंग न करणाऱ्या पुरुषाला लागू आहे, असे श्रीधरस्वामी म्हणतात.



दा. क्र. 93658

३० कलियुगात यथाशास्त्र कर्मानुष्ठान होणे शक्य नाही व तीव्र विरक्तिहि राहू शकत नाही; म्हणून जे कर्म निपजेल ते संपूर्ण करून व अनेक जन्मातील सुकृत-दुष्कृत नाहीसे करून निर्वासन चित्त करीत पुढील भगवत्प्राप्तीचा पंथ निष्कंटक करणारा, नामसंकीर्तन, स्वधर्माचरणादि सर्वकर्मद्वारा परमात्मपूजनरूप असा एक भक्तिमार्गच आहे. म्हणून कलियुगात तोच सर्वांना सेव्य होय.

एष निष्कंटकः पंथाः यत्र संपूज्यते हरिः ।

श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु

---

स्वच्छंदोपात्तदेहाय विमलज्ञानमूर्तये ।
भक्तमानसहंसाय ज्ञानराजाय ते नमः ।।

### आर्ष संस्कृति

सर्व प्राण्यात मनुष्यप्राणीच काय तो विचार करू शकतो; आणि जो विचार करू शकतो त्यालाच कांही सांगता येणे शक्य आहे. म्हणूनच

"शास्त्रं ह्यविशेषप्रवृत्तमपि मनुष्यानेवाधिकरोति"

शास्त्र हे सामान्येकरून प्रवृत्त झाले असले तरी ते मनुष्याकरिताच आहे; असे आचार्यादिक म्हणतात. हे शास्त्रहि मनुष्याच्या अन्तःकरणात, जे त्याला नेहमी साध्य करून घेण्याची किंवा आपल्याला मिळावे अशी इच्छा असते ते त्याला मिळवून कसे घेता येईल हे सांगण्याकरिता प्रवृत्त झाले आहे. मनुष्याच्या अन्तःकरणात त्याला काय मिळावे वाटते याचा बारीक विचार केला तर आधिभौतिक किंवा विषयसुख मिळावे असे तर वाटतेच; पण त्याबरोबर जे विषयसुख त्याला मिळावे असे वाटते ते नाहिसे होऊ नये, कायमचे टिकावे असे त्याला वाटत राहते. हा प्रत्येक माणसाचा अनुभव आहे. ज्ञानी-अज्ञानी कोणीहि असो, त्याच्या ठिकाणी अशी सुप्त इच्छा असते, यात शंका नाही.

अशी इच्छा करणाऱ्या पुरुषाला आपण, आपले विषय, हे सर्व नाशिवंत आहेत हे ठाऊक नसते असे नाही. पण हे ठाऊक असूनहि प्रत्येक मनुष्यमात्राला 'मी व माझे भोग्य विषय नित्य राहावेत' अशी मात्र इच्छा असते व ती, जगाचा इतका विनाशीपणा पाहूनहि नाहिशी होत नाही.

याचे कारण काय याचा, आर्ष संस्कृतिवाचून कोणत्याहि संस्कृतीने सुसंबद्ध विचार केला नाही.

आर्ष संस्कृतिवाचून इतर संस्कृतीत भौतिक विषयसुखाचा विचार प्रधान दिसतो; आणि आर्ष संस्कृतीत, मनुष्याच्या मनात नित्यसुखाचा विचार येण्याचे कारण काय, या प्रश्नाचा विचार प्रधान आहे. या नित्यसुखाच्या ध्येयालाच आर्ष संस्कृतीत 'अध्यात्म ध्येय' असे नांव दिले आहे.

कोणाच्या मते, इतर संस्कृतीतहि अध्यात्मध्येय आहे असे असेल; पण तेथे त्या ध्येयाच्या नामनिर्देशापलीकडे कांही विचार केला गेला नाही.

"न हि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्"

'क्षणभरहि मनुष्य व्यापार केल्यावाचून राहू शकत नाही' असे जे मनुष्यासंबंधाने म्हटले आहे ते याच उद्देशाने की अज्ञानी लोकांना अध्यात्मसुखाची कल्पना नसल्यामुळे, त्यांच्या दृष्टीने भौतिक विषयसुख हेच त्यांचे ध्येय व ते क्षणोक्षणी नाशिवंत असल्यामुळे, ते नवीन नवीन मिळविण्याकरिता त्यांना क्षणभर देखील प्रयत्न केल्यावाचून राहवत नाही. क्षणभर देखील मनुष्य सुखावाचून राहू शकत नाही व ते सुख विषयाचे ठिकाणी आहे अशी त्याची भावना असते. तेव्हा विषयसुखार्थ प्रयत्न केल्यावाचून क्षणभर तरी तो कसा राहणार ! असा अज्ञानी पुरुष भौतिक सुखाकरिताच विशेष प्रयत्न करितो; त्याचे भौतिक सुख हेच एक ध्येय.

आणि जगात सर्वच नाशिवंत असताना मला नित्य सुखाची इच्छा कां होते ? मी जर नित्य नाही तर नित्य सुख भोगणार तरी कोण ? मी नित्य को अनित्य ? नित्य म्हणून जगात एखादे सुख आहे काय ? नसेल तर मला तशी इच्छा कां होते ? इत्यादि

प्रश्नमालिका मनात उत्पन्न होऊन जो याचा विचार करितो त्याची, (१) आधिभौतिक सुखप्राप्ति व (२) आध्यात्मिक सुखप्राप्ति अशी दोन ध्येये होतात. हे ध्येयच मनुष्याच्या प्रवृत्तीचे किंवा प्रत्येक व्यापाराचे प्रयोजन असते.

हे ध्येय किंवा प्रयोजन प्राप्त करून घेण्याकरिता, जी आचारविचारांची मांडणी तिलाच **संस्कृति** म्हणतात. संस्कृति अनादि आहे म्हणजे केव्हा तरी तिची प्रथमच सुरुवात झाली असे नाही. जगाच्या आदिपासून अंतापर्यंत संस्कृति अस्तित्वात असते. ह्या संस्कृती दोन आहेत. एक **दैवी** व दुसरी **आसुरी.**

(१) अध्यात्मसुखाची प्राप्ति हे ध्येय मुख्य मानून तिला अविरोधि अशी भौतिक सुखप्राप्ति, ज्या संस्कृतीत आहे तिला **आर्ष संस्कृति** किंवा **दैवी संस्कृति** म्हणतात.

(२) अध्यात्मसुखाची जीत चर्चा नाही व भौतिक विषयसुख हेच जिचे ध्येय सर्वस्व आहे तिला **आसुरी संस्कृति** म्हणतात.

भारताची संस्कृति दैवी आहे व बाकी सर्व राष्ट्रांची संस्कृति आसुरी आहे. भगवद्‌गीतेत दोन प्रकारची संस्कृति सांगितली असून नाथांनी तीन प्रकारची सांगितली आहे–

उचित स्वधर्मशास्त्रस्थिति । निवृत्तिकर्मी जे प्रवृत्ति ।
ऐसी जेथ इंद्रियवृत्ति । ते दैवी संपत्ति सत्वस्थ ॥२६५॥

कामाभिलाष दृढ चित्तीं । आणि स्वधर्मी तरी वर्तती ।
ऐसी जे इंद्रियस्थिति । ते आसुरी संपत्ति राजस ॥२६६॥

सलोभमोहे क्रोध चित्तीं । सदा अधर्मीं प्रवृत्ति ।
ऐशी जे इंद्रियस्थिती । राक्षसी संपत्ती तामस ।।२६७।।
(ए. भा. अध्या. २५)

### संतांचे जागतिक पुढारीपण

आपले पुष्कळ पुढारी संस्कृतीचे संरक्षण केले पाहिजे असा बकवा करितात. पण संस्कृति म्हणजे काय व तिचे संरक्षण कसे करावयाचे याची काहीच स्पष्ट कल्पना ते देऊ शकत नाहीत. ते जे संस्कृति रक्षणाचे मार्ग म्हणून लोकांपुढे मांडतात ते आर्ष किंवा दैवी संस्कृतीचे रक्षण करणारे न ठरता तिचे मारक व आसुरी संपत्तीचे तारक ठरत आहेत. आज जगात सर्वत्र आसुरी संपत्तीचा नंगा नाच सुरू झाला असल्यामुळे, दैवी संपत्तीचा पुरस्कार करण्याकरिता प्रत्येक जण दुसऱ्याला सांगत सुटत आहे. पण दैवी सस्कृतीचा आचारविचार कोणीहि आत्मसात केला नसल्यामुळे व तोंडात दैवी संस्कृतीचा जप आणि अन्तःकरणात आसुरी संपत्तीचे ठाणे मांडले असल्यामुळे, ते सर्व " परोपदेशे पाण्डित्यं " होत आहे. ज्या आर्षसंस्कृतीत अध्यात्मध्येयाला प्राधान्य आहे त्या संस्कृतीचे, भौतिक विषयसुखाला प्राधान्य देणाऱ्याकडून संरक्षण होणे दुरापास्त आहे. आज ज्या मानवतेचा कंठशोष केला जातो, ती मानवता भौतिक विषयसुखाचे ध्येय समोर ठेवून उत्पन्न होऊ शकत नाही, सत्य, अहिंसा, निष्कपट, अविश्वासघात वगैरे ज्या थोर सद्‌गुणांची प्रत्येक मनुष्य प्रशंसा करितो, त्या सद्‌गुणांची आपण मूर्ति बनणे, याला मानवता म्हणतात. पण अशी मानवतेची मूर्ति भौतिक सुखवाद्यात सांपडणे शक्य आहे काय ? या सुखाकरिताच खोटे बोलणे, हिंसा करणे, काम, क्रोध, अपहार इत्यादि सर्व दुष्कृत्ये आपले हातून घडतात.

भौतिक सुखवाद हा स्वार्थदृष्टि वाढविणारा म्हणून आसुरी संस्कृतीचा पाठिराखा आहे. अध्यात्मसुखवाद मनुष्याला पूर्ण निस्वार्थी बनविणारा असल्यामुळे, स्वार्थ दृष्टीमुळे उत्पन्न होणारे दुर्गुण, अध्यात्मसुखवाद्याला कधीहि स्पर्श करीत नाहीत. म्हणून आपला विषयसुखाचा स्वार्थ त्यांचा सुटला असल्यामुळे, त्याकरिता त्यांचा कोणताहि प्रयत्न होत नाही व अध्यात्मध्येयाला विघातक होणार नाही असे भौतिकसुख कसे प्राप्त करून घ्यावे याचा अज्ञानी लोकांस मार्ग सांगणारे व स्वतः अध्यात्मप्राप्तीने मानवतेच्या शिखरावर चढलेले श्रीएकनाथ महाराजांसारखे पुरुष एकाचेच नाही तर जगाचे पुढारी व गुरु होण्यास योग्य होतात. जगाच्या आरंभापासून आजतागायत जे जे थोर अध्यात्मप्रवीण महात्मे होऊन गेले त्यांच्या अध्यात्मध्येयप्रधान शिकवणीमुळेच ज्या ज्या काली ज्या ज्या मानाने लोकांनी त्यांची शिकवण आचारविचारात आणली त्या त्या काली त्या त्या मानाने जगात परस्पर प्रेम, मैत्री, सुस्थिति नांदली; आणि जेव्हा जेव्हा लोक तिची आठवण विसरले तेव्हा तेव्हा जगाची घडी विस्कटली व पुनः भगवंताला अवतार धरून व अर्जुनासारख्या शिष्याला निमित्त करून जगाला त्या शिकवणीचे धडे द्यावे लागले. सारांश, नाथांसारखे पुरुष व त्यांनी चालविलेली दैवी संस्कृति हीच खरोखर जगाच्या सुस्थितीचे आधारस्तंभ आहेत.

## गुरुपरंपरा

असो, मनुष्यांनी अखंड सुख शांति भोगावी व त्याला त्याच्या सुप्त इच्छेप्रमाणे कधीहि दुःख भोगण्याचा प्रसंग येऊ नये, अशा परम करुणेने जगाकरिता जे कांही नाथांनी केले तेच आज नाथ-वाङ्मय म्हणून प्रसिद्ध आहे. एकाचे भौतिकसुख जसे दुसऱ्याला घेता येते व देता येते, तसे अध्यात्मसुख घेता-देता येत नाही.

" जे अनिरुप्य की निरुपिजे । ऐकतां बुद्धी आणिजे ।
वांचुनी डोळा देखिजे । ऐसे नाही ।। " (ज्ञा. अ. १३-१७७)

गुरूच्या उपदेशाप्रमाणे आपणच आपल्या ठिकाणी ओळखले पाहिजे; म्हणून या अध्यात्मसुखाच्या प्राप्तीकरता श्रीगुरु नुसता उपदेशच करू शकतात. शिष्याने आपल्या ठिकाणी त्याचा नंतर अनुभव घ्यावा. स्वतंत्र बुद्धीने वेदान्तविचार करणाऱ्याचा नाथांनी एके ठिकाणी असा निषेध केला की, "आमावस्येच्या काळोखात काजळाचा डोंगर रचून त्याचे दोन भाग करण्याकरिता आंधळयाला सांगावे, तसे अनुभवी गुरूवाचून स्वबुद्धीने शास्त्राध्ययन करून ब्रह्म जाणणे आहे."

" शास्त्रज्ञोऽपि स्वातंत्र्येण ब्रह्मज्ञानान्वेषणं न कुर्यात् "

असे आचार्यांचेहि म्हणणे आहे.

आधुनिक काळातील वेदान्तावरील पुष्कळ प्राकृत ग्रंथ या थाटाचे आहेत पण नाथांचे वाङ्मय तसे नाही. त्यांचे ज्ञान, त्यांच्या पूर्वीच्या संतपरंपरेप्रमाणे गुरूपरंपरेनेच आले असल्यामुळे, कोणत्याहि संतवाङ्मयाच्या विरुद्ध त्यांचे वचन सापडणे शक्य नाही. ज्ञानेश्वरमहाराज, नाथमहाराज, तुकाराममहाराज इत्यादि संतांचा आत्मबोध शंकराचार्यांसारखाच केवलाद्वैतरूप आहे.

वेदान्ताचा विचार करणारे, आद्यशंकराचार्य सोडून, बाकीचेहि आचार्य आहेत. त्यांनी केवलाद्वैत सिद्धान्त न स्वीकारता द्वैताचे, द्वैताद्वैताचे मंडन केले आहे खरे, पण ते सर्व त्यांचे करणे निरनिराळया प्रज्ञेच्या अधिकाऱ्यांकरिता असले पाहिजे. कारण 'द्वैत सत्य आहे' हा सिद्धान्त श्रुति, युक्ति व अनुभव यांच्या स्पष्ट

विरुद्ध असता तो आत्यंतिक खरा आहे, अशा दृष्टीने त्या महात्म्यांनी त्याचा स्वीकार करणे शक्य नव्हते. सर्वच लोक द्वैत सत्य मानतात. द्वैतच सत्य आहे हे सांगावयाला कशाला पाहिजे ? सर्वसामान्य बुद्धीला प्रथमपासून अवगत असलेला द्वैतवाद हा पूर्ण मीमांसेने स्वीकारलेला वाद म्हणता यावयाचा नाही. द्वैतापुढे शोध करून कांही सिद्धान्त काढावयाचा असल्यास तो अद्वैतरूपच राहील.

जसा दोन हा आकडा प्रथमचा आहे, असे म्हणता यावयाचे नाही, प्रथम आकडा एक हा असून दोन हा आकडा त्याचा विस्तार होय, त्याप्रमाणे अद्वैत हेच मूळ असून द्वैत हा त्याचा विस्तार मानावा लागतो.

" अद्वैतं परमार्थो हि द्वैतं तद्भेद उच्यते "

'अद्वैतच अत्यंत सत्य असून द्वैत हे अद्वैताचाच प्रकार आहे' असे माण्डुक्यकारिकेत आचार्य म्हणतात.

" सर्वेषां प्रस्थानकर्तृणां साक्षात् परंपरया वाऽद्वैते ब्रह्मणि एव तात्पर्यम् । न हि ते मुनयो भ्रान्ताः सर्वज्ञत्वात्तेषाम् । "

'साक्षात् किंवा परंपरेने अद्वैत परब्रह्माचे ठिकाणीच सर्व मतांचे तात्पर्य आहे.' असे मधुसूदन सरस्वति म्हणतात. इतर दर्शनकारांना मूर्खाचे कोटीत घालावयाचे नसल्यास त्यांच्या म्हणण्याला मान देऊन केवलाद्वैतात त्यांच्या मताचे तात्पर्य दाखविणे भाग आहे. म्हणजे त्यांचे सिद्धान्त आत्यंतिक नसून, अद्वैताचे ग्रहण करू न शकणाऱ्या मंदबुद्धीकरिता त्यांनी वरवर भिन्न सिद्धान्त आपल्या दर्शनातून मांडले असे म्हणणे भाग पडते. श्रीनाथांना आचार्यांप्रमाणे अद्वैतवेदान्तमतच मान्य होते असे त्यांच्या सर्व ग्रंथांवरून दिसते.

## नाथांचे वाङ्मय

'नाथांचे वाङ्मय' पाहिल्यास त्यात कांही 'आकारग्रंथ' आहेत व कांही 'प्रकरण ग्रंथ' आहेत. ज्यांत सर्व सिद्धान्तांचा प्रसंगोपात्त ऊहापोह असतो त्याला 'आकार ग्रंथ' म्हणतात. आणि विवक्षित सिद्धांतांचा ऊहापोह करणाऱ्या ग्रंथाला 'प्रकरण ग्रंथ' म्हणतात. नाथभागवत, भावार्थरामायण हे दोन नाथांचे आकार ग्रंथ आहेत. आणि चिरंजीवपदाभ्यास, आनंदलहरी, हस्तामलक, चतु:श्लोकीभागवत इत्यादि प्रकरण ग्रंथ आहेत.

कोणत्याहि ज्ञानाचा प्रांत घ्या, त्यात ते ज्ञान ज्याना अवगत नाही अशा अज्ञान्याकरिताच असते. त्या ज्ञानाचे जाणते पुरुष अज्ञान्यांना सज्ञान करण्याकरिता ग्रंथ करीत असतात. वेदान्तग्रंथहि वेदान्तग्रंथात जे ज्ञान सांगितले आहे, ते ज्यांना माहीत नाही त्यांना ते प्राप्त करून देण्याकरिता निर्माण झाले. मूळ परमेश्वराने उपनिषदादि ग्रंथातून प्रकट केलेले ज्ञान, मराठी वाचकांकरिता नाथादि संतांनी प्राकृतातून सांगितले. ज्ञान सर्व एकच आहे; म्हणून संस्कृत ग्रंथापासून ज्ञान होऊन जसे पुरुष तरतात, तसेच नाथादिकांचे प्राकृत ग्रंथ वाचूनहि गुरुकृपेने मनुष्य तरू शकतो. म्हणून संस्कृताभिमान व्यर्थ होय असे नाथांनी स्पष्ट सांगितले आहे.

श्रीनाथादि संताच्या वाङ्मयातून विशेषत: परमार्थाची शिकवणूक अधिक दिसून पडते. याचे कारण हे आहे की मनुष्याला जे कळते ते शिकविणे यात शिक्षण कांहीच नाही. मनुष्याला स्वाभाविक रीत्या जे समजत नाही व जे त्याच्या कल्याणाचे आहे तेच शिक्षण त्याला दिले पाहिजे.

संसार करणे व विषयसुख भोगणे हे ज्ञान प्रत्येक प्राण्यास त्याच्या योनीप्रमाणे स्वाभाविक आहे. हे सांगण्याची जरूरी नाही. पण आपले आत्यंतिक कल्याण कशात आहे व आपल्या अन्त:करणात

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रम....३८७७० वि: ...
१५८०
क्रमांक ... नों दि. ...



जी अखंड सुखाची व कायमच्या दुःखनाशाची सुप्त इच्छा आहे ही कशाने शांत होईल, याचे ज्ञान मनुष्याला मुळीच नाही. कोणत्याहि भौतिक विषयसुखाच्या प्राप्तीचा मार्ग येथे कुचकामाचा आहे. आपले आत्यंतिक कल्याण कशात आहे हे समजून घेऊन, त्याच्या साधनाला लागल्याखेरीज मनुष्याला कायमचे सुख प्राप्त होऊन, तो कायमचा दुःखातून सुटावयाचा नाही; हे जाणून सर्व संतांनी प्रामुख्याने आत्यंतिक सुखाच्या मार्गाचाच उपदेश केला आहे. तरी भौतिकसुखाच्या मार्गाचा उपदेश करणे त्यांनी सोडले असा अर्थ नाही. आत्यंतिक सुखप्राप्तीच्या आड येणार नाही अशा रीतीने तोहि प्रयत्न करावयाला मोकळीक देऊन तो कशा रीतीने करावयाचा याचाहि मार्ग त्यांनी दाखविला आहे.

मनुष्याला 'मी सर्वसमर्थ' आहे असे वाटत नाही व तो त्याचा वर्तमान प्रयत्न, पूर्वप्रयत्नाने बद्ध आहे. अशा स्थितीत त्याचा वर्तमान प्रयत्न कसा सिद्धीस जाणे शक्य आहे? एकतर त्याने सर्वसमर्थ व्हावे किंवा सर्वसमर्थाचे साह्य घ्यावे. यावाचून दुसरा मार्ग नाही. व्यावहारिक दृष्टचा कांही काल, असा प्रयत्न करणारा पुरुष निष्क्रिय दिसेल, पण कोणत्याहि ध्येयप्राप्तीकडे तीव्र चित्त लागल्यावर दुसरीकडे निष्क्रियता येणे अपरिहार्य आहे. परीक्षेस बसणारा मुलगा घरची कामे करीत नसतो, किंवा देशहितार्थ देह झिजविणाऱ्या कोण्या पुरुषाने आपल्या कुटुंबाकडे लक्ष दिले आहे? उतावीळपणाने प्रयत्न करणाऱ्यापेक्षा विचार करून व दूरवर त्याचे परिणाम काय होतील ही दूरदृष्टि ठेवून प्रयत्न करणाराहि निष्क्रिय भासतो. तसेच संतांचे वाङ्मय अदूरदृष्टि मनुष्यांना निष्क्रिय बनविणारे भासते, तर दूरदृष्टि पुरुषांना तेच प्रयत्नाची योग्य दिशा दाखविणारे वाटते. वेदान्तासारखे प्रयत्नवादी शास्त्र कोणतेच नाही. "तुम्हीच सर्वसमर्थ आहा. तो आपला मूळचा सर्वसमर्थपणा तुम्ही मिळवा. तो मिळविला असतां तुम्हाला कोणा-

चेच साह्य नको. किंवा सर्व ब्रह्माण्ड तुम्हाला साह्य करील. यालाच ब्रह्मपदप्राप्ति म्हणतात. ही पदप्राप्ति झाली असता जे निष्क्रिय तेच सर्वसमर्थ आहे, असा अनुभव येतो. अथवा सर्वज्ञ व सर्वसमर्थ अशा परमेश्वराचे निष्कपट अंतःकरणाने शक्तिसाह्य घेतल्यास आपला कोणताहि प्रयत्न सफल होतो." हेहि वेदान्ताचे सांगणे आहे. भगवद्गीतेत सर्वत्र 'परमेश्वराला शरण जा', असा उपदेश करून शेवटी,

"यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः"

या श्लोकात, जेथे आपला प्रयत्न व त्या प्रयत्नाला परमेश्वराचे साह्य आहे, तो कोणताहि प्रयत्न सिद्धीस गेल्याखेरीज राहत नाही, असे सांगितले आहे.

'आपल्या प्रयत्नास परमेश्वर सहकारी आहे' असे नुसते समजल्याने परमेश्वराचे साह्य मिळत नसते. परमेश्वराचे साह्य मिळविण्याचे मार्ग "तदर्थं कर्म कौन्तेय.." इत्यादि श्लोकांतून सांगितले आहे. समर्थांनीहि,

"सामर्थ्य आहे चळवळीचे ।...
परि तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ।। "

या ओवीत असेच सांगितले आहे. चळवळ करणे म्हणजेच भगवंताचे अधिष्ठान असणे नव्हे, तसे असते तर "परि" या पूर्वपक्षव्यावर्तक व पक्षान्तरबोधक अव्ययाचा उपयोग निरर्थक होतो. "परि" या अव्ययाने 'चळवळ' या पूर्वपक्षाचे व्यावर्तन करून भगवंताचे "अधिष्ठान" हे निराळे सांगितले. ते भगवंताचे अधिष्ठान म्हणजे काय याचा समर्थांनी,

"पहिले ते हरिकीर्तन । दुसरे ते राजकारण"

या ओवीत स्पष्टीकरण केले आहे. हरिकीर्तनादिक, भगवंताचे साह्य मिळविण्याचे जे प्रयत्नमार्ग आहेत ते करून भगवंताचे साह्य मिळवावे व नंतर चळवळ करावी म्हणजे कोणताहि व्यावहारिक प्रयत्न सफल होतो असा सर्व आर्षशास्त्रांचा व सर्व नाथादि सत्पुरुषांचा उपदेश आहे.

### नाथांचे अद्वैतमत

'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापर:'

ब्रह्म अविनाशी आहे आणि जीव ब्रह्मरूप आहे, तो ब्रह्माहून निराळा नाही. हा आचार्यसिद्धान्त नाथांनीहि मान्य केला आहे. यालाच अद्वैतमत म्हणतात.

जीव, जगत, ईश्वर किंवा ब्रह्म या तिघांपैकी जीव, जगत् हे दोन पदार्थ आपल्याला प्रत्यक्ष आहेत व ईश्वर हा पदार्थ सर्व जीवांचा व जगाचा शास्ता म्हणून अनुमानाने व शास्त्रावरून आपण मानतो. प्रत्यक्ष त्याचा अनुभव नाही. हा प्रत्यक्ष अनुभव आणून देणारे वेदान्तशास्त्र आहे. एका ईश्वरावाचून सर्व जीव आपल्या खऱ्या स्वरूपाला न जाणणारे आहेत व आपल्या मूळ खऱ्या स्वरूपाच्या विरुद्ध त्यांनी आपल्या स्वरूपाची कल्पना करून घेतली आहे.

'आत्मत्वाचा विसरू । तेणें "मी देह" हा अहंकारू ।
तेणें अहंकारे संसारू । अतिदुस्तरू थोरावे ।।"

(ए. भा. अ. ३–६३)

मूळात जीव ब्रह्मस्वरूप आहे म्हणजे तो अविनाशी, चैतन्यस्वरूप व सुखस्वरूप आहे, तो कर्ता नाही, भोक्ता नाही, त्याला दु:ख नाही, तो सर्वव्यापक आहे, त्याच्यावाचून दुसरी वस्तु नाही.

तो काल, देश, वस्तु यांच्या मर्यादिच्या बाहेर आहे, पण तोहि आपली स्वरूपस्थिति विसरला आणि नामरूपात्मक मायेला सत्यत्व देऊन म्हणजे आपल्या अस्तित्वाबरोबर त्यांच्या अस्तित्वाचीहि कल्पना करून आपल्या कल्पनेनेच द्वैतप्रपंच निर्माण केला–

'नामरूपाचियें भडसे । कल्पनावशें माया वाटे'

(ए. भा. अ. ३–६६)

नामरूपे भासली की, त्याला आपण आपल्या कल्पनेने जगत् हे नांव देतो. या नामरूपाच्या भासाचे ठिकाणी जितके आपण आसक्त होऊ तितके तितके आपण आपले खरे स्वरूप विसरून माया-भ्रांतीला दृढ करीत जातो. नाना नामरूपांच्या ठिकाणी नाना वस्तूंच्या अस्तित्वाची आपण कल्पना केली असल्याने, नामरूप बदलले की आपल्याला नाना वस्तूंच्या उत्पत्तिनाशांचा प्रत्यय येऊन, त्यांच्या ठिकाणच्या आसक्तीमुळे, प्रियवस्तुवियोगाचे व अप्रियवस्तुसंयोगाचे दुःख अनुभवाला येते.

"तत्वान्यतत्वाभ्यामनिर्वचनीये नामरूपे
मायाशब्देनाभिलप्येते"

आचार्यांनी नामरूपालाच माया म्हटले आहे.

"ब्रह्म पूर्वी एकाकी एक । तेचि केवि झाले अनेक ।
तो मायायोग परिपाक ।"

(ए. भा. अ ३–६९९)

नाथहि एकाकी परब्रह्म नामरूपाने बहुरूप झाले म्हणजे नामरूपे हे मायेचे स्वरूप होय, असे म्हणतात.

ही नामरूपी माया, परब्रह्माचे ठिकाणी,

"जेवि नभी नीलिमेचे भान । तेवि ब्रह्मीं माया नांदे संपूर्ण"

नसताच विपरीत भास आहे असे नाथ म्हणतात. नाथादि संतांच्या व आचार्यांच्या वेदान्तमताचा विचार केला असता, या मायेचे जे वर्णन सापडते, ते दोन प्रकारचे आहे;

"विद्या अविद्या निजस्वभावी । जीवशिवांची भेदपदवी"

एक अविद्या व दुसरी विद्या. विपरीत ज्ञानाला 'अविद्या' म्हणतात व यथार्थ ज्ञानाला 'विद्या' म्हणतात.

१. आपल्या स्वरूपाचे विपरीत ज्ञान ज्या जीवाला आहे त्याला अविद्या आहे. ही भ्रांतिरूप आहे. हिलाच भ्रांत कल्पना किंवा विपरीत कल्पना म्हणतात. तोच अज्ञानी जीव होय.

२. ज्याला आपल्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान आहे त्याला विद्या उपाधि आहे. त्याला ज्ञानी म्हणतात.

एकच माया ज्ञानी व अज्ञानी यांना भिन्न भिन्न भासते. श्रीज्ञानेश्वरमहाराजहि,

"जिती अविद्या ऐसी । अन्यथा बोधाते गिवसी ।
तेचि यथाबोधेसी । निमाली उठी ।।"

(अमृ. अ. ३-१०)

–जोपर्यंत आपण आपल्याविषयी भलतीच विपरीत कल्पना करितो तोपर्यंत त्या कल्पनेला अविद्या म्हणावयाचे व जेव्हा आपण आपल्याविषयी खरी कल्पना करूं तेव्हा ती विद्या म्हणावयाची.

"अहंब्रह्म ही पूर्ण स्फूर्ति ।

ही विद्या होय आणि ती विसरून,

"ते अहंकारले देहाकृति । देहाभिमाने निश्चिती ।
जीव म्हणती वस्तूते"

(ए. भा. अ. ३-७०१)

ही अविद्या होय.

मानसोन्मादात जसा रोगी प्रथम धट्टाकट्टाच असतो, पण त्याला मी रोगी आहे असे कल्पनेनेच वाटते, प्रकृतीत कांही फरक पडत नाही. त्याप्रमाणे जीवाच्या मूळ सच्चिदानंद ब्रह्मस्थितीत अविद्यारूपी विपरीत कल्पनेने कांही फरक पडत नाही. नुसती तो आपल्याविषयी विपरीत कल्पना करून घेतो. ब्रह्मस्वरूपावर असा विपरीत कल्पनारूपी भास भासणे यालाच जीवदशा म्हणतात व तो भास, ज्या सच्चिदानंद ब्रह्मस्वरूपावर भासतो, त्याशी ऐक्य करून त्या भासाकडे पाहिल्यास

"जैशा घृताच्या कणिका । घृतेसी नव्हती आणिका ।"
"जेवि सुवर्णी अलंकार । तंतुमाजी पटाकार ।"
"भिंतीवरी भासे चित्र ।"

यាप्रमाणे भासहि सच्चिदानंद स्वरूपच दिसावयाला लागतो.

सारांश, आपल्याला जीव जगत् हे दोन पदार्थ, जे आज ब्रह्मधर्माहून विपरीत धर्माचे दिसतात तेच पुढे ब्रह्मधर्माचे आहेत, असा अनुभव येतो. यालाच ब्रह्मसाक्षात्कार म्हणतात. ब्रह्माचा अनुभव आपल्याला जीव–जगाहून निराळ्या ठिकाणी घ्यावयाचा नसून जीव-जगतालाच ब्रह्मस्वरूपाने अनुभवावयाचे असते. जीव-जगत् ब्रह्मस्वरूप आहेतच, आपण तसे त्यांना समजत नाही. ही जीवजगताविषयीची कल्पना खोटी म्हणजे नाममात्रच आहे. वस्तुतः तिने कांही फरक केला नाही; म्हणूनच मायेचे वर्णन करताना,

"नुपजेल्याचे श्राद्ध करणे । तैसी सांगणे महामाया"
"निजछायेचे शिर फोडा । आकाशाची त्वचा काढा"
"आकाशाची सुमने । सुवासें की वासहीने"

मायेचे अर्थहीन शब्दमात्र अस्तित्व मानलेले आहे. वेदान्तात मायेचे अवडंबर माजविले असले तरी तिला कोठे सत्य मानिले नाही. विपरीत कल्पनारूपी माया खोटी व तिच्या योगाने भासणारे जीव–जगत् यांचे निराळेपण अर्थात् खोटेच राहणार.

आमचे पुष्कळसे आधुनिक विद्वान् 'जीव जगत् खोटे आहे–मिथ्या आहे' या वेदान्ताच्या प्रतिपादनावर फारच रुष्ट झालेले दिसून येतात. हे प्रतिपादन मनुष्याला प्रयत्नशून्य बनविणारे असल्याने राष्ट्रोद्धाराला विघातक आहे, असे त्यांचे म्हणणे असते. अशा लोकांची वेदान्त्यांना कीवच करावी लागते.

वेदान्तशास्त्र हे कोणत्याहि गोष्टीची तात्विक मीमांसा करणारे शास्त्र आहे. तात्विक मीमांसा कोणताहि उद्देश मनात धरून होऊ शकत नाही. ती करीत असताना कोणाच्या रागलोभाचा मुलाहिजा ठेवूनहि चालावयाचे नाही. तसे केले असता निःपक्ष तात्विक मीमांसेला बगलच मिळते.

वेदान्तात जीव-जगत् यांचे तात्विक स्वरूप काय, याचा विचार केला आहे व हा विचार करताना जीव-जगत्-ब्रह्म यांच्या स्वरूपाचा काय निर्णय ठरतो हे अगदी काटेकोरपणे पाहिले आहे. सत् म्हणजे अविनाशी, चैतन्यस्वरूप आणि आनंद हे ब्रह्माचे धर्म सांगितले असून त्यापासून जीव–जगत् प्रकट होतात असे सर्वांचे म्हणणे आहे.

ब्रह्म अपरिणामी आहे म्हणजे त्यापासून विरुद्ध धर्माची कोणतीहि वस्तु उत्पन्न होऊच शकत नाही. जगत् नाशिवंत, जड व दुःखरूप आहे. असे जगत् अविनाशी चैतन्यापासून कसे निर्माण होणे शक्य आहे ? हे शक्य नाही म्हणूनच 'ब्रह्मापासून जगत् झाले' हा जो श्रुत्यादिकांनी ब्रह्मजगताचा कार्यकारणभाव दाखविला आहे तो सत्य नसून जगत् ब्रह्मस्वरूप आहे, ब्रह्माहून ते निराळे नाही, असा या कार्यकारणभावाचा अर्थ आहे. 'वस्तुतः जगत् ब्रह्माहून

निराळी वस्तु नव्हे' असा आचार्य व श्रीज्ञानेश्वर नाथादि संतांनी अर्थ केला. जगत् मिथ्या आहे या आचार्यांच्या वेदान्तातील सिद्धान्ताचाहि हाच अर्थ आहे, असे उपनिषद्भाष्यावरून दिसून येईल.

"न विश्वं नाम पुरुषादन्यत्किंचिदस्ति" (मुंडक २–१–१०)

जगत् म्हणजे ब्रह्माहून निराळा पदार्थ नव्हे.

"अब्रह्मप्रत्ययः सर्वोऽविद्यामात्रो रज्ज्वामिव सर्पप्रत्ययः"

जेथे जेथे अविनाशी, चेतन, आनंद या प्रत्ययाहून निराळा प्रत्यय येईल तो तो खोटा प्रत्यय समजावयाचा. '(दोरीवर भासणाऱ्या सर्पाप्रमाणे)' याचा स्पष्ट अर्थ असा की, आज आपण विनाशी, जड व दुःखरूप असे जे जगत् अनुभवतो, ते अविनाशी, चैतन्यरूप व आनंदरूप अनुभवाला आले पाहिजे. जगत् म्हणून काही परमेश्वराहून निराळी वस्तु आहे किंवा निराळ्या धर्माची वस्तु आहे असे न पाहता किंवा न समजता जगत् ब्रह्मस्वरूप पाहणे, यालाच वेदान्तात जगत् मिथ्या पाहणे, जगताचा त्याग करणे म्हणतात.

याप्रमाणे जगताला ब्रह्मस्वरूपाने पाहणारी ज्ञानदृष्टि लाभल्यावर पुरुष ज्ञानी म्हटला जातो. अशाहि स्थितीत तो जगाच्या उपयोगाचा राहत नाही असे नाही. ज्ञानी पुरुषहि प्रारब्धानुसार व्यवहार करतोच. अज्ञानी पुरुष प्रारब्धानुसार व्यवहार करतो व वासनेनुसारहि निरनिराळा प्रयत्न करितो. ज्ञान्याचा व्यवहार फक्त प्रारब्धानुसारच शिल्लक राहतो, एवढाच फरक.

"अदृष्टा अधीन जे शरीर । तेथ आलियाहि हरिहर ।
अन्यथा न करवे अणुमात्र । हे वेदशास्त्र संमत ।।"

हा 'सामान्य सिद्धान्त' आहे. पण वेदान्त प्रयत्नवादी असल्यामुळे, त्याचा 'विशेषसिद्धान्त' असा आहे की,

"यत्र योगेश्वरः कृष्णो, यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिः"

परमेश्वराचे साह्याने पुरुष कोणताहि प्रयत्न सिद्धीस नेऊ शकतो. बहुतेक पुरुष परमेश्वरसाह्यपूर्वक प्रबल प्रयत्न करणारे नसतात; म्हणून त्यांच्या फळात कोणीहि कांही फरक करू शकत नाहीत. जे कोणी परमेश्वराचे साह्य मिळवून प्रयत्न करतील त्यांचा प्रयत्न केव्हाहि सफल होतो, असा सर्व वेदान्ताचा मतितार्थ आहे. हाच अर्थ श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी,

"तैसा औदार्याचा कुरुठा । श्रीकृष्ण आपु जाहलिया सुभटा ।
कां सर्व सुखाचा वसौटा । तोचि नोहावा"

(ज्ञा. ५-१२)

या ओवीत सांगितला आहे.

'प्रारब्धं नियतिर्वापि महेशविमुखे भवेत्"

प्रारब्धाची किंवा नियतीची सबब परमेश्वर विन्मुखाकरिता आहे, असे वेदान्तात दुसरे वचन आहे, असो.

परमेश्वराहून जीव-जगत् ह्या वस्तूंना यत्किंचित् जरी निराळे अस्तित्व दिले तर परमेश्वर, जीव, जगत् या तिन्ही वस्तु मर्यादित होतात. ही मर्यादा तीन प्रकारची आहे. देशमर्यादा, कालमर्यादा, वस्तुमर्यादा.

१-कोठे वस्तु असणे व कोठे नसणे ही देशमर्यादा होय.

२-केव्हा वस्तु असणे व केव्हा नसणे ही कालमर्यादा होय आणि ३-वस्तु-वस्तु भिन्न असणे ही वस्तुमर्यादा होय.

परमेश्वराहून जीव-जगत् निराळे मानल्यास वस्तुमर्यादा आली. मग परमेश्वरवस्तु सर्वव्यापक होणार नाही. सर्वव्यापक वस्तुवाचून सर्व मर्यादित वस्तु नाश पावतात. मग जीवजगताबरोबर परमेश्वरहि विनाशी होईल. विनाशीभाव वेदान्ताच्या दृष्टीने जरी काल्पनिक असला तरी विनाशीअविनाशी हे सापेक्ष भाव असल्यामुळे मुळात अविनाशीभाव असल्याखेरीज काल्पनिक विनाशीभावाचीहि प्रतीति येणे शक्य नाही. खोटचा आभासालाहि खऱ्याचा आधार पाहिजे. सर्व भावांचा विनाश जाणारा, अर्थातच अविनाशी असावा लागतो. अविनाशी भावच मानू नये असे म्हणता यावयाचे नाही. अविनाशी भावच सर्वांचा विनाश व आपला अविनाश जाणते. यालाच सच्चित् म्हणतात व सतावाचून चित् राहत नाही व चितावाचून सत् राहू शकत नाही. यालाच प्रेम म्हणतात. अशा या सच्चिदानंद ब्रह्मभावाचा विचार केल्यास तिच्याबरोबर दुसऱ्या सत्य वस्तूच्या अस्तित्वाचा अंगीकार करता येत नाही.

ही सच्चिदानंद परब्रह्म वस्तु वेदान्तात सर्वसमर्थ मानली आहे. तेव्हा तिला आपल्यापासून किंवा आपणच विनाशी, जड जगत्स्वरूप होण्याला काय हरकत आहे असाहि कित्येक आक्षेप घेतात. पण तो फोल आहे. कारण परब्रह्मवस्तु अविकृत आहे. पुन: कोणत्याहि वस्तूची शक्ति स्वविघातक होऊ शकत नाही. तशीच परमेश्वराची शक्तिहि त्याला विघातक होऊ शकत नाही. अविनाशी परमेश्वरापासून विनाशी जगत् उत्पन्न होते म्हणताना, जर परमेश्वर नित्य अविनाशी आहे तर त्यापासून विनाशी जगत् उत्पन्न होणे किंवा तोच विनाशी जगत्स्वरूप होतो ही कल्पनाच मनात येऊ शकत नाही. तेव्हा जगत्स्वरूपाने त्याचा आविर्भाव खोटाच म्हणावा लागतो. सारांश, जीवजगत् जोपर्यंत आपण सच्चिदानंदस्वरूप समजत नाही तोपर्यंत सद्ब्रह्माहून ते निराळे पडत असल्यामुळे, असतच मानावे लागते; आणि आपल्या विपरीत कल्पनेने जगासह

आपली ब्रह्मस्वरूपता विसरून आपण सच्चिदानंद ब्रह्माहून अलग पडल्यामुळे, सच्चिदानंदाच्या विरोधी, विनाशी, जड, दुःख इत्यादि धर्म आपल्यावर ओढवून घेतो. हेच सर्व दुःखाचे मूळ आहे. म्हणून आपल्या ठिकाणी असलेली आपल्या विषयीची व जगाविषयीची विपरीत कल्पना आपण घालविली पाहिजे, तेव्हाच या सर्व दुःखातून कायमचे सुटू याच विचाराने वेदान्तशास्त्र प्रवृत्त झाले आहे.

### दुःखातून सुटण्याचा उपाय

नसलेली खोटी वस्तु 'आहे' असे मानून चालणे व त्यावर सुखार्थ आसक्ति ठेवणे, हेच सर्वस्वी आपल्या दुःखाला कारणीभूत असते. जगत् म्हणून मुळी स्वतंत्र वस्तु नाही. ती आहे असे आपण मानतो व तेथे आसक्ति ठेवतो. यामुळेच खोटया मृगजळाचे पाठीमागे 'पाणी आहे' अशा भावनेने धावणाऱ्या मृगाप्रमाणे आपण दुःखी होतो. यातून सुटण्याचा उपाय म्हणजे तात्विक विचार करणे आणि त्या विचाराने जी वस्तु खोटी ठरेल तिची आसक्ति सोडणे व जी वस्तु खरी ठरेल तिचे प्रेम करणे.

प्रेम आपला स्वभाव आहे. तो नाहीसा होऊ शकत नाही. तात्विक विचाराला वेदान्त किंवा ब्रह्मविचार म्हणतात व खऱ्या ठरणाऱ्या ब्रह्मवस्तूवर स्वाभाविक प्रेम बसणे याला भक्ति म्हणतात. वेदान्तात ब्रह्मविचार करण्याच्या दोन पद्धती आहेत. एकीला 'व्यतिरेक' व दुसरीला 'अन्वय' म्हणतात. ब्रह्म जीव-जगद्रूपाने आपल्याला भासते. त्या ब्रह्माचे शास्त्राने सांगितलेले सच्चिदानंद-स्वरूप शोधण्याकरिता, आपल्याला जीवजगताच्या स्वरूपाचा शोध करण्यावाचून दुसरे कोठे जावे लागत नाही.

### नाथांचे मते ब्रह्मस्वरूप

तैत्तिरीयोपनिषदात आचार्यांनी "सत्यज्ञानमनन्तं ब्रह्म" या श्रुतीवर भाष्य करिताना "सत्यमिति यद्रूपेण यन्निश्चितं

तद्रूपं न व्यभिचरति" सदासर्वदा एकरूप असणे म्हणजे केवळ सत्तारूप, "ज्ञानं ज्ञप्तिरवबोधो भावसाधनो ज्ञानशब्दो न तु ज्ञानकर्तृ" केवल ज्ञानस्वरूप, (ज्यात स्वतःची किंवा दुसऱ्याची 'ज्ञातता' उत्पन्न होत नाही असे 'ज्ञान') आणि "आनंदानंदिनोश्चाविभागोऽत्र" केवल आनंदरूप असे ब्रह्माचे स्वरूप मानिले आहे. नाथांनीहि परब्रह्माचे असेच वर्णन केलेले आहे.

"शून्यत्व सांडूनि गगनें । सर्वत्र सदा असणे ।
तैसा आत्मा पूर्णपणे । सर्वदा सर्वी" ।।

(स्वात्मसुख १७)

ज्या विशेषणाने प्रत्येक पदार्थ आपण निरनिराळा समजतो तो विशेषपणा काढून टाकला असता जे नुसते अस्तित्व राहते तीच परब्रह्माची सद्रूपता होय.

"सांडुनि ज्वाळा काजळा । दीप प्रकाश उमाळा ।
असे तैसी आत्मकळा । कळातीत ।।"

आपल्या ज्ञानातील विशेषांश काढून टाकला असता, जी चिन्मात्रता शेष राहते तेच ज्ञानरूप ब्रह्म होय.

"कां रसनेविण फुडी । ते सदा सर्वांगें गोडी ।
भोगिजे जै आवडी । ते स्वानंदसुख ।।"

भोक्तृत्वावाचून जे सुख तो ब्रह्मानंद होय. असे हे ब्रह्मस्वरूप निर्विकार, निर्विकल्प आहे असे नाथांचे म्हणणे आहे. जोपर्यंत आपण आपले खरे स्वरूप जाणत नाही, नामरूपाने भासणारा जगत्पसारा खरा समजतो व त्यामुळे आपणहि सत्य व जगत् पसाराहि सत्य, अशी सत्य द्वैत कल्पना करून आहो तोपर्यंत आपल्या

दुःखाचा आत्यंतिक शेवट होणार नाही, असे, "द्वितीयाद्वै भयं भवति" या श्रुतीत सांगितले आहे.

"आत्मा पूर्णत्वे सर्वत्र एक । तेथ जो 'मी' म्हणे वेगळा देख ।
तेचि अज्ञान भयजनक । दुःखदायक अतिद्वंद्वे" ।।

(ए. भा. २–४४९)

असे नाथांचेहि म्हणणे आहे. अद्वैतात एकच वस्तु शेष राहत असल्याने तेथे दुःखाचे कारणच राहत नाही. एका अद्वैत निर्विकल्प ब्रह्मावाचून बाकी सर्व संसार-दुःखादि पदार्थ कल्पनामात्र अस्तित्वरूप मानावे लागतात.

पुष्कळसे आधुनिक विद्वान् जगतादि पदार्थांचे कल्पनामात्र अस्तित्व मानावयाला तयार होत नाहीत; पण विचार केला असता जगतादि पदार्थांना कल्पनामात्र अस्तित्वाशिवाय दुसरे अस्तित्वच मानता येत नाही, असेच दिसून येते.

अस्तित्व दोन प्रकारचे आहे. एक, कल्पना करण्यापूर्वीच अस्तित्व असणे व दुसरे, कल्पनेबरोबरच अस्तित्व निर्माण होणे.

कल्पना करणाऱ्याचे अस्तित्व कल्पनेच्या पूर्वीच मानणे शक्य आहे. कारण कल्पना करण्यापूर्वी तो असेल तरच उत्तरक्षणी कल्पना करू शकेल. अमुक आहे अमुक नाही, असे वाटणे याला कल्पना म्हणतात. कल्पना करणाराहि 'मी आहे' असे म्हणतो हे खरे, तरी पण त्याच्या बोलण्यावरूनच तो आपल्या कल्पनापूर्वसिद्ध अस्तित्वाचे दुसऱ्याकरिता ग्रहण करितो, स्वतःकरता नाही, असे स्पष्ट दिसते. "अहं बहुस्यां प्रजायेय" या श्रुतीत परमेश्वराने आपल्या बहुभवनाची कल्पना केली, असे जे सांगितले आहे, त्यावरून बहुभवनापूर्वी परमेश्वर एकरूपाने जो अकाल्पनिक होता तो काल्पनिक बहुरूप झाला; म्हणून अद्वैत सिद्ध असून द्वैत हे काल्पनिक

ठरते. कल्पना करणारा अकाल्पनिक ठरतो व बाकीचे कल्पनामात्र अस्तित्वरूप ठरते.

"आपली कल्पना संपूर्ण । ते माया जाण नृपवर्या ।"
(ए. भा. ३-६७)

असे नाथ म्हणतात. म्हणूनच प्रपंचाला जाणणाऱ्या ज्ञानावाचून सर्व प्रपंच मायिक आहे असे सर्व आचार्यादिकांनी म्हटले आहे. हा काल्पनिक प्रपंच आपण सत्य म्हणजे अकाल्पनिक समजतो व तेथे प्रेम करतो, हेच आपल्या दुःखाचे मूळ आहे. नाथ म्हणतात

"हा प्रपंच मुळीं झाला नाहीं । हें कळलें ज्याच्या ठायीं ।
तोचि देहीं विदेहि । निरस्तोपाधि पाही तो एक ।"
(हस्तामलक ११७)

सारांश, ज्ञानस्वरूप आत्म्याहून जीव-जगत् ह्या स्वतंत्र निराळ्या वस्तु आहेत हा समज संपूर्ण नाहीसा होऊन

"भिंतीवेगळे चित्र नुठी । तेवि मजवेगळी न दिसे सृष्टी ।
मी जगद्रूप जगजेठी । माझिया निजपुष्टी जगत्व जगा ।। "
"जगाचें जें नामरूप । तो मी परमात्मा चित्स्वरूप ।
माझ्या निजांगाचें स्वरूप । तें विश्वरूप स्वयें भासे ।।"

याप्रमाणे जगत्-जीव पूर्ण ब्रह्मस्वरूप आहेत असे प्रत्ययाला आले पाहिजे. द्वैताची लवलेशहि कल्पना न येणे-म्हणजे सच्चिदानंद ब्रह्माहून दुसरे कांही आहे असे यत्किंचित् कल्पनेत न येणे—याला निर्विकल्प अवस्था म्हणतात. अशी अवस्था झाली म्हणजे दुःख केव्हाहि भासावयाचे नाही. ही अवस्था प्राप्त होण्याकरिता द्वैताच्या सत्यत्वबुद्धीचा सपशेल नाश होणे अवश्य आहे. हेच जगत् मिथ्या

आहे अशा शब्दाने वेदान्तात सांगितले जाते. वेदान्तात " जगत् मिथ्या आहे " या वाक्याचा अर्थ, जगत् ब्रह्माहून यत्किंचित् निराळे नाही, ते पूर्ण ब्रह्मस्वरूपच आहे, असा आहे; हे मागे सांगितलेच आहे.

### भक्ति मुख्य साधन

" निर्विकार स्वरूपप्राप्ती । अवश्य पावणें आहे चित्ती ।
तैं करावी भगवद्भक्ती । उत्कटा प्रीति अविश्रम "

(ए. भा. अ. ३-७३८)

नाथांचे व सर्व साधुसंतांचे मते ही निर्विकल्प अवस्था सगुण परमेश्वरभक्तीवाचून प्राप्त होऊ शकत नाही. स्वतःच्या प्रेमासारखे किंवा तेहि गौण करून

" जीवाहूनिही वरौती । माझे ठायीं अत्यंत प्रीती "

असे परमेश्वराचे अत्यंत उत्कट व अविश्रांत प्रेम करणे याला नाथ 'भक्ति' म्हणतात.

एका परमेश्वरभक्तीने सर्व पुरुषार्थ साधतात, असे संतांचे म्हणणे असून

" या वै साधनसंपत्तिः पुरुषार्थचतुष्टये ।
तया विना तदाप्नोति नरो नारायणाश्रयः । "

असा पुराणांचाहि दावा आहे. साधुसंतांनी तिचाच प्रामुख्याने पुरस्कार केला. पण हे परमेश्वरप्रेम सर्वांनाच उपजत असते असे नाही. आत्मप्रेम सर्वांनाच आहे. तेच आत्मप्रेम–आत्मा व परमात्मा एकच असल्यामुळे, हे प्रगट गुह्य जाणून, भगवंताचे ठिकाणी बसेल असे उपाय करणे भाग पडते. ते उपाय म्हणजे भगवद्भक्ति प्रधान ठेऊन आत्मविचार करणे, विषयवैराग्याचा अभ्यास करणे, सत्संग करणे, श्रीगुरुपदिष्ट होणे, हे होत. ह्या सर्व उपायांचा

नाथांनी आपल्या ग्रंथातून मुमुक्षुकरिता उपदेश केला आहे. एकनाथी भागवतात नाथांनी निरनिराळ्या ठिकाणी मूळग्रंथाच्या अनुरोधाने ते ते साधन विस्तृत मांडले आहे. आणि प्रकरण ग्रंथातहि कांही विशिष्ट साधनांचा ऊहापोह केला आहे. परमार्थातील साधनश्रेणीचा विचार केल्यास पुढीलप्रमाणे त्यांचा क्रम दिसतो.

"मदर्पणें आवश्यक । करावे नित्यनैमित्तिक ।
तेचि चित्ताचे शोधक । साधन मुख्य परमार्थी ।"

(ए. भा. १०-६१)

प्रथम भगवत्प्रीत्यर्थ म्हणजे भगवत्प्राप्त्यर्थ विहिताचरण करणे. गीतेतहि असेच विधान आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजहि

"म्हणोनि आपले विहित । तेंचि देवाचे मनोगत ।
ते आचरतां निभ्रांत । सांपडे तो"

(ज्ञा. अ. १८)

असेच म्हणतात. गीतेत यालाच कर्मयोग हे नांव दिले असून भागवतादिकात याला भक्तियोग हे नांव आहे. ही भक्ति कर्ममिश्रित असल्यामुळे याला गौणभक्ति म्हणतात.

या स्वधर्माचरणाने मग

"यापरी स्वधर्मे जाण । ज्याचें शुद्ध अंत:करण ।
तो विषयीं उदासीन । हें ओळखण तयाचीं"

(ए. भा. १०-७४)

अशा निष्काम कर्मयोगाने म्हणा, अगर गौणभक्तियोगाने म्हणा, चित्त शुद्ध होते. चित्त शुद्ध झाल्याचे लक्षण असे आहे की विषयाचा वीट येऊन चित्त विषयाविषयीं उदासीन होणे व भगवंताकडे व त्याच्या स्वरूपविचाराकडे चित्त लावावेसे वाटणे. विषयांचा वीट

हे ‘वैराग्य’ होय व स्वरूपविचाराकडे प्रवृत्ति याला ‘विवेक’ म्हणतात. हे विवेक–वैराग्य पूर्ण परमेश्वर प्राप्ति होईपर्यंत जागृत ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

“विवेकावीण वैराग्य आंधळे । वैराग्यावीण विवेक पांगळे ।
(च. भा. ७४)

म्हणून यांचे रक्षण न झाल्यास पुढील प्रगतिच होणे शक्य नाही. यात मुख्य वैराग्य आहे. म्हणून त्यांचे संरक्षण मुमुक्षूने कसे करावे हे नाथांनी चिरंजीवपदात सांगितले आहे. मुमुक्षु जसा जसा परमार्थात पदाक्रमण करतो तसेतसे कामनिक लोक आपल्या कामनापूर्तीकरिता त्याची सेवा करून त्यांना विषय अर्पण करतात; पण मुमुक्षूचे ठिकाणी अनुतापपूर्वक जर प्रबल वैराग्य नसेल तर

“पांचही विषय जाण । जडलें संपूर्ण सन्माने ।”

पुन: साधक विषयात फसतो.

“मग जे जे जन वंदिती । तेचि त्याची निंदा करिती ।”

असे असूनहि “अनुताप नुपजे चित्तीं” व पूजा, सत्कार करणाऱ्यांच्या ममतेत गुंतून राहतो. मान, अपमान त्या गोष्टी प्रारब्धाधीन आहेत खऱ्या, पण प्रारब्धसुखभोग भोगतानाहि मुमुक्षूने आनंद मानता कामा नये. प्रारब्धप्राप्त सुखभोग आनंदाने भोगावे असा कोठे उपदेश नाही. जनसंग, स्त्रीसंग यांपासून दूर असावे. गृहस्थाने स्वस्त्रीवाचून इतरांची संगति सर्वस्वी टाकावी. नाथ म्हणतात–

“यालागीं कृष्णभक्तीशीं । ऐसी स्थिति असावी ”

शास्त्र ही भगवंताची आज्ञा आहे, असे समजून ती पाळण्याची जो आपली शिकस्त करतो त्याला भगवंतकृपेने भगवत्प्रेम प्राप्त

होत जाते. मुलगा आईबापांचे ऐकत नाही व आईबापावर त्याचे प्रेम आहे, असे होत नाही. स्त्री पतीचे मनोगताप्रमाणे वागत नाही, पण तिचे पतीवर प्रेम आहे, असे कोण म्हणेल ! सारांश, प्रेम करणारा, ज्याच्यावर प्रेम करायचे, त्याच्या सर्वस्वी स्वाधीन झाल्याखेरीज राहत नाही. म्हणून जसजसा पुरुष भगवदाज्ञैकपरायण होतो तसतसे ते भगवत्प्रेमच वाढीला लागते. येथे एक गोष्ट मुख्यत्वे करून लक्षात ठेवावयाला पाहिजे की, शास्त्र–संतांनी भगवत्प्राप्तीची जी साधने प्रगट केली असतील त्यावर, मुलाची आपल्या आईवर जशी नितांत श्रद्धा असते, तशी पूर्ण श्रद्धा मात्र पाहिजे.

"येथे भावेविण तत्वता । परमार्थू नये हाता ।"

हे निश्चित !

## सत्संग

ज्या ध्येयाची प्राप्ति करून घ्यावयाची, ते ध्येय ज्यांनी गाठले त्यांची संगति करावी, असे प्रत्येक ध्येयवाद्याला वाटतेच. भगवत्प्राप्तीचे ध्येय ज्यांच्या अंतःकरणात आहे त्यांनाहि, ती भगवद्भक्ति ज्यांना झाली त्यांची संगति करावी, अशी आवड उत्पन्न होते. ज्याप्रमाणे रुग्णालय हे प्रत्यक्ष वैद्यशास्त्राचे ज्ञान करून देणारे बहुमोल साधन, तसे परमेश्वराच्या प्राप्तीकरिता लागणारे प्रेम कसे करायचे हे सत्संगतीतच समजते. आपल्याहून इतरत्र खरे प्रेम करण्याची आपल्याला संवय नसल्यामुळे व प्रत्येक वस्तूवर प्रेम करतेवेळी आपले प्रेम मुख्य ठेवण्याचाच आपल्याला अभ्यास असल्यामुळे "आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवंति" भगवंताचे प्रेम कसे करावे याचे शिक्षण संतसंगतीतच मिळते व संतसंगति लागल्यापासूनच परमार्थमार्गास खरी सुरुवात होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम 38600 दि:



" संतसंगतीमेळे जाण । तात्काळ पावावया माझे स्थान ।
आणिक नाही गा साधन । सत्य जाण उद्धवा । "

(ए. भा. १२-४५)

प्राप्तपुरुषाची भेट होणे ही " व्याघ्रसिंहाचे दूध जोडे " याहूनहि अति दुर्लभ गोष्ट आहे. " ज्यासी भगवद्भक्तीची आवडी " लागली असेल, " त्यावरी भगवंताची आवडी " जडली असेल व " ज्याच्या पुण्याच्या कोडी " फलद्रूप झाल्या असतील, त्यांनाच भगवद्भक्ताची रोकडी भेट होते. अशा भगवद्भक्ताच्या संगतीत नामसंकीर्तन, हरिकथा इत्यादिकांची गोडी लागून ती वाढू लागते.

## सद्‌गुरु

या संगतीतूनच एखाद्या भगवद्भक्ताच्या पुढे मार्गोपदेशक म्हणून आपला संबंध जुळतो. हीच सद्‌गुरुप्राप्ति होय. " दे कृष्णीं प्रीति गुरु तोचि साच " असाच नाथांनी भागवतात गुरूचा निवाडा करून त्याला शरण जाण्यास सांगितले व ज्याला पूर्णानुभव नाही व संसारकामना वाढण्यास जे कारणीभूत होतात, अशा सर्वांची नाथांनी हजेरी घेतली आहे. भागवतात सद्‌गुरुमाहात्म्य वर्णन पुष्कळच आले आहे; पण नाथांनी सद्‌गुरुमाहात्म्यपर एक 'आनंदलहरी' नांवाचा स्वतंत्र प्रकरण-ग्रंथच लिहिला आहे. ज्यांना सगुण-निर्गुण ब्रह्माचा साक्षात्कार होऊन सगुणाच्या अवीट आवडीची प्राप्ति झाली अशा महात्म्यांना शरण जाऊन निष्कपट अंतःकरणाने त्यांची सेवा करून कृपा संपादन करावी. त्यांची कृपा झाली असता चारी मुक्ती दासी होतात.

" मृत्यूचे मूळ तुटे । नामस्मरणाचे खत फाटे ।
पापपुण्याची वाढी खुंटे । धरणे उठे काळाचे ।। "

उलट

" तैसे सद्‌गुरुकृपेविण । पावले मोक्षाचे सदन ।
भूतभविष्यवर्तमान । ऐकिलें नाहीं जनीं कोठें ।। "

आजकाल गुरुपरंपरेचे फारच वावडे होऊ लागले आहे. खरोखर परमार्थाची अत्यंत तळमळ नसल्यामुळे व परमार्थाला संसारसुखाचे साधन करू पाहण्याची प्रवृत्ति असल्यामुळे फसवे गुरूशी संबंध येऊन फारच फसगत होते. यात खऱ्या सत्पुरुषांचा काय दोष ?

" प्रारब्धवशास्तव जाण । एखादे अवचट दिसे चिन्ह ।
इतक्यासाठीं मुक्तपण । मानी कोण जगामाजीं । "

(ए. भा. अ. ११–४७९)

साधूचे आंगी जे सद्‌गुण सांगितले आहेत त्यांपैकी एखादा गुण, एखाद्याचे ठिकाणी, तो साधु नसताना सुद्धा, प्रारब्धाने राहू शकतो. तेवढ्यावरून साधू म्हटला जात नाही. खरी परमार्थाची तळमळ लागली असता व आपल्या बुद्धीची घमेंड नाहीशी झाली असता परमेश्वरकृपेने खऱ्या सद्‌गुरूची प्राप्ति होतेच. श्रीगुरूची उपासना करतेवेळी

" श्रीगुरूते पाहतां मनुष्यदृष्टी । ज्ञान नोहे गा त्रिशुद्धी ।

गुरुला मनुष्य मानू नये.

" श्रीगुरूचे ठायीं नीचपण । शिष्यें देखिलें असे जाण ।
अणुमात्र केलिया हेळण । ब्रह्मज्ञान कदा नुपजे त्या । "

(च. भा. १५७)

यत्किंचित् गुरूची अवज्ञा करू नये इत्यादि सेवेतील घातापाताविषयी नाथांनी सावधगिरीच्या सूचना दिल्या आहेत. खरोखरच ज्यांनी परमार्थ आकलन केला तो अज्ञानदृष्टीने मानव दिसत असला तरी साधकांनी

"जो चित्सुखें सदा संपन्न । चिद्रूपीं ज्यासी समाधान ।
तो चिन्मात्राहून भिन्न । नव्हे जाण सर्वथा ।।"

अशा विचाराने श्रीगुरूला सदेह सच्चिदानंदस्वरूप पाहावे व त्यांचे ठिकाणी आत्मप्रेमवत् निःसीम प्रेम करावे. ज्याला सद्‌गुरूला सदेह सच्चिदानंदस्वरूप समजता येत नाही त्याला स्वतः सदेहसच्चिदानंदस्वरूप होता येणार नाही. साक्षात् ब्रह्मच मुमुक्षुकरिता श्रीगुरूरुप धारण करते. "ब्रह्मैव गुरुरूपेणावतिष्ठते ।" अशी श्रुति आहे. सद्‌गुरूच्या सांनिध्यात, ज्या धर्माचरणाने साक्षात् भगवान प्रसन्न होतो, त्या सर्व धर्माचे अनायासे शिक्षण मिळते. (या शिक्षणाचे संपूर्ण वर्णन नाथांनी भागवतात तिसऱ्या अध्यायात केले आहे.) सत्संगाची गोडी वाढू लागते. त्यावाचून मनाला कोठेच बरे वाटत नाही. कोण्या भूताचे ठिकाणी दया करावी, मैत्री कोठे असावी हे भेद कळू लागतात. भगवंताचे आज्ञेप्रमाणे सर्व भूतांचे कल्याण तो पाहतो.

"धर्माणामविरोधेन सर्वेषां प्रियमाचरेत् ।"

असे भारतात सांगितले आहे. "ब्रह्मा मुंगी समसमाने" असले "तरी यथोचित विधान । सर्वथा जाण चुकेना" हे तत्व नीट उलगडत नाही. म्हणूनच हल्ली ब्रह्मघोटाळे सुरू आहेत.

"करितां यथोचित अर्पण । जरी क्रिया दिसे भिन्न भिन्न ।
तरी अंतर श्रद्धा अभिन्न । हें मुख्य लक्षण भागवतधर्मी ।।"

(ए. भा. अ. ३।३७७)

मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत सर्व भगवद्रूप असले तरी जोपर्यंत साक्षात् अनुभव येत नाही तोपर्यंत सर्वव्यापक भगवंताने ज्या भूताशी जसे वागायला सांगितले तसे, त्याचीच इच्छा म्हणून, त्या भूताशी आपण वागले पाहिजे. सर्वभूतस्वरूप परमेश्वराशी सर्वभूतरूप परमेश्वराचे आज्ञेप्रमाणे वागण्यात त्याची आज्ञा पाळली जाते. जप–तप–स्वाध्याय–ब्रह्मचर्य इत्यादि गुणांचे यथार्थ ज्ञान होऊन ते आंगी बाणत जातात. स्वाध्याय म्हणजे भगवन्नामाचे अखंड आवर्तन. याच्या योगाने सर्व सद्‌गुण आंगी बाणतात. गुरूच्या मुखाने आत्मा व परमेश्वरस्वरूपाचा विचारहि ऐकण्यात येऊन तो स्वरूपसाक्षात्कार करून घेण्याच्या इच्छेने एकांतवास, यथालाभ-संतोष यांचा अभ्यास करून स्वरूप विचारात त्याचे मन लागते. ते लागलेले मन पुन: पुन: देहावर येऊ नये म्हणून भागवतादि सात्विक शास्त्रांचे मनन होते. सगुण भगवंताच्या लीलांचे श्रवण, कीर्तन व त्याच्या लीला करण्यात गोडी उत्पन्न होऊन त्याचाच मनाशी व संतजनांशी संलाप सुरू होतात. अशा या अभ्यासाने

"हरिकथेची महिमा कैसी । आदरें पुसत्या सांगत्यासी ।
होती पुण्याचिया राशी । पाप वोखदेसी मिळेना ।"

निःशेष पाप नाहीसे होते. पुढे या

"साधनरूप भक्तीच्या युक्ती । पूर्ण सप्रेमे उपजे भक्ती ।"

सर्वत्र आसक्ति सुटून भक्तिप्रेमाने चित्ताला भगवत्स्वरूपाचे ठिकाणी स्थिर होण्याची इच्छा झाली की भगवंताच्या स्वरूपाचा विचार दृढ होण्यास काही प्रयास पडत नाहीत. अलंकारावर प्रेम असले तरी सोन्याची पारख नसलेला पुरुष जसा सोन्याचे समजून पितळेच्या अलंकारावरहि प्रेम करू पाहतो, तसे सगुण परमेश्वराचे प्रेम असून परमेश्वराच्या स्वरूपाची खरी ओळख

नसणाऱ्या पुरुषाचेहि होते; म्हणून अलंकाराची आवड अवीट राहण्याकरिता सोन्याची स्वरूपओळख होणे अवश्य आहे; तशी सगुणाची आवड अवीट होण्याकरिता त्याच्या निर्गुण स्वरूपाची ओळख होणे जरूर आहे. भगवद्भक्त नामदेवांना निर्गुण ज्ञानावाचून सर्व संतांनी कच्चे ठरविले, ही आख्यायिका प्रसिद्ध आहे.

### व्यतिरेक ब्रह्मज्ञान

सगुणाचा स्वरूपविचार यालाच ब्रह्मज्ञान म्हणतात. तोच स्वतःच्या जीवस्वरूपाचा विचार आहे. यालाहि ब्रह्मज्ञानच म्हणतात. शेवटील जी निर्विकल्प ब्रह्मस्थिति आहे ती प्राप्त करून घेण्याकरिता ब्रह्मज्ञान विचार आवश्यक आहे. निर्विकल्प अवस्थेत द्वैतस्फुरण नाही व अद्वैतस्फुरणहि नाही. ब्रह्मज्ञानविचारात द्वैतस्फुरण मिथ्या ठरविले जाते व भक्तीने अद्वैतस्फुरण विसरले जाते, असा यांचा उपयोग आहे. द्वैतस्फुरणात जीव, जगत् व ईश्वर यांचे द्वैत येते. जीव–जीव निराळे, जीव-ईश्वर निराळे, जीव-जगत् निराळे, ईश्वर-जगत निराळे असे अज्ञानदशेत पुरुष मानतो. हे सर्व प्रकारचे द्वैत खोटे ठरवून सर्व एकच वस्तु आहे असे ज्या ब्रह्मज्ञानाने ठरते तो ब्रह्मज्ञानविचार करण्याची पद्धति दोन प्रकारची आहे. त्याची सविस्तर मांडणी नाथांनी चतुःश्लोकी भागवतात दाखविली आहे.

"अन्वयव्यतिरेकाचें सूत्र । साधूनि साधक पवित्र ।
स्वयें झालें वस्तुचिन्मात्र । सदा सर्वत्र अविनाश ।"

(च. भा. ६२१)

अन्वय व व्यतिरेक ह्या दोन पद्धती होत. देह म्हणजेच मी व नामरूपात्मक प्रपंच खरा असे जे आपण समजतो ते खोटे, हे प्रथम व्यतिरेकाने समजते. ब्रह्मस्वरूपापासून सर्व प्रपंच झाला हे सर्व शास्त्रांचे म्हणणे आहे. ब्रह्म कारण व प्रपंच त्याचे कार्य जगत्, असा

त्यांचा कार्यकारणभाव आहे. नाथांना ब्रह्म व जगत् यांचा विवर्तरूप कार्यकारणभावच मान्य आहे, हे स्पष्ट आहे. ब्रह्माचा व जगताचा कार्यकारणभाव दाखविताना

"दोरा आंगीं सर्पाकारू । भासोनी निमाला भयंकरू ।
तो नातळतां सर्पविकारू । दोरू तो दोरू जैसा तैसा ।"

दोरीवर भासणारा सर्प जसा खोटा म्हणजे स्वतंत्र अस्तित्वयुक्त नाही, दोरीच सर्पाकार भासली.

"तेवि प्रपंचाची घडामोडी ।
माझिया स्वरूपीं न लगे ओढी ।"

तसे प्रपंचाचे असणे-नसणे माझ्या ठिकाणी मुळी नाही-म्हणजे भ्रमरूप विवर्त आहे.

आचार्यांनीहि हेच व्यतिरेकाचे तत्व

"यत्र यदध्यासस्तत्कृतेन दोषेण गुणेन वाणुमात्रेणापि
स न संबध्यते ।"

या भाष्यपंक्तीत मांडले आहे. सच्चिदानंद परब्रह्माला अलग करून पाहता प्रपंचवस्तु कांही शिल्लक राहत नाही. तसे ब्रह्माहून जगत् निराळे ठरत नाही. म्हणून ब्रह्म खरे व त्यावर भासणारे जगत् खोटे असे ठरविणे याला व्यतिरेक म्हणतात.

### अन्वयविचार

नामरूपाने भासणारे जगत अलग करून म्हणजे सत्, चित्, आनंद यांचा आधार न घेता केवळ सच्चिदानंदाचा अनुभव घेणे याला निर्गुण ब्रह्मज्ञान म्हणतात. हीच स्वरूपस्थिति "व्यतिरेक शुद्धस्वरूपस्थिति ।" असे नाथ म्हणतात. ज्या-

प्रमाणे घटापासून माती निराळी करून पाहिल्यास किंवा मातीचा व्यतिरेक केल्यास घट म्हणून वस्तु शिल्लक राहत नाही, त्याप्रमाणे घट म्हणजे काय याचा विचार केल्यास ज्या ज्या मातीचा घट बनला त्या मातीवाचून घट कांही निराळा दिसत नाही. घटात संपूर्ण मातीच असते, म्हणून घट म्हणजे मातीच होय. मातीलाच निराळ्या आकारात घट नांव आहे, असे विचारांनी ठरविणे याला अन्वय म्हणतात. "कारणापासून कार्य अभिन्न। या नांव अन्वय जाण" असे नाथांनी अन्वयाचे लक्षण केले आहे. व्यतिरेक व अन्वय या पद्धतीने कार्यकारणाचा विचार केल्यास माती खरी, घट खोटा किंवा भिंत खरी व चित्र खोटे असे ठरते. त्याप्रमाणे जगत् व ब्रह्म यांच्या कार्यकारणभावाचा विचार केला असता "ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या" हा आचार्यसिद्धान्त निष्पन्न होतो. वेदान्तात, व्यतिरेकाने जगत् ब्रह्माहून स्वतंत्र वस्तु नव्हे व त्याला ब्रह्माहून स्वतंत्र अस्तित्वहि सिद्ध होत नाही, असे दाखवून अन्वयाने मग जगत्, ब्रह्मवस्तुच होय, असे सिद्ध केले आहे. असे हे जीव–जगत्–ब्रह्म यांचे पूर्ण ऐक्य सिद्ध होते.

"जेविं तांब्याचा केला नाग। फणा पुच्छ मध्यभाग।
पाहतां तांबेचि सर्वांग। तेविं वस्तुपासूनिया जाणा ।।"
"माया महत्तत्व चिद्घन। भूते भौतिके चिद्रूप पूर्ण।
हें अन्वयलक्षण विरंची।"

(च. भा. ५८१–५८३)

व्यतिरेकमुखाने व अन्वयमुखाने असा दोन प्रकाराने ब्रह्मानुभव आचार्यांनी शतश्लोकीत सांगितला आहे.

"आदौ ब्रह्माहमस्मीत्यनुभवउदिते खल्विदं ब्रह्म पश्चात्।"

आधी व्यतिरेकाने मी ब्रह्म आहे (म्हणजे मीच सत् म्हणजे अविनाशी, चित् म्हणजे चैतन्यस्वरूप व आनंदस्वरूप आहे.) असा

अनुभव येतो व देहादिक प्रपंच सर्व खोटा ठरतो. मग अन्वयमुखाने सर्वच ब्रह्मस्वरूप आहे, असा अनुभव येतो. अन्वयमुखाने पूर्ण ब्रह्मानुभव आला म्हणजे ब्रह्मज्ञान पूर्ण झाले, असे समजावयाचे; पण या दोन प्रकारच्या विचारपद्धतीने निर्गुणसगुण अशा दोन्ही स्वरूपाचे ज्ञान होते. व्यतिरेकाने निर्गुण ब्रह्मप्रत्यय येतो व अन्वयाने सगुणब्रह्मप्रत्यय येतो. म्हणूनच नाथांनी

"माझी पावावया निजप्राप्ति । अन्वये करावी माझी भक्ति ।
व्यतिरेकें माझी स्वरूपस्थिति ।"

(च. भा. ५७६)

या ओवीत व्यतिरेकप्रत्ययाला निर्गुण व अन्वय प्रत्ययाला भक्ति म्हटले आहे. यात एक मौज अशी आहे की एक ब्रह्मच आहे, दुसरे काही नाही, हेच तत्व दोन्ही विचारपद्धतीने निष्पन्न होते. एकात नामरूपरहित ब्रह्मानुभव येतो व दुसऱ्यात नामरूपासह ब्रह्मानुभव येतो–म्हणजे नामरूपे ही ब्रह्मस्वरूपच ठरतात. आज आपल्याला जगाचा ब्रह्मरूपाने प्रत्यय नाही. विनाशी, जड, दुःखदायक व स्वतंत्र अस्तित्वाचा एक पदार्थ असे आपण जगत् मानतो व याच प्रत्ययाला धरून 'जगत्' हा शब्द वापरला जातो. जगत् खोटे म्हणून जो वेदान्तात निषेध दिसतो तो याच जगत्प्रत्ययाचा आहे– म्हणजे विनाशी, जड व दुःखरूप अशी स्वतंत्र अस्तित्वाची स्वतंत्र वस्तुच नाही, आहे ते सर्व ब्रह्मच आहे, असे वेदान्ताचे म्हणणे आहे. व्यतिरेकाने अशा जगताचे अस्तित्व उडविल्याशिवाय अन्वयाने सर्व ब्रह्म आहे, हा खरा अनुभव यावयाचा नाही. म्हणूनच सर्वत्र वेदान्तात अन्वयाच्या निरूपणापेक्षा व्यतिरेकाचे निरूपण विशेष आले आहे. व त्यामुळेच पुष्कळसे वेदान्ती नामरूपाला तुच्छ लेखून व्यतिरेकाने निर्गुण ब्रह्माचा प्रत्यय घेणारे किंवा हेच श्रेष्ठ मानणारे दिसतात. निर्गुणाइतकेच सगुणहि वेदान्तात निरुपाधिक ठरते, हे त्यांना समजत नाही.

"प्रपंच एक झाला होता । हें स्वरूपीं मिथ्या वार्ता ।
पुढें होईल मागुता । हेहि सर्वथा असेना ।"

हे अन्वयाचे बळावरच भक्त म्हणत असतात. यालाच वेदान्तात अजातवाद म्हणतात.

## विवर्तादि निरनिराळे वाद

आपल्या बुद्धीने स्वतंत्र विचार करणारे आज पुष्कळसे वेदान्ती आपण नवीन शोध लावला असे लोकांसमोर मांडण्याकरिता कांही तरी विलक्षणच प्रतिपादन करतात. मायावाद आचार्यांचा, स्फूर्तिवाद श्रीज्ञानेश्वर महाराजांचा, अजातवाद हा निराळा इत्यादिक त्यांची मते वेदान्ताचे यथार्थ ज्ञान नसल्यामुळेच होतात. वास्तविक यात कांही फरक नाही. एक निर्विकारी, निलेप असे सच्चिदानंद ब्रह्म आहे. ते विकार पावत नाही व त्यापासून कांही उत्पन्न झाले नाही, असाच सर्व वेदान्ताचा मतितार्थ आहे. तो सिद्ध करण्याकरिता ज्यांना विनाशी, जड, दुःखरूप जगत् अशी एक वस्तु आहे, असे वाटते त्यांना यथार्थबोध करून देण्याकरिता हे सर्व वाद निरनिराळ्या पातळीवर मानलेले आहेत. ब्रह्माहून निराळी जगत्‌वस्तु नाही, असे ठरविणे भाग असते. भासणारी जगत्‌वस्तु ब्रह्मावर भ्रमाने भासते असे मानल्यावाचून तिचे पृथक् अस्तित्व व पृथक वस्तुत्व नाहीसे करता यावयाचे नाही. या मायावादालाच विवर्तवाद, अध्यासवाद अशी दुसरी नांवे आहेत. हा व्यतिरेक झाला. या मायावादाचा अर्थ, सच्चिदानंद परब्रह्मावर भ्रमाने, विनाशी, जड अशी निराळी जगत्‌वस्तु भासते, ती मिथ्या म्हणजे अपृथक् सत्तावान व अपृथक् वस्तु आहे. या म्हणण्याचा विचार करू लागलो तर तेथेच आपल्याला अजातवाद दिसू लागतो. जगताला ब्रह्माहून निराळे अस्तित्व नाही व निराळे वस्तुत्व नाही. म्हणजे ब्रह्माचे अस्तित्व तेच जगताचे अस्तित्व व ब्रह्माचे वस्तुत्व तेच जगताचे

वस्तुत्व असे मायावादाने सिद्ध केले. अस्तित्व ब्रह्माचे व वस्तुत्वहि ब्रह्माचे, तर मग जगत् म्हणजे पूर्ण ब्रह्मच, असे सिद्ध होत नाही काय ? यालाच अन्वय म्हणतात. जगत् ब्रह्मच तर ब्रह्मापासूनच दुसरी जगत् वस्तु निर्माण झाली हे म्हणणे खोटे व ब्रह्मापासून ब्रह्म निर्माण झाले म्हणणेहि मूर्खपणाचे होईल. म्हणून ब्रह्मापासून कांही निर्माण झाले नाही व होऊ शकत नाही, हा अजातवाद मायावादातूनच निष्पन्न झाला.

अज्ञानदशेतून ज्ञानदशेत येईतोपर्यंत मायावादाचा प्रांत असून ज्ञानदशेनंतर अजातवादाचा प्रांत होय. यालाच श्रीज्ञानेश्वर महाराजांनी अमृतानुभवात स्फूर्तिवाद म्हटले आहे. ज्याला पूर्ण-ब्रह्मस्वरूप व्हावयाचे असेल त्याला क्रमाने या मायावाद व अजात-वाद या दोन्ही वादातून जावेच लागते. हा वाद विवक्षित ज्ञान्याचा नाही, सर्व ज्ञान्यांचा आहे. श्रीआचार्यांनीहि प्रथम मायावाद स्वीकारून ज्ञानभूमिकेवरून

" तरंगफेनभ्रमबुद्बुदादि सर्वं स्वरूपेण जलं यथा तथा ।
चिदेव देहाद्यहमन्तमेतत् सर्वं चिदेवैकरसं विशुद्धम् ।। "

सर्व नामरूपे ब्रह्मस्वरूप आहेत, असे म्हटले आहे.

" अतः सर्वात्मना सर्वव्यवहाराणां सर्वविकाराणां च
सत्यत्वं सतोऽन्यत्वे चानृतत्वम् इति न कश्चिद्दोषः "

ब्रह्मस्वरूपाने सर्व जगत् खरे असून ब्रह्माहून ते निराळे मानणे हे खोटे आहे, असे छांदोग्योपनिषदात आचार्य म्हणतात.

## भक्ति

व्यतिरेक ज्ञानपूर्वक भूमिका असून अन्वयज्ञान उत्तरभूमिका आहे. या अन्वयज्ञानाने जगत्कल्पना संपूर्ण मावळते आणि जो

नामरूपात्मक देखावा, जगत् म्हणून संबोधिला जात होता तो, नंतर व्यापक सगुणब्रह्म म्हणून बोलला जाऊ लागतो. नामरूपरहित ते निर्गुण ब्रह्म व नामरूपसहित ते सगुण ब्रह्म होय. ज्यांना नामरूपेहि पूर्ण ब्रह्मस्वरूप वाटत नाहीत ते व्यतिरेकज्ञानीच राहतात. आचार्यादिकांच्या वाङ्मयात व नाथादिक संतांच्या वाङमयात दृष्टीस पडणारा मोठा फरक म्हणजे आचार्यांच्या ग्रंथात भक्तिप्रेमाचे प्राधान्याने वर्णन नाही. ते संत वाङमयात ओतप्रोत भरलेले दिसते आणि नाथांनी तर असे स्पष्ट म्हटले आहे की,

"अन्वयस्थितीच्या भक्तीपरते । मज आन नाही पढियंते ।
मज वेगळे न देखे आपणाते । मद्रूपे जगाते चिन्मय देखे ।।

अन्वय भक्तिरूप असून भक्ति अन्वयरूप आहे. भक्तीवाचून अन्वय साधत नाही व अन्वयावाचून भक्ति साधत नाही. एका भक्तीवाचून भगवंताला प्रिय कांही नाही. ज्ञानाने म्हणजे व्यतिरेकाने निर्गुण ब्रह्माशी ऐक्य पावून अन्वयरूपभक्तीने सगुणाशी ऐक्य पावले असता मनुष्य पूर्ण ब्रह्म झाला. किंवा नाथादि संतांचे म्हणणे की, एका भक्तीनेच अथ पासून इति पर्यंत संपूर्ण परमार्थ हाती येतो. भक्ताला दुसऱ्या कोणत्याहि साधनाची आवश्यकता नाही. ज्याला भगवत्प्रेम उत्पन्न झाले नाही त्यानेच परमार्थाकरिता व भगवंताचे प्रेम उत्पन्न होण्याकरिता इतर साधनांचा अवलंब करावा. पण भक्तीच्या साह्यावाचून

"न करिता भगवद्भक्ति । सज्ञानाहि नातुडे मुक्ति" ।
"न करिता भगवद्भजन । ब्रह्मयासीहि मुक्ति नव्हे जाण ।
मा इतरांचा ज्ञानाभिमान । पुसे कोण परमार्थी" ।।

(ए. भा. ३।१८०)

मुक्ति होते असे नाथादिकांना संमत नाही. ब्रह्मज्ञान होण्याकरिताहि भक्ति पाहिजे. श्रवणमननादिकांना ब्रम्हज्ञानाचे

साधनत्व सांगितले असले तरी ते साधन भक्तीवाचून अज्ञाननिवृत्ति किंवा संसारनिवृत्ति करू शकत नाही, असे नाथादिकांचे म्हणणे आहेच. पण आचार्यादिकांना देखील हे मान्य आहे, हे "अपि च संराधने प्रत्यक्षानुमानाभ्याम्" या सूत्रावरून दिसते. "मोक्षकारण सामग्र्यां भक्तिरेव गरीयसी" असे त्यांचेच वचन आहे.

भक्ति गौण व मुख्य अशी दोन प्रकारची आहे. गौणभक्तिहि कर्ममिश्रित व शुद्ध अशी पुनः दोन प्रकारची आहे. सर्वकर्मसमर्पणरूप ही पहिली व भगवत्कथाश्रवण, भगवद्गुणगान, भगवन्नामस्मरण, भगवत्पूजन, भगवद्वंदन, भगवद्दास्य, भगवन्मैत्री ही शुद्धभक्ति होय. ह्या दोन्ही प्रकारच्या भगवद्भक्तीने

"सद्भावें करितां भगवद्भक्ति । भक्ति विरक्ति भगवत्प्राप्ति।
तिन्ही एकेकाळी होती".

प्रेम, भगवत्साक्षात्कार, विषयवैराग्य हे तिन्ही एकदम प्राप्त होतात. या तिघांच्या साहाय्याने मग आपली अहंता व ममता दोन्ही परमेश्वराला समर्पण होऊन येथे आत्मनिवेदनरूप भक्ति घडते. येथेच ब्रह्मसाक्षात्कार होतो. भगवत्प्रेमामुळे हा साक्षात्कार दृढ होतो. येथे सगुणनिर्गुण दोन्ही साक्षात्कार होतात.

"साधनरूप भक्तीच्या युक्ती । पूर्ण सप्रेम उपजे भक्ती"

ही गौणभक्ति करता करता प्रेमरूपभक्ति उत्पन्न होते व पुढे ज्ञानानंतर ही प्रेमभक्ति चालू राहते. तिच्या दाढर्याने सर्व नामरुपात्मक जगत्च पुढे सगुण ब्रह्ममय दिसू लागते.

कित्येक लोक असा आपेक्ष घेतात की, भक्तीमध्ये सगुणाचे आलंबन असते व सर्व सगुण ब्रह्मज्ञानविचाराने खोटे ठरत असल्याने ज्ञानाच्या पूर्वी सगुणाची भक्ति शक्य व आवश्यक

असली तरी ज्ञानानंतर तिची आवश्यकता नाही व ती शक्यहि नाही.

पण असे म्हणणाऱ्या लोकांना नाथांनी असा सवाल केला आहे की,

"नारदासी पूर्ण ब्रह्मज्ञान ।
त्यासी कां श्रीकृष्णमूर्तीचे ध्यान ।
श्रीकृष्णदेह चैतन्यघन ।
यालागी श्रीकृष्णभजन नारदा पढिये ।।"

ज्ञानापूर्वी जे सगुण आपण खोटे ठरवितो तेच ज्ञान झाल्यावर खरी असो किंवा खोटी असो जर सच्चिदानंद ब्रह्माहून निराळी वस्तु राहील तर आचार्य म्हणतात

"यद्यस्त्यद्वैतहानिः स्यात् द्वैतं न सहते श्रुतिः"

द्वैत कायमच राहिले आणि श्रुतीने तर पूर्ण अद्वैत सांगितले आहे. ज्ञान झाल्यावर माया, मायाकार्य, बंध, मोक्ष, बद्ध, मुमुक्षु, मुक्त या सर्वांचेच अस्तित्व केव्हा नव्हते व नाही असा अनुभव येतो. जे जगत् ज्ञानापूर्वी सच्चिदानंद ब्रह्माहून निराळी वस्तु आहे असे वाटत होते तेच जर ज्ञानानंतर

"म्हणून विश्वपण जावे । मग माते घेयावे ।
तैसा नव्हे आघवे । सकटचि मी ।।" (ज्ञा.)

नामरूपासह ब्रह्मस्वरूप भासायला लागते. तेथे परमेश्वराच्या रामकृष्णादिदेहाबद्दल बोलावयासच नको. आचार्यहि भौतिक वाटणारा देह

"मृद्रूपोहि यथा कुंभो तद्वत् देहोऽपि चिन्मयः"

देखील ज्ञानानंतर चिन्मात्र भासतो, असे म्हणतात. म्हणजे खोटे समजून टाकून देण्याची आवश्यकता नाही, असा ज्ञानेश्वर महाराजांच्या मताचाच अनुवाद आचार्य करतात.

सगुण, सच्चिदानंदाहून निराळे मानतो तोपर्यंतच खोटे. परब्रह्माशी ऐक्य केल्यावर परमेश्वराचे सच्चिदानंदत्व त्यालाहि मानणे भाग आहे. नाथ म्हणतात

"निर्गुणाहूनि सगुण न्यून । म्हणे तो केवळ मूर्ख जाण ।
सगुणनिर्गुण दोन्ही समान । न्यूनपूर्ण असेना ।।"

पण थोडा विचार केल्यास असे दिसेल की जसे

"विघुरलें तें तूप होय । थिजले त्यापरीस गोड आहे ।
निर्गुणापरीस सगुण पाहे । अति लवलाहे स्वानंदु ।।"

निगुणानंदापेक्षा सगुणानंद विशेष आहे, असे नाथांचे म्हणणे आहे.

### ज्ञानोत्तरभक्तीची आवश्यकता

कोणी ज्ञानी भक्ति करीत असले तरी सर्वांनी भक्ति केली पाहिजे का ? असाहि एक पुढे आक्षेप आणला जातो. नाथादि संतांचे असे म्हणणे आहे की,

"मायानिवर्तक ब्रह्म । हे संत सज्ञान बोलती"
"न करता भगवद्भजन । ब्रह्मज्ञान कदा नुपजे"
(ए. भा. अ. २–४५०–५१)

म्हणजे ब्रह्मज्ञानापूर्वी सगुण भगवद्भजन पाहिजेच. पण ब्रह्मज्ञान झाल्यावरहि निर्विकल्प सुखस्वरूप होण्यासाठी भक्ति पाहिजे. निर्विकल्प स्थिति बानवणे व ब्रह्मावाचून सर्व प्रपंचाचा विसर पाडणे हे ज्ञानाचे हाती नाही. ज्ञान येथे असमर्थ आहे. त्याची

कारणे श्रीज्ञानेश्वर महाराजांनी दिली आहेत. तीच नाथांनी दिली आहेत."

(१) "देहीचे जावोनि अहंपण । ब्रह्माहमस्मि स्फुरे स्फुरण ।
ते स्फूर्तिही विरे संपूर्ण । त्या नांव विज्ञान पूर्णत्वाचे।।"
"ते पावावया पूर्ण प्राप्ति । भावे करावी भगवद्भक्ति ।।"

'मी ब्रह्म आहे, असे जे ज्ञानानंतर वाटत असते तो ज्ञानाहंकार आहे."

"स्वरूप निर्विकल्प पूर्ण । ते मी म्हणावया म्हणते कोण ।"

ज्ञानदशेत अविद्याजन्य भेद नाहीसा झाला तरी विद्याभेद राहिलाच.

"विजातीयभेद मी देह म्हणणे । सजातीयभेद मी जीवपणे ।
स्वगतभेद मी ब्रह्मस्फुरणे ।"

ज्ञान प्राप्त झाल्यावर, मी देह, हा विजातीय भेद व मी जीव, हा सजातीय, हे दोन्ही मावळतात; पण "मी ब्रह्म" हे स्फुरण मात्र निर्विकल्प स्वरूपाचे ठिकाणी मी म्हणणारा दुसरा कोणी आहे असे दर्शविते. हे 'मी ब्रह्मस्फुरण' आपोआप नाहीसे होत नाही.

"ते पाया पडूनि मिया । सोडविले ।"

असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

"माझिया भक्तिचिया आवडी । अहं सोहं दोन्ही कडी ।
तुटली अभिमानाची बेडी ।"

भक्तीनेच, अहंब्रह्म हा व्यक्तिज्ञानाभिमान व सोहं हा व्यापक ज्ञानाभिमान दोन्ही नाहीसे होतात. दुसरा उपाय नाही.

(२) "नाप्रतीतिस्तयोर्बाध: किंतु मिथ्यात्व निश्चय: ।"
(पं. द. चि. दीप १३)

ज्ञान होणे म्हणजे नामरूपे न भासणे नव्हे. नामरूपे खोटे म्हणजे निराळ्या अस्तित्वाची निराळी वस्तु नव्हे, असे वाटणे होय असे विद्यारण्य म्हणतात–म्हणजे ज्ञान झाल्यावर समाधिव्यतिरिक्तकाली नामरूपे भिंतीवरील चित्राप्रमाणे भासतात, असे सर्व भक्तिविरहित ज्ञानी म्हणतात. नामरूपाचा जेव्हा भास होतो तेव्हा त्याला

"तेंचि स्वरूपी ठेवूनि मन । बाह्यस्फूर्तीचे स्फुरे भान ।
ते दशा गा व्युत्थान ।"

व्युत्थान म्हणतात. म्हणजे समाधिदशा राहिली नाही. समाधीत

"पावोनि निजसुखप्राप्ति । मनादि इंद्रियें उपरमती ।
अणुभरी स्फुरेना वृत्ती । समाधि बोलती या नांव ।"

इंद्रियादि सर्व वृत्तीव्यापारांचा निरोध असतो–म्हणजे पूर्ण निर्विकल्प अवस्था असते. पण सर्व निर्विकल्प एक ब्रह्मच जर आहे व ब्रह्म जर सत्य व सुखरूप आहे तर त्याठिकाणी ज्ञान्याला व्युत्थानकाली खोटे व उपेक्षणीय जे वाटते ते ब्रह्म की ब्रह्माहून निराळे काही, हा येथे प्रश्न येतो. ब्रह्म भासत असेल तर सत्य व परम प्रेमरूप ब्रह्म खोटे व उपेक्षणीय वाटणे शक्य नाही. अर्थात् ब्रह्माहून निराळेच काही तरी भासते; असे म्हणणे भाग पडते व ज्ञानीलोक

"बोधोत्तरकालं बाधित: स्वप्नप्रपंच: प्रागप्यसत्वेन प्रतीयमानोऽपि प्राक्कालसंबंधीतया स्मृत्या यथा विषयी क्रियते एवं वर्तमानप्रपंचोऽसत्वेनानुभूयमानोऽपि संस्कारवशात्"

या भासाला नामरूपजगताचाच भास म्हणतातहि; म्हणून ज्ञान्याला व्युत्थान अवस्थेत हा सर्व प्रपंचभास नाहीसा होऊन निर्विकल्पमति करणे हे नुसत्या ज्ञानाचे साहाय्याने शक्य नाही. हे कार्य भगवद्भक्तिच करू शकते.

कोणी म्हणतात, ज्ञान झाल्यावर व्युत्थानकाली निर्विकल्प अवस्था नसली तरी पुढे विदेहमुक्तीत तो निर्विकल्प होऊन राहील. मग भक्तिच कशाला करायला पाहिजे ?

या आक्षेपाचे आधीच नाथांनी उत्तर दिले आहे की, भक्तीवाचून तसे ज्ञानच होऊ शकत नाही व सगुण परमात्मा सच्चिदानंदघनच असल्यामुळे त्याचे ठिकाणी पूर्वीपासून लागलेले प्रेमहि पुढे सुटू शकत नाही.

(३) ज्ञानोत्तरभक्तीचे तिसरे कारण असे की,

घेऊनि षड्गुणैश्वर्यसंपत्ति । अवतरली श्रीकृष्णमूर्ती ।
यश श्री औदार्य कीर्ती । ज्ञान वैराग्यस्थिति अभंग" ।

सगुण परमेश्वराचे हे षड्गुणैश्वर्य निरुपाधिक असल्यामुळे या ऐश्वर्यानेच तो मायानियंता आहे. हे परमेश्वराचे मायानियंतृत्व,

"अवधारी गा रघुनाथा । तुम्हा अवताराची निजसत्ता ।
नये जीवाचिये हाता । जरी यथार्थता मुक्त जाहला ।"

(भा. रा. बा. कां. अ. ११)

मुक्त झाला तरी मुक्ताला प्राप्त होत नाही. तेच मायानियंतृत्व सामर्थ्य, ज्ञानोत्तर भक्तीने प्राप्त होते, असे

"मुक्तिवरील मागतां भक्ति । श्रीकृष्णाची अवतारशक्ति ।
मायानियंतृत्वाची पूर्ण स्थिति । उद्धवाचे हातीं स्वयें आली ॥"

नाथांनी या ओवीत सांगितली आहे. ज्ञानाने निर्गुणाशी व भक्तीने सगुणाशी ऐक्य पावल्यानंतर समाधि–व्युत्थान हे दोन्ही भाव जाऊन

"यालागीं समाधि आणि व्युत्थान ।
या दोन्ही अवस्थासहित जाण ।
बुद्धि होय ब्रह्मार्पण । अखंडत्वें पूर्ण परम समाधी ।। "

अखंड समाधि साधला जातो. ही अवस्था पूर्ण प्रेमरूप आहे.

"प्रेमाची जाति ऐसी । आठवूं येऊं नेदी आठवणेसी । "

प्रेमात जाणीवच शिल्लक राहत नसल्याने ब्रह्मपणासह सर्व द्वैत-अद्वैत विसरले जाते. हीच निर्विकल्प अवस्था, विदेहमुक्ति, परमप्रेमरूप भक्ति होय. या अवस्थेत आत-बाहेर भगवत्प्रेमावांचून काही नाही. ही पदवी प्राप्त करून देणे थोर राष्ट्रनेत्यांच्या हातात नाही. एवढचा थोरवीस आईबापहि पोहोचवू शकत नाहीत. ते एक नाथांसारख्या संतांच्या कृपेनेच होऊ शकते. अशा निःसीम कल्याण करणाऱ्या संतांचे उपकार

"काय सांगू मी या संतांचे उपकार ।
मज निरंतर जागविती ।।१।।
काय द्यावे त्यासी व्हावें उतराई ।
ठेविता हा पायीं जीव थोडा ।। २ ।। "

फिटणेच शक्य नाही. अशा अहेतुक दयाळु संतांचे उपकार न मानणाऱ्याहून कृतघ्न कोण असू शकेल ?

---

## आम्ही वैकुंठवासी आलों....९

आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी ।।
बोलिले जे ऋषि । साच भावें वर्ताया ।। (तु. गा.)

ही तुकाराममहाराजांची उक्ति आहे. यात "आम्ही" या अनेकवचनी पदाने श्रीतुकाराममहाराजांनी आपल्यासह आपल्या समान ज्ञानभक्तिसंपन्न असलेल्या सर्व सत्पुरुषांच्या अवतारांचे प्रयोजन काय व मूळ ठिकाण कोणते, हे निवेदन केले आहे.

### आम्ही वैकुंठवासी

अज्ञानी लोकांना आत्मोद्धाराचा मार्ग दाखविण्याकरिता या जगात प्रगट होणारे संत, प्रगट होण्यापूर्वी वैकुंठवासी असतात. 'वैकुंठ' हा शब्द भगवंतालाहि लावतात व त्याचे वास्तव्य असलेल्या लोकालाहि तो लावण्यात येतो. हा वैकुंठलोक "कही एकाधेनि वैकुंठा जावें । तें तिहीं वैकुंठचि केलें आघवें"
(ज्ञा. अ. ९-२०३)
" पूर्वजां वैकुंठमार्ग सोपा", "वैकुंठभुवनीं घर केलें"
" सर्वत्र वैकुंठ केले असे" (हरिपाठ अभंग) इत्यादि श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या वचनांवरून, प्रादेशिक व व्यापक असा दोन प्रकारचा दिसतो. भगवन्नामस्मरण, नामस्मरण करणारे भक्त व सगुण साकार भगवान हे तिन्ही जेथे राहतात ते वैकुंठ होय. भगवान, भक्त व नामस्मरण ही तीनहि एकरूप व नित्यच आहेत व म्हणून त्यांचे वैकुंठस्थानहि नित्यच आहे.

### चैतन्यमय वैकुंठ-कैलास

पंचकोशाचा विवेक करून नामरूपरहित होणारा आत्मसाक्षात्कार, देहाच्या अनुबंधाने होतो, म्हणून प्रथम तो एकदेशी असतो व तोच, विश्वातील सर्व नामरूपाचा व्यतिरेक करून झाला असता

व्यापक होतो. अर्जुनाला नेहमी दिसणारा सगुण परमात्मा व दिव्य दृष्टि देवून दाखविलेले विश्वरूप असे दोन प्रकारचे सगुणहि आहे, असे दिसते. त्याचा अर्थ असा की, ज्ञानाने दिसणारे व्यापकत्व प्रेमाकरिता एकदेशी होते, व्यतिरेकज्ञानाने जे एकदेशीय खोटे वाटते, तेच अन्वयज्ञानाने "सदात्मना तु सर्वं नामरूपादिकं सत्यमेव" या शंकराचार्यांच्या उक्तीप्रमाणे सत्य वाटत असल्यामुळे, प्रादेशिक वैकुंठलोक असो किंवा व्यापक वैकुंठलोक असो, सर्वच सत्य किंवा नित्य ठरतात.

ज्याप्रमाणे जगत् वास्तविक सच्चिदानंद ब्रह्म असताना अज्ञानी लोकांना ते जड व विनाशी वाटते, त्याप्रमाणे नित्य असे वैकुंठादि लोक अज्ञानी व सकाम उपासकांना नाशिवंत वाटतात. याविषयी नाथ म्हणतात–

"होतां ब्रह्मांड घडामोडी । वैकुंठ कैलास नलगे वोढी ।"
"तेथें नाहीं कळिकाळांचे गमन ।"
"सकळ ब्रह्मांडाबाहेरी । मायावरणाभीतरीं ।
वैकुंठ कैलास हर-हरी । स्वलीला करीं निर्मिजे ।।"

ब्रह्मांडाच्या उत्पत्तिनाशाबरोबर वैकुंठ-कैलासाचा उत्पत्ति-नाश होत नाही. जड-विनाशी अशा ब्रह्मांडाच्या बाहेर शुद्धसत्वात्मक मायावरणाच्या आंत वैकुंठ-कैलासाची रचना आहे.

"ऊंस गाळून काढिजे सार । आळवुनी कीजे साखर ।
तिचेहि नानाप्रकार । करिती नानाकार अति कुशल ।"
तेंचि चैतन्यचि निश्चितें । मुसावोनि श्रीभगवंते ।
वैकुंठ रचलें येथे । निजसामर्थ्यें नांदावया ।।"

नाथांच्या मते वैकुंठ-कैलास चैतन्यमय आहे.

## आलों याचि कारणासी

अशा चैतन्यमय वैकुंठात राहणारे श्रीतुकारामादि संत "बुडताहे जन पाहावेना डोळा" "जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती" या त्यांच्याच उक्तीप्रमाणे अपूर्णतेच्या दुःखात तळमळणाऱ्या जीवांचे हाल पाहावेनात म्हणून, लोकांना खऱ्या सुखाचा मार्ग दाखविण्याकरिता अवतीर्ण होतात. इतर अज्ञानी जीवाप्रमाणे ते कर्माच्या स्वाधीन होऊन कर्मफळ भोगण्याकरिता जन्म घेत नाहीत. त्यांना कर्म, जन्म व जगत् सर्वच भगवत्स्वरूप दिसत असते.

"तुका म्हणे आम्ही देखतच नाही ।
हरिवीण कांहीं दुसरें तें ॥"

ज्ञान व भक्ति यांच्या साहाय्याने त्यांची कर्मरूप बेडी केव्हाच तुटलेली असते व ते आपल्या मूळच्या परमेश्वरी स्वरूपाने पूर्णपणे स्वतंत्र होऊन राहिलेले असतात.

## संताचे कार्य म्हणजे लीला

"संचित क्रियमाण । भक्तां प्रारब्ध नाहीं जाण ।"

या श्रीतुकारामांच्या उक्तीप्रमाणे त्यांचे प्रारब्धकर्म देखील क्षीण होते. जगात इतर सामान्य माणसाप्रमाणे ते भोग भोगताना वगैरे जे दिसतात, ती त्यांची केवळ लीला असते. सामान्य अज्ञानी लोकांना परमेश्वरप्राप्ति आपल्या आटोक्याच्या बाहेर आहे, ते समर्थांचेच काम; आपले नव्हे, असे वाटू नये, म्हणूनच जन्मापासून देहत्यागापर्यंतची त्यांची सर्व लीला असते. उत्तम नट जसा कोणत्याहि पात्राची भूमिका बेमालूम करून दाखवितो, त्याप्रमाणे ज्ञानभक्तिपूर्ण झालेले संतच अज्ञान्याची भूमिका घेऊन प्रथमपासून शेवटपर्यंत परमेश्वरप्राप्ति कशी करून घ्यावी याचा साधनमार्ग स्वतःच्या आचरणाने दाखवित असतात. त्यांना साधनाची गरज

नसते. ते सिद्धच असतात. त्यांना जन्ममृत्यु नाही व त्यांचे देहहि भौतिक नसतात "सदेह सच्चिदानंद । कां न होवावे ते"

(ज्ञा. अ. १८–१६४५)

ते देहासहित सच्चिदानंदस्वरूप झालेले असतात.

"तुका म्हणे आतां । उरलो उपकारापुरता"

नित्यमुक्त परमात्मा जसा अवतार धारण करून सन्मार्ग दाखविण्याचे जगत्कार्य करीत असतो, त्याप्रमाणे तुकाराममहाराजादि संतहि स्वतःच्या आचरणाने इतरांना कृतार्थ होण्याचा मार्ग दाखविण्याकरिताच जगात प्रगट होतात. एवढे थोर उपकाराचे कार्य करण्यास त्यांच्यावाचून दुसरा कोणीहि समर्थ नाही.

### बोलिलें जे ऋषि

जीवाचे कल्याण म्हणजे सुख. ते दोन प्रकारचे आहे. अभ्युदय किंवा विषयसुख व अध्यात्मसुख किंवा मोक्ष, जीवमात्राला या कल्याणाची इच्छा आहे. पण मनुष्यालाच हे दोन्ही प्रकारचे कल्याण करून घेता येते. खरे कल्याण म्हणजे आत्मसुख करून घेणे हेच होय. त्याच्या अभावी मनुष्य विषयसुखाकडे धाव घेतो. सर्वत्र सुखरूप आत्माच भरला आहे. असा अनुभव आल्यावर एक आध्यात्मिक सुखच होऊन जाते. मग विषयसुखाचे नावच राहत नाही. जीवाला हे सुख प्राप्त नाहीं, म्हणूनच शास्त्रकारांनी त्याच्या प्राप्तीसाठी साधनमार्ग सांगितला आहे. त्याला 'धर्म' म्हणतात. हा धर्म ऋषींनी प्रगट केला असला, तरी त्यांनी आपल्या बुद्धीने तो निर्माण केला नाही. त्यांनी "ते ध्यानयोगानुगता अपश्यन्" ध्यानाने परमेश्वराच्या ठिकाणचा धर्म जाणून प्रगट केला. धर्म परमेश्वरापासून निर्माण झाला, हा वैदिकच समज आहे, असे नसून सर्व धर्मात तसाच समज आहे. सर्व धर्मसंस्थापकांनी परमेश्वराचे

ध्यान करून आपआपल्या अनुयायांना योग्य असा धर्म परमेश्वरापासूनच मिळविला आहे.

### संतांचे अवतार कशासाठी असतात

धर्म हा मुख्यतः खरे सुख जे आध्यात्मिक सुख ते मिळविण्याकरिताच निर्माण झाला आहे. पण विषयसुखाच्या आसक्तीमुळे जीव विषयसुख मिळविण्याकरिताच त्याचा उपयोग करतो. हा प्रकार अत्यंत वाढून मनुष्य जेव्हा आध्यात्मिक सुखाला अगदी विन्मुख होतो, तेव्हा त्याला अध्यात्मसुखप्रवण करण्याकरिता भगवंताचे व संतांचे अवतार होऊन ते परमेश्वराप्रीत्यर्थ निष्कामचित्ताने धर्माचरण करण्याचा उपदेश करतात व स्वतः तसे आचरण करून दाखवितात. यालाच गीतेत 'कर्मयोग' असे म्हटले असून भागवतात "भक्तियोग" म्हटले आहे. धर्माचे अनुष्ठान एकच पण ते विषयसुखाकरिता केले असता नाशिवंत सुख व ते सुख ज्या संसारात आहे तो संसार प्राप्त करून देणारे होते; आणि तेच भगवत्प्रीत्यर्थ निष्कामचित्ताने केले असता अखंड व अविनाशी असे अध्यात्मसुख प्राप्त करून देणारे होते, असे धर्मदृष्टया ऋषींचे म्हणणे आहे.

### साच भावें वर्ताया

धर्माचे अनुष्ठान म्हटले तर, धर्म काय, अधर्म काय हे समजायला पाहिजे. त्यावाचून धर्माचे अनुष्ठान होणे शक्य नाही. तो धर्म

"तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्य व्यवस्थितौ ।"

(श्री गीता १६-२४)

या भगवदुक्तीप्रमाणे शास्त्रावरून जाणून घेतला पाहिजे.

कोणी म्हणतात की, धर्माधर्माचा निश्चय बुद्धीने होऊ शकतो; पण बुद्धि व्यवसायात्मिका व अव्यवसायात्मिका अशी दोन प्रकारची आहे किंवा एकच बुद्धि दोन प्रकारची होते असे म्हटले तरी हरकत नाही. ज्या बुद्धीचा निश्चय, निश्चयाचे विषय पुष्कळ असल्यामुळे

बदलतो किंवा जी अनिश्चित निश्चयाची बुद्धि असते तिला अव्यवसायात्मिका बुद्धि म्हणतात. हीच सर्व संसारी पुरुषाची बुद्धि असल्यामुळे या बुद्धीने धर्माधर्मनिर्णय होऊ शकेल असे म्हटल्यास सर्व लोक धर्मानेच वागतात, असे म्हणणे भाग पडते. मग 'धर्माने वागा' असा कोणी कोणाला उपदेशच करू शकत नाही.

### धर्माधर्माच्या निर्णयाची कसोटी

व्यवसायात्मिका बुद्धीने धर्माधर्माचा निर्णय करता येतो, पण ही बुद्धि सर्वांना प्राप्त नसते व ती एकच प्रकारची असते. ज्याच्या ठिकाणी तिचा उदय होईल, त्याच्या ठिकाणी त्या बुद्धीचा विषय एक, निश्चय एक व निर्णयहि एकच राहतो. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

"तैसी दुर्लभ सद्बुद्धि । जिये परमात्माचि अवधि ।"

एका परमेश्वराच्या अस्तित्वाचा निर्णय करून त्याच्याचकडे ज्या बुद्धीची धाव असते ती व्यवसायात्मिका बुद्धि होय. ज्ञानभक्तीच्या योगाने या बुद्धीचा उदय होतो व अशा बुद्धीनेच धर्माधर्माचा निर्णय होतो, हे मनु इत्यादि सर्व शास्त्रकारांना मान्य असून "महाजनो येन गतः स पंथः" या वचनात ज्ञानभक्तिसंपन्न झालेल्या तुकाराम महाराजांसारख्या संतांनाच धर्माधर्माचा निर्णय करता येतो, असे सांगितले आहे. अशा या श्रीतुकाराम महाराजादि सत्पुरुषांचे वागणे

"जयांचिये लीलेमाजी नीति । जियाली दिसे"

(ज्ञा. अ. ९-१९२)

असे असते. या सत्पुरुषांचे बोलणे देखील "सहज बोलणें हितउपदेश" असे धर्माला धरूनच असल्यामुळे इतर सामान्य लोकांना जेव्हा धर्माधर्माचा निर्णय होत नाही, तेव्हा तो अशा सत्पुरुषांच्या वागण्यावरून, वचनावरून व उपदेशावरून होऊ शकतो.

## पंडित निश्चलदासजी – मत समीक्षण...१०

उत्तर हिंदुस्थानाकडे पंडित निश्चलदासजी म्हणून वेदान्ती होऊन गेले. वेदान्तातील बहुतेक संस्कृतग्रंथ यांच्या अवलोकनातून गेले होते. वेदान्तावरील सर्व ग्रंथकारांची मते यांनी आपल्या ग्रंथातून दिली असून आवश्यक तेथे विरोधी मतांचा समन्वयहि त्यांनी केला आहे. विचारसागर, वृत्तिप्रभाकर व युक्तिप्रकाश हे तीन त्यांनी केलेले मुख्य ग्रंथ आहेत. उत्तर हिंदुस्थानी पंडित म्हणून त्यांचे ग्रंथ हिंदी भाषेतूनच आहेत. अलीकडे पंडित निश्चलदासजीच्या या वरील ग्रंथांचा वारकरी संप्रदायात बराच अभ्यास सुरू झाला आहे. हे वरील ग्रंथ सर्व वेदान्तसिद्धान्ताचे व निरनिराळ्या ग्रंथकारांच्या मतांचे संग्राहक असल्यामुळे एकाच ग्रंथांत सर्व वेदान्त सिद्धान्त पहावयास मिळतात; म्हणून वेदान्ताचा अभ्यास करणाऱ्याला ते ग्रंथ उपयुक्तहि आहेत. यात शंका नाही. पण खेदाची गोष्ट ही की वारकरी पंथातील काही जसे पंडित निश्चलदासांचे ग्रंथाचे अवलोकन व अभ्यास करितात तसे आचार्यादिकांच्या किंवा समर्थासारख्यांच्या ग्रंथांचे अवलोकन करीत नाहीत.

### एकनिष्ठ भाव

वारकरी संप्रदायातील पुरुषांना या विषयी विचारले असता आम्ही वारकरी संप्रदायातील श्रीतुकाराम महाराजादि संतांचे एकनिष्ठ भक्त आहोत म्हणून दुसऱ्याचा द्वेष किंवा अनादर न करता आम्ही संतांचेच वाङ्मय अवलोकनात ठेवितो असे उत्तर देतात. पण पंडित निश्चलदासजीच्या ग्रंथांचा अभ्यास करताना यांचा एकविधभाव बिघडत नाही व दुसरे वेदान्त ग्रंथ वाचताना मात्र एकविधभाव बिघडतो हे एक न उलगडणारे आश्चर्य आहे.

वास्तविक पाहता निरनिराळे वेदान्त ग्रंथावलोकन वेदान्तसिद्धान्त समजण्याला उपकारकच ठरते. वेदान्त हा नुसता शब्दज्ञानाचा विषय नव्हे. त्यात मुख्य आत्मानुभवाचा हेतु असून तो घेण्याकरिता आपली बुद्धि निःशंक झाली पाहिजे व एका शुद्ध ब्रह्मवस्तूचे ठिकाणी सर्व विरोधाचा समन्वय करता आला पाहिजे व निर्विकल्प निरुपाधिक ब्रह्म वस्तूचा अनुभव घेता आला पाहिजे. पण हे सर्व आपल्या बुद्धीने साधणे शक्य नसते. त्याकरिताच ग्रंथावलोकन आवश्यक आहे. श्री ज्ञानेश्वरमहाराजादिक संतांचे ग्रंथातून ही कार्ये होऊ शकतात, पण तितका थोर सद्भाव त्यांचे ठिकाणी असायला पाहिजे. पण तो नाही हे संतवाङ्मयाबरोबर पंडित निश्चलदासजीसारख्या पंडितांच्या वाङ्मयाचे आम्ही अवलोकन करितो यावरून सिद्ध आहे.

### पंडित व संत

शब्द व्युत्पत्तीत प्रवीण असलेला पंडित म्हटला जातो व अनुभवप्रवीण संत म्हटला जातो. पुष्कळ पंडितांचे ग्रंथावलोकनाने वरवरचे सिद्धांत पंडितांना अवगत झाले तरी अनुभवाचे प्रांतात पंडित लंगडे पडतात; म्हणून त्यांचे ग्रंथात एखादा अपसिद्धान्त राहून जातो. संतांचे ग्रंथांत अनुभवाला धरूनच सर्व विवेचन असते व त्यांचे ग्रंथ सर्वतोपरी अचूक असतात व म्हणून प्रमाण असतात. संतांचे ग्रंथ जसे बिनधोक वाचता येतात तसे पंडितांचे ग्रंथ बिनधोक अभ्यासता येत नाहीत.

"यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिताह्यर्थाः प्रकाशंते महात्मनः ।।

(श्वेताश्वतर)

श्वेताश्वतर श्रुति म्हणते की परमेश्वरभक्तीवाचून भगवद्वाणीचा खरा अर्थ समजत नाही, म्हणून पुष्कळ पंडितांनी लिहिलेले ग्रंथ

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम.................... दि:
नों दि:



कोठे कोठे असेच चुकलेले आहेत व वाचकांनाहि भगवत्प्रेमाच्या अभावी खरे-खोटे सिद्धान्त निवडून काढणारी बुद्धि प्राप्त झालेली नसल्याने ग्रंथकाराला प्रमाण मानून त्यांनी जे लिहिले तेच प्रमाणभूत मानतात. अशा स्थितीत अपसिद्धान्तच, सिद्धान्त म्हणून ग्रहण केले जातात.

पंडित निश्चलदासजीचे ग्रंथ असेच व्युत्पत्ति व गाढ ग्रंथावलोकन यांच्या बळावर लिहिलेले आहेत. व त्यांच्या ग्रंथात संताला मान्य असलेल्या सिद्धान्ताचे दृष्टीने कांही प्रमाद झाले आहेत. पण पंडित निश्चलदासजीचे हे प्रमाद कसे झाले आहेत हे त्यांच्या ग्रंथांचा व संतवाङमयाचा अभ्यास असलेल्या वारकरी लोकांच्या दृष्टीस अजून पडले नाहीत, हे एक आश्चर्यच आहे. एवढेच नाही तर उलट पंडितजीचेच सिद्धान्त पुष्कळांच्या गळी उतरलेले दिसतात. याचे उदाहरण म्हणजे ह. भ. प. प्रल्हादबोवा सुबंध यांनी पंडित निश्चलदासजीच्या तिन्ही ग्रंथांचे मराठीत भाषांतर केले आहे; पण त्यातील कांही अपसिद्धान्त किंवा स्वविरोधी प्रतिपादन त्यांच्याहि लक्षांत आले नाही; पण संतांच्या ग्रंथाकडे विषेश लक्ष नाही, संतांच्या ग्रंथांचा व संतांच्या ग्रंथातील सिद्धान्ताचा उलगडा करणाऱ्या किंवा वेदान्तानुसार त्यांचे प्रामाण्य पटवून देण्याचा प्रयत्न करणाऱ्या आधुनिक श्री गुलाबराव महाराजासारख्या संतविभूतीचे ग्रंथांचा अभ्यास न करण्याचा अट्टाहास हेच एक याचे कारण होय. याचा परिणाम असा झाला की वारकरी पंथ अद्वैतभक्तिमार्गाचाच मुख्यतः पुरस्कर्ता असूनहि त्या पंथात अद्वैतानंतर भक्ति म्हणजे अर्थवाद होय किंवा अज्ञानी जनांचा बुद्धिभेद होऊ नये म्हणून एक लोकसंग्रहाची बाब म्हणून मानली जाऊ लागली व भक्तीपेक्षा ज्ञानालाच प्राधान्य देण्यात येऊ लागले आणि त्या अनुरोधानेच पुष्कळशा वारकरी अग्रणींच्या कीर्तनातून प्रतिपादन होत असे, पण अलिकडे श्रीगुलाबराव

महाराजांच्या ग्रंथाचाहि थोडा अभ्यास करणे सुरू झाल्यामुळे हे वारकरी अग्रणीहि थोडे सावध होऊन सगुण परमेश्वराचा उच्छेद करून निर्गुणरूपाचा व ज्ञानाचा बडेजाव प्रतिपादन करण्याच्या-ऐवजी सगुण परमेश्वराचा व भक्तिमार्गाचा बडेजाव वर्णन करायला लागले आहेत. पूर्वी ज्यांची कीर्तने ज्ञानाची महती व गाण्यानी भरली राहत असत, त्यांच्या कीर्तनातून आता भक्तीभाव मांडला जातो, इतका फरक झाला आहे.

### पंडित निश्चलदासजीचे प्रमाद

पंडित निश्चलदासजी आपल्या युक्तिप्रकाशातील "ईश्वरके निर्णयकी युक्ति" या तेहतीसाव्या युक्तीत म्हणतात.–

(१) सिद्धान्ती कहता है तुम जो ईश्वरके अवतार मानो हो सो अवतार ईश्वरके अंश करके होते है अथवा ईश्वर सर्व कलाहि अवतार लेता है. जो कहोगे कि ईश्वरके अंशकरके अवतार होते है तो ईश्वर अखंड होनेसे खंडाय-मान दोष आवता है और जो कहोगे कि समग्रहि ईश्वर संपूर्ण कलाओ करके अवतार लेता है तो एकदेशावच्छिन्न हुवा कि जहां अवतार लिया. और सो स्थान शून्य हुआ. मुमुक्षु कहता है इसका निर्णय तुमहि करो. सिद्धांती कहता है, रे भाई सुन जिस शरीरमे षड्भग होते है तिस शरीरकी अवतार संज्ञा है. षड्भगोका लक्षण कहते है "**ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः । ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इतीरिणाः**" संपूर्ण ऐश्वर्य, धर्म, यश, लक्ष्मी, ज्ञान और वैराग्य इन छटोको भग संज्ञा है. भग करके जो युक्त है सो भगवान् ईश्वर है... सो ईश्वर किसीने देखा है।

और जो कोई कहे ईश्वरका मरेपिछे दर्शन होगा, अथवा कहे की इस देहसे पूर्व देखा या तो कहो कि ईश्वरके दर्शनका यहि फल हुवा कि वारंवार जन्ममृत्युको प्राप्त भया. इससे परोक्ष का नाम ईश्वर है कि परदेहि मात्र है. इस विषे प्रमाण गीतामे कहा है सोई कहता हूं. '**दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम्**" इसका अर्थ कहते है, हे अर्जुन ! इन नेत्रोसे तुझको मेरा स्वरूप नहि दिखनेका, इससे मै दिव्यचक्षु देता हूं. तिन नेत्रोसें मेरा स्वरूप देखो. यह केवल परदेहीकी वार्ता कही है, कारण विश्वरूप प्रगट करके अर्जुन को बताया है. अर्जुनने अपनी बुद्धिके अवांतर विश्वरूप देखा है. देखो अर्जुनके एकदेशमे बुद्धि है तिस बुद्धि के अवांतर ऐसा विराट रूप देखा. इसमे विराटरूप कौन हुवा इसमे विराट अर्जुनहि भया. याते ऐसे महान् पूर्ण रूप हो करके तुच्छ और सावयव पाषाणादिककी मूर्ति है. तिनके आगे नाक रगडे है कि मै पतित हूं ! मेरा कल्याण करो वही मूढता है. ऐसा करनेसे ईश्वर जो है सो परदेहीका नाम कैसे है. यवनादिक मृतक शरीरको मृत्तिकामे दाब करके बडा स्थान बनाते है और अनेक प्रकारकी प्रार्थना करते है. जो पडदा उघाडकर देखे तो गले हुये अस्थि मात्र है.

**प्रश्न**–तुम कहते हो कि ईश्वर परदेही मात्र है तो शास्त्रमे ईश्वर कहा है.

**उत्तर**–जो ईश्वर कहा है सो केवल मूढ पुरुषको भय देनेके निमित्त कहा है. कारण तिसके भय करके मूढ

पुरुष शास्त्रसे विपरीत व्यवहार नहि वर्तेगा. कारण जो विपरीत व्यवहार वर्तेगा तो ईश्वर दंड देवेगा. और उपासनादिक जो कही है सो स्त्री पुत्रादिक जो पदार्थ है तिन्होकी उपासना छुडावने के अर्थ कही है.

हा एक प्रमाद झाला.

(२) दुसरा प्रमाद वृत्तिप्रभाकर या ग्रंथाच्या प्रथम प्रकरणांत आहे. पंडित निश्चलदासजी म्हणतात

"श्रुतिमें ईश्वरके ज्ञानादिकनकी उत्पत्ति कही है याने नित्य नही किंतु प्राणियोके कर्मनके अनुसार सृष्टीके आदिकालमें सर्व पदार्थनको विषय करनेवाला ईश्वरका ज्ञान उपजे है.

पुनः कांही प्रमादाचे विचार विचारसागरात आहेत ते असे–

(३) रामकृष्णादिकनकू जो मनुष्याकार मूर्ति है सो यद्यपि रूपवाली है तथापि सो मूर्ति मायारचित है मिथ्या सो मूर्ति ब्रह्म नहीं.

(४) पुराणमे रामकृष्णादिनकू ब्रह्मरूपता कही है सो तिनकी शरीर मूर्ति ब्रह्मरूप है इस अभिप्रायसे कहि है.

(५) रामकृष्णादिकनके शरीर यद्यपि साधु असाधु पुरुषनके पुण्यपापके अधीन है.

**अनुवाद**

ईश्वरविषयक निर्णय करणारी तेहतीसावी युक्ति––

सिद्धान्ती म्हणतो तुम्ही जे ईश्वराचे अवतार मानता ते अवतार

ईश्वराचे अंशरूप होतात की ईश्वर सर्व कलांसह अवतार घेत असतो. ईश्वराचे अंश अवतार होतात असे म्हणाल तर ईश्वर अखंड असताना तो खंडित होतो असा मानण्याचा दोष येतो आणि असे म्हणाल की संपूर्ण ईश्वर अवतार घेतो, तर जेथे ईश्वराने अवतार घेतला तेवढ्या देशापुरता एकदेशी होईल व दुसऱ्या ठिकाणी त्याचे अस्तित्व मानता येणार नाही. मुमुक्षु म्हणतो, याचे उत्तर तुम्हीच द्या.

सिद्धान्ती म्हणतो ऐक. ज्या शरीरात यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य हे सहा प्रकारचे ऐश्वर्य असते त्याला अवतार म्हणतात. हा ईश्वर कोणी पाहिला आहे काय ? कोणी म्हणेल की मेल्यावर त्या ईश्वराचे दर्शन होईल किंवा कोणी म्हणेल हा देह मिळण्यापूर्वी मी ईश्वराला पाहिले होते तर ईश्वराला पाहूनहि जन्ममृत्यु मिळणे हेच परमेश्वराचे दर्शनाचे फळ म्हणावे लागते. यावरून परोक्ष जी वस्तु तिचे ईश्वर हे नांव आहे की दुसरा कोणी देह धारण करणारा होय, याचे प्रमाण गीतेत सांगितले आहे. ते मी सांगतो. "अर्जुना ! मी तुला दिव्यचक्षु देतो त्याच्या योगाने माझे स्वरूप पहा." हे सर्व वर्णन दुसरा देह धरणाऱ्याचे आहे. कारण विश्वरूप प्रगट करून अर्जुनाला दाखविले आहे. गीतेमध्ये त्याचे स्वरूपहि सर्वत्र हातपाय वगैरे अवयव आहेत असे सांगितले आहे. हे व्यापक स्वरूप अर्जुनाने कसे पाहिले ? तोंड पाहून वर्णन केले असेल तर अर्जुनाचे शरीरहि तेवढे मोठे झाले असेल किंवा विश्वरूपाच्या सर्व बाजूस फिरून त्याला प्रदक्षिणा केली असेल तर असे कांही कोठे लिहिले नाही. जर तुम्ही म्हणत असाल की लिहिले आहे तर सांग. येथे द्रष्टा कोण होता व दृश्य कोण होता ? दृश्य विराट व द्रष्टा अर्जुन असेल तर दृश्य मोठे की द्रष्टा मोठा ? द्रष्टा दृश्यापेक्षा मोठा असतो हे प्रसिद्ध आहे. मुमुक्षु म्हणतो की तुम्हीच सांगा. विश्वरूप कसे पाहिले ? सिद्धान्ती–अर्जुनाने आपल्या

बुद्धीहून निराळे पाहिले. अर्जुनाचे एकदेशात बुद्धि आहे व बुद्धीहून निराळे विश्वरूप पाहिले म्हणजे असे विश्वरूप अर्जुनच झाला; म्हणून असे आपण व्यापक व पूर्ण असूनहि तुच्छ व सावयव अशा पाषाणादि मूर्तींच्या समोर नाक घासणे, मी पतित आहे, माझे कल्याण कर म्हणून रडणे हा मूर्खपणा आहे. मुसलमान लोक मृत शरीराला जमीनीत पुरतात व त्यावर थडगे करून प्रार्थना करतात. खोदून पाहिले तर अस्थींचा सांपळा आहे.

मुमुक्षु– तुम्ही म्हणता ईश्वर परदेही मात्र म्हणजे 'आपणच दुसरा देह धारण करणे होय' तर शास्त्रात ईश्वर सांगितला आहे ?

सिद्धान्ती–शास्त्रात जो ईश्वर सांगितला तो मूर्खांना भय उत्पन्न करण्याकरिता सांगितला आहे. त्याच्या भयाने पुरुष भलत्या मार्गाने वागत नाही.

(२) वृत्तिप्रभाकर प्रकरण ३ मध्यें पंडित निश्चलदासजी लिहीतात:– श्रुतीमध्ये परमेश्वराच्या ज्ञानादिकांची उत्पत्ति सांगितली आहे म्हणून नित्य नाही. परंतु प्राण्यांच्या कर्मानुसार सृष्टीच्या प्रारंभी सर्व पदार्थांना विषय करणारे ईश्वराचे ज्ञान उत्पन्न होते.

(३) रामकृष्णाची जी मनुष्याकार मूर्ति आहे ती जरी सावयव आहे तरी ती मायारचित आहे. मिथ्या आहे व ब्रह्मरूप नाही. पुराणादिकातून रामकृष्णाचे शरीर ब्रह्मरूप आहे असे सांगितले आहे ते ब्रह्मचैतन्य त्यांच्या शरीराचे अधिष्ठान आहे हे सांगण्याकरिता आहे. रामकृष्णादिकांचे शरीर साधूच्या पुण्यांच्या व दुर्जनाच्या पापांच्या अधीन आहे.

### स्वविधानांची विसंगति

पंडित निश्चलदासजी जाडे पंडित आहेत. थोर वेदान्ताचे व्यासंगी आहेत. पण त्यांनी युक्तिप्रकाशात ईश्वराचे खंडन केले आहे.

ते त्यानी आपलेच खंडन केले आहे. कारण विचारसागराच्या चवथ्या तरंगात निरनिराळ्या प्रक्रियांनुसार जीव ईश्वर यांची स्थिति वर्णन करताना ईश्वराचे मंडन केले आहे. भगवान् शंकराचार्यांच्या गीतेवरील भाष्याच्या आधाराने परमेश्वर मायेच्या योगाने अवतार शरीर घेतो, भगवंताचे शरीर भौतिक नाही मायामय आहे असे प्रतिपादन केले आहे. वृत्तिप्रभाकराचे प्रथम प्रकरणात ईश्वराचे ज्ञान नित्य नाही असे मानिले आहे, तर त्याच ग्रंथाच्या प्रकरण ८ मध्यें विवरणकारांचे मतानुसार ईश्वराचे विवेचन करताना ईश्वर व जीव यांचा बिंब प्रतिबिंब असा संबंध मानून पंडितजी म्हणतात--

"इस रीतिसे ग्रीवास्थ मुखमेंहि बिंब प्रतिबिंब भाव प्रतीत होते हैं. सो ग्रीवास्थ मुख सत्य है. यातै बिंब प्रतिबिंबका स्वरूप भी ग्रीवास्थ मुखरूप होते तै सत्य है. परंतु ग्रीवास्थ मुखते बिंबत्व प्रतिबिंबत्व धर्म मिथ्या है. इस रीतिसे विवरणकारके मतमें अज्ञानमें प्रतिबिंबित जीव है और बिंब ईश्वर है. याने ईश्वरभावकी प्राप्तिभी शुद्ध की प्राप्ति है."

**अनुवादः**--या रीतीप्रमाणे मानेच्या ठिकाणी असणाऱ्या मुखाचे ठिकाणीच बिंब प्रतिबिंब भासतात. मानेच्या ठिकाणी असणारे मुख सत्यच असते आणि बिंब प्रतिबिंब यांचे स्वरूपहि मानेच्या ठिकाणचे मुखच असल्यामुळे सत्यच आहे परंतु त्यांचे ठिकाणचे बिंबत्व व प्रतिबिंबत्व धर्म मात्र खोटे आहेत. या विवरणकारांचे रीतीप्रमाणे ईश्वराची प्राप्ति होणें म्हणजे शुद्धाचीच प्राप्ति होते, याचा भाव असा की शुद्धरूपच ईश्वर संज्ञेला प्राप्त होते व ज्या धर्माचे योगाने ब्रह्माला ईश्वर म्हणायचे ते धर्म शुद्ध

ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणीच येतात. ईश्वर शुद्ध ब्रह्मच असल्यामुळे ईश्वरातच जीव विदेह मुक्तीला जातो असे म्हणणे गैर नाही कारण

"आवरणस्वभाव अज्ञानकृत अल्पज्ञात्व जीवमें है, बिंबरूप ईश्वरमें स्वरूपप्रकाश तैं सर्वज्ञत्व है"

म्हणजे जीवाचे ठिकाणी अल्पज्ञता अज्ञानामुळे असते; पण ईश्वराचे ठिकाणी सर्वज्ञता स्वरूप प्रकाशामुळेच आहे. (वृत्तिप्रभाकर प्रकरण ८ प्रसंगांक २०२-२०३)

परमेश्वराचे ठिकाणी जी सर्वज्ञता मानली जाते ती सृष्टीतील जीवाच्या कार्याप्रमाणे फळ देण्याकरिताच मानली जाते. म्हणून बद्ध जीवाचे दृष्टीने ईश्वर सर्वज्ञ मानावा लागतोच पण मुक्त जीवाचे दृष्टीने देखील त्यांचे प्रारब्धाचा नियामक म्हणून ईश्वर मानावाच लागतो. एका मुक्तजीवाचे दृष्टीने जग नाही, कर्म नाही, जीव नाही हे जरी खरे असले तरी एका मुक्त जीवाबरोबर सर्वच मुक्त होत नाहीत म्हणून त्या जीवांचे दृष्टीने परमेश्वर मानावाच लागतो; म्हणून ईश्वर नित्यच मानावा लागतो. त्याचप्रमाणे त्याचे ज्ञानहि नित्यच मानावे लागते.

आता कोणी अशी शंका घेतील की परमेश्वराची सर्वज्ञता जगविषयीच असल्यामुळे जग आहे तोपर्यंत तो सर्वज्ञ हे मानिलेच आहे; पण जगाचा प्रलय झाल्यावर जगच राहत नाही मग सर्वज्ञतेचा उपयोग काय ? आणि तेव्हा परमेश्वर सर्वज्ञ नसतो पण सृष्टीच्या आरंभी पुनः सर्वज्ञता उत्पन्न होते असे मानिल्यास काय हरकत आहे ? पण हे म्हणणे मूर्खपणाचेच होईल. कारण जीव, जीवाची कर्मे व त्यांची शास्त्रानुसार मिळणारी फळे हे सर्व जेव्हा प्रगट होते किंवा व्यक्त होते तेव्हा जगत् म्हटले जाते, पण प्रलयात अगदी त्यांचा अभाव असतो असे मुळीच नाही. हे सर्व जगत् अव्यक्त

दशेला गेले की प्रलय म्हटला जातो. त्या अव्यक्तदशेत ही जगाची सर्व स्थिति सूक्ष्म असते किंवा आवरणरूप अज्ञानात किंवा मायेत लीन असते. या जगत्स्थितीचा अभाव ज्ञानाने होतो. आत्मज्ञान होईपर्यंत हा जगताचा पसारा व्यक्त व अव्यक्त होत राहतो. जीवाचे ठिकाणी आवरणरूप अज्ञान असल्यामुळे जीवाला तो जगताचा पसारा व्यक्त दिसत नाही; पण परमेश्वराचे ठिकाणी आवरणरूप अज्ञान नाही असे "ईश्वरमे आवरणका अंगीकार किसी अद्वैतवादके ग्रंथमे नहीं" पंडित निश्चलदासजी म्हणतात. (वृत्तिप्रभाकर प्र. ८ प्रसंगांक २११)

तेव्हा अज्ञान्याचे दृष्टीने अव्यक्त असलेले जगत् परमेश्वराला व्यक्तच राहिले पाहिजे व त्याला विषय करणारे किंवा जाणणारे ज्ञानहि परमेश्वराचे ठिकाणी प्रलयकाळीहि मानावे लागते. पुनः ब्रह्मदेवाच्या दिवसात सृष्टि असते व रात्रीत सृष्टीचा प्रलय असतो. हा ब्रह्मदेवाचा प्रत्येक दिवस व रात्र देवाच्या हजार वर्षाचा काळ इतकी असते. सृष्टि व्यक्त असताना सृष्टीचा हजार वर्षांचा काळ परमेश्वराला सर्वज्ञतेमुळे मोजता येणे शक्य आहे पण ब्रह्मदेवाच्या रात्रीत म्हणजे प्रलयात सर्व जीव जगत् लीन झाल्यावर रात्रीच्या हजार वर्षाच्या काळाची गणना करून पुनःसृष्टि उत्पन्न करण्याकरिता ब्रह्मदेवाला जागे करणारा प्रलयकालीहि राहला पाहिजे व त्याला ज्ञान राहणारच, ज्ञानाशिवाय कालगणना कशी होणार ? भगवान् शंकराचार्य म्हणतात "किमु वक्तव्यं तस्य नित्यसिद्धेश्वरस्य सृष्टि स्थितिसंहृतिविषय नित्यज्ञानं भवतीति" नित्यसिद्ध अशा परमेश्वराला सृष्टीच्या उत्पत्तिस्थिति प्रलय याचे ज्ञान राहते हे काय सांगायचे आहे ! अशा रीतीने पंडित निश्चलदासजीचे "सृष्टीच्या आरंभी परमेश्वराच्या ज्ञानाची उत्पत्ति होते हे म्हणणे वेदांताला धरून नाही. त्याचप्रमाणे अज्ञानी

मूर्ख लोकांना भय दाखविण्याकरिता ईश्वर शास्त्रात मानिला आहे, हेहि त्यांचे म्हणणे, त्यांच्या व इतर श्री ज्ञानेश्वरादि संतांच्या आणि आचार्यांच्या प्रतिपादनावरून ईश्वर सिद्ध होत असल्यामुळे वेदांताला अनुसरून नाही. ईश्वर कोणी पाहिला आहे ? हा त्यांचा नास्तिकपणाचा सवाल असून श्री ज्ञानेश्वरादि संतांच्या सगुण साक्षात्काराला खोटे ठरविणारा आहे; म्हणून त्याज्य आहे. आणि आपणाला साक्षात्कार झाला नाही म्हणून कोणालाच साक्षात्कार होत नाही किंवा आजपर्यंत झाला नाही हे मानणे अत्यंत मूर्खपणाचे आहे.

### अवतार अंशाने होतो काय ?

पंडितजीने ईश्वर अंशाने अवतार घेतो की संपूर्ण घेतो असा प्रश्न केला आहे. पण विचारसागराच्या चवथ्या तरंगात त्यांनीच भाष्यकाराचे वचन देऊन भगवंताचा देह मायाकार्य आहे असे सांगितले आहे, त्यांना त्याची आठवण नव्हती काय ? ब्रह्म अखंड, अफूट, अद्वैतरूप आहे असे श्री ज्ञानेश्वरमहाराजांनी अमृतानुभवात व आचार्यांनी मांडुक्योपनिषदात (मां. ३।२) सांगितले आहे हे पंडितजीस माहित नाही काय ? जर ब्रह्माला अंशच नाही तर परमेश्वर अंशाने अवतार घेतो किंवा सर्व अंशाने पूर्ण असा अवतार घेतो असा प्रश्न पंडितजीने कसा केला ? ब्रह्म जगद्‌रूपानें किंवा रामकृष्णादि विग्रहरूपाने अंशभूत झाल्यासारखे भासते पण अंशभूत होत नाही. सर्वदा पूर्णच राहते हेच दाखविण्याकरिता वेदान्तात मायावाद–विवर्तवाद मानला आहे. अफूट, पूर्ण, अद्वैत ब्रह्म, जगद्रूपाने नटले तरी देखील अफूट अद्वैतरूपच राहते, हा वेदान्तसिद्धान्त आहे. पंडितजीच्या विचारसागरादि ग्रंथातून व्यतिरेकपूर्वक निर्गुण ब्रह्माचे जितके सविस्तर वर्णन आले आहे तितके किंवा थोडे तरी अन्वयाचे व अन्वयाने नामरूपसहित होणाऱ्या सगुणाचे वर्णन नाही, म्हणून

हे ग्रंथ पूर्ण वेदान्त सिद्धान्त सांगणारे नाहीत. श्री ज्ञानेश्वर महाराज, नाथ महाराज, आचार्य यांच्या ग्रंथातून व्यतिरेक व अन्वय हे वेदान्तविचाराचे दोन्ही प्रकार दिसतात. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी व्यतिरेकपूर्वक निर्गुणाचे वर्णन करतांना

"रुप वर्ण व्यक्ति । नाही दृश्य द्रष्टा स्थिति"

असे जसे म्हटले तसेच अन्वयाने

"म्हणोनि वन्हि आणि ज्वाळ । दोन्ही वन्हीचि केवळ ।
तेवि मी गा सकळ । संबंध वाव ।।"

नामरूपसहित सर्व ब्रह्मच आहे असे सांगितले आहे. पुराणादिकांतून भगवंताच्या अवताराला अंश म्हटले आहे तो अंशासारखा दिसतो म्हणून म्हटले आहे. खरोखर परमात्मा अंशाने अवतार घेतो असा त्याचा अर्थ नाही. तसा अर्थ करणेच वेदान्तविरुद्ध होते. "कोणी म्हणतील मागल्या जन्मात आम्ही परमेश्वर पाहिला होता किंवा मेल्यावर पाहू" इत्यादि पंडितजींच्या कोटयाहि केवळ छलरूप आहेत. कारण तसे कोणीच म्हटले नाही व म्हणत नाही. अर्जुनाने विश्वरूप पाहिले ते एका ठिकाणी राहूनच पाहिले व ते अन्वयाने पाहिले असे श्री ज्ञानेश्वर माउलीने स्पष्ट सांगितले आहे.

"प्रथम स्वरूप समाधान । पावोनि ठेला अर्जुन"

म्हणजे पहिल्यांदा अर्जुनाला व्यतिरेक ज्ञानाने निर्गुण स्वरूपाचा साक्षात्कार झाला व त्याच अनुभवाला घेऊन

"सवेचि उघडले नयन । तंव विश्वरूप देखे"

नंतर डोळे उघडून पाहतो ते विश्वरूप दिसायला लागले म्हणजे सर्व नामरूपाने जो सृष्टीचा प्रत्यय येत होता तो सर्व नामाने व रुपाने परमात्माच नटलेला दिसू लागला. पंडितजीला अन्वयाचा

अनुभव नसल्यामुळे विश्वरूप कसे दिसू शकते हे समजले नाही; म्हणून त्यांना विश्वरूप भगवंताचे रूप खोटे वाटले व त्यामुळेच त्यांनी छलरूप कोटचा केल्या. पण श्रीज्ञानेश्वर महाराजादिकांना त्यांचा अनुभव असल्यामुळे विश्वरूप कसे पाहावे हे स्पष्ट सांगितले आहे. अनुभवी संत व पंडित यांत असा फरक असतो !

## मूर्तीपुढे नाक घासणे मूर्खपणा नाही

पंडितजी म्हणतात, आपण पूर्ण असताना तुच्छ पाषाणाच्या मूर्तीपुढे नाक घासणे व मी पापी म्हणून रडणे हा मूर्खपणा आहे. पण हे पंडितजीचे म्हणणेच मूर्खपणाचे आहे. कारण आपण पंडितजीसारख्या एखाद्या श्रेष्ठ पुरुषाला नमस्कार करितो तेव्हा त्या पुरुषाचे जड देहाला कांही नमस्कार करीत नसतो, त्या देहात असलेल्या चेतनाला नमस्कार करितो; त्याप्रमाणे रामकृष्णादिकांच्या शरीराचे जे नामरूप आहे ते व त्यांत जे परमेश्वर चैतन्य आहे ते सर्व अन्वय विचाराने पूर्ण ब्रह्म असल्यामुळे त्या भावनेने आपण पाषाणाच्या मूर्तीला नमस्कार करितो. पाषाणाला नमस्कार करीत नसतो. पाषाण हा नुसता तशी भावना करण्याकरितां आधार असतो. ज्ञानीपुरुषाला ब्रह्मज्ञान झाल्यावर पूर्वीचे पाषाणादिक ब्रह्मरूपानेच अनुभवाला येणे शक्य आहे. कारण एका ब्रह्मवस्तूवाचून बाकीच्या भासणाऱ्या सर्व वस्तु, ब्रह्मवस्तूवर कल्पित आहेत; हा वेदान्ताचा सिद्धान्त आहे हे पंडितजीने विचारसागर, वृत्तिप्रभाकर यांत सांगितले आहे.

ब्रह्म सोडून बाकीच्या वस्तूंचे हे कल्पित वस्तुत्व ब्रह्मज्ञानाने नाहिसे झाल्यावर, मग सर्व नामाने व रूपाने ब्रह्मवस्तुच एक अनुभवाला येते. नामरूपे ही कल्पित नाहीत तर नामरूपांचे ब्रह्माहून स्वतंत्र निराळे वस्तुत्व जे भासते ते कल्पित आहे. ते नामरूपाचे कल्पित अस्तित्व ब्रह्मज्ञानाने नाहीसे होते व नामरूपे

राहतात. ती ब्रह्मसत्तेवर भासतात व त्यांचे ब्रह्माशीच एका सत्तेमुळे ऐक्य होते. प्रथम जरी असा अनुभव नसला तरी पाषाणाच्या ठिकाणी कोरलेल्या भगवंताचे रूपाला नमस्कार करता करता वर सांगितलेला अनुभव येतो, असा सर्व भक्तांना अनुभव आला आहे. विद्यारण्यस्वामी म्हणतात

" अपरोक्षत्वयोग्यस्य न परोक्षमतिर्भ्रमः " ।

पुढे जो खरोखरच अनुभव येतो तसा अनुभव येण्यापूर्वी जर आपण भावना केली तर तो भ्रम नव्हे म्हणजे मूर्खपणा नव्हे ते परोक्षज्ञान होय. म्हणून पाषाण – मूर्तीचे ठिकाणी परमेश्वर समजून नाक घासून व दीन होऊन जी प्रार्थना करितो ती करता करता ती पाषाण–मूर्तिच परमेश्वराची मूर्ति अशी अनुभवाला येते. अशा या सगुण साक्षात्काराच्या मार्गाला पंडितजी मूर्खपणा म्हणतात, याला अनुभवरहित पंडिताई हेच कारण आहे.

### अवतार शरीर

रामकृष्णादिक अवतार शरीराविषयी तर पंडितजीच्या बुद्धीत घोटाळाच दिसून येतो " रामकृष्णादिकनकू जीवनते विलक्षणता ईश्वरता है । तोभी तिनका शरीर मायारचित है याते ब्रह्म नही मिथ्या है " असे पंडितजी एके ठिकाणी विचारसागरात तर तेथेच दुसऱ्या वचनाने " तैसे रामकृष्णादिकनके शरीर यद्यपि साधु असाधु पुरुषनके पुण्यपापके अधीन है " असेहि म्हणतात. "भाष्यकारने कृष्णशरीर मायाकार्य कहा है. तिनके शरीरनका उपादान कारण साक्षात् माया है " असेहि ते म्हणतात. रामकृष्णादिक जीवाहून निराळे आहेत कारण त्यांचे ठिकाणी ईश्वरता आहे असे जर पंडितजी म्हणतात, तर रामकृष्णांच्या ईश्वरतेमुळे रामकृष्ण नित्यज्ञानी

नित्यमुक्त म्हणजे नित्य ब्रह्मरूपच झाले मग त्या रामकृष्णांचे मिथ्या मायारूप शरीर कसे होऊ शकते ? हा प्रश्न वेदान्ताने सोडविला जाऊ शकत नाही. कारण नाथ म्हणतात

"सूर्य अंधाराते नाशी । परी तो सन्मुख नये त्यापाशी ।
तेवि माया नियंता हृषीकेशी । परी माया देवासी दृष्ट नाहीं
( ए. भा. अ. २५ । १९४ )

परमेश्वराचे ठिकाणी आवरण नाही व तो नित्यमुक्त आहे असे पंडितजी म्हणतात. मग त्याची मूळची सच्चिदानन्द निरुपाधिक स्थिति कायमच राहते असा त्याचा अर्थ होतो. त्या सच्चिदानन्दरूप परमेश्वराचे ठिकाणी त्रिगुणात्मक माया कशी राहणार ? ती राहणे शक्यच नाही. तर ती परमेश्वराचे शरीर तरी कसे होऊ शकेल ? वर नाथांनी म्हटल्याप्रमाणे सूर्यासमोर अंधार कधी येत नाही, तशी सच्चिदानन्द परमेश्वराचे शरीर बनून माया राहणे शक्य नाही. पुनः माया कारणरूपात इंद्रियगोचर होत नाही असे वेदान्ताचे म्हणणे आहे. मायाहि जगद्रूप कार्यावरून अनुमेय आहे. ती मूळ स्वरूपात गोचर होत नाही. मग माया हेच परमेश्वराचे शरीर मानल्यास परमेश्वराचे अवतार शरीर कोणालाच गोचर होऊ नये; पण अर्जुनादिकांना गोचर होते. अज्ञानदशेतच गोचर होते असे नाही तर ज्ञानदशेतहि अर्जुनादिकांना गोचर होत होते. तेव्हा परमेश्वराचे शरीर होते कसे ? हे वेदान्ताने सांगता येत नाही. रामकृष्णादि ईश्वरी अवताराचे शरीर मायाकार्य मानले तर मायाकार्य म्हणजे मायेचा परिणाम तो तर वेदान्तात भौतिकच मानला आहे. म्हणून भगवंताचे अवतार शरीर मायाकार्य आहे म्हटल्याबरोबर ते भौतिकच मानावे लागेल; पण पंडितजी म्हणतात--अवतारशरीर मायाकार्य आहे पण भौतिक नाही. एवंच मूळमायाहि भगवंताचे शरीर होऊ शकत नाही व मायाकार्य

म्हणजे मायेचा भौतिक परिणामरूपहि अवताराचे शरीर मानता येत नाही; म्हणून परमेश्वराचे शरीर लीलाविग्रह सच्चिदानन्दरूपच आहे असे म्हणणे भाग आहे. म्हणूनच ते तुच्छहि नाही. कारण तुच्छ असते तर श्रीज्ञानेश्वरमहाराजासारख्या मोठमोठ्या अनुभवी संतांचे तेथे प्रेम बसले नसते. तुच्छ वस्तूवर कधीच प्रेम बसत नाही. ज्ञानानंतर संसार तुच्छ ठरतो म्हणूनच तेथे मग प्रेम राहत नाही. तसे अवतार शरीराचे नाही. रामकृष्ण, विठ्ठल इत्यादि रूपाचे ठिकाणी श्री तुकाराम महाराज, नाथ महाराज यांनी परमप्रेमरूप भक्ति केली आहे. पूर्वी नारदांनीहि केली आहे. नाथ म्हणतात

"नारदासी पूर्ण ब्रह्मज्ञान । त्यासी कैसे श्रीकृष्ण भजन ।
श्रीकृष्ण देहो सच्चिदानन्दघन ।
म्हणूनि श्रीकृष्णभजन नारदा पढिये ।। "

भगवान् श्रीकृष्णाचा अवतार झाला तेव्हा त्याच्या अवतार-शरीराचा वसुदेवाला जो अनुभव आला तो वसुदेवाने

"विदितोऽसि भवान् साक्षात् पुरुषः प्रकृतेः परः ।
केवलानुभवानन्दस्वरूपः सर्व बुद्धिदृक्"

तो या श्लोकाने व्यक्त केला आहे. श्रीकृष्ण म्हणजे प्रकृतीच्या पलीकडे असणारा, सर्व बुद्धीचा साक्षी व केवळ चिदानन्दरूप जो परमात्मा तोच होय. जीव जरी वस्तुतः सच्चिदानन्द ब्रह्मस्वरूपच आहे व सच्चिदानन्द स्वरूप कधी न बदलणारे व अविनाशी आहे, तरी जीव हा आपले हे स्वरूप विसरला; म्हणून त्याला मायिक शरीर प्राप्त होते पण परमेश्वराला आपल्या मूळ सच्चिदानन्द स्वरूपाचा विसर होत नाही. मग त्याला मायामय देह घेणे कसे शक्य आहे ? समर्थहि म्हणतात,

“निर्गुणचि स्वभावे । सगुण होय”

निर्गुण परमेश्वर स्वभावत: म्हणजे मायेवाचूनच सगुण रामकृष्णदिकरूप होतो, मग “प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्म मायया” या गीतेतींल भगवान् श्रीकृष्णाच्या व

“स्वां मायां त्रिगुणात्मिकां अधिष्ठाय वशीकृत्य संभवामि”

या आचार्यांच्या म्हणण्याचा अर्थ कसा करायचा असा प्रश्न येथे उत्पन्न होतो. त्याचे समाधान असे भगवंताचे ठिकाणी जी भगवंताची म्हणून शक्ति आहे, त्या शक्तीचा, जीवाला अनुभव नाही. ती भगवंताची शक्ति जीवाला आत्मस्वरूपाचा विसर पडल्यामुळे, त्रिगुणात्मक माया रूपाने भासते म्हणून आपल्या शक्तीचा, जीवाला ज्या माया स्वरूपाने अनुभव आहे, त्याच रूपाने उल्लेख करून अर्जुनाला आपल्या शक्तीची ओळख करून दिली, त्या माया शक्तीला आपल्या स्वाधीन ठेवून परमात्मा अवतार घेतो. ती मायाशक्ति वस्तुत: चैतन्यच होय दुसरी नाही, असें

“संविदेव पराशक्तिर्नेतरा परमार्थत:”

(सूतसंहिता शिवमाहात्म्य खंड अ. ५ श्लो. १४)

या श्लोकात सांगितले आहे. त्या चैतन्य शक्तीनेच परमेश्वर अवतार घेतो. आचार्यानीहि गीतेच्या १४ व्या अध्यायांतील २७ व्या श्लोकावर टीका करतांना

“यया चेश्वरशक्त्या भक्तानुग्रहादि प्रयोजनाय ब्रह्म
प्रतिष्ठते प्रवर्तते सा शक्ति ब्रह्मैवाहम् ।”

ज्या परमेश्वराच्या शक्तीने परमेश्वर भक्तावर कृपा करण्याकरिता अवताररूपाने प्रगट होतो ती शक्ति ब्रह्मरूप आहे व ती शक्ति म्हणजे मीच होय असे म्हटले आहे. शक्ति एकच

आहे. ती परमेश्वराचे ठिकाणी चैतन्यरूप आहे. पण जीवाला त्रिगुणात्मक दिसते. जीवाला परमेश्वराच्या शक्तीचा ज्या रूपाने अनुभव आहे त्या रूपाने श्रीकृष्णानी तिचा उल्लेख केला व त्या शक्तीला आपल्या स्वाधीन ठेवून अवतार घेतो-म्हणजे जन्मतो असे सांगितले. वास्तविक भगवंताचा अवतार चैतन्य शक्तीने होतो व ती चैतन्यशक्ति नित्यच असल्यामुळे त्या शक्तीने भासणारा अवतारदेहहि नित्यच असतो. तो नित्य भगवद्देह जीवाचे ठिकाणी असलेली त्रिगुणात्मक माया, जन्मला असे भासविते. खरोखर भगवंताचा देह उत्पन्न होत नाही. असा आचार्यांच्या भाष्याचा आशय आहे.

पंडितजी म्हणतात,

"किंतु तिनके शरीरनका उपादानकारण साक्षात् माया है"

(विचारसागर–तरंग ४।२०७)

पण ही माया चैतन्यरूप घेतली तर अनायासे अवतार–शरीर ब्रह्मरूपच सिद्ध होते व माया म्हणजे त्रिगुणात्मक माया परमेश्वराच्या शरीराचे उपादान कारण आहे म्हटल्यास थोर प्रमाद होतो, कारण ते शरीर रज्जुसर्पाप्रमाणे भ्रमाचे कार्य होईल व ज्ञानानंतर त्या शरीराचा प्रत्ययच येणे शक्य नाही व असे भ्रमजन्य शरीर आत्मविस्मृतिशिवाय व कर्माशिवाय प्राप्तच होऊ शकत नाही. हा वेदान्ताचा सिद्धान्त आहे. पंडितजी म्हणतात, वेदान्तात कोणीहि परमेश्वराला आत्मविस्मृति व कर्मजन्य देहाची प्राप्ति मानित नाही. तेव्हा परमेश्वराचे शरीराचे माया उपादानकारण मानणे वेदान्त विरूद्ध आहे.

साधूच्या पुण्यकर्माने व दुर्जनाच्या पापकर्माने अवतारदेह होतो असे म्हणणेहि वेदान्ताच्या विरोधी आहे. स्वतःच्या कर्मा-

शिवाय दुसऱ्याच्या कर्माने उत्पन्न होणारे पदार्थ जड असतात हा वेदान्तसिद्धान्त आहे. साधु व दुर्जन यांच्याच केवळ कर्माने अवतार देह होतो असे म्हटले तर रामकृष्णादिकांचा देह जड होईल व त्या जड देहाचे ठिकाणी आत्मभ्रांति झाल्यावाचून म्हणजे तो जडदेह म्हणजेच मी असे वाटल्यावाचून त्या जडदेहाचा व्यापार होणे शक्य नाही; पण पंडितजी म्हणतात,

"जीवनकूं देहादिकनमें आत्मभ्रांति है रामकृष्णादिकनकूं नही."

जीवाना त्यांच्या त्यांच्या देहाचे ठिकाणी आत्मभ्रांति असते, पण रामकृष्णादिकांना देहाचे ठिकाणी आत्मभ्रांति नाही. आता कोणी निश्चलभक्त असे म्हणेल की रामकृष्णादिकांच्या शरीराचे उपादानकारण होणारी माया पंडितजीने शुद्धसत्वात्मक घेतली आहे, हे त्यांच्या "रामकृष्णादिकनकी उपाधि माया शुद्ध सत्व गुणवाली है" या वाक्यावरून दिसते. पण शुद्ध सत्व गुणवाली माया म्हणून निराळी कोणती शक्ति आहे काय? याचा विचार करू. परमेश्वराची एकच शक्ति आहे. ईश्वराचे ठिकाणी एकापेक्षा अधिक शक्ति नाही.

"परास्यशक्तिर्विविधैतां श्रूयते".

परमेश्वराची एकच शक्ति विविधप्रकारचे कार्य करणारी आहे, असे श्रुतीत म्हटले आहे. शुद्धसत्व गुणवाली माया म्हणजे मायाशक्ति त्रिगुणरहित झाली की तिला शुद्धसत्वात्मक मायाशक्ति म्हणतात, परमेश्वराला विसरलेल्या जीवाचे ठिकाणी परमेश्वराची चैतन्यशक्ति त्रिगुणात्मक भासते व जीव त्रिगुणरहित झाला म्हणजे तो शुद्धसत्वगुणी होतो. जीवाच्या पूर्वीच्या त्रिगुणात्मक माया-उपाधीच्या दृष्टीने त्याच्या त्रिगुणरहित स्थितीला शुद्धसत्वात्मक

अनुक्रम 38000 दि:
क्रमांक 9400



मायास्थिति म्हटली जाते; पण वास्तविक त्याची चैतन्यमय स्थिति असते. या शुद्धसत्वगुणाच्या स्थितीला काय धर्म असतात हे आचार्यांनी सांगितले आहे. ते म्हणतात,

"शुद्धस्य सत्वस्य गुणाः प्रसादः स्वात्मानुभूतिः
परमा प्रशांतिः ।
तृप्तीः प्रहर्षः परमात्मनिष्ठा यया सदानन्द रस
समृच्छति ।।"

शुद्ध सत्वाचे हे गुण आहेत. सदा मन प्रसन्न राहणे, अखंड आत्मानुभव, चित्त अत्यंत वासनारहित असणे, तृप्ति, परमानंद, परमेश्वराकडेच चित्त लागून राहणे, अखंडानन्द स्थिति. जीवाचे ठिकाणी प्रथम त्रिगुणात्मक मायेची स्थिति असते व ती आत्मज्ञानाने नाहिशी झाल्यावर त्याचे ठिकाणी जीवन्मुक्तस्थितीत शुद्धसत्वात्मक माया राहणे शक्य आहे. पण परमेश्वराचे ठिकाणी केव्हाच त्रिगुणात्मक माया नाही, म्हणून तिची निवृत्ति होत नाही; मग परमेश्वराच्या अवतार शरीराचे ठिकाणी शुद्धसत्वगुणवाली माया उपादानकारण मानणे म्हणजे त्या शुद्धसत्वगुणी मायेला चैतन्य-शक्ति हेच नांव द्यावे लागणार नाही का? किंवा परमेश्वराच्या चेतनशक्तीला त्रिगुणात्मक मायेच्या अपेक्षेने शुद्धसत्वात्मक माया म्हटले गेले असे म्हणावे लागणार नाही काय? म्हणून शुद्ध-सत्वात्मक मायाकार्य भगवंताचे अवतार शरीर मानिले तरी चेतन ब्रह्मरूपच सिद्ध होत असल्यामुळे अवतारशरीर तुच्छ, मिथ्या ठरत नाही. आचार्यांनी जे शुद्धसत्वगुणाचे धर्म सांगितले आहेत त्यापैकी कोणताहि धर्म तुच्छ किंवा मिथ्या नसून ब्रह्मज्ञान्याचे ठिकाणीहि नित्य राहणारे आहेत व त्यापैकी परमात्मनिष्ठा हा जो धर्म सांगितला आहे तो सगुणाचे ठिकाणी चित्तवृत्ति जाणे हा त्याचा अर्थ आहे. सारांश, केवल व्यतिरेकात्मक वेदान्त विचार करणारे जे लोक

असतात त्यांना नामरूपरहित निर्गुण स्वरूपच एक खरे स्वरूप वाटते व पंडित निश्चलदासजीचे तसेच झाले आहे. वास्तविक पाहता श्रीज्ञानेश्वरादि संतांचे असे म्हणणे आहे की दोन्हीं सगुण निर्गुण रूपे निरुपाधिक व स्वाभाविक आहेत, असाच ब्रह्मज्ञानाने अनुभव येतो, वेदान्तदृष्टीने व अनुभवदृष्टीने पंडित निश्चलदासजीच्या विचारसागरादि ग्रंथापेक्षा श्रीज्ञानेश्वरादि संतांचे ग्रंथ अतिश्रेष्ठ आहेत. पण त्यांचे श्रेष्ठत्व कसे व कोणत्या बाबतीत आहे याची मीमांसा ज्या श्रीगुलाबराव महाराजांनी आपल्या ग्रंथातून केली आहे ते त्यांचे ग्रंथ अभ्यासिल्यावाचून कळणे शक्य नाही. श्रीगुलाबराव महाराजांनी आपल्या ग्रंथातून, श्रीकृष्णादि अवतार शरीराचे निरुपाधिकत्व, चिदानन्दमयत्व, पूर्णत्व कसे आहे व त्यांची प्रेमभक्ति केल्यावाचून व्यतिरेक ज्ञान्यांचे ठिकाणी राहणारा अविद्यालेश कसा नाहिसा होत नाही व निर्विकल्प सहजावस्था कशी बाणत नाही हे वेदान्तसिद्धान्ताला धरून सिद्ध केले आहे.

कित्येक वारकऱ्यांना असे जर विचारले की तुम्ही इतर संतांचे ग्रंथ कां अभ्यासित नाही? त्यावर त्यांचेकडून असे उत्तर येते की आमचा एकविधभाव आहे. पण इतर संतांचे ग्रंथ वाचल्याने एकविधभाव कसा बिघडतो हेच समजत नाही. तुकाराम महाराजांनी प्रभु श्री दत्तात्रय महाराजांना वंदन केले आहे व "विठ्ठल गणपति दुजा नाही" म्हणून प्रतिपादन केले आहे; पण त्यांचा एकविधभाव बिघडला नाही. मग त्यांना पूज्य मानणाऱ्या इतर वारकऱ्यांना एकविधभाव बिघडतो असे कां वाटावे? श्री ज्ञानेश्वर महाराजांनी "देवा तूंचि गणेश" म्हणून भगवंताचे वर्णन केले आहे. त्यांचा एकविध भाव नव्हता काय? आपले इष्ट उपास्य जे असते त्याची सर्वत्र भावना केली असता आपल्या चित्तात इष्टदेवतेचीच भावना राहत असते म्हणून तसे करण्यात एकविधभाव

मोडत नाही. " देवा तूचि गणेश " येथे माऊलींनी व "विठ्ठल गणपति दुजा नाही " येथे तुकाराम महाराजांनी हेच तत्त्व स्वीकारले आहे. अशी भावना न करता एकटे उपास्य घेऊन बसले असता आपल्या उपास्याची व्यापकता आपल्या अनुभवाला येऊं शकत नाही. उपास्याची भावना चित्तातून नाहीशी होऊन दुसरे उपास्य चित्तात शिरले तर एकविधभाव बिघडतो; पण सर्वत्र आपल्या उपास्याची भावना केल्यास आपले उपास्यच चित्तात राहते म्हणून एकविधभाव कायम राहतो.

### श्री ज्ञानेश्वर महाराजांचे मत

या अवतार शरीराविषयी प्रत्यक्ष श्री ज्ञानेश्वर महाराजांनी कांही उलगडा केला आहे काय हे पाहणे आता जरूर आहे. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी,

" हे अवतार जे सकळ । ते जिये समुद्रीचे कां कल्लोळ ।
विश्व हे मृगजळ । जया रश्मीस्तव दिसे " (ज्ञा. ११-१८०)

या मध्ये अवतार शरीरांची खूण सांगितली आहे. ते म्हणतात भगवंताचे विश्वरूप हा समुद्र असून भगवंताचे रामकृष्णादिस्वरूप या विश्वरूप समुद्रावरील तरंग आहे आणि जगत् हे त्या विश्वरूपाच्या किरणामुळे भासणारे मृगजळ आहे. या ठिकाणी माऊलीने भगवंताच्या सगुण साकार भगवद्देहाचा सगुणसाकार जगताहून निराळेपणा दाखविला आहे व निराळेपणा दाखविण्याकरिताच भगवत्शरीराला व जगताला जलतरंगाचा व मृगजळाचा असे दोन भिन्न दृष्टांत दिले आहेत. भगवंताचे अवतार शरीर व जग यात कांही फरक नसता तर एका मृगजळाचाच दोघांनाहि लागू पडणारा दृष्टान्त दिला असता; पण माऊलीने तसे केले नाही. भगवंतांनी अर्जुनाला जे विश्वरूप दाखविले ते कांही अध्यस्त, तुच्छ व ज्ञानाने

ज्याची निवृत्ति होईल असे नव्हते. हे माऊलीच्या म्हणण्यावरून स्पष्ट दिसते. दिव्य दृष्टि दिली नाही तोपर्यंत अर्जुनाला विश्वरूपाचा प्रत्यय आलाच नाही. दिव्य दृष्टि दिल्यावर तो विश्वरूप पाहू लागला. ही दिव्य दृष्टि म्हणजे काही मायिक दृष्टि नव्हे; कारण श्री ज्ञानेश्वर माऊली म्हणते की,

"ऐसी श्रीमुखौनि अक्षरे । निघती ना जव एकसरे ।
तव अवघेचि आंधारे । जावोचि लागे" ।

भगवंतांनी मी तुला दिव्य दृष्टि देतो अशी तोंडातून अक्षरे काढल्याबरोबर अर्जुनाचे ठिकाणची अविद्या पार नाहीशी झाली. माऊली म्हणते की, भगवंताचे तोंडातून निघालेली ती अक्षरे नव्हती तर परब्रह्माचे साम्राज्य म्हणजे सर्व व्यापकस्वरूप दाखविणारी प्रकाश ज्योति होती.

"मग दिव्यचक्षु प्रकाश जाहला ।
तया ज्ञानदृष्टी फांटा फुटला ।
यापरी दाविता झाला । ऐश्वर्य आपुले"

दिव्य दृष्टीने अर्जुनाची दृष्टि ज्ञानदृष्टि झाली तेव्हा भगवंताचे ऐश्वर्य पाहू शकला. अर्थात् विश्वरूप हे ज्ञानदृष्टीनेच दिसणारे आहे हे सिद्ध आहे. याचाच उलगडा पुढे माऊलीने पुनः केला आहे.

"प्रथम स्वरूप समाधान । पावोनि ठेला अर्जुन ।
सवेचि उघडले लोचन । तव विश्वरूप देखे"

भगवंताच्या कृपा प्रसादाने प्रथम अर्जुन व्यतिरेकाने सर्व देहादिकांहून निराळा होऊन आपल्या आत्मस्वरूपाशी ऐक्य पावला. हा अनुभव घेऊन व ती ज्ञानदृष्टि घेऊनच डोळे उघडले, तेव्हां

त्याला सर्व नामरूपांत भगवंतच भरलेला दिसू लागला. व्यतिरेकाने आत्मस्वरूप झाल्यावर अन्वयाने विश्वरूप पाहिले जाते असा अर्थ.

“ इहीच दोही डोळा । पहावे विश्वरूपा सकळा । ”

व्यतिरेक व अन्वय या दोन डोळ्यांनी विश्वरूप दिसते असे माऊलींनी स्पष्ट केले आहे. या विश्वरूपदर्शनात अर्जुनाला पहिल्यांदा सर्व प्रपंचरचनेचा भास झाला नाही,

“ म्हणे केवढे गगन तेथ होते । ते कवणे नेले पां केतुके ।
ती चराचर महाभूतें । काय जाहली ”

हे या ओवीवरून स्पष्ट आहे.

पंडित निश्चलदासजीने अशी शंका केली आहे की अर्जुनाने विश्वरूप विश्वरूपाच्या सभोवार फिरून पाहिले की एका ठिकाणी बसून पाहिले ? स्वतः अनुभव नसतांना अशी पोरकट शंका करणे हास्यास्पद आहे. माऊली म्हणते,

“जयाची सोय वेदा नाकळे। तयाचे सकळावयव एकेचि वेळे ।
अर्जुनाचे दोन्ही डोळे । भोगिते जाहले ”

जे वेदालाहि अगम्य व सर्व प्रपंचरचनेचा ग्रास करणारे अमर्याद विश्वरूप त्याला प्रदक्षिणा कशी करता येणार ? पंडितजींना विश्वरूपाची मर्यादित कल्पना असावी असे दिसते. हे ज्ञानदृष्टीने दिसणारे स्वरूप अर्जुनच झाला होता असेहि पंडितजीने दर्शविले आहे; पण स्वप्नात गेलेला पुरुष आपणच स्वप्नातील बहुरूप होतो, त्याप्रमाणे अर्जुन आपणच विश्वरूप ‘विश्वरूप होऊन’ पाहत होता असे म्हटले तर याला ज्ञान दृष्टीची आवश्यकता कशाला हवी ! सर्व अज्ञानी जीवांना रोज असा अनुभव येतो; पण येथे विश्वरूप दर्शनाचे

वर्णन केले आहे तसे आपण स्वप्नात पाहत नाही. अर्जुनाला विश्व-रूपदर्शनात–

“आपण आंग आपण अलंकार। आपण हात आपण हत्यार।
आपण जीव आपण शरीर। देख चराचर कोंदले देवे”

पूर्वी जे जे पदार्थ निरनिराळे पाहण्यात येत होते ते दर्शन जाऊन सर्व नामरूपात एक भगवंत वस्तूच प्रत्ययाला येत आहे. एका साखरेचे हत्ती, घोडे, उंट, गाय असे रुखवन्त करावे व त्या सर्वांत जशी एक साखर वस्तुच दिसावी, तसे अर्जुनाला विश्वरूप दिसले; पण स्वप्नात असा ऐक्याचा देखावा कधी कोणाला दिसतो का? कधीच नाही; म्हणून विश्वरूपदर्शन स्वप्नासारखे म्हणता येत नाही. स्वप्नदर्शनाला ज्ञानदृष्टीची आवश्यकता नाही.

### दोन प्रकारचे विवर्त

श्री ज्ञानेश्वर माऊलींनी अवतारशरीर कशाप्रकारचे मानिले पाहिजे, याचा आम्ही वर सांगितल्याप्रमाणे

“हे अवतार जे सकळ। ते जिये समुद्रीचे कां कल्लोळ।
विश्व हे मृगजळ। जया रश्मीस्तव दिसे”

या ओवीत सांगितले आहे. वेदान्ताने विवर्तवादाचा अंगीकार करून जीव, जगत् व ईश्वर यांचे ऐक्य आहे, असे प्रतिपादिले आहे. पण पुष्कळ वेदान्ती, ब्रह्म हे नामरूपरहित निर्गुण आहे, असा वेदान्तातील व्यतिरेक विचाराचे प्रमाण मानून नामरूपसहित ब्रह्म पूर्ण सच्चिदानन्द स्वरूप व निरुपाधिक आहे हा वेदान्तातील अन्वय-विचार प्रमाणच मानित नाहीत. वेदान्तात एक व्यतिरेकच सांगितला आहे असे वाटते व त्यामुळे नामरूपात्मक सगुण अध्यस्तविवर्त म्हणजे भ्रांतीने किंवा विपरीत कल्पनेने भासणाराच विवर्त होय

असाच समज धरून ते बसतात, पण श्री ज्ञानेश्वर माऊलीने वरील ओवीत विवर्ताचे दोन प्रकार दोन दृष्टान्ताने सांगितले आहेत. या विवर्ताचे स्पष्टीकरण श्री गुलाबराव महाराजांनी आपल्या ग्रंथातून फार मार्मिक केले आहे. अधिष्ठानाला झाकणारा व त्याचे ज्ञान न होऊ देणारा व ब्रह्मज्ञानाने जो विवर्त निवृत्त होतो त्याला अध्यस्त विवर्त म्हणतात. आणि अधिष्ठानाला न झाकणारा किंवा ज्या विवर्तात अधिष्ठानाचे ज्ञान होते व जो ब्रह्मज्ञानानेहि निवृत्त होत नाही त्याला अनध्यस्तविवर्त म्हणतात. जग हे परब्रह्माचे ठिकाणी अध्यस्त आहे असे वेदान्तात म्हटले आहे. कारण जगाचे अधिष्ठान सच्चिदानन्द ब्रह्म असून ते जगद्वस्तूने झाकले गेले व ते दिसत नाही. म्हणजे त्याचे धर्म जगांत दिसून येत नाहीत. धर्मावरूनच वस्तु जाणली जाते. ब्रह्म सच्चिदानन्द या धर्माचे आहे, पण जग त्याविरुद्ध जड, विनाशी या धर्माचे दिसते. ज्याप्रमाणे सूर्याचे किरणाचे ठिकाणी किरणाचे ज्ञान न होता मृगांना तेथे जळाचे ज्ञान होते, मनुष्यांना मृगजळ काय हे माहित आहे त्यांना जळ दिसत नाही, नुसता भास दिसतो, सूर्याला तर मृगजळ काय चीज आहे हें मुळींच माहित नाही म्हणून मृगजळ अध्यस्तविवर्त म्हटले जाते. तसेच जग हे जगताचे अधिष्ठान जे परब्रह्म त्याला झाकून टाकून भासते, जगरूप कार्यात अधिष्ठान ब्रह्म दिसत नाही. व ब्रह्मज्ञानाने जग मुळीच नाही असा अनुभव येतो. म्हणून ते जग अध्यस्तविवर्त म्हटले जाते. मूळच्या वस्तूचे ज्ञान न होता त्या ऐवजी दुसऱ्याच वस्तूचे ज्ञान होणे यालाच भ्रम म्हणतात. मूळ ब्रह्म वस्तु असताना तिचे ज्ञान होत नाही व त्या ऐवजी निराळ्या जगद्वस्तूचे ज्ञान होते म्हणून जग अध्यस्त किंवा भ्रमरूप म्हटले जाते. पण दृष्टांतातील समुद्राच्या कल्लोळाचा व सिद्धान्तातील अवतार शरीराचा तसा प्रकार नाही. कल्लोळ पाण्याला झाकत नाही व कल्लोळांत पाणी स्पष्ट दिसते आणि अधिष्ठानभूत पाण्याचे

95



ज्ञान झाल्यावरहि कल्लोळ राहतात; म्हणून समुद्राचे ठिकाणी कल्लोळ दुसरी वस्तु नव्हे व अध्यस्तहि नाही. म्हणून पाण्याचा कल्लोळ हा अनध्यस्त किंवा भ्रमरहित अथवा निरुपाधिक विवर्त म्हटला जातो. या अनध्यस्त विवर्ताची सत्ता, अधिष्ठानाची सत्ता असते म्हणून अधिष्ठान अनध्यस्त विवर्तहि सत्य व अविनाशी ठरतो. सारांश रामकृष्णादि अवतार सत्य अविनाशी आहेत, म्हणूनच त्यांची प्रेमभक्ति संतांनी प्रवृत्त केली आहे.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 38000 वि: निवाय
क्रमांक 9420 नों. दि: 90/C/ay
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 13541
REFBK-0013758

# संतविभूति श्रीगुलाबरावमहाराज

यांचे

## विक्रीस तयार असलेले ग्रंथ

| | | किमत |
|---|---|---|
| १. | भक्तिपद तीर्थामृत (भाषांतरासह) ... | १-५० |
| २. | सूक्तिरत्नावली द्वितीय यष्टि ... | २-५० |
| ३. | भागवतरहस्य खंड १-२ (प्रत्येकी) . | २-५० |
| ४. | सूक्तिरत्नावली चतुर्दश यष्टि ... | ५-०० |
| ५. | ,, पंचदश ,, ... | ५-०० |
| ६. | ,, षोडश ,, (संस्कृत) ... | ५-०० |
| ७. | ,, सप्तदश ,, (समयोपदेश) ... | ५-०० |
| ८. | ,, अष्टादश ,, (समयोपदेश) ... | २-०० |
| ९. | मनोहारिणी हिंदी (गीतेवरील व्याख्यानें) . | ०-५० |
| १०. | संप्रदाय सुरतरु (उत्तरार्ध) ... | ३-५० |
| ११. | अभंगाची गाथा ... | २-५० |
| १२. | पदांची गाथा (भाग १-२) ... | ५-५० |
| १३. | स्वमन्तव्यांश सिद्धान्त तुषार (हिंदी) ... | १-५० |
| १४. | अलौकिक व्याख्यानमाला ... | २-०० |
| १५. | श्रीगुलाबरावमहाराज यांचें चरित्र खंड १-२ .. | ८-०० |
| १६. | उपदेशामृत पत्रें भाग १ ... | ३-०० |

– पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें –

१. मधुर प्रकाशन, गोपाल प्रिंटिंग प्रेस, वाकररोड, नागपूर-२

२. हिंदुस्थान साहित्य, ३०९ शनिवार पेठ, पुणें - २

३. श्री ज्ञानेश्वर संस्थान, दहीसात, अमरावती.

।। श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ।।

# विशेष महत्त्वाची सूचना

अंतकाळीं तैसा संकटाचे वेळीं । हरी तया सांभाळी अंतर्बाह्य ।।
संतसज्जनांनीं घेतली प्रचीति । आळशी मंदमति केंवी तरे ।।

—श्रीज्ञानेश्वर महाराज

सर्व सांप्रदायिकांस विशेष महत्त्वाची सूचना देण्यांत येत आहे कीं, पुढें काळ मोठा कठीण येणार आहे; तरी सर्वांना त्याच्यांतून निर्विघ्न सुखरूप पार पडण्याकरितां भगवंताची कृपा पाहिजे व त्यासाठीं सर्व आबालवृद्धांनीं होईल तेवढा अधिकांत अधिक काळ भगन्नामस्मरणांत घालवावा. घरांतील सर्व स्त्रीपुत्रकन्यादिकांनाहि भगवन्नामस्मरणाची उत्तरोत्तर अधिक गोडी व संवय लावावी. त्या निमित्तानें आपल्यासहि अधिक नामस्मरण घडतें. नित्याचा आवश्यक व्यवहार करीत असतांनाहि नामस्मरणाला व्यत्यय येऊं शकत नाहीं. निरर्थक गप्पागोष्टी किंवा परचर्चा चुकून देखील बिलकूल करूं नये. "क्षणार्द्धमपि व्यर्थं न नेयम्" हें भक्तिसूत्र सतत डोळ्यापुढें ठेवावें. सर्वांत मुख्य लक्षांत ठेवण्याची गोष्ट म्हणजे सतत नामस्मरणाबरोबरच श्रीज्ञानेश्वर महाराज व श्रीसद्गुरु-महाराज यांचे ठिकाणीं पूर्ण अचल विश्वास ठेवून सांप्रदायिक बंधुत्व सबल करावें. इति शम्.

श्रीज्ञानेश्वर मंदिर<br>अमरावती

आज्ञेवरून<br>श्रीबाबाजीमहाराज पंडित